म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. १३८८
८२
REFBK-0012315

# अधातलंहरी

श्रीनिवास नारायण बनहट्टी



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे, स्थळप्रत.
३३७७३ वि: १७८५
अनुक्रमांक ...... २३/५/६२
९३५८ नों: दि:

श्री नि वा स
ना रा य ण
ब न ह ट्टी

# आकाशलहरी

REFBK-0012315

मूल्य तीन रुपये

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. ९२३१५

प्रथमावृत्ति १५ मार्च १९६२
सर्वाधिकार सुरक्षित
मूल्य तीन रुपये

प्रकाशक : श्यामकान्त वनहट्टी,
सुविचार प्रकाशन मंडळ,
धनतोली, नागपूर–१; व ४६१।१०
सदाशिव, पुणें–२.

मुद्रक : चिंतामणी सदाशिव लाटकर
कल्पना मुद्रणालय, ४६१।१०
सदाशिव, 'शिव–पार्वती', पुणें–२.

# प्रकाशकांचें निवेदन

प्रा. श्री. ना. बनहट्टी यांचे निरनिराळ्या नियतकालिकांतून प्रसिद्ध झालेले लेख व वेळोवेळीं त्यांनी केलेलीं भाषणें यांचें संकलन व संपादन करून त्यांचे खंडशः प्रकाशन करण्याची एक योजना त्यांच्या कांहीं ख्यातिप्राप्त विद्यार्थ्यांनीं आखली होती, त्या योजनेंतील हा पांचवा खंड, आकाशवाणीवरून त्यांनी केलेल्या भाषणांचा, आज मराठी रसिकांच्या हातीं देतांना आनंद होत आहे. आकाशवाणीच्या नागपूर, पुणें, मुंबई व औरंगाबाद या केन्द्रांवरून त्यांनी गेल्या सतरा अठरा वर्षांत जीं भाषणें दिलीं त्यांपैकीं कांहीं चिरकालीन महत्त्वाचीं भाषणें एकत्रित करून या संग्रहांत शक्य तो कालानुक्रमानें दिलीं आहेत. यांतील कांहीं भाषणांच्या हस्तलिखित प्रती अथवा नियतकालिकांत प्रसिद्ध झालेल्या कांहीं भाषणांचीं कात्रणें लेखकांच्या दप्तरांत मिळालीं. कांहीं भाषणांचे मथळे व तारखा यांच्या फक्त नोंदीच त्यांच्याजवळ होत्या, त्यांतील शक्य तितक्या भाषणांचें संशोधन करून आकाशवाणीच्या संग्रहालयांतून त्यांच्या प्रतिलिपि करवून आणल्या. तरीहि कांहीं भाषणांच्या प्रतिलिपि मिळणें दुरापास्त ठरल्यामुळें त्यांचा समावेश या खंडांत करतां आला नाहीं. कदाचित मुळांत लेखकांच्या दप्तरांतहि कांहीं भाषणांच्या नोंदी नसण्याची शक्यता आहे. तरीहि शक्य तितक्या प्रयत्नानें उपलब्ध झालेल्या सामग्रीचें जास्तींत जास्त कसोशीनें या संग्रहांत संकलन केलेलें आहे, एवढें येथें नमूद करावयास पाहिजे. त्याचप्रमाणें मुद्रणाच्या पूर्वी यांतील भाषणांवरून एकदार अखेरचा हात फिरविण्याचें व कांही भाषणांच्या प्रति अपुऱ्या मिळाल्या, त्यांचा मजकूर नव्यानें लिहिण्याचें कामहि आम्ही लेखकांकडून करवून घेतलें आहे.

हीं भाषणें विविध क्षेत्रांतील अगदीं भिन्न अशा विषयांवर दिलेलीं असल्यामुळें वाचकांना या संग्रहांत भरपूर वैचित्र्य आढळेल, असा भरंवसा आहे. मराठीचे सुप्रसिद्ध साहित्यकार व समीक्षक प्रा. म. ना. अदवन्त यांनीं या संग्रहासाठीं रसग्राही परिचयात्मक उपोद्‌घात लिहून दिला याबद्दल आम्ही त्यांचे फार आभारी आहों.

आकाशवाणीच्या नागपूर केन्द्राचे लोकप्रिय अधिकारी श्री. सीताकान्त लाड यांनी या संग्रहाच्या बाबतींत जें आपुलकीनें सहकार्य दिलें, त्याबद्दल त्यांचेंहि आम्ही ऋणी आहों.

—प्रकाशक

## अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| १ | साहित्यांतील राजकारणी | १ |
| २ | मराठी चरित्र वाङ्मय | ९ |
| ३ | लोकसाहित्याची गंगा | १७ |
| ४ | वारकरी पंथ आणि त्याचें वाङ्मय | २५ |
| ५ | मराठींतील विनोद | ३२ |
| ६ | मराठी साहित्यांतील पहिलें वहिलें | ४१ |
| ७ | सुधारक आणि आगरकर | ४९ |
| ८ | मराठी वाङ्मयाच्या इतिहासाची अखिल भारतीय पार्श्वभूमि | ५५ |
| ९ | ज्ञानेश्वर महाराजांचें चरित्र आणि कार्य | ६१ |
| १० | आधुनिक बंगाली कविता | ७१ |
| ११ | पंडितराय जगन्नाथ आणि त्यांची प्रिया | ७८ |
| १२ | नाटकाचें तंत्र | ८६ |
| १३ | रसविचार | ९२ |
| १४ | पुरुषाच्या दृष्टिकोनांतून पत्नी | १०० |
| १५ | तात्यासाहेबांचें स्मृतिचित्र | १०६ |
| १६ | मराठ्यांच्या सैन्याची उभारणी व रचना | ११३ |
| १७ | सरमा आणि पणि | १२० |

*प्रा. श्री. ना. बनहट्टी — लेखसंग्रह*

| | | | |
|---|---|---|---|
| १ एकावळी–प्रथमावृत्ति १९४१, | | | |
| द्वितीयावृत्ति | १९५१ | ३-०० रु. | |
| संपादक–डॉ. मा. गो. देशमुख | | | |
| २ **नाट्य व रंगभूमि** | १९५५ | ३-०० रु. | |
| ३ **वाङ्मयविमर्श** | १९५५ | ३-५० रु. | |
| ४ **आदरांजलि** | १९५७ | ३-०० रु. | |
| ५ **आकाशलहरी** | १९६२ | ३-०० रु. | |

*लवकरच प्रसिद्ध होत आहे :*

**चिं त न आ णि च र्चा**

[ निरनिराळ्या सामाजिक व तात्त्विक प्रश्नांसंबंधी लिहिलेल्या चिंतनपर लेखांचा संग्रह ].

संग्रहालय ठाणे
१२३९४
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
33943 दि: 
9328 नों: दि: 93/4/28

# रसग्रहण

प्रा. श्री. ना. बनहट्टी यांच्या वेळोवेळीं प्रसिद्ध झालेल्या लेखांचें व भाषणांचें संकलित स्वरूपांत प्रकाशन करण्यासाठी मागे १९५५ सालीं एक प्रातिनिधिक संपादकमंडळ नेमण्यांत आलें होतें. त्यांच्या विविध साहित्य-विषयक लेखांचे व व्यक्तिविवेचनात्मक लेखांचे तीन खंड यापूर्वीच प्रसिद्ध झाले आहेत. ‘नभोवाणी’वरील त्यांच्या भाषणांचा खंड संपादित करण्याचें काम त्यावेळीं माझ्यावर सोपविण्यांत आलें होतें. त्यांच्या नभोवाणीवरील ८-९ भाषणांचीं कात्रणें त्या वेळीं माझ्याकडे आलीं होतीं व त्याच्या प्रकाशनाची योजनाहि पण झाली होती. पण त्या वेळीं तें काम त्यांचीं बरींचशीं भाषणें उपलब्ध होऊं न शकल्याने म्हणा किंवा अन्य कांही कारणाने म्हणा तसेंच राहून गेलें. माझ्या मनाला ती रुखरुख सारखी लागलेली होती. आता देखील त्यांचीं सगळीं भाषणें मिळालीं आहेत असें नाही. उपलब्ध भाषणांपैकी कांही तात्कालिक स्वरूपाची होतीं, तीं वगळण्यांत आलीं. पण चिरकालिक महत्त्वाचीं बरींचशीं भाषणें प्रकाशकांनी एकत्रित केलीं. तेव्हा तीं छापून प्रसिद्ध करण्याची कल्पना मी उत्साहाने उचलून धरली. तेव्हा आज त्यांच्या नभोवाणी-वरील बहुतेक महत्त्वाच्या भाषणांचा खंड प्रकाशित होत आहे याचा मला विशेष आनंद वाटत आहे व त्या संग्रहाला रसग्रहण लिहिण्याची संधि मला मिळाली याबद्दल अतिशय धन्यता वाटत आहे.

तसा प्रा. बनहट्टी यांचा व माझा परिचय गेल्या दहा वर्षांतलाच. प्रा. बनहट्टी यांचा शिष्य होण्याचें भाग्य मला लाभलें नव्हतें पण त्यांच्या साहित्य-

सेवेचा फार पूर्वीपासून परिचय होता. ' मयूरकाव्यविवेचन ', ' एकावलि ', ' द्विविध दर्शन 'मधील विष्णुशास्त्री चिपळूणकरांवरील त्यांचा प्रबंध—या त्यांच्या टीकात्मक ग्रंथांनी त्यांचा वाङ्मयीन परिचय पूर्वीच झाला होता. त्यांचीं नाट्यविषयक व्याख्याने ऐकण्याची संधीहि मला मिळाली होती. पण प्रत्यक्ष परिचय होण्याचा योग मात्र आला नव्हता. तो योग एका व्याख्यानाच्या निमित्ताने आला. जळगावच्या वाचनालयांत व्याख्यान देण्याच्या निमित्तानें आम्ही त्यांना बोलावलें होतें. त्या वेळीं त्यांचा मुक्काम माझ्याकडेच होता. सुरवातीला त्यांच्याशीं वागतांना मला पुष्कळच संकोच वाटे. पण कांही तासांतच तो संकोच दूर झाला. प्रा. बनहट्टी यांचें सौजन्य, मनमोकळा स्वभाव व प्रेमळ वृत्ती यांचा इतका कांहीं पगडा आमच्या मनावर बसला कीं, त्यामुळें आमची कितीतरी जुनी ओळख आहे असें वाटूं लागले. मराठी रंगभूमीचा त्यांचा व्यासंग व त्या विषयाबद्दल मला वाटणारें कुतूहल यांनी आम्ही अधिकच जवळ आलों. आणि आता तर प्रा. बनहट्टी आम्हां उभयतांना घरच्यासारखेच वाटतात. प्रा. बनहट्टी यांच्या स्वभावांतील सौजन्य व गोडवा यामुळेच आम्हां दोघांमधील हें अंतर इतक्या झटकन् कमी झालें.

याच त्यांच्या स्वभावाचा प्रत्यय त्यांच्या लेखनांत व भाषणांत येतो असें त्यांचें टीकाविषयक लेख वाचतांना किंवा त्यांचें भाषण ऐकतांना नेहमी वाटते. गाढा व्यासंग, बहुश्रुतता आणि चिंतन याला सौजन्य व समतोलवृत्ती यांची जोड मिळाल्यामुळे त्यांच्या लेखनांतून वा. म. जोशी यांच्या प्रमाणेंच त्यांचें प्रसन्न व्यक्तिमत्त्व डोकावत असतें. त्यांच्या संशोधक व चिकित्सक वृत्तीची त्यांत भर पडल्यामुळे नवा विचार, नवा मुद्दा आपल्या लेखनांत वा भाषणांत ते सांगून जातात व वाचकांना विचारोन्मुख करतात. साहित्यांतील कोणत्याहि प्रश्नाचा विचार करतांना त्या प्रश्नाच्या मुळाशी जाऊन इतरांना सहसा न दिसणारे त्यांतील बारकावे वाचकांच्या नजरेला आणण्याचे व कोणत्याहि अभिनिवेशाच्या आहारीं न जातां समतोलपणाने त्या प्रश्नाच्या सर्व बाजूंचा विचार करण्याचें सामर्थ्य त्यांच्या विवेचनांत आहे. त्यामुळे त्यांचें टीकाविषयक साहित्य हें सकस, निर्दोष व प्रसन्न असें झालें आहे. त्यांच्या लेखनाचा दुसरा एक डोळ्यांत भरणारा विशेष म्हणजे त्यांतील सर्वंकषता. प्रा. बनहट्टी हे जुन्या साहित्यांत जितके रमतात तितकेच नव्या साहित्याशींहि ते समरस होऊं शकतात. ज्ञानेश्वर, मोरोपंत

किंवा संतकवि यांच्याविषयींचें विवेचन करतांना त्यांत जेवढी त्यांची रसिकता दिसून येईल तितकीच रसिकता आधुनिक नाटकांविषयीं मीमांसा करतांनाहि दिसून येईल. त्यांचे पांडित्य हें एकारलेलें नाहीं. जुन्या नव्याच्या संगमावर तें उभे आहे. आणि या संगमावर उभे असतांना त्यांची रसिकता जुन्या नव्यातील सौंदर्य ज्याप्रमाणे टिपून घेतें त्याचप्रमाणें त्यांची विवेचकशक्ति त्यांतील अनिष्ट प्रवृत्तींचीहि सहानुभूतीनें नोंद करते. मात्र त्या अनिष्ट प्रवृत्तीचें दर्शन घडवितांना त्यांत कुठेहि कटुता येत नाही, कुठेहि उपहासाची व उपरोधाची धार येत नाही! कुठेहि अभिनिवेशाचा दर्प नाही. त्यामुळे सौजन्य व सहानुभूति हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचें जे विशेष, त्यांचें दर्शन त्यांच्या टीकालेखांतून झाल्यावाचून राहत नाहीं.

'आकाश-लहरी' हा त्यांच्या साहित्याचा अगदी निराळा पैलू. हें त्यांचें बोलकें साहित्य आहे. विविध विषयांवर ते आपणाशी अतिशय प्रेमळपणानें हितगूज करीत आहेत असें या भाषणांचें स्वरूप. त्यांच्या विद्वत्तापूर्ण व संशोधनपर लेखांमध्ये किंवा विवेचनपर टीकालेखांमध्ये जे प्रा. बनहट्टी आपणाला दिसतात त्यापेक्षा या त्यांच्या नभोवाणीवरील भाषणांतून दिसणारे प्रा. बनहट्टी निराळेच आहेत. त्यांच्या प्रबंधांतून त्यांच्या विद्वत्तेचें, त्यांच्या संशोधक वृत्तीचें, त्यांच्या चिकित्सक व तर्कशुद्ध दृष्टीचें आणि त्यांच्या बहुश्रुततेचें आपणाला दर्शन होतें. कोणताहि विषय सांगोपांग विवेचकपूर्ण रीतीने मांडण्याचें त्यांचें कौशल्य त्यांच्या त्या लेखांतून दिसतें. पण त्यांच्या या भाषणांत दिसतें तें त्यांचें प्रसन्न व्यक्तिमत्त्व, त्यांचें सहज व अकृत्रिम असें वक्तृत्व व त्यांची प्रेमळ व सौजन्यशील वृत्ती. आपण एका बहुश्रुत आणि प्रेमळ व्यक्तीच्या सान्निध्यांत बसलों आहोंत व विविध विषयांवरील तिचें रसाळ वक्तृत्व ऐकत आहोंत असाच हीं भाषणें वाचतांना भास होतो. यांत पांडित्य आहे, पण पांडित्य प्रदर्शन नाहीं, बहुश्रुतता आहे पण तिची जाणीव नाही, मतप्रदर्शन आहे, पण त्यांत अभिनिवेश नाही. त्यामुळे हीं भाषणें लालित्यपूर्ण विवेचनाचे उत्कृष्ट नमुने आहेत असेंच म्हणावें लागेल.

आकाशवाणीवरील भाषणें म्हणजे अगोदर अनेक दृष्टींनी तारेवरील कसरत असते. अनेक बंधनें त्यांत संभाळावीं लागतात—अनेक पथ्यें पाळावीं लागतात. त्यांत पहिलें बंधन असतें कालमर्यादेचें. ठराविक वेळेच्या बाहेर एक शब्दसुद्धा

जाता कामा नये हा अशा भाषणावर असलेला अत्यंत कडक निर्बंध. धोक्याच्या तांबड्या दिव्याकडे लक्ष ठेवून प्रत्येक शब्द मोजून मापून उच्चारावा लागतो. त्यामुळे दहा किंवा चौदा मिनिटांच्या चौकटींत आपल्या सर्व विचारांची बैठक बसविण्याची करामत आपणाला करावी लागते. कमींतकमी शब्दांत जास्तींत जास्त आशय आणण्याचें कौशल्य या ठिकाणीं पणाला लागतें. 'संयम' या गुणाला या ठिकाणीं अधिक महत्त्व प्राप्त होतें. आपणाला एखाद्या विषयावर खूप बोलवेसें वाटते. नेहमीच्या व्याख्यानांत आपण बोलत असतांना वेळेचें भान आपणांला रहात नाही. पण या ठिकाणीं वेळेचें भान विसरून चालत नाही. तुम्ही भान विसरलां तरी तांबडा दिवा व पुढे सरकत असलेला मिनिट-काटा तुम्हांला त्याची जाणीव करून देत असतो. आणि त्याची कदर न करतां तुम्ही बोलत राहिलां तर तें तुमच्याचपुरतें राहातें. कारण ध्वनिक्षेपक यंत्राचा तुमचा संबंध तांबडा दिवा लागतांच तुटलेला असतो. त्यामुळे आवश्यक तेवढ्याच गोष्टी भाषणांत आणण्याचा संयमहि पाळावा लागतो. वेळेच्या ठराविक मर्यादेंत विषयाचा उपन्यास, प्रपंच व शेवट करावयाचा असल्याने अशा भाषणाला रेखीवता आपोआप येते. आकृति सौंदर्य हा अशा भाषणाचा विशेष म्हटला पाहिजे. आणि शेवटचा महत्त्वाचा गुण म्हणजे वक्तृत्व. वाचत असतांनाहि भाषण केल्याचा, सहज भाषण केल्याचा आभास निर्माण करणें हा अशा लिखित भाषणांचा सर्वांत मोठा गुण. त्यामुळे नभोवाणी भाषणांना बोलकीं भाषणें अशी संज्ञा देण्यांत येतें. या बोलक्या भाषणांत बोलणाराचा व्यासंग, त्याची बहुश्रुतता, त्याची शैली व त्याचें व्यक्तिमत्त्व हीं सर्व प्रगट व्हावीं लागतात. आपल्या शेजारीं बसून वक्ता विविध विषयांवर आपल्याशीं हितगुज करीत आहे अशी हीं भाषणें ऐकणाऱ्या श्रोत्यांची समजूत व्हावयास हवी. आकाशवाणीवरील भाषणें म्हणजे तारेवरील कसरत आहे असें मी विधान केलें तें त्याच अर्थाने.

प्रा. वनहट्टी यांनीं ही तारेवरील कसरत अतिशय यशस्वी रीतीने करून दाखवली आहे हें हीं भाषणें वाचतांना सुद्धा लक्षांत येते. त्यांचीं पुष्कळच भाषणें मी नभोवाणीवरून ऐकलीं आहेत. आणि तीं ऐकत असतांना विषयाची मांडणी करण्याचें त्यांचें कौशल्य, शब्दाची योग्य निवड करण्याचें त्यांचे सामर्थ्य, शैलींतील प्रवाहीपणा व गतिमानता यामुळे त्यांचीं भाषणें अतिशय

अ. क्र. 33953 दि. १२-१-५५ ११
9396 नों. दि. 23.1.52

परिणामकारक वाटत होती. प्रा. बनहट्टी यांच्या वक्तृत्वगुणाचा प्रत्यय त्यांची भाषणें नभोवाणीवरून ऐकत असतांना आम्हांला आलाच होता – पण तीं भाषणें छापील स्वरूपांत वाचतांना त्यांच्या त्याच गुणाचा प्रत्यय पुन्हा आल्याशिवाय राहात नाहीं. कारण हीं भाषणें मनाशीं वाचत असतांना सुद्धा त्यांतील शब्दांची अचूक निवड, त्यांतील सहजता व अकृत्रिमता आणि त्यांत डोकावणारें लेखकाचें मोहक व्यक्तिमत्व यामुळे त्यांतील वक्तृत्व-गुणाचा सहज प्रत्यय येतो. खालील उतारा उदाहरण म्हणून सहज मनाशीं वाचावा म्हणजे मी केलेल्या विधानाचा प्रत्यय येईल.

"लहानपणीं झोपाळ्यावर बसून झोके घेतांना माझ्या बहिणी ओव्या म्हणत असत. मोठमोठे झोके घेण्याचें काम आमचें, ओव्या म्हणण्याचें काम त्यांचें, असा आमच्यांतला श्रमविभाग असे, तो मला सुखकारक वाटे. गोड गळ्याने म्हटलेल्या त्या ओव्या ऐकण्यांत मन तल्लीन होत असे आणि त्यामुळे झोके घ्यायला दुप्पट जोर येई. 'गाण्याने श्रम वाटतात हलके' हा एका प्रसिद्ध कवीने सांगितलेला सिद्धान्त मी याप्रमाणे लहानपणींच अनुभवून चुकलों होतों."

उत्कृष्ट लघुकथेप्रमाणे नभोवाणीवरील भाषणांची सुरवात आकर्षक हवी व शेवटहि परिणामकारक हवा. हीं दोन्ही तंत्रें प्रा. बनहट्टी यांनी फार चांगलीं पाळलेलीं आहेत. 'लोकसाहित्याची गंगा' या विषयावरील त्यांच्या भाषणाचा प्रारंभ वर दिलेला आहे तो किती आकर्षक आहे हें वाचतांना सुद्धा सहज लक्षांत येण्यासारखें आहे. भाषणाचा शेवट समालोचनात्मक हवा तितकाच तो परिणामकारकहि हवा. लघुकथेच्या अखेरीइतकीच भाषणाची अखेरीहि परिणामाच्या दृष्टीने महत्त्वाची असते. प्रा. बनहट्टी यांच्या अनेक भाषणांची अखेर या दृष्टीने पहाण्यासारखी आहे.

हें झालें भाषणाच्या बहिरंगाविषयी पण त्यांच्या भाषणांचें अंतरंगहि त्यांच्या भाषणांच्या बहिरंगाइतकेंच मोहक आहे हें विसरून चालावयाचें नाही. हीं भाषणें वाचत असतांना पहिली गोष्ट मनांत भरते ती त्यांतील विषयांची विविधता. साहित्यापासून ते सामाजिक विषयांपर्यंत बहुविध विषयांना त्यांची विवेचकशक्ति स्पर्श करून जाते. साहित्यविषयक भाषणांतहि विविधता आहे. चरित्र, नाटक, संतवाङ्मय, लोकवाङ्मय, विनोद, रस इत्यादि अनेक विषयांवर

त्यांनी आपले मौलिक विचार प्रगट केले आहेत. त्यांच्या प्रत्येक भाषणांतून विषयाची व्यवस्थित मांडणी केलेली आढळेल — प्रतिपादनांत तर्कशुद्धता आढळेल — व मतप्रतिपादनांत आर्जवीपणा आढळेल. त्यांच्या व्यक्तिमत्वांतील सौजन्याचा प्रत्यय तर विषयप्रतिपादनांत ठिकठिकाणीं आल्यावाचून रहात नाही.

'साहित्यांतील राजकारणी' 'मराठींतील चरित्रवाङ्मय' 'वारकरी पंथ व त्याचें वाङ्मय' 'मराठींतील विनोद' 'मराठी साहित्यांतील पाहिलें वहिलें' 'रसविचार' आणि 'नाटकाचें तंत्र' हें या संग्रहांत आलेलें खास साहित्याचे विषय. कांहींचा विचार त्यांनी समालोचनात्मक पद्धतीने केलेला आहे तर कांहीचा विचार चर्चात्मक पद्धतीने केला आहे. विषयाचें विवेचन कोणत्याहि पद्धतीने केलेलें असलें तरी त्यांत येणारा मुद्दा नवीन असतो — विचार करावयास लावणारा असतो. 'साहित्यांतील राजकारणी'मध्ये साहित्याच्या निरनिराळ्या कालखंडांत राजकारणाच्या कोणकोणत्या प्रवृत्ती होत्या हें सांगून त्यांचें प्रतिबिंब त्या वेळच्या कादंबरीवाङ्मयामध्ये कसें पडलें आहे हें त्यांनी हरिभाऊ आपटे, वामनराव जोशी, पु. य. देशपांडे व ग. त्र्यं. माडखोलकर यांच्या कादंबऱ्यांच्या आधारें दाखविलें आहे व 'सध्याच्या स्थितींतून देशाला ज्या ज्या मार्गांनी पुढे नेणें शक्य आहे त्या त्या मार्गांचें प्रभावशाली व कलापूर्ण दिग्दर्शन करणारें असे वाङ्मय आपणांला सध्याच्या काळीं हवें आहे असा निष्कर्ष त्यांनी काढला आहे. मराठी चरित्रवाङ्मयाचे समालोचन करतांना 'स्वकीय गौरवाची भावना एका बाजूने अशी अतिरेकाला चालली आहे. दुसऱ्या बाजूने जी विशालता तिला यावयास पाहिजे ती मात्र आलेली दिसत नाही,' असें सांगून 'आपल्या स्वकीयत्वाच्या कल्पनेंत अखिल भारताचा समावेश झाला पाहिजे' असें तें म्हणतात व तो फारच थोड्या प्रमाणांत होत असल्याबद्दल हळहळ व्यक्त करतात. 'वारकरी पंथ आणि त्याचें वाङ्मय' हें त्यांचें भाषण म्हणजे रसाळ वक्तृत्वाचा एक सुंदर नमुना आहे. वारी या शब्दाचा अर्थ व वारकरी संप्रदायाचें स्वरूप थोडक्यांत सांगून त्यामध्ये झालेल्या वाङ्मयाचें त्यांनी मोठ्या रसपूर्ण रीतीने वर्णन केलें आहे. त्या वाङ्मयाच्या वर्णनांत ते वाहून जातात — भावनाविवश होतात आणि वाचकांच्या मनोवृत्तींचीहि पकड घेतात. या भाषणाचा खालील नमुना पहा:

"हें वाङ्मय म्हणजे महाराष्ट्र सरस्वतीचा कालिजा आहे, मराठी राष्ट्र-पुरुषाची ती आत्मज्योत आहे. आपण असें पहा की, मराठी वाङ्मयांतून जर ज्ञानेश्वरी वजा केली, एकनाथी भागवत नाहीसें केलें आणि तुकोबाचे अभंग जर गाळून टाकले तर मराठीच्या वाङ्मयी मूर्तीचा कलिजाचा काढून घेतल्यासारखे होणार नाही काय? नामदेव, जनाबाई, तुकाराम यांच्या अभंगा-शिवाय मराठी वाङ्मय ... ही कल्पनाच मुळीं आपणाला सहन होत नाहीं. आपल्या आईशिवाय हें जग असूं शकेल, ही कल्पनाच लहान मुलाला होऊं शकत नाही त्याप्रमाणे ज्ञानेश्वर माउलीशिवाय मराठी भाषा असूं शकेल हें मान्य करण्यास आपण कदापि तयार होणार नाहीं." या उताऱ्यांतील त्यांच्या भावनेशीं कोण समरस होणार नाही.

'मराठींतील विनोदा'ची पूर्वपीठिका सांगतांना विनोदाचा जन्म हसण्याच्या सहज प्रवृत्तींतून कसा झाला हें त्यांनी दाखविलें आहे व मुखपरंपरेने आलेल्या अनेक विनोदांचीं त्यांनी सुंदर उदाहरणें दिलीं आहेत. त्यामुळे हें भाषण ज्या वेळी नभोवाणीवरून श्रोत्यांनी ऐकलें असेल त्या वेळीं त्यांची खूपच करमणूक झाली असेल. पण या मनोरंजक विनोद प्रकारांबरोबर मराठींतील आद्य विनोदकार म्हणून विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या उपहासपर्वाचें स्वरूप त्यांनी स्पष्ट केलें आहे. 'मराठी नाटकाचें तंत्र' हेंहि भाषण त्यांच्या नाट्यव्यासंगाची साक्ष पटविणारें आहे. विष्णुदास भावे यांच्या नाट्यप्रयोगापासून ते Ibsen च्या पद्धतीच्या नाटकापर्यंत मराठी नाटकांत तंत्रदृष्ट्या व प्रयोगदृष्ट्या कोणकोणते बदल होत गेले याचें त्यांनी केलेलें विवेचन अतिशय मूलगामी व सूक्ष्म असें आहे. अतिशय थोड्या अवकाशांत या तंत्रविषयक झालेल्या स्थित्यंतराचें त्यांनी केलेलें दिग्दर्शन त्यांचा मराठी रंगभूमीचा व्यासंग स्पष्टपणें दाखविते. रसविचारांत रसासंबंधीच्या मतमतांतरांचा परामर्श घेऊन 'रस म्हणजे भावो-ल्लास' हेंच सत्य व्यापक दृष्टीने पाहिलें असतां आपणाला कसें गवसतें हें त्यांनी समजवून सांगितलें आहे. हीं साहित्यविषयक निरनिराळीं भाषणें त्यांचा व्यासंग व सखोल अभ्यास स्पष्ट करतातच पण त्यांचा साहित्याकडे पाहण्याचा निर्मळ व प्रसन्न दृष्टिकोनहि दाखवितात. यांतील कांहीं भाषणांत विवेचन अपुरे वाटते हें खरे — समालोचनांतहि कांहीं भाषणांत त्रोटकपणा हेंहि खरे — पण हा दोष ज्या कालमर्यादेने ते बांधले गेले आहेत त्या बंधनाचा

आहे. किंबहुना इतक्या थोड्या अवकाशांत इतके पुष्कळ त्यांनी सांगितलें याचेंच कौतुक वाटू लागतें.

'लोकसाहित्याची गंगा' हें भाषण अनेक दृष्टींनी मला फार आवडलें. त्याची सुरवातच व्यक्तिगत आठवणीने त्यांनी केलेली आहे. त्यामुळे लेखकाबरोबर आपणहि झोपाळ्यावर बसून आपल्या बहिणीने म्हटलेल्या,

'माझ्या दारावरनं । मुलांचा ग मेळा गेला
कंठीवरुनी ओळखिला । भाऊराया'

या ओव्या ऐकतो की काय असा भास होतो. कौटुंबिक जीवनांतील निरनिराळ्या व्यक्तींवर केलेल्या ओव्यांचें दर्शन त्यांनी मोठ्या रसिकतेने घडविलें आहे. ओवीनंतर कहाण्यांचा त्यांनी परिचय करून दिला आहे, व समाजाची अद्‌भुतरम्यतेची आवड पूर्ण करण्यासाठी कहाण्यांची निर्मिति कशी होते हेंहि त्यांनी सांगितलें आहे. भावनांच्या प्रेरणेने निर्माण झालेलीं स्त्रीगीतें व अद्‌भुतरम्यतेच्या आवडीमुळे निर्माण झालेल्या जानपदकथा ह्या दोन लोकसाहित्याच्या भागांत समाजाचें जीवन कसें प्रतिबिंबित झालें आहे हें त्यांनी दाखविलें आहे. हें भाषण त्यामुळेच अत्यंत काव्यपूर्ण पण त्याबरोबरच विवेचनपूर्ण असें झालें आहे. 'ज्ञानेश्वरमहाराजांचें चरित्र आणि कार्य' हेंहि भाषण त्यांच्या शैलीचा एक आगळाच पैलू दाखविते. 'नभोवाणी प्रवचन' असें या भाषणाला नांव दिलें आहे व या भाषणाचा थाटहि प्रवचनाच्यासारखाच आहे. अत्यंत रसाळपणानें सुरवातीला सांगितलेलें ज्ञानेश्वराचें चरित्र श्रोत्यांच्या मनाचा वेध घेते. त्या चरित्रावर त्यांनी बनविलेलें आध्यात्मिक रूपक अभिनव आहे. विठ्ठलपंत म्हणजे परमात्मा, रुक्मिणी म्हणजे माया किंवा प्रकृति असें मूळ रूपक घेऊन निवृत्ती, ज्ञान, सोपान व मुक्ता हें अध्यात्म मार्गाच्या वाटचालीवरील टप्पेच कसे आहेत हें त्यांनी स्पष्ट केलें आहे. या रूपकाच्या अनुषंगानेच त्यांनी ज्ञानेश्वरींतील तत्त्वज्ञानाचें व त्यांतील काव्याचें अतिशय रसिक पद्धतीने विवरण केलें आहे. ज्ञानेश्वरावरील हें प्रवचन त्यांच्या वक्तृत्वाचा व कल्पनाविलासाचा निराळाच पैलू दाखविते यांत शंका नाही.

'मराठी वाङ्मयाच्या इतिहासाची अखिल भारतीय पार्श्वभूमि' हें त्यांचें भाषण प्रासंगिक असलें तरी त्यांतील विचार मौलिक आहेत. मराठी वाङ्म-

याचा इतिहास लिहिणाऱ्यांनी अखिल भारतीय पार्श्वभूमि विचारांत घ्यावी—त्याशिवाय त्यांच्या वाङ्मयाचा इतिहास पूर्ण होणार नाहीं हा विचार नवा आहे. ते म्हणतात, " भारतांतील निरनिराळ्या भाषा आणि आपली मराठी यांच्यामध्ये ही जी अशी सदोदित देवाणघेवाण चालली आहे तिचें संशोधन करून संस्कार, प्रेरणा व अनुकरण यांचे उगम कोठें कोठें व कसे कसे दिसतात यांचा नीट छडा लावल्याखेरीज मराठी वाङ्मयाचा अभ्यास पूर्ण झाला असें कदापि म्हणतां येणार नाहीं. " मराठी वाङ्मयाच्या इतिहासलेखनाचा त्यांनी या नव्या दृष्टिकोनातून केलेला विचार शास्त्रशुद्ध आहे. पण अशी इतिहासलेखनाची दृष्टि आपणाकडे अद्यापि आलेली नाही हेंहि तितकेंच खरें.

'सुधारक आणि आगरकर' व 'तात्यासाहेबांचें स्मृतिचित्र' हीं दोन व्यक्तिगौरवात्मक भाषणें. या दोन्ही भाषणांत त्यांनी आगरकरांचें व तात्यासाहेबांचें कर्तृत्व उलगडून दाखविलें आहे. अर्थात् 'सुधारक आणि आगरकर' हें भाषण अधिक तात्त्विक स्वरूपाचें आहे तर तात्यासाहेबांच्या स्मृतिचित्रांत व्यक्तिगत जिव्हाळ्याचे रंग अधिक भरले आहेत. पहिल्यांत 'सुधारकां'त व्यक्त झालेलें आगरकरांचे लढाऊ व्यक्तिमत्त्व दिसतें तर दुसऱ्यांत तात्यासाहेबांच्या समन्वयवादी स्वभावाचें मोहक चित्रण केलेलें आढळतें. या दोन्ही व्यक्तिचित्रांतून त्यांच्या शैलीचे दोन निरनिराळे पैलू प्रगट झालेले आढळतील. ' 'पंडितराय जगन्नाथ व त्याची प्रिया' आणि 'सरमा आणि पणि', हीं दोन्ही भाषणें अगदी निराळ्याच स्वरूपाचीं आहेत. त्या दोन्हींतहि त्यांची रसिक सौंदर्यदृष्टि प्रतीत होते. व संस्कृत साहित्याचा व्यासंग त्यांत प्रतिबिंबित झालेला दिसतो. त्यांतून काढलेल्या निष्कर्षांतून त्यांची संशोधनदृष्टिहि दिसून येते. 'पंडितराय जगन्नाथ व त्याची प्रिया' या भाषणांत पंडितराय जगन्नाथ व बादशहाची कन्या लवंगी यांच्याविषयीची चटकदार व खमंग वाटणारी आख्यायिका सांगून ती दंतकथा काल्पनिक कशी असावी व त्यांनी केलेल्या भामिनी विलासांतील स्त्रीरूपवर्णनामध्ये विशुद्ध कुलवधूचेंच चित्र कसें दिसतें, लवंगीचा किंवा यवनीचा त्यांत वासहि कसा येत नाही हें त्यांनी आपल्या भाषणांतून दाखविलें आहे. यांतील विवेचन कालमर्यादेमुळें अपुरें वाटतें. पण त्यांतला विचार हा संशोधनाचा विषय होण्यास हरकत नसावी. 'सरमा व

पणि ' या ऋग्वेदांतील संवादसूक्तावरून सरमा व पणि यांच्यासंबंधी ऐतिहासिक संशोधन करण्याचा प्रयत्न त्यांनी या भाषणांत केला आहे. पण या भाषणाचें खरें सौंदर्य आहे सरमा व पणि यांच्या कथेच्या आविष्करणांत. त्या संवादांतून काढलेले निष्कर्ष हा त्या भाषणाचा गौण भाग. त्यांच्या बहुश्रुततेचा प्रत्यय मात्र या दोन्ही भाषणांतून आल्यावाचून राहात नाहीं.

' पुरुषाच्या दृष्टिकोनांतून पत्नी ' या त्यांच्या भाषणांतून व्यक्त होणारीं मतें त्यांचा स्त्रीजीवनविषयक प्रगल्भ व प्रगत दृष्टिकोन व्यक्त करणारी आहेत. ' पत्नी ही सहचारिणी आहे, तिला स्वतंत्र व्यक्तित्व आहे; संसारांत तिचें स्थान पुरुषाच्या बरोबरीचे असून पुरुषाइतकेंच स्वातंत्र्य तिलाहि आहे. ' हे त्यांनी व्यक्त केलेले विचार आगरकरांच्या अनुयायाला शोभण्यासारखेच आहेत. पण त्यांतहि गृहकृत्यामध्ये दक्ष असणारी आणि प्राप्त परिस्थितींत संसाराचा गाडा कर्तबगारीने हाकून त्यांत आनंद मानणारी पत्नी त्यांच्या मतें पुरुषांना अधिक आदर्शभूत वाटत आली आहे. त्यांच्या या मताशीं पुरुष सहमत होतील याची खात्री वाटते. पण आजची शिक्षित स्त्री या मतांशीं कितपत सहमत होईल हें मात्र सांगतां येणार नाहीं.

प्रा. बनहट्टी यांच्या नभोवाणीवरील भाषणांतून व्यक्त होणारे विचार पाहिले म्हणजे त्यांच्या बहुश्रुत व संपन्न व्यक्तिमत्त्वाचें प्रतिबिंब त्यांत कसें पडलें आहे हें दिसून येतें. त्यांच्या टीकालेखांतून त्यांच्या विद्वत्तेचें व व्यासंगाचें दर्शन होत असलें तर त्यांच्या या भाषणांतून त्यांच्या सौजन्यशील व संयत व्यक्तिमत्त्वाचें दर्शन घडतें. हीं भाषणें वाचत असतांना प्रा. बनहट्टींच्या सहवासांत गप्पा मारत असल्याचा आनंद वाचकांना होतो. त्यांच्या सहवासांत त्यांच्या प्रसन्न व्यक्तिमत्वाने, स्नेहशील वृत्तीने, उद्योगशीलतेने व बहुश्रुततेने मनुष्य भारून जातो तोच अनुभव त्यांचीं हीं नभोवाणीवरील भाषणें ऐकतांना श्रोत्यांना आला असेल व तीं मुद्रित स्वरूपांत वाचत असतांनाहि त्याच अनुभवाचा पुनःप्रत्यय आल्यावाचून राहत नाही.

**निदान** मला तरी तसा अनुभव आला आणि हेंच या ' आकाशलहरीं 'चें **खरें यश** आहे असें मला वाटतें.

*म. ना. अदवन्त*

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 33963 वि: ...
क्रमांक 9386 नों: दि: 931-5.1८

१

# साहित्यांतील राजकारणी

आज ज्या विषयावर मी बोलणार आहें, तो महत्त्वाचा आहे अन् तितकाच मनोरंजक पण आहे. आपल्या मराठी वाङ्मयांत कादंबरीकार, नाटककार यांनी नानापरीच्या व्यक्तींचीं जीं चित्रें रेखाटलीं आहेत, त्यांपैकी राजकारणी व्यक्तींच्या चित्रांविषयी थोडेंसें बोलावें असा हेतु आहे.

परतंत्र देशाच्या सार्वजनिक जीवनांत मुख्य स्थान राजकारणाला असणार, हें ठरल्यासारखेंच असतें. आपल्या देशाच्या सार्वजनिक जीवनांत गेलीं साठ-पाऊणशें वर्षें राजकारणालाच प्राधान्य होतें; आजहि तशीच स्थिति आहे. अर्थात् कादंबरीकारांनी सार्वजनिक जीवनाचें चित्रण करतांना राजकारणाच्या क्षेत्रांत धडपडणाऱ्या व्यक्तींना प्राधान्य द्यावें, हें साहजिक आहे. या साहजिक प्रवृत्तीमुळे हरिभाऊ आपटे आणि त्यांच्या मागून येणारे अनेक नामवंत साहित्यकार यांनी राजकारणी व्यक्तींचीं अनेक प्रातिनिधिक व वैशिष्ट्यपूर्ण चित्रें रेखाटलेलीं आपल्या वाङ्मयांत दृष्टोत्पत्तीस येतात.

या चित्रांचें साकल्याने परिपूर्ण अवलोकन थोड्याशा अवकाशांत करणें शक्य नाही. तरी थोडासा मासला आपण पाहूं शकूं.

अव्वल इंग्रजीमध्ये सरकार-दरबारीं युक्तिवाद करणें आणि अर्जविनंत्यांच्या द्वारें आपल्या गरजा पटवून देणें, हाच राजकीय चळवळीचा सर्वसंमत मार्ग होता.

पण पुढे या मार्गाची व्यर्थता पटून स्वार्थत्यागपूर्वक लोकजागृति करण्याचा मार्ग तरुण पिढीने अवलंबिला. चिपळूणकर, टिळक, आगरकर यांनी स्वार्थत्याग करून सरकारच्या रोषाची पर्वा न करतां देशोद्धाराच्या कार्यास वाहून घेण्याचें तेजस्वी उदाहरण घालून दिलें. त्याचा त्या वेळच्या तरुण पिढीच्या मनावर फार मोठा व खोल परिणाम झाला. त्याचे पडसाद हरिभाऊंच्या प्रारंभीच्या कादंबऱ्यांमध्ये स्पष्ट उमटलेले दिसतात. हरिभाऊंनी निर्माण केलेल्या यशवंतराव खरे आणि भाऊ उर्फ भावानंद या मराठी वाङ्मयामध्ये अजरामर ठरलेल्या दोन व्यक्ति अवलोकिल्या म्हणजे त्या काळच्या समाजांत देशाच्या राजकीय उद्धारासंबंधाने विचारी आणि प्रतिभावान अशा व्यक्तींच्या कल्पनांची झेप कोठपर्यंत जाऊं शकत होती, याचें उत्तम दिग्दर्शन होतें.

समाजामध्ये नवीन विचार, नवीन ध्येय आणि नवीन मार्ग उत्पन्न होऊं लागले की जुने विचार, ध्येयें आणि मार्ग यांची थोडीफार अवहेलना आणि टवाळी व्हावयाची हें ठरल्यासारखेंच असतें. असल्या जुन्यांची टवाळी आणि टिंगलबाजी यांनी भरलेल्या वातावरणांत यशवंतराव खरे या प्रखर आणि संस्कारक्षम बुद्धीच्या मुलाची वाढ झाली. जुन्या रावबहादुरी वळणाच्या सार्वजनिक चळवळींची अवहेलना करणारा जो जहाल तरुणांचा वर्ग त्या वेळीं समाजांत निर्माण होऊं लागला होता, त्याचा प्रतिनिधि व पुढारी शोभेल असा हा तल्लख प्रवृत्तीचा देशभक्त कसा निर्माण झाला, हें हरिभाऊंनी फार सुंदर रीतीने दाखवून दिलें आहे. यशवंत हा देशाभिमानी होता, देशोद्धारासाठी स्वार्थत्याग करण्यास तयार होता, परंतु देशोद्धारासाठी काय केलें पाहिजे याविषयीचे त्याचे विचार बव्हंशी प्रतिक्रियात्मक आणि निषेधाच्या स्वरूपाचे होते. जुने मार्ग चुकीचे कसे हें सांगण्यांत तो पटाईत झाला, पण नवे मार्ग अवलंबिले पाहिजेत ते कोणचे व कसे याविषयी निश्चित व स्पष्ट कल्पना त्याला झालेली नव्हती. तो बव्हंशी अंधारांत चांचपडत होता. याचें मुख्य कारण म्हणजे त्याची विचारसंपदा बव्हंशी उसनवारीची, त्याचे विचारगुरु जे श्रीधरपंत त्यांच्यापासून घेतलेली होती. श्रीधरपंत हे अतिशय विद्वान् व देशाविषयी कळकळ बाळगणारे खरे; परंतु तितकेच बुद्धीचे खवचट, निंदाखोर आणि क्रियाशून्य. विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या काळाच्या सुमारास खासगी बोलण्यांत जहाल, परंतु कृतींत शून्य अशा सुशिक्षितांचा एक वर्ग निर्माण झाला होता, त्याचें प्रतीक म्हणून श्रीधरपंत

हें अतुलनीय पात्र हरिभाऊंच्या प्रतिभेने निर्माण केलें आहे.

या श्रीधरपंतांचा यशवंता हा शिष्य. तो समाजामध्ये त्या वेळीं निर्माण होऊं घातलेल्या जहाल तरुण वर्गाचें प्रतीक म्हणून हरिभाऊंनी वाचकांपुढे ठेवला आहे. जुन्या सुधारकांचा मार्ग चुकीचा व अपायकारक आहे. यास्तव त्यांचा वाटेल त्या उपायांनी बीमोड करावयाचा आणि सरकारच्या रोषाची पर्वा न करितां जहाल भाषा वापरून जनतेचा राजकीय असंतोष प्रज्वलित करावयाचा हें एकंदरीने या जहाल पक्षाच्या धोरणाचें सार दिसतें. यशवंताच्या मनोभूमिकेची वाढ या दिशेने कशी झाली, हें फार सुंदर रीतीने हरिभाऊंनी दाखविलें आहे.

त्या काळांत उदयास येत असलेल्या देशभक्तीची निषेधात्मक आणि प्रतिक्रियात्मक अशी बाजू यशवंतराव खरे यांच्या द्वारा हरिभाऊंनी दाखविली, तशीच विधायक आणि उदात्त बाजू 'मी' कादंबरीमध्ये भाऊ उर्फ भावानंद या लोकविलक्षण भूमिकेच्या द्वारा त्यांनी पुढे मांडली आहे. या दोन्ही कादंबऱ्यांमधील प्रतियोगीभाव लक्षांत ठेवण्याजोगा आहे. यशवंता श्रीधरपंतांचा शिष्य तर भाऊ हा शिवरामपंतांचा मुख्य शिष्य. गुरूच्यामध्ये जमीन-अस्मानचें अंतर, तसेंच शिष्यांमध्येहि. श्रीधरपंतांची शिकवण वावदूकपणाची तर शिवरामपंतांची शिकवण विधायक, कृतिप्रधान. यांचें स्वतःचें आयुष्य विधायक सेवावृत्तीचें उत्कृष्ट उदाहरणच होतें. विधायक आणि कृतिमान अशा आदर्शाचें एक सामर्थ्य असें असतें की त्या मार्गाने जाणारे साधक आपल्या गुरुउपदेशाच्या मर्यादेपर्यंत जाऊन तेथेच थबकतात, असें नाही. ते आपल्या विधायक वृत्तीची आपापल्या व्यक्तिसामर्थ्यानुरूप परिसीमा गाठतात. सांदीपनीच्या शिष्यांमधून श्रीकृष्णांसारखा महायोगी निर्माण होणें, हें विधायक उपदेशाचें खरें सार्थक होय. शिवरामपंत आणि भाऊ यांच्या बाबतींत असेंच झालें. भाऊने आपल्या सामर्थ्यास अनुसरून शिवरामपंतांच्या उपदेशाच्या आणि उद्देशाच्या पलीकडे जाऊन फार मोठी उडी मारली. त्याने आपल्या देशाच्या उद्धाराकरिता सर्वस्वार्पण करण्याचें ठरवून संन्यास घेतला आणि निष्काम देशसेवेचा एक नवा संप्रदाय निर्माण केला.

देशाच्या उद्धारार्थ आपलें सर्व आयुष्य वाहून घेणाऱ्या आणि विशिष्ट शिस्तीने अपरिग्रहवृत्तीने राहणाऱ्या सेवकांचा संप्रदाय किंवा संस्था निर्माण करण्याची कल्पना पुढे दहाबारा वर्षांनी नामदार गोखल्यांनी सर्व्हंटस ऑफ इंडिया सोसायटीच्या रूपाने आणि त्याहिपेक्षा प्रभावी स्वरुपांत महात्मा गांधींनी

सत्याग्रहाश्रमाच्या रुपाने अमलांत आणली; परंतु हेच ध्येयभूत विचार हरिभाऊंनी आपल्या कादंबरीमध्ये इतक्या पूर्वीच्या काळीं भावानंद या लोकविलक्षण भूमिकेच्या द्वारें व्यक्त केले, हें हरिभाऊंच्या प्रतिभेचें द्रष्टेपण लक्षांत घेण्याजोगें आहे.

पुढे काळाच्या ओघानुसार देशांतील राजकारणी व्यक्तींच्या मनोभूमिकेमध्ये कसा बदल होत चालला, हें चित्रित करण्याचा उपक्रम हरिभाऊंनी आपल्या आजच आणि कर्मयोग या कादंबऱ्यांमध्ये केला. पण या दोन्ही कादंबऱ्या अपुऱ्या असल्यामुळे त्यांतील भूमिकांचें विशेष उद्घाटन करणें शक्य नाही. दोनतीन प्रवृत्तींचा उद्भव या कालामध्ये, म्हणजे विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकामध्ये झाला असल्याचें त्यांनी मार्मिकपणाने दिग्दर्शन केलें आहे. त्यांचा नुसता उल्लेख येथें करणें बस होईल.

पहिली प्रवृत्ति अत्याचारी क्रांतिवादाची. राजकारणांत जहालपक्ष जो निर्माण झाला होता, त्याची ही एक अपरिहार्य परिणति होती. पुष्कळ जहाल बोलून आणि लिहून कांहीं होईना, तेव्हा राजकर्त्यांना दहशत बसेल अशा तऱ्हेच्या कांहीतरी कृतीचा अवलंब केला पाहिजे असें तल्लख बुद्धीच्या राजकारणी तरुणांस वाटूं लागलें. अशा क्रांतिकारक तरुणवर्गाचा नमुना म्हणून आपल्यांनी ‘आजच’ कादंबरीमध्ये नारायणराव हें पात्र निर्माण केलें आहे. या पात्राची निर्मिति १९०८ सालीं खुदीराम बोसचा पहिला बॉंब पडण्यापूर्वी तीनचार वर्षें हरिभाऊंनी केली. हें त्यांच्या अद्भुत भविष्यसूचक प्रतिभेचें आणखी एक लक्षण ध्यानांत ठेवण्याजोगें आहे.

दुसरी एक विचाराची प्रवृत्ति अशी की आपल्या देशाच्या उद्धारासाठी औद्योगिक चळवळीला प्रामुख्य देऊन देशांत उद्योगधंदे निर्माण केले पाहिजेत. या प्रवृत्तीचे प्रतिनिधिभूत कृष्णराव हें पात्र हरिभाऊंनी “आजच” कादंबरीमध्ये घातलें आहे.

तिसरी प्रवृत्ति अध्यात्माची. विवेकानंदांचा जयजयकार एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस होऊन त्यांचीं भाषणें त्या कालच्या तरुण पिढीच्या वाचनांत आलीं. तेव्हा तिच्या विचारांना एका विशिष्ट तऱ्हेची चालना मिळाली. आपण देशोद्धारार्थ जीं जीं कार्यें, ज्या ज्या चळवळी करुं त्यांना अध्यात्माचें अधिष्ठान असलें पाहिजे, तरच आपल्या देशाचा खरा उद्धार होईल, हें या विचारसरणींतलें

सूत्र होतें. या विचारसरणीचें प्रतिपादन "आजच" व "कर्मयोग" या कादंबऱ्यांमध्ये दोघां स्वामीजींचीं पात्रें घालून हरिभाऊंनी केलें आहे. "कर्मयोग" कादंबरीचा नायक चंद्रशेखर हा अध्यात्मवादी कार्यकर्ता बनतो, असें दाखविण्याचा हरिभाऊंचा उद्देश असावा.

हरिभाऊंची प्रतिभा इतकी विशाल होती व त्यांचें द्रष्टेपण इतकें अद्भुत होतें कीं त्यांनी निर्माण केलेले राजकीय क्षेत्रांतील कार्यकर्त्यांचे जे नमुने आहेत, त्यांच्या पलीकडे कोणाहि कादंबरीकाराची प्रतिभा १९३० सालपर्यंत तरी जाऊं शकली नाही. वामनराव जोशांनी १९१५ सालच्या सुमारास लिहिलेल्या "नलिनी" कादंबरीमध्ये १९०९-१० च्या सुमारास तरुण पिढीमध्ये अत्याचारी क्रांतिवादाची जी एक लाट आली होती, तिचें चित्रण करण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु क्रांतिवादी मनोवृत्तीची मीमांसा किंवा उद्घाटन हा त्या कादंबरीचा प्रतिपाद्य हेतु नसून एक रहस्यमय कथानक सजविण्यासाठी पिस्तुलाशीं खेळ खेळणाऱ्या तीन तरुणांचें स्वभावचित्र रंगवितांना क्रांतिवादाची एक पार्श्वभूमि म्हणून त्यांनी आधार घेतलेला दिसतो.

यापेक्षा वामनराव जोशांनी "इंदु काळे आणि सरला भोळे" या कादंबरींत चितारलेलें विनायकराव भोळे या निष्ठावंत गांधीवादी त्यागी देशभक्ताचें चित्र हृदयंगम वठलें आहे. मराठी कादंबरी वाङ्मयामध्ये अत्यंत सहृदयतेने वर्णिलेल्या ज्या हृदयंगम भूमिका आहेत, त्यांत विनायकराव भोळे या भूमिकेची गणना करावीच लागेल. गांधीजींचा ध्येयवाद, देशोद्धाराकरिता आत्यंतिक त्याग करण्याची प्रेरणा यांचा कायमचा परिणाम होऊन ज्या श्रेष्ठ मनोवृत्तीच्या सुशिक्षितांनी आपलीं आयुष्यें गांधीप्रणीत मार्गाला वाहून घेतलीं, अशांचा कलापूर्ण रीतीने चित्रित केलेला नमुना म्हणून विनायकरावांचें पात्र मराठी वाङ्मयांत अजरामर होईल.

युनिव्हर्सिटीच्या परीक्षांमध्ये उच्च श्रेणीचें यश मिळवून स्वतःला आवडत्या मुलीशीं विवाह केल्यानंतर विनायकराव गांधींच्या ध्येयवादाने आकृष्ट होऊन त्यांच्या सत्याग्रहाच्या चळवळींत सामील होतो. अर्थात त्याला जबर शिक्षा होते. सुटून आल्यानंतर गांधींच्या आदेशानुसार खेड्यांत जाऊन तेथे आश्रम शाळा वगैरे काढतो. विपरीत परिस्थितीशीं टक्कर देत देशकार्य करीत असतांच कष्टांनी आणि विरोधी व्यक्तींच्या कारवायांनी पिचून जाऊन या उदात्त चारित्र्याच्या

तरुणाचा अंत होतो.

आपल्या नागपूरचे विख्यात कादंबरीकार श्री. पुरुषोत्तम यशवंत देशपांडे हे सध्या पूर्ण गांधीवादी व कॉंग्रेसपक्षीय आहेत. परंतु त्यांच्या 'विशाल जीवन' या कादंबरीमध्ये त्यांचा हा दृष्टिकोन प्रतिबिंबित झालेला नाही. प्रस्तुत कादंबरीचा नायक शेतसाऱ्याची माफी मिळविण्याच्या प्रश्नापासून आपल्या सार्वजनिक जीवनास जी सुरवात करतो, तिची अखेर साम्यवादी आणि कामगारांचा कैवारी बनण्यांत होते. ही दिलीपाच्या विचारांची आणि मनोवृत्तीची परिणति श्री. देशपांडे यांनी आपल्या प्रभावी आणि अर्थगर्भ शैलीने वर्णिली असून ती वाचकांच्या मनावर परिणाम केल्याखेरीज राहात नाही.

आतापर्यंत मराठी वाङ्मयांत प्रतिबिंबित झालेलें जें राजकारण वर्णन केलें, तें अधिकारप्राप्तीपूर्वीच्या जमान्यांतील होतें. या राजकारणांतील व्यक्ति या सर्वच जें आपल्यापाशी नाही तें मिळविण्यासाठी झटणाऱ्या, त्यासाठी आपआपल्या मनोवृत्तींनुरूप त्याग करणाऱ्या अथवा त्यागाचें सोंग करणाऱ्या अशा होत्या. परंतु १९१९ च्या मांटेग्युचेम्सफर्ड सुधारणानंतर आपल्या राष्ट्रास थोडे थोडे राजकीय हक्क मिळण्यास सुरवात झाली. तेव्हा अधिकारस्वीकाराचें राजकारण आपल्या देशांतील लोकांनी कसें चालविलें व सध्या चालवीत आहेत, याचें चित्र वाङ्मयांत कोठें उमटलें असल्यास तेंहि पाहिलें पाहिजे.

अधिकारस्वीकाराचें राजकारण चित्रित करणारे सर्वांत अधिक प्रसिद्ध कादंबरीकार श्री. गजानन त्र्यंबक माडखोलकर हे होत. त्यांनी आपल्या 'कांता' या कादंबरी-मध्ये मांटेग्युचेम्सफर्ड सुधारणास अनुसरून मध्य प्रांताचे गृहमंत्रिपद भूषविणारे 'सर महादेव ठाकूर' यांची भूमिका निर्माण करून मराठी वाङ्मयांत एक नवें दालन उघडलें असें म्हणावयास चिंता नाही. सर महादेव यांचें जबरदस्त व्यक्तिमत्त्व, त्यांची मुत्सद्देगिरी, त्यांचा निःस्पृहपणा इ. गोष्टी नेमस्तांच्या जमान्यांतील आदर्शभूत राजकारणी व्यक्ति कशी असे हें उत्कृष्ट रीतीने आपल्या प्रत्ययास आणून देतात.

'कांता' कादंबरीपेक्षा माडखोलकरांची 'मुखवटे' ही कादंबरी अधिक परिणामकारक, परंतु तितकीच बोचक आहे. १९३५ च्या सुधारणा कायद्या-नुसार प्रांतिक स्वायत्तता प्राप्त झाल्यानंतर कॉंग्रेसतर्फे सत्ताग्रहणाच्या युगास सुरवात झाली. १९३७ ते ३९ पर्यंत कॉंग्रेसचें मंत्रिमंडळ आपल्या प्रांतांत नांदलें.

त्यांत मध्यंतरीं घालमेली व उलथापलथीहि झाल्या. तो सर्व इतिहास अलीकडचा व सर्वांस माहीत असलेला असाच आहे. माडखोलकरांनी या काळांत आपल्या प्रांतांत सर महादेव यांचा पुतण्या ‘ प्रियदर्शन ’ हा प्रधानमंत्री झाला असल्याचें वर्णन केलें असून या प्रियदर्शनाचीच प्रमुख भूमिका ‘ मुखवटे ’ या कादंबरींत रंगविली आहे. सध्या प्राप्त झालेल्या लोकशाहीच्या जमान्यांत प्रांताचा मंत्री किंवा सत्ताधारी कसा असावा हें ‘ प्रियदर्शन ’च्या भूमिकेच्या रूपाने दिग्दर्शन करण्याचा माडखोलकरांचा हेतु दिसतो. निष्कलंक चारित्र्याचा, निःस्पृह लोकशाही वृत्तीचा, आणि अतुल धैर्यशाली असा ‘ प्रियदर्शन ’ ही एक आदर्शभूत व्यक्ति आहे, यांत शंका नाही. राजकारणांत चारित्र्यापेक्षा कौटिल्याचीच जरूर असते हें सूत्रवाक्य तो मान्य करीत नाही. देवाणघेवाण किंवा सौदेबाजी यांना तो तिरस्कार्य समजतो. अर्थात अशा तऱ्हेचा ध्येयवादी सत्यव्रत आणि स्पष्टवक्ता देशभक्त प्रधानमंत्रीपदावर टिकू नये आणि थोड्याच अवकाशांत त्याला राजीनामा द्यावा लागून आपली राजकीय आत्महत्या करून घेण्याची पाळी यावी, हें अपेक्षितच होतें.

सत्तेच्या राजकारणांत निरनिराळ्या व्यक्ति निरनिराळे मुखवटे घालून आपलें सत्यस्वरूप लपवून कशा वावरत असतात, लोकशाहीच्या आणि कामगार चळवळीच्या नांवाखाली स्वार्थी वृत्तीचा कसा हैदोस चालू असतो, याचें मोठें भेदक वर्णन मोहन, अण्णासाहेब प्रभृति पात्रांच्याद्वारें माडखोलकरांनी केलें आहे. लोकशाहीच्या जमान्यामध्ये खरें लोककल्याण साधायचें असेल तर कोणत्या गोष्टींपासून व कशाप्रकारच्या व्यक्तींपासून सावध राहिलें पाहिजे हें त्यांनी या पात्रांच्या द्वारां मार्मिकपणाने सूचित केलें आहे यांत शंका नाही.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतरच्या या सत्ताग्रहणाच्या जमान्यामध्ये सत्तेची आणि राजकीय कर्तृत्वाचीं निरनिराळीं क्षेत्रें व हीं कोणत्या रीतीने वापरलीं पाहिजेत हें दर्शविणाऱ्या कादंबऱ्या आणि नाटकें निर्माण व्हावयास पाहिजेत ही गोष्ट खरीच आहे, त्या दृष्टीने माडखोलकरांचा उपक्रम अभिनंदनीय आहे.

सध्याच्या स्थितींतून देशाला ज्या ज्या मार्गांनी पुढे नेणें शक्य आहे त्या त्या मार्गांचें प्रभावशाली व कलापूर्ण दिग्दर्शन करणारें असें वाङ्मय आपणांला सध्याच्या काळीं हवें आहे. यापुढचा राजकारणी पुरुष देशाला, जनतेला स्वकर्तव्याची जाणीव करून देणारा, देशाच्या उन्नतीची कोणती तरी दिशा आखून

घेऊन तिच्यासाठी सर्वस्व अर्पण करून धडपड करणारा असा असावा लागेल. अशा व्यक्तींचें चित्रण आपल्या कादंबरी-नाटकांतून झाल्या तें समाजाला उद्बोधक व मार्गदर्शक ठरेल.

आपल्या नागपूरचे श्री. नाना जोग यांचे 'चित्रशाळा' हें अगदी अलीकडे प्रसिद्ध झालेलें नाटक मला एका दृष्टीने उल्लेखनीय वाटतें. सध्याच्या समाज-रचनेचा अपुरेपणा आणि दोषपूर्णता त्यांत जरा भडक रीतीने चित्रित करण्याचा प्रयत्न केला असून सध्याच्या संघर्षकालामध्ये कलेसंबंधाच्या पूर्वीच्या कल्पना आणि कलेचें पूर्वीच्या जमान्यांतलें स्वरूप इतउत्तर टिकून राहणें कसें शक्य नाही, हें दाखविण्याचा त्यांत प्रयत्न केला आहे. त्यांतील नायक प्रकाश, त्याची पत्नी शोभा आणि विशेषतः साम्यवादी तत्त्वज्ञानाचें प्रतिपादन करणारा मध्यम-वर्गीय कामकरी गोविंद यांचीं चित्रें परिणामकारक वठलीं आहेत.

राजकारणी व्यक्तींचीं चित्रें रंगविण्याच्या बाबतींतहि आपणें मराठी वाङ्मय अशा रीतीने प्रगति करीत आहे. हरिभाऊ आपट्यांच्यासारखा विशाल प्रतिभेचा कलाकार जेव्हा निर्माण होईल तेव्हा स्वातंत्र्याच्या युगांतल्या समाजाच्या हृदयाला हात घालणाऱ्या अजरामर राजकारणी भूमिकांच्या निर्मितीने आपलें वाङ्मय परिपुष्ट होईल.

● ● ●

आकाशवाणी, नागपूर, १६-६-१९४९
प्रसिद्धि, 'युगवाणी', नागपूर, सप्टेंबर १९४९;

२

# मराठी चरित्र वाङ्मय

चरित्रें कशाकरिता लिहिलीं जातात आणि आपण तीं कशाकरिता वाचावयाचीं? चरित्र ही वाङ्मयाची एक महत्त्वाची शाखा आहे आणि कोणत्याहि भाषेंत पाहिलें तरी अत्यंत लोकप्रिय असलेल्या पुस्तकांमध्ये चरित्रांचीं कांही नांवें आढळतीलच. आपल्या मराठींत रमाबाई रानडेकृत 'आमच्या आयुष्यांतील कांही आठवणी', केळकरकृत 'लोकमान्य टिळक चरित्र', लक्ष्मीबाई टिळक यांचीं 'स्मृति-चित्रें', महात्मा गांधींचें 'सत्याचे प्रयोग' हे व यासारखें कांही कांही चरित्रग्रंथ अत्यंत लोकप्रिय झाले आहेत. त्याबरोबरच हवालदारकृत 'रावसाहेब वि. ना. मंडलीक चरित्र' यांसारखे कित्येक जाडजूड चरित्रग्रंथ वाचकांच्या अभावीं कपाटांत धूळ खात पडून राहिलेलेहि आढळतील. असा प्रकार पाहिला म्हणजे मनांत विचार आल्याखेरीज राहात नाही, की चरित्रें कशाकरिता लिहिलीं जातात आणि तीं आपण कशाकरिता वाचतों!

मराठींतल्या एका सुप्रसिद्ध कवीने याचें आपल्यापुरतें उत्तर दिलें आहे. मोरोपंतांनी महाभारतरचनेस प्रारंभ करितांना म्हटलें की

हरि ज्यांचा कैवारी त्या पांडुसुतांसी वंदितों भावें।
वाटे चरित्र त्यांचें कांही आपण तरावया गावें ॥

तसेंच मोरोपंत आणखी एका ठिकाणीं म्हणतात :—

राया हरिचरिताचें गाणें हें वज्र पाप पर्वत रे।

असे उद्‌गार आपल्या जुन्या संतकवींपैकी आणखी कितीएकांनी काढलेले आढळतील. याचा तात्पर्यार्थ हा की परमेश्वराच्या लीलाकथा आणि परमेश्वराच्या भक्तांचीं चरित्रें यांचेंच वर्णन कवीने करावें आणि अर्थात् वाचकाने वाचावें— कारण तीं पावन आहेत, त्यांच्या कीर्तन-श्रवणाने पापांचें निर्दाळण होतें व पुण्य गाठीं पडतें.

जुन्या कवींची दृष्टि आणि वृत्ति बहुशः याप्रमाणे होती. या वृत्तीनेच त्यांनी आपलीं आख्यानें व काव्यें लिहिलीं; महीपतिसारख्यांनी संतचरित्रांचें वर्णन याच वृत्तीने केलें. या वृत्तीविषयी आपल्याला तक्रार करण्याचें कारण नाही. पारमार्थिकवृत्ति आणि ईश्वरभक्तीची भावना यांत वस्तुतः वाईट असें कांहीच नाही. या भावनांच्या प्रभावाने जगांतलें उत्तमोत्तम वाङ्मय निर्माण झालें आहे; आज देखील या भावना लुप्त झाल्या नसून मानवी अंतःकरणावर त्यांचा अंमल चालत आहे. मूळतापीच्या सुप्रसिद्ध धर्माधिकारी घराण्यांतले एक सुप्रसिद्ध पुरुष कै. अण्णासाहेब धर्माधिकारी यांनी अनेक ईश्वरभक्तांचीं चरित्रें वर्णन करणारीं सुंदर आख्यानें रचिलीं असून तीं 'भक्तिभाग्य' नांवाच्या त्यांच्या काव्य-पुस्तकाच्या रूपाने नुकतींच प्रसिद्ध करण्यांत आलीं आहेत. भक्तिभावनेने स्फुरलेले असे अनेक सुंदर ग्रंथ आज घटकेस लिहिले जात असलेले व प्रसिद्ध होत असलेले आपणांस आढळतील.

भक्ति व परमार्थ यांचें महत्त्व याप्रमाणे सनातन आहे. पण हें पुरेसें आहे काय ? चरित्रें काय फक्त एवढ्याच हेतूने लिहिलीं जाऊं शकतात ? आणि आपण वाचक काय केवळ एवढ्याच हेतूने चरित्रग्रंथ वाचतों ? मोरोपंतांना पारमार्थिक दृष्टि हीच पुरेशी वाटली असेल, पण आजकालच्या उच्च दर्जाच्या लेखकाला आणि सर्वसामान्य वाचकाला ती पुरेशी किंवा सर्वव्यापी वाटणार नाही. चरित्रवाङ्मय इतर अनेक हेतूंनी निर्माण होतें आणि अनेक कारणांस्तव तें आपणाला वाचनीय व आनंददायक वाटतें.

आपण मराठींतील चरित्र-वाङ्मयाचा एक धावता आढावाच घेऊं या; म्हणजे त्यावरून चरित्रें कोणत्या हेतूंस्तव कसकशीं लिहिलीं जातात आणि तीं कोणत्या कारणांस्तव वाचकांना आवडतात व मान्य होतात याचा आपोआप उलगडा होऊन जाईल.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 33963 वि: ...
क्रमांक 9366 नों: दि: ...


मोठी आनंदाची व लक्षांत ठेवण्याची गोष्ट ही की मराठी वाङमयाचा प्रारंभच मुळी चरित्ररचनेने झालेला आढळतो. मराठींतील ग्रंथरचनेचा प्रारंभ महानुभाव पंथांतील विद्वानांनी केला. त्या पंथांतील कांही ग्रंथ ज्ञानेश्वरीच्याहि पूर्वीचे आहेत, ही गोष्ट आता सर्वमान्य झाली आहे. महानुभव पंथ संस्थापक श्रीचक्रधर यांची माहिती एकत्र करून त्यांच्या माहीभट नांवाच्या विद्वान शिष्याने ‘लीळाचरित्र’ नामक ग्रंथ तयार केला तोच मराठींतील पहिला चरित्रग्रंथ असें आपणांस म्हणतां येतें. हें लीळाचरित्र मराठी भाषेंतील अगदी पहिल्यावहिल्या ग्रंथांपैकी एक होय; त्याचा काळ ज्ञानेश्वरीच्या पूर्वीचा असावा असें विद्वानांचें म्हणणें आहे.

लीळाचरित्राप्रमाणे श्रीचक्रधरांचे पूर्वावतार श्रीचक्रपाणि आणि गुरु श्री गोविंदप्रभु यांचीं चरित्रें महानुभाव पंथांत लिहिलीं गेलीं, तींहि त्याच काळांतलीं आहेत. चक्रधरांचे शिष्योत्तम नागदेवाचार्य यांचेंहि चरित्र ‘स्मृतिस्थळ’ या नांवाने प्रसिद्ध आहे.

हीं सर्व चरित्रें सरळ सोप्या गद्यामध्ये लिहिलेलीं असून त्यांत चरित्रविषयक व्यक्तींच्या कथा एकामागून एक कथन केल्या आहेत. त्या काळच्या मानाने पाहतां कालानुक्रम, विश्वसनीयता या ऐतिहासिकतेच्या दोन तत्त्वांचें पालन करण्याचा कटाक्ष आहे, पण हेतु मात्र पारमार्थिक आहे. अशा रीतीने जुनी भाविकता व आधुनिक ऐतिहासिकता यांचें चमत्कारिक व मजेदार मिश्रण या चरित्रग्रंथांत झालें असल्याचें आपल्या अनुभवास येतें.

महानुभावीय कवींनी श्रीकृष्ण व इतर ईश्वरावतार यांच्या लीलांवर आख्यानात्मक काव्यें पुष्कळ लिहिलीं आहेत. पण त्यांना अर्थात् चरित्रग्रंथांमध्ये गणतां येणार नाही.

महानुभावांचा हा आद्य प्रयत्न पाहिल्यानंतर सुमारें चारशें वर्षांचें अंतर तोडून आपणांला शिवकालांत उतरावें लागेल. मध्यंतरींच्या काळांत चरित्रात्मक रचना अगदीच झाली नाही असें नाही. जी झाली ती भाविकपणाच्या गडद छायेने झाकोळलेली अशी आपणांस भासते. तिचा उल्लेख थोड्याशा अवकाशानंतर करूं. जिला खरेंखुरें चरित्र म्हटल्यास साजेल अशी रचना मराठींत पुन्हा नव्याने शिवकालाच्या अखेरीस होऊं लागलेली दिसते. ‘शिवरायाचा आठवावा प्रताप, शिवरायाचा आठवावा साक्षेप’ असा समर्थ रामदासस्वामींनी जिथे उपदेश केला, तिथे मराठमंडळांतल्या इतर स्वराज्याभिमानी विचक्षण पुरुषांना

सर्वथैव नूतन सृष्टि निर्माण करणाऱ्या आपल्या प्रतापी शिवभूपतीचें चरित्रगान करावें असें वाटलें असल्यास त्यांत नवल काय? शिवाजीमहाराजांचीं चरित्रें ज्यांना आपण सामान्यतः बखरी म्हणतों, पुष्कळच लिहिलीं गेलीं. त्यांपैकी नऊ-दहा बखरी प्रसिद्ध असून सभासद बखर, चिटणीसकृत सप्तप्रकरणात्मक चरित्र, वगैरे कांही चरित्र या नात्याने उच्च दर्जाच्या आहेत.

शिवाजीमहाराजांप्रमाणेच त्यांच्या वंशांतील संभाजी, राजाराम वगैरे छत्रपति आणि इतर कांही ऐतिहासिक प्रसिद्ध पुरुष यांच्याहि बखरी लिहिल्या गेल्या. पुष्कळशा बखरी व्यक्तिचरित्राच्या स्वरूपाच्या नसून घराण्यांचे अथवा राज्यांचे इतिहास या स्वरूपाच्या आहेत. इतिहास आणि चरित्र या वाङ्मयप्रकारामध्ये भेद कल्पिणें हें त्या काळच्या लेखक वाचकांच्या फारसें गावीं नसावें. दोन्हींचा हेतु एकच–'पूर्वज–गौरव' हा. आपल्या पूर्वजांमध्ये एखादा अलौकिक प्रतापी कोणी झाला असेल तर त्याचेच तेवढे गौरव स्वतंत्रपणाने करण्याची बुद्धि साहजिकच होते. ही महापुरुष-गौरवाची बुद्धि शिवरायावर ज्या अनेक बखरी लिहिल्या गेल्या त्यांच्या बुडाशीं होती, असें आपण म्हणूं शकतों.

या महापुरुषगौरवाच्या बुद्धीचा पारमार्थिक वृत्तींशीं संयोग होऊन त्यांतून संत-चरित्रें निर्माण झालीं. संत हे तरी महापुरुषच; मात्र त्यांचें क्षेत्र परमार्थ, भक्ति हें. अर्थात् त्यांच्या चरित्रांच्या वर्णनांत परमार्थाच्या व भाविकपणाच्या वृत्तीला प्राधान्य आलेलें दिसतें – अशीं संतचरित्रें कित्येक कवींच्या स्फुट काव्यांमध्ये आलेलीं आहेत. सामान्यतः चरित्रें म्हणून ओळखलीं जात नसलीं तरी त्याच प्रकारांत ती जमा होण्याजोगीं आहेत. उदाहरणार्थ, नामदेवांचे तीर्थावळीचे अभंग हे खरें म्हटलें तर ज्ञानेश्वरांचें चरित्रच आहे. पण जाणीवपूर्वक संतचरित्र लिहिणारा एक मोठा साक्षेपी, प्रेमळ व भाविक रचनाकार म्हणजे महीपति. उद्धव-चिद्घन, निरंजन माधव इत्यादि संतचरित्रकार महीपतीच्या पूर्वी होऊन गेले, पण महीपतीचा आटोप व साक्षेप कांही विशेषच होता. महिपतबोवा ताहराबाद-करांनी भक्तविजय, संतविजय, संतलीलामृत, भक्तलीलामृत, असे अनेक संतचरित्रपर ग्रंथ लिहिले असून त्यांत कित्येक संतांचीं चरित्रें अनेकवार ग्रथन करण्यासहि त्यांनी मागेपुढे पाहिलेलें नाही.

राष्ट्राचें वयोमान जसजसें वाढत जातें तसतसा इतिहास साठत जातो व राष्ट्राचें नांव उजळणारे महापुरुषहि अनेक होत जातात. तेव्हा पूर्वजगौरव आणि

महापुरुषगौरव या दोन प्रवृत्ति वाढत जाऊन चरित्रग्रंथ उत्तरोत्तर जास्त जास्त निपजूं लागावे. इतर जिवंत राष्ट्रांमध्ये खरोखरी असाच प्रकार होत असतो. पण महाराष्ट्रांत इंग्रजी अंमल सुरू झाल्यानंतर कांही काळपर्यंत ही अगदी स्वाभाविक प्रवृत्ति लुप्त झाल्यासारखी झाली. आपल्या राष्ट्राला संस्मरणीय असा कांही इतिहास आहे, अलौकिक कर्तबगारी करून दाखविणारे महापुरुष आपल्या राष्ट्रांत निपजले आहेत याची जाणीवच मुळी एकदम नाहीशी झाली. अशा काळांत चरित्रें निपजलीं, तीं कसलीं व कोणाचीं? तर पीटर धि ग्रेट, ड्यूक ऑफ वेलिंग्टन, कॅप्टन कुक यांचीं आणि तींहि भाषांतरवजा !

हीं लक्षणें १८७०-७५ च्या सुमारास पालटूं लागलीं. विष्णुशास्त्री चिपळूण-करांच्या उद्दीपक लिखाणाने आणि इतर अनेक कारणांनी स्वत्वाभिमान, स्वदेशाभिमान लोकांमध्ये जागृत होऊं लागला. आपण कोण होतों, कसे होतों, आपल्यांत महान व्यक्ति कोण व कशा होऊन गेल्या, हें पाहण्याची जिज्ञासा उद्भवली. तिचा परिणाम वाङ्मयांत दिसूं लागला. रामदास, एकनाथ यांसारखे संत, बाजीराव, शिवाजी यांसारखे राजकीय पुरुष यांचीं चरित्रें होऊं लागलीं. कुंटे, लेले, यांनीं काव्यात्मक शिवचरित्रें लिहिलीं. बापटांनी बाजीरावांचें चरित्र लिहिलें. पारसनिसांनी झाशीची राणी लक्ष्मीबाई हिचें चरित्र लिहिलें. अशा रीतीने चरित्रवाङ्मय हळूहळू पुष्ट होऊं लागलें. धनुर्धारीच्या-सारखे चटकदार भाषा लिहिणारे लेखक देशाभिमान उद्दीपित करण्यास पुढे सरसावले. त्यांनी जनकोजी शिंदे, हरिपंत फडके इ० स्वदेशीय वीर मुत्सद्द्यांचीं सुमारे १०-१५ चरित्रें द्रुतगतीने लिहून प्रसिद्ध केलीं.

स्वदेशाभिमानाच्या भावनेंतून इतिहासाचें अवलोकन व संशोधन करण्याची वृत्ति उद्भवली. अशा वृत्तींतून खरे शास्त्रीबोवांनी लिहिलेलें नाना फडणिसाचें चरित्र, नातूकृत महादजी शिंदे चरित्र, पारसनीसकृत ब्रह्मेंद्रस्वामी इत्यादि अनेक चरित्रें निर्माण झालीं आणि अजून हा क्रम सुरूच आहे. रियासतकार नानासाहेब सरदेसायांनी आपल्या बऱ्याचशा लिखाणाला चरित्र ग्रंथांचें स्वरूप दिलें आहे.

स्वत्वाभिमान आणि स्वदेशाभिमान एकदा जागृत झाल्यानंतर पूर्वजगौरव आणि महापुरुषगौरव या मध्यंतरीं कांही काळ अस्तंगत झालेल्या भावना पुन्हा निर्माण होण्यास फारसा उशीर लागला नाही. महाराष्ट्राचा आधुनिक इतिहास जसजसा बनूं लागला तसतशी त्यांतील दिवंगत व्यक्तींचें चरित्र लिहून त्यांचे

गौरव करण्याची व त्यांची स्मृति चिरकाल जागृत ठेवण्याची बुद्धीहि निर्माण होऊं लागली. अशा रीतीचा पहिला उल्लेखनीय प्रयत्न म्हणजे काशीबाई कानिटकर यांनी लिहिलेलें डॉ. आनंदीबाई जोशी यांचें चरित्र हा होय. पुढे विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचें चरित्र त्यांचे बंधु लक्ष्मणराव यांनी लिहिलें. हीं दोन्ही चरित्रें वाङ्मयप्रांतांत बरींच गाजलीं.

स्वकीयगौरवाची ही प्रवृत्ति १९२० नंतर फारच भरास आली असून आधुनिक महाराष्ट्रांत होऊन गेलेल्या एकूणएक नामांकित व्यक्तीचें चरित्र लहान-मोठें, बरेंवाईट, कसें कां होईना – लिहिलें गेलें आहे असे आपण म्हणूं शकतों. फाटककृत न्या. रानडेचरित्र, केळकरकृत टिळकचरित्र, लठ्ठेकृत शाहू छत्रपति-चरित्र, मुजुमदारकृत किर्लोस्करचरित्र, करंदीकरकृत सावरकरचरित्र हीं त्यांतलीं कांही प्रमुख म्हणून उल्लेखितां येतील. लोकहितवादी, विष्णुबुवा ब्रह्मचारी, तेलंग, भांडारकर, मंडलीक, जांभेकर, आगरकर, राजवाडे, हरि नारायण आपटे, ज्योतिबा फुले, बाबा पदमनजी, जावजी दादाजी, कर्वे, विजापूरकर, शिंदे, गडकरी, परांजप, खाडिलकर, भिन्न भिन्न क्षेत्रांतील अनेकानेक कार्यकर्त्यांचीं चरित्रें मराठींत झालीं आहेत. स्वकीयगौरवाची किंबहुना आत्मगौरवाची ही भावना अलीकडे इतकी फोफावली आहे की कुणी एखादा व्यापारी अगर दुकानदार आपल्या धंद्यांत यशस्वी झाला, किंवा एखाद्या लेखकाने दोनचार पुस्तकें लिहिलीं की त्याचें चरित्र मासिकांतून अगर साधल्यास स्वतंत्र पुस्तक रूपाने फडकविण्यांत येतें व असलेल्या नसलेल्या गुणांची संभावना करून त्याला महाविभूति बनविण्यांत येतें.

स्वकीयगौरवाची भावना एका बाजूने अशी अतिरेकाला जात चालली आहे. दुसऱ्या बाजूने तिला जी विशालता यायला पाहिजे ती मात्र आलेली दिसत नाही. आपल्या स्वकीयत्वाच्या कल्पनेंत अखिल भारताचा समावेश व्हायला पाहिजे; पण तो फारच थोड्या प्रमाणांत झालेला दिसतो. राजा राममोहन राय, गांधी, नेहरू, रवीन्द्रनाथ टागोर, लाला लजपतराय, रामकृष्ण परमहंस, विवेकानंद, रामतीर्थ, दयानंद यांच्यासारख्या दिगन्तविख्यात पंचवीस-तीस व्यक्ति सोडल्या तर कितीशा भारतीय थोर पुरुषांचीं चरित्रें मराठींत झालेलीं आढळतील? तामिळनाड, केरळ, उत्कल, आंध्र, कर्नाटक या प्रांतांतील फारच थोड्या महनीय व्यक्तींची जीवनरेषा चरित्रद्वारा मराठींत आलेली आहे.

आमची भावना भारताला व्यापण्याइतकीहि विशाल होऊं शकत नाही, मग भारताबाहेरील व्यक्तींविषयी काय सांगावें ? युरोप, अमेरिका, आणि चीन या देशांतील कांही विख्यात व्यक्तींचीं चरित्रें मराठींत झालीं आहेत, हें खरें. पण जितकें व्हावयास पाहिजे त्या मानाने हें माप कमीच भरतें असें मला वाटतें.

चरित्रवाङ्मयाचा अत्यंत गोड प्रकार म्हणजे 'आत्मचरित्र'! मराठींत आत्मचरित्रें बरींच झालीं आहेत व त्यांतलीं बहुतेक गोड आणि मूल्यवान आहेत. याचें मुख्य कारण हें की तीं केवळ आत्मनिवेदनाच्या हेतूने लिहिलेलीं आहेत. त्यामुळे त्यांत कृत्रिमतेचा लवलेश आलेला नाही. आत्मचरित्र हें आत्मगौरवाकरिता किंवा आत्मप्रसिद्धीकरिता लिहिलें जाऊं शकतें. हा आत्मचरित्रांचा कनिष्ठ वर्ग होय. यापेक्षा आत्मसमर्थनाच्या हेतूने लिहिलेलीं आत्मचरित्रें थोडीं वरच्या दर्जाचीं; आणि निरपेक्ष आत्मनिवेदनाच्या हेतूने निर्भेळ सत्य तेंच प्रांजलपणे सांगणारीं आत्मचरित्रें सर्वांत श्रेष्ठ होत.

आत्मचरित्राच्या विभागांत रमाबाई रानडे यांचें 'आमच्या आयुष्यांतील कांही आठवणी' आणि लक्ष्मीबाई टिळक यांचीं 'स्मृतिचित्रें' सर्वांत अधिक सरस ठरतील. प्रांजल, निष्कपट मनाने आणि पूर्ण निरपेक्षतेने केलेलें आत्म-निवेदन या दोन पुस्तकांत आढळेल. जें घडलें तें जसें अंतःकरणांत ठसलें, तसेंच स्त्रीसुलभ जिव्हाळ्याने वाचकांपुढे मांडलें. या अकृत्रिमतेमुळे या दोन्ही पुस्तकांना अवीट गोडी आली आहे. प्रसिद्ध व्याकरणकार दादोबा पांडुरंग यांनी लिहिलेलें लहानसें आत्मचरित्र असेंच सहजसुंदर वठलेलें आहे. खरेंखुरें आत्मा-विष्करण ज्यांत झालें आहे अशीं आणखी कांही आत्मचरित्रें मराठी वाङ्मयास भूषवीत आहेत. एक विठ्ठल रामजी शिंदे यांच्या आठवणी, दुसरें स्वातंत्र्यवीर सावरकर यांची माझी जन्मठेप, व तिसरें कमलाबाई देशपांडे यांचें 'स्मरणसाखळी'. धर्मानंद कोसंबी यांचें 'निवेदन', अण्णासाहेब कर्वे यांचें 'आत्मवृत्त' श्री. गोविंदराव टेंबे यांचा 'जीवनविहार' हीं हि जवळ जवळ तितकींच चांगलीं आहेत. कारण त्यांत प्रांजळ निवेदनाची वृत्तिच बव्हंशी प्रकट झालेली आहे. तात्यासाहेब केळकरांच्या 'गतगोष्टीं'ना आत्मसमर्थनाचा मधूनमधून वास लागलेला आहे. बाकी तेंहि त्यांच्या इतर लिखाणाप्रमाणे सुगम व सुरस वठलें आहे.

भाषांतरित आत्मचरित्रांमध्ये महात्मा गांधींचें 'सत्याचे प्रयोग' याला अग्र-

स्थान दिलें पाहिजे हें उघड आहे.

चरित्रवाङमयाच्या या अति त्रोटक आढाव्यावरून काय दिसून येतें? ईश्वराचें आणि ईश्वराच्या भक्तांचें चरित्र गुणगान करावें, हा जो पूर्वीच्या कवींचा दंडक, त्यापासून आमच्या चरित्र-लेखकांचें लक्ष ढळून ते पूर्वजगौरव आणि महापुरुषगौरव या हेतूंवर शिवोत्तर कालांत स्थिर झालें. पुढे इंग्रजी अमदानींत कांही वर्षें विस्मृतीच्या अंधकारांत गेल्यानंतर स्वत्वाभिमान जागृत होऊन महापुरुषगौरवाची पूर्वीची भावना पुन्हा प्रस्थापित झाली. पण केवळ 'स्वकीयांचा गौरव' असें अतिरेकी व संकुचित स्वरूप तिला प्राप्त होऊन मंडलीकचरित्रासारखीं कंठाळी चरित्रें किंवा दुकानदारांचीं अगर बुवामहाराजांचीं फुगवटी चरित्रें निर्माण होण्यांत त्याचें पर्यवसान झालें. आत्मचरित्रांचा विभाग मात्र प्रांजळ आत्मनिवेदनाची व आत्माविष्कारांची वृत्ति त्यांत प्रभावी असल्यामुळे हृदयंगम झाला आहे. बाकीचें आपलें चरित्रवाङ्मय संकुचित स्वगौरवाच्या डबक्यांत बुचकळ्या मारण्यांत समाधान मानीत आहे.

आपली स्वकीयगौरवाची भावना अधिकाधिक व्यापक होत होत, निरपेक्ष जिज्ञासा किंवा निर्मळ कुतूहलबुद्धि यांच्यामध्ये तिची परिणति झाली पाहिजे. स्वदेशांतील वा नाना देशांतील व्यक्तींच्या जीवनाविषयी कुतूहल वाटावें, त्यांतील कित्येकांच्या जीवनाशीं सहृदयतेने समरस होऊन मानवी जीवनाचे नवलपूर्ण देखावे पाहिल्याचा आनंद स्वतःच्या मनाने अनुभवावा आणि त्या आनंदाचे वाटेकरी इतरांस करण्यासाठी स्वतः पाहिलेला जीवनाचा चित्रपट कलापूर्ण वाणीने वर्णावा अशी क्रिया आमच्याकडे घडत असल्याचे फार करून अनुभवास येत नाही. असें होईल तेव्हाच आपलें चरित्रवाङ्मय कलापूर्ण चंद्राप्रमाणे विलसणारें मनोहर दिसूं लागेल.

● ● ●

आकाशवाणी, नागपूर, १७-१०-१९५१.

३

# लोकसाहित्याची गंगा

लहानपणीं झोपाळ्यावर बसून झोके घेतांना माझ्या बहिणी ओव्या म्हणत असत. मोठमोठे झोके घेण्याचें काम आमचें, ओव्या म्हणण्याचें काम त्यांचें, असा आमच्यांतला श्रमविभाग असे, तो मला सुखकारक वाटे. गोड गळ्याने म्हटलेल्या त्या ओव्या ऐकण्यांत मन तल्लीन होत असे आणि त्यामुळे झोके घ्यायला दुप्पट जोर येई. 'गाण्याने श्रम वाटतात हलके' हा एका प्रसिद्ध कवीने सांगितलेला सिद्धान्त मी याप्रमाणें लहानपणींच अनुभवून चुकलों होतों.

बहिणींनी म्हटलेल्या ओव्या आवडण्याचें एक मोठें कारण असें होतें की, बहुतकरून त्या ओव्यांमध्ये 'भाऊराया'चें महत्त्व वर्णन केलेलें असायचें. ती स्तुति, तो मोठेपणा भाऊ या नात्याने सगळा आपल्याला लागू पडतो, हें मनांत येऊन आम्हांला स्वतःविषयी मोठा अभिमान वाटे. मराठींत झोपाळ्यावरल्या ओव्यांचा जो उमाप साठा आहे. त्यांत बहिणींनी आपल्या भाऊरायाचें अपार कौतुक केलेलें आहे. जुन्या काळीं, जेव्हा बालविवाह रूढ होते, तेव्हा लहान मुलींना सासरच्या अगदी परक्या जाचक वातावरणांत एकदम जाऊन पडावें लागे. त्या भयानक परिस्थितींत आपला भाऊ हा मोठा आधार त्यांना वाटायचा. आधाराची असोशी अतिशय सुंदर रीतीने व्यक्त करणारा 'पाठीराखा' हा शब्द भावालाच उद्देशून मुळांत प्रचारांत आला. सासरीं गेलेल्या मुलीचें शरीर जरी घरकामांत गुंतलेलें असलें तरी मन घरासमोरच्या वाटेकडे असायचें. दारावरनं कुणी गेला की हा आपला भाऊराया तर नाही ना, अशी उत्सुकता वाटायची. म्हणून भावावर ज्या ओव्या रचल्या गेल्या त्यांपैकी पुष्कळशा ओव्यां-

मध्ये 'माझ्या दारावरनं' हें पालुपद प्रारंभी असलेलें आढळतें.

माझ्या दारावरनं। मुलांचा
ग मेळा गेला। कंठीवरुनी
ओळखीला। भाऊराया ॥

अशा रीतीनें आमच्या बहिणी म्हणूं लागल्या म्हणजे 'माझ्या दारावरनं' हें पालुपद असलेल्या पांचपंचवीस तरी ओव्या त्या म्हणून जात असत. त्यांतली एक ओवी तिच्यांतील वैचित्र्यामुळे आणि नादमाधुर्यामुळे माझ्या अद्याप चांगली लक्षांत राहिली आहे.

माझ्या ग दारावरनं।
कुणी गेला ग चंगीभंगी। हातीं
रुमाल पंचरंगी। भाऊराया ॥

या ओवीची त्या वेळीं मोठी गंमत वाटे. त्या वयांत चंगीभंगी या शब्दाचा अर्थ कांहीच कळत नव्हता. पण आपल्या भाऊपणाचें कांहीतरी ठसकेबाज वर्णन यांत आहे असें वाटून मन संतुष्ट होई.

आता ऐतिहासिक दृष्टीने पाहून मी असें म्हणू शकतो की थोडाबहुत इष्क आणि रंगेलपणा करणें हें ज्या काळांत प्रतिष्ठितपणाचें मानलें जात असे अशा पेशवाईच्या काळांत रचलेली ही ओवी असली पाहिजे. अशा रीतीनें त्या त्या काळाच्या परिस्थितीला धरून ओव्या रचण्याचा आमच्या बायकांचा हा उद्योग निरंतर चाललेला आहे. इतिहासांतल्या भिन्न भिन्न प्रसंगांवर, वीर पुरुषांवर बायकांनी ओव्या रचल्या आहेत. तसेंच अलीकडच्या काळांत झालेल्या राजकीय चळवळी, आंदोलनें, राष्ट्रीय पुढाऱ्यांचीं उदात्त चरित्रें या गोष्टी देखील ओव्या रचणाऱ्या मार्मिक भगिनींच्या नज़रेंतून सुटलेल्या नाहीत. साने गुरुजींनी 'स्त्री जीवन' या नांवाने प्रसिद्ध केलेल्या ओव्यांच्या संग्रहाच्या दुसऱ्या भागांत त्यांनी अशा ओव्यांचीं अनेक उदाहरणें दिलीं आहेत.

त्यांतलें गांधी जादूगाराचें वर्णन पहा—

गांधी जादूगार। भ्याडां करी धीट।
दास्याचा आणी वीट। सर्व लोकां।

लौकिक व प्रासंगिक विषयांचा समाचार जरी याप्रमाणे ओव्या रचणारणींनी घेतला असला, तरी त्याचें मुख्य लक्ष घरांत गुंतलेलें आहे. कुटुंबांतल्या हरएक

नात्याच्या संबंधावर अथांग प्रेमाने व कारुण्याने भरलेलें आशानिराशांच्या छायाप्रकाशाने नटलेलें ओवी साहित्य आमच्या महाराष्ट्रांतल्या मुलींनी आणि तरुणींनी निर्माण केलें आहे. बहिणीचें भावावरचें, माउलीचें लेकरावरचें प्रेम नानापरींनी आळवून वर्णन करणाऱ्या ज्या ओव्या आमच्या मायबहिणींनी रचलेल्या आहेत, त्या ऐकून ज्याचे डोळे ओले होणार नाहीत, असा माणूस विरळा आढळेल.

भावाच्या संबंधाने भावजय येते. सासरीं गेलेल्या मुलीला—

येरे येरे भाऊ। किती झालें दडपण।
कधी हृदय उघडीन। तुझ्यापुढे ॥

असें झालेलें असतें. पण तिकडे भावाचें लग्न होऊन तो बायकोच्या नादांत गुंगून जातो. मग सासुरवाशिणीला—

माय तों माहेर। बाप तों येऊ जाऊ।
पुढे आणितील भाऊ। लोक लाजे ॥

असा अनुभव येऊं लागतो. या अनुभवाला कारणीभूत होणाऱ्या भावजयीवर उर्फ भाबीवर कितीतरी ओव्यांचा वर्षाव सासुरवाशिणी तरुणींनी केला आहे.

पुढे पतिराजांशीं ओळख होऊन संसार सुरू होतो. बाहेरून सासूसासऱ्यांचा जाच, तर आंतून पतीचें प्रेम, या द्वैधावस्थेमधून पुढे पुत्राचा लाभ झाला, म्हणजे अपत्यप्रेमाच्या अथांग सागरामध्ये स्त्रीचें मन पोहूं लागतें. लहानग्या बाळाचें कोडकौतुक बायकांच्या या ओव्यांमधून किती किती केलें आहे म्हणून सांगावें ?

घागऱ्या घुळूघुळू। दणाणला माझा सोपा।
खेळतो प्राण सखा। राजस बाळ।

अशा रीतीने स्त्रीला आपल्या जीवनामध्ये सुरवातीपासून अखेरपर्यंत जे सुखदुःखमिश्र अनुभव येतात, जीं नातीं व जे संबंध तिच्या अंतःकरणाला जाऊन भिडतात, आणि त्यामुळे तिच्या मनांत जे भावनातरंग हेलावत असतात, त्या सर्वांचें अत्यंत रम्य प्रतिबिंब या ओव्यांमध्ये दिसून येतें.

या ओवी साहित्याची सर्व व्यापकता लक्षांत घेण्याजोगी आहे. मराठी समाजाच्या सर्व थरांतून, सर्व वर्गांमधून, सर्व जातींमधून तें निर्माण झालेलें दिसतें. त्यावरून महाराष्ट्रीय महिलेचें मन किती शुद्ध आहे, याचा प्रत्यय येतो. स्त्री-

जातीच्या परंपरागत परवशतेमुळे तें दडपलेलें असलें, तरी तें मेलेलें नाही. त्या परवश स्थितींतहि आपल्या प्रेमळ धिटाईने ती या दुःखमय संसारांत समाधानाचें नंदनवन निर्माण करूं पाहते.

काव्याची किंवा उच्च साहित्याची विद्वन्मान्य कोणतीहि कसोटी लावून पहा; बायकांनी रचलेल्या या ओव्या उच्चतम काव्याच्या पदवीस लायक ठरल्यावाचून राहणार नाहीत. हें केवळ पांढरपेशा वर्गांतील स्त्रियांनीं रचलेल्या ओव्यांस अनुलक्षून मी म्हणत नाहीं. कनिष्ठ मानलेल्या वर्गांच्या व जातींच्या स्त्रियांनी रचलेल्या ओव्या तितक्याच किंबहुना कांकणभर अधिकच काव्यमय, मार्मिक व स्वतंत्र बुद्धीच्या निदर्शक असतात.

भाऊ आणि भावजय ऊर्फ भाबी यांचें महत्त्व या स्त्रीरचित लोकसाहित्यांत किती असतें, याचा उल्लेख मागे केला आहेच. वऱ्हाडांतल्या महार जातींतून गोळा केलेल्या ओवी संग्रहातून बहिणीने भावाचें केलेलें वर्णन येथे किंचित् सादर करतों—

शुक्राची चांदणी। आली वळचणीशीं।
दोन पहर रात। भाऊ बोले बहिणीशीं॥
भाऊ समरथ। बहीण दुबळी।
संपादून गेली। नरबदा दरव्यामधी॥
बोलला भाऊराया। बहिणी ताटीं नको जेवूं।
जानं परदेशीं। इतकी माया नको लावूं॥

ही स्त्री भावजयीचें कसें कौतुकपूर्ण वर्णन करते पहा—

सकाळीं उठूनी, माझी भावजय दळे।
तीच्या चुड्यावरी। सुखदेव डरमळे॥

कामसू आणि कष्टाळू भावजय भल्या पहाटे उठून दळीत आहे; तिच्या हातांतल्या काकणांवर शुक्राच्या चांदणीचें प्रतिबिंब नाचत आहे, असें या ओवींत वर्णन आहे. या ओवींत रेखाटलेल्या कल्पनाचित्रापुढे कालिदासासारख्या कवींची प्रतिभा देखील फिकी पडेल!

ही वऱ्हाडी महिला आपल्या पतीसंबंधाने सासूला म्हणते—

सासू आत्याबाई। तुमचा सोनियाचा सेव!
तुमच्या सेवाखाली। जन्मले नामदेव॥

पण एखादी मुलगी चुणचुणीत व खणखणीत असूनहि तिच्या पदरीं एखादा

मूर्ख मनुष्य नवरा म्हणून बांधला जातो. तिच्या चिडलेल्या मनाचें औपरोधिक विनोदांत पर्यवसान होतें :—

सासू आत्याबाई । तुमच्या पदराला ग ठी ।
दिल्लीचं बांदर । पैदा केलं माझ्यासाठी ॥

प्रियकरावरून जीव ओवाळून टाकणारी वऱ्हाडी महार महिला म्हणते :—

तूझ्या जीवासाठी । जीव देईन एकदा ।
जीवाच्या जीवल्गा । बिनशाहीच्या कागदा ॥
तूझ्या जीवासाठी । जीव आपला देईन ।
दोन्ही नेत्राचं पाणी । झारी भरून ठेवीन ॥

अशा तऱ्हेचें भावनांच्या गाढतेंतून निर्माण झालेलें हें नारीनिर्मित ओवी वाङमय कल्पनेच्या दृष्टीनेहि तितकेंच रम्य आहे. हें ओवी वाङमय म्हणजे समाज जीवनाचा एक आरसा आहे; अनेक रसरुचिर असें उच्च कोटीचें काव्य आहे आणि मनाला सात्त्विक आणि चोखाळ बनविणारें विद्रावण आहे.

◆

लहानपणच्या आठवणींमध्ये बहिणींनी झोपाळ्यावर म्हटलेल्या ओव्यांना जसे दृढ स्थान आहे, तसेंच आईने भक्तिरसपूरित मनाने सांगितलेल्या कहाण्यांना आहे. विशेषतः संपत शुक्रवारची कहाणी ती अगदी तल्लीन होऊन सांगत असे आणि मी तितक्याच एकतानतेने ऐकत असें. तिचा मुख्य भाग अद्याप बराचसा लक्षांत आहे. एका राजाच्या राणीला मूल होत नव्हतें; त्याच गावांत एका गरीब ब्राह्मणाची सून भक्तिभावाने संपत शुक्रवारचें जिवतीचें व्रत करीत असे. ती गर्भारशी झाल्याचें राणीला कळलें तेव्हा राणीने तिच्या बाळंत-पणाच्या खोलीपर्यंत भुयार खणून सुईणीला वश करून घेतलें व तिच्या करवीं झालेल्या मुलाला पळवून त्या ब्राह्मण बाईपुढे वरवंटा टाकला. ती ब्राह्मण स्त्री कांही तरी गफलतीचा प्रकार आहे एवढें उमगली. तथापि तिने आपलें संपत शुक्रवारचें व्रत तसेंच भक्तिभावाने चालू ठेवलें. श्रावणांतल्या दर शुक्रवारीं ती गौरीची मनोभावें पजा करी व माझा बाळ जिथें असेल तिथें सुखी असो असें म्हणून त्या वरवंट्यावर अक्षता टाकी. त्या अक्षता इकडे राजवाड्यांत राज-पुत्राच्या डोक्यावर उमटत. हें असें कां होतें, म्हणून त्याने शोध चालविला. या

शोधाच्या पायीं तो काशीयात्रा करून आला व परत आल्यावर त्याने मावंदें केलें आणि त्यांत गावांतल्या झाडून सर्व बायकांना जेवायला बोलावलें. त्यांत त्याची जन्मदात्री आई पण आली. राजपुत्र पंक्तींतून तूप वाढीत हिंडत असतां पंक्तींत बसलेल्या त्याच्या आईला पान्हा फुटून त्याच्या चिळकांड्या ह्याच्या तोंडावर उडाल्या. तेव्हा खऱ्या मायलेकरांची ओळख पटून सर्व आनंदी आनंद झाला. पाचां उत्तरीं सांगितलेली कहाणी साठां उत्तरीं सफळ संपूर्ण.

या कहाणींत अद्‌भुतता खूप भरलेली आहे. अद्‌भुतरम्य कल्पनासृष्टींत कांही वेळ तरी गुंगून जाण्याची ही कसोशी समाजाच्या सर्व वर्गांत लहानापासून थोरापर्यंत सर्व माणसांमध्यें वसत असते. समाजाची अद्‌भुतरम्यतेची ही आवड पुरविण्याकरिता नानाप्रकारच्या चमत्कृतिजनक कथा निर्माण होतात. त्यांपैकी कांहींना भक्तिभावाच्या व देवतोपासनेच्या बैठकींत बसवून त्यांच्या कहाण्या बनविल्या जातात असें दिसतें. ज्यांच्या कहाण्या बनविल्या गेल्या नाहींत अशा निवळ स्वरूपांतल्या गोष्टी देखील सामान्य जनतेमध्ये पुष्कळच प्रचलित आहेत. पुण्याचे दाते व पूर्वी मूलचे सध्या नागभीड येथे असलेले वि. वा. जोशी यांनी अशा गोष्टी मिळवून त्यांचे संग्रह प्रसिद्ध केले आहेत.

भावनांच्या प्रेरणेने निर्माण झालेलीं स्त्रीगीतें आणि अद्‌भुतरम्यतेच्या आवडीमुळे निर्माण झालेल्या जानपद कथा—त्यांतच कहाण्या, आजीबाईच्या गोष्टी, वीरकथा, रूपककथा, नीतिकथा वगैरे सर्व आल्या, कारण सर्वांचें मूळ समाजाच्या कथाप्रीतींत असतें—हे दोन लोकसाहित्याचे प्रमुख विभाग होत. या दोन विभागांनी सर्व समाजाला व्यापलें आहे. समाजाचें जीवन निरनिराळ्या प्रकारांनी व निरनिराळ्या अंशांनीं या दोन्ही विभागांमध्ये प्रतिबिंबित होतें. त्याचप्रमाणें प्रेम, निष्ठा, वात्सल्य, दया, त्याग सेवा इत्यादि गुणांची पखरण या लोकसाहित्याच्या द्वारा समाजामध्ये होऊन कौटुंबिक प्रेम व सामाजिक एकोपा वाढीस लागतो.

याशिवाय उखाणे, म्हणी, निरनिराळ्या धंद्यांच्या लोकांचीं विशिष्ट कामें करतांना म्हणायचीं सामुदायिक गाणीं, अशा कितीतरी प्रकारांनी हें लोकसाहित्य समाजाच्या सर्व थरांमध्ये विखुरलेलें आहे.

सामुदायिक गाण्यांच्या उल्लेखावरून लहानपणीं ज्याची मौज आम्हीं पुष्कळ अनुभवली असा एक प्रकार मला आठवतो. हस्त नक्षत्र लागलें म्हणजे हत्तीचें चित्र

पुढें ठेऊन त्याच्याभोवती फेर धरून मुली गाणीं म्हणतात. त्याला हातगा किंवा भोंडला म्हणतात. गाणीं म्हणून झालीं, म्हणजे मग खिरापत वाटतात. आमच्या घरीं हा हातग्याचा धांगडधिंगा बराच चाले. मी नेमाने या हातग्याजवळ जाऊन बसायचा, तो खिरापतीच्या लोभाने नव्हे, तर मला बहिणींनी म्हटलेलीं गाणीं फार आवडत म्हणून. हातग्याच्या गाण्यापैकी कित्येक मोठीं गोड, विनोदी, व्याजोक्तिपूर्ण आणि खुमासदार आहेत. इथे त्यांतला मोठासा उतारा म्हणून दाखविण्यास अवकाश नाही. तथापि सुंदरीच्या लग्नाचा हा वेतबात ऐका—

वऱ्हाडी कोण कोण जाण माझ्या सुन्दरीचं लगीन ।
आजा म्हणे मी आजा। खाइन तूप सांजा ॥ माझ्या.
आई म्हणे मी आई । करीन मांडवांत घाई ॥ माझ्या.
मैत्रीण म्हणे मी मैत्रीण । सगळ्याच पोळ्या लाटीन ॥ माझ्या.
विंचू म्हणे मी चावीन । वाजंत्री छान लावीन ॥ माझ्या.

आमच्या लोकसाहित्याचें व्यापकत्व अशा प्रकारचें आहे. समाजाच्या सर्व थरांमधून, सर्व अवस्थांमधून तें निर्माण झालें आणि समाजाच्या जीवनाचें यथार्थ पण मार्मिक व वेचक प्रतिबिंब त्यांत पडलेलें असल्याकारणाने समाजाच्या मनाचें पोषण करण्यासहि तें समर्थ झालें. पण आता प्रश्न मनांत उद्भवतो तो हा की हें सर्व लोकसाहित्य त्यापुढे समाजामध्ये जिवंतपणाने खेळतें वावरतें राहणार की पुस्तकांमध्ये छापलें जाऊन प्रस्तरीभूत होऊन केवळ समाजशास्त्रज्ञांच्या अभ्यासाचा विषय होणार ? बालविवाह आणि जुन्या काळची कुटुंबपद्धति हीच जर नाहीशी झाली तर सासुरवाशिणीने भावाची काकुळतीने केलेली आळवणी, सासूनणंदांच्या जाचांचें, प्रेमाचें अंतःकरणाच्या उमाळ्यासरशी आलेलें वर्णन या सर्व गोष्टींना अवकाशच कोठे राहिला ! देव, देवता, कुळाचार हे जर उठवणीला लागले, तर त्यांच्याकरिता प्रवृत्त झालेल्या कहाण्या, गाणीं, आरत्या हें तरी कसें तगून राहणार ? समाजस्थैर्याचे पूर्वीचे हे बंध तुटले आहेत आणि नवे निर्माण झालेले नाहीत अशा विचित्र अवस्थेंत आपण आहों. अशा अवस्थेंतहि लोकसाहित्याचा कांही उपयोग होऊं शकेल असें मला वाटतें. हें लोकसाहित्य जिवंत ठेवण्याचा प्रयत्न केल्यास तें जुनें समाज जीवन परत आणूं शकणार नाही हें खरें, पण तें मानसिक अनुभूतीचा उच्च आनंद आपणास देऊन कुटुंबांत व समाजांत प्रेम, दया, निष्ठा, सहानुभूति, त्याग इ० भावांची जोपासना करण्यांत

आपणास खास मदत करील. कारण त्यांतील भाव शाश्वत स्वरूपाचे आहेत आणि त्यांत चित्रित झालेलें जीवन कांही परकें नाही—जीर्ण झाल्यामुळे सोडून टाकलें असलें तरी तें वस्त्र आपलेंच आहे–एवढी जाणीव होण्याइतका त्याचा आपला निकटचा संबंध आहे.

●●●

आकाशवाणी, नागपूर.
प्रसिद्धि, 'मधुवन', चांदा २६-१०-१९५१;

# ४

# वारकरी पंथ आणि त्याचें वाङ्मय

पंढरीची वारी आहे माझे घरीं।
आणिक न करी तीर्थव्रत ॥
व्रत एकादशी करीन उपवासी।
गाइन अहर्निशीं मुखीं नाम ॥
नाम विठोबाचें घेईन मी वाचे।
बीज कल्पांतींचें तुका म्हणे ॥

'वारी!' हा एक फार गोड अस्सल मराठी शब्द आहे. मराठी माणसाच्या मनांत याचा जो अर्थ उतरतो तो दुसऱ्या कोणत्याहि भाषेंत यथार्थ रीतीने व्यक्त करता येणार नाही. वारी आणि वारकरी हें मराठी समाजाच्या संस्कृतीचें 'शब्देंवीण संवादिजे' अशा कोटींतलें वैशिष्ट्य आहे. तुकोबांनी 'पंढरीची वारी आहे माझे घरीं' असें म्हटलें काय, किंवा आजकालच्या कॉलेजांतल्या मुलाने 'काय, कितवी वारी आहे परीक्षेची?' असें आपल्या दोस्तास विचारलें काय, वारी या शब्दाचा मराठी माणसाच्या मनांत जो अर्थ भरतो त्याची बरोबर कल्पना अमराठी मनुष्यास होणें कठीण आहे.

वारी म्हटली म्हणजे पंढरीची आणि वारकरी म्हटला म्हणजे पंढरपूरच्या पांडुरंगाचा भक्त, हें समीकरण ठरून गेलें आहे. मराठी समाजाच्या रोमरोमांत तें भिनून गेलें आहे. वारकरी पंथ किंवा संप्रदाय म्हटलें म्हणजे सर्वसाधारण समाजापासून अलग राहून आपले निराळे उपासनाविधि आचरणारा व कांही चमत्कारिक चिन्हें धारण करणारा जखडबंद अनुयायांचा समुदाय, अशी कल्पना आपल्या मनांत येत नाही. तर 'विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म। भेदाभेद भ्र

अमंगळ ' असें मानणारी उदारता व प्रेममयता यांची प्रचीति आपल्याला होते. वारकरी संप्रदायाने ' सर्वांभूतीं भगवंत ', व ' देव भावाचा भुकेला ' या दोन तत्त्वांच्या आधाराने समाजांत प्रेम, समता व ऐक्य यांचा प्रसार करून कर्मठपणा व भेदाभेद यांचा निरास केला, म्हणूनच त्याने महाराष्ट्राचें सर्व अंतरंग व्यापलें आणि महाराष्ट्र समाजाच्या एकंदर जीवनावर खोल ठसा उमटविला. आपणा स्वतःस मराठी म्हणविणारा समाज जगतीतलावर अस्तित्वांत आहे तोंपर्यंत हा ठसा त्या समाजाच्या जीवनांतून नाहीसा होणें शक्य नाही.

वारकरी पंथाचा आचार व विधि तसें पाहिलें तर अगदी साधा आहे. तुलसी-काष्ठाची माळ गळ्यांत नित्य वागविणें, हरिपाठ म्हणणें, एकादशी करणें ( म्हणजे दर पंधरवड्यांतील एकादशी तिथीस उपवास करणें ) आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे वर्षांतून एकदा तरी पंढरीची वारी करून पांडुरंगाचें दर्शन घेणें एवढ्या गोष्टी सांगितल्या की वारकरी पंथाचें कर्मकांड बहुतेक संपलें. हरि-नामस्मरण करणें, भजन-कीर्तन करणें, गोपीचंदनाचे नाम, मुद्रा व टिळे लावणें इत्यादि आणखी कांही लक्षणें सांगतां येतील. परंतु तीं सर्व भक्तिमार्गी, विशेषतः वैष्णव संप्रदायांना समान आहेत. आणि मराठी व कानडी समाजांत त्यांचा आढळ मोठ्या प्रमाणांत सर्वत्र होतो. तेव्हां निवळ वारकरी पंथाच्या आचार-विधींत अगर व्यवहारांत असें विशेष व अलौकिक कांही नाही की ज्याच्यामुळे त्या पंथाला मराठी समाजाच्या जीवनांत असें सर्वातिशायी महत्त्व प्राप्त व्हावें.

हें सर्वातिशायी महत्त्व प्राप्त होण्यास वारकरी पंथांतील साधुसंतांनी अमृता-हुनि गोड, सागरापरिस विशाल आणि बावनकशी सुवर्णासमान चोखाळ असें जें वाङ्मय निर्माण केलें तें कारणीभूत झालें आहे. इतर पंथांनाहि त्यांचें वाङ्मय आहे आणि तें आपापल्या परीने गुणवान व भव्य असेंहि आहे. पण वारकरी पंथाच्या वाङ्मयाची बात न्यारी आहे. हें वाङ्मय म्हणजे महाराष्ट्र सरस्वतीचा कलिजा आहे, मराठी राष्ट्रपुरुषाची ती आत्मज्योत आहे. आपण असें पहा, की, मराठी वाङ्मयांतून जर ज्ञानेश्वरी वजा केली, एकनाथी भागवत नाहीसें केलें आणि तुकोबांचे अभंग जर गाळून टाकले तर मराठीच्या वाङ्मयी मूर्तीचा कलिजाच काढून घेतल्याप्रमाणे होणार नाही काय ? नामदेव, जनाबाई, तुकाराम यांच्या अभंगांशिवाय मराठी वाङ्मय—ही कल्पनाच मुळी आपणांस सहन होत नाही. आपल्या आईशिवाय हें जग असूं शकेल, ही कल्पनाच लहान मुलास होऊं

शकत नाही, त्याचप्रमाणे ज्ञानेश्वरी माउलीशिवाय मराठी भाषा असूं शकेल हें मान्य करण्यास आपण कदापि तयार होणार नाही. या वारकरी साधुसंतांनी मराठी वाङ्मयांत घातलेली भर इतकी मूल्यवान आहे अशी भाषा करणें हें व्यर्थ ठरेल. यांनी मराठी वाङ्मयांत भर घातली नाही, यांनी मराठी वाङ्मयाचा कलिजा निर्माण केला, त्याची चैतन्यज्योत पाजळली !

उपलब्ध खाणाखुणा व पुरावे यांवरून पंढरपूरचें पांडुरंगाचें देवालय बरेंच प्राचीन असावें असा विद्वानांनी तर्क केला आहे. नामदेवमहाराज तर

'युगें अठ्ठावीस विटेवरी उभा'

असें पांडुरंगास उद्देशून आपल्या आरतींत म्हणतात. याचा अर्थ 'अठ्ठावीस युगें मिळून होणारा इतका काळ' असा करायचा की पंचांगांतील कालगणनेस अनुसरून 'सध्याच्या या अठ्ठाविसाव्या कलियुगांत' (अष्टविंशतितमे कलियुगे) असा करावयाचा, हा एक प्रश्नच आहे. तथापि यावरून पांडुरंगाच्या देवळाचा प्राचीनपणा व्यक्त होतो, एवढें स्थूलमानाने धरून चालण्यास हरकत नाही. ज्ञानेश्वरांच्या चरित्रांत ते पंढरीस पांडुरंगाच्या दर्शनास गेले व तेथून नामदेवादि संतांना घेऊन तीर्थयात्रेस गेले असा उल्लेख आहे. यावरून ज्ञानदेवांच्या काळीं पांडुरंगाचें देवालय चांगलेंच विख्यात होतें असें दिसतें. ज्ञानदेवांच्या अभंगांत 'विठ्ठलाचा वारिकरी' असाही उल्लेख आढळतो. यावरून वारीची वहिवाट अभंगकर्त्या ज्ञानेश्वरांच्या पूर्वीपासून चालत आली असावी हें देखील सिद्ध होतें. पण या वारकरी संप्रदायाला विशेष भरदार आणि देशव्यापी स्वरूप आलें तें ज्ञानेश्वर–नामदेवांच्या काळीं आणि त्यांच्या अवतारकार्यामुळे, यांत शंका नाही. पांडुरंगाच्या भक्तिसंप्रदायाचा प्रसार त्या विशिष्ट काळांत समाजाच्या सर्व थरांमध्ये आणि वर्गांमध्ये तीव्र वेगाने झालेला दिसतो; मग त्यास कारण कांहीही असो. त्या वेळेस अशी जात राहिली नाही की जिच्यामध्ये संत निर्माण झाला नाही. या अठरापगड जातीच्या भक्तमंडळींनी

सदा नामघोष करूं हरिकथा ।
तेणें सदा चित्ता समाधान ।
सर्वसुख ल्यालों सर्व अलंकार ।
आनंदें निर्भर डुल्लतसों ॥

या तुकोबांच्या अभंगांत वर्णिल्याप्रमाणे नामघोष व हरिकथा यांच्या गदा-

घोळाने केवळ पंढरीचेंच नव्हे तर अखिल महाराष्ट्राचें वातावरण दुमदुमून टाकलें. ज्ञानदेवांनी आपली गीतेवरील निरुपम टीका भावार्थदीपिका उर्फ ज्ञानेश्वरी पूर्वीच लिहिलेली होती. वारकरी संप्रदायाने अत्यंत योजकतेने तिचा अंगीकार करून तिला आपली माउली किंवा आदिग्रंथ बनविले. वस्तुतः ज्ञानेश्वरांना नाथपंथाचा अनुग्रह झालेला होता. आणि त्यांचा अमृतानुभव ग्रंथ नाथपंथाच्या शिवशक्ति तत्वास अनुसरून लिहिला होता. खुद्द ज्ञानेश्वरींतहि योगमार्गाचें वर्णन कांही जरूर नसतां अत्यंत विस्तार करून स्वानुभवाच्या ऊर्मीने केलेलें दिसतें. तरी देखील ज्ञानेश्वरीच्या शैलीचा अलौकिक गोडवा, तिच्यांतील वर्णनांचा प्रेमळपणा, आणि गुरुभक्ति व भगवद्भक्ति यांचें अपार गौरव यामुळे विठ्ठलभक्तांच्या मेळाव्यांत तिला अग्रस्थान सहजच मिळालें. ज्ञानेश्वरी लिहिणारे आणि अभंग रचणारे ज्ञानदेव एकच, असें सर्वसाधारण प्रचलित मत आहे. त्याप्रमाणे पाहिलें तर स्वत: ज्ञानदेव आपल्या आयुष्याच्या उत्तरार्धांत पंढरीस जाऊन तेथील संतसमुदायांत मिसळले, त्यामुळेही ज्ञानेश्वरीस वारकरी समाजांत मान्यता प्राप्त होण्याचें दार उपलब्ध झालें असलें पाहिजे. हरिपाठ व इतर अभंग वगैरे जी ज्ञानेश्वरांची रचना आहे ती त्यांनीं पंढरपूरच्या संतमेळ्याचें पुढारीपण पतकरल्या वर केली असावी. अर्थात् तिचा वारसा आपोआप वारकरी पंथाकडे यावा हें स्वाभाविक होय. ज्ञानेश्वरांप्रमाणे त्यांचीं भावंडें निवृत्तिनाथ, सोपानदेव आणि मुक्ताबाई यांनींही अभंगरचना केली आहे. तिच्यांत योगसिद्धीचें व समाधि-सुखाचें वर्णन प्रामुख्याने केलेलें आढळतें. मुक्ताबाईची रचना मोत्याप्रमाणे शांत तेजाने चमकणारी आहे.

नामदेव—ज्ञानदेवांच्या काळीं विठ्ठलभक्तीच्या संप्रदायास जी उधाण भरती आली, त्यांत सर्व जातींमध्ये संत निर्माण झाले व त्यांनी काव्यरचना केली. ही रचना मुख्यत्वेंकरून अभंग व पदें अशी स्फुट स्वरूपाची आहे. भजन-कीर्तनांत स्फूर्ति होईल तसे अभंग तोंडावाटे बाहेर पडावे; त्यांतले विशेष चांगले वाटतील ते कोणीतरी लिहून ठेवावे, तोंडातोंडीं त्यांचा प्रसार व्हावा आणि नंतर त्यांतली निवडक रचना सांप्रदायिक वाङ्मयांत स्थिर व्हावी, अशा रीतीने हें वाङ्मय जमत चाललें. एकाच्या तोंडून दुसऱ्याच्या तोंडीं असें या स्फुट उद्गारांचें एकसारखें प्रचलन होत असल्यामुळे एकांने रचलेला अभंग दुसऱ्याच्या नांवावर रूढ व्हावा, असें पुष्कळदा झालें असेल आणि किती तरी कविता कालाच्या

ओघांत नष्टहि झाली असेल. ती उपलब्ध होणें आता केवळ अशक्य आहे. आणि जी उपलब्ध होण्याजोगी आहे तिचें शास्त्रशुद्ध रीतीने संशोधन करणें हेंहि मोठें बिकट काम आहे.

या समयस्फूर्त भक्तकवींमध्ये सर्वांत अधिक विख्यात व विपुल रचना करणारा नामदेव होय. याचें नांव आणि याची कविता पंजाब, पेशावरपर्यंत प्रवास करून गेली, यावरून त्याची भक्त या नात्याने अलौकिक योग्यता ध्यानीं येते. आग्रही भक्तिभाव आणि सांकडें घालण रा प्रेमळपणा या गुणांमध्ये नामदेवांचा हात धरणारा दुसरा कोणीहि कवि असणें शक्य नाही. देवाची सख्य-भक्ति करावी अशी नामदेवांनीच.

पतीत पावन नाम ऐकुनि आलों मी दारा।
पतीत पावन न होसि म्हणुनी जातों माघारा।
घेसी तेव्हा देसी ऐसा अससी उदार।
काय रोधूं देवा तुमचें कृपणाचें दार।

हें नामदेवाचे अप्रतिम सुंदर उपरोधपूर्ण पद पुष्कळांच्या परिचयाचें असेल. नामयाची दासी जनाबाई हिचे अभंग फार प्रेमळ व सुंदर आहेत.

येग येग विठाबाई। माझे पंढरीचे आई।
भीमा आणि चंद्रभागा। तुझे चरणींच्या गंगा।
इतुक्यांसहित त्वां बा यावें। माझे रंगणी नाचावें।
माझा रंग तुझे गुणीं। म्हणे नामयाची जनी।

हा सर्वत्र आबालवृद्धांच्या तोंडीं असलेला गोड अभंग या जनीचा आहे. गोरा कुंभार , परिसा भागवत, विसोबा खेचर, सावता माळी, नरहर सोनार, कान्हूपात्रा नायकीण, चोखामेळा महार इत्यादि अनेकानेक साधुसंत जे त्या काळीं आणि त्यानंतर होऊन गेले त्यांच्या प्रत्येकाच्या नांवावर थोडी थोडी रचना आजमितीस उपलब्ध आहे. अर्थात किती तरी अभंग, पदें व ओवीबद्ध प्रकरणें नष्टही झालीं असतील.

यानंतर वारकरी पंथाच्या वाङ्मयाचा मागोवा घ्यायचा झाल्यास दोन अडीचशें वर्षांची हनुमान उडी मारून आपणास एकदम एकनाथांच्या काळांत म्हणजे शालीवाहन शकाच्या पंधराव्या शतकाच्या अखेरीस यावें लागतें. भागवत धर्म किंवा वारकरी संप्रदाय यांच्या मार्गक्रमणांत एकनाथांनी साधिलेलें कार्य ज्ञाने-

श्वरांना सर्वस्वी पूरक आहे. ज्ञानेश्वर ब्रह्मचारी व सर्वसंगपरित्यागी; तर एकनाथ गृहस्थाश्रमी व प्रपंचोपभोगी; ज्ञानदेवांचें आयुष्य अत्यल्प, तर नाथांचें बरेंच दीर्घ; ज्ञानरायांनी भगवद्गीतेवर टीका लिहिली, तर नाथांनी जवळ जवळ तितकाच मान्य असा जो भागवत एकादशस्कंध त्यावर लिहिली; ज्ञानदेवांच्या रचनेत निरूपण-कलेचा परमोत्कर्ष आहे, तर नाथांच्या रचनेंत कीर्तनाचा विस्तार दृग्गोचर होतो, ज्ञानेश्वरांनी साडेतीन चरणी ओवी लिहिली, तर एकलाथानी साडेचार चरणी ओवी लिहिलीं — अशा रीतीने ज्ञानरायांनी केलेलें कार्य नाथांनी एकप्रकारें विस्तारून त्याला सर्वांगपरिपूर्णता आणिली असें म्हणण्यास हरकत नाही. नाथांचा भागवत ग्रंथ म्हणजे खरोखरी क्षीरोदधी आहे. गोदुग्धाप्रमाणे सर्वत्र गोड, सात्त्विक व पौष्टीक. त्यांचे रुक्मिणीस्वयंवर इत्यादि लहान ग्रंथ, अभंग व भाडरु इत्यादि रचनाही सोज्वळ, चटकदार, समाजमनाचा ठाव घेणारी व ज्ञानभक्ति-परिपूर्ण आहे.

यानंतर वारकरी संप्रदायाला कळसाप्रमाणे शोभणारे तुकोबाराय यांच्यापर्यंत आपण येऊन ठेपतों. त्यांनी स्वतःच आपलें चरित्र अभंगांत वर्णून ठेविलें आहे. बाह्यात्कारीं पाहिलें असतां त्या चरित्रांत विशेष कांही नाही. त्यांच्यावर आल्या तशा विपत्ति पुष्कळांवर येतात. त्या विपत्तींचा आत्मसाधनेकडे उपयोग करून घेऊन, एका खेड्यांत जिऱ्यामिऱ्याचें दुकान लावून बसणारा हा तुका वाणी

घोटवीन लाळ ब्रह्मज्ञान्या हातीं।
मुक्तां आत्मस्थिती सांडवीन।
ब्रह्मभूत काया होतसे कीर्तनीं
भाग्य तरी ऋणी देवा ऐसा।
धन्य म्हणवीन इहलोकीं लोकां।
भाग्य आम्ही तुका देखियेला।

अशा योग्यतेप्रत जाऊन पोचला हें केवढें आश्चर्य ! आनंदाने निर्भर होऊन कीर्तन करीत असतां

असों ऐसा देहीं आठवचि नाही।
देहींच विदेही भोगूं दशा।

अशा स्थितीप्रत पोचलेले तुकोबाराय ज्यांनी प्रत्यक्ष पाहिले असतील ते भाग्य-शाली तर खरेच ! पण हिऱ्याप्रमाणे तेजस्वी, अमृताप्रमाणे संजीवक, द्राक्षाप्रमाणे

रसाळ अशी त्यांची अभंगवाणी ज्या आपणांपर्यंत चालत आली आहे त्यांचेंही भाग्य कांही कमीं नाही ! अंतःकरणाचा इतका खोल ठाव घेणारें आणि हृदयाच्या सर्व वृत्तींना गुंगवून सोडणारें इतकें परिणामकारक कवित्व आजपर्यंत दुसऱ्या कोणत्याहि कवीनें केलें नसेल. त्यांच्या अभंगांतल्या एकेका शब्दानें मन मुग्ध होतें, काया मोहरून जाते. अधिक काय सागावें? प्रयत्न करावा तर शब्द अपुरे पडतात.

तुकारामरुपी कळसाध्याय झाल्यानंतर वारकरी पंथाचा ग्रंथ पुढे वाढण्यास जागाच उरली नाही. तुकोबांचे शिष्य निळोबा, बहिणाबाई वगैरे संतांनी या पंथांत तुकोबानंतर अभंगरचना केलीं. तसेंच महिपतीबोवा ताहराबादकर यांनी संतचरित्रपर अनेक ग्रंथ लिहून मोठी महत्त्वाची कामगिरी केली. समुद्राला ओहोटी लागल्यानंतरच्या लाटा जशा असाव्यात तसा हा नंतरचा प्रकार भासतो. वारकरी संप्रदाय अजूनहि चालू आहे.

दिंड्या पताका गजरें। नाम घेती साचोकारें।

हा देखावा अद्यापहि 'वाळवंटीं। चंद्रभागेच्या काठीं' आषाढी कार्तिकीच्या वारींत दृष्टीस पडेल. पण तुकोबांनी जी अखेर गाठली तिचें दर्शन आपणास त्यांच्या अभंगवाणींतच होऊं शकेल म्हणून त्यांच्याच विनवणीच्या अभंगानें हें निरूपण आपण संपवूं या.

सकळिकांच्या पायां माझी विनवणी। मस्तक चरणीं ठेवीतसें<br>
अहो श्रोते वक्ते सकळही जन। बरें पारखून बांधा गाठीं<br>
फोडिलें भांडार धन्याचा हा माल मी तंव हमाल भारवाही<br>
तुका म्हणे चाली झालीं चहूं देशीं। उतरला कसीं खरा माल॥

आकाशवाणी, नागपूर, २३-४-५२

५

# मराठींतील विनोद

## पूर्वपिठीका आणि उपहासपर्व

कुणा एका शास्त्रज्ञाने मनुष्याची व्याख्या 'हसणारा प्राणी' अशी केली आहे. ही व्याख्या त्याने विनोदासाठी म्हणून केली नसून शास्त्रीय दृष्ट्या ती बिनचूक आहे असा त्याचा दावा आहे. हसणें हा मनुष्यप्राण्याचा अनन्य-सामान्य विशेष आहे. माकड वानर वगैरे ज्या प्राण्यांना प्राणिशास्त्राच्या तत्त्वानुसार 'मानवाचे पूर्वज' म्हणून मानण्यांत येतें त्यांच्या ठायीं दांत विचकून आनंद प्रदर्शित करण्याची कांहीशी प्रवृति दिसून येते. परंतु मानवाचें शरीर व मन आणि वानर वगैरे प्राण्यांचें शरीर व मन यांमध्ये जेवढा फरक आहे, तेवढाच फरक माणसाचे हसणें आणि या प्राण्यांची हसण्यासारखी भासणारी क्रिया यांमध्ये आहे. हास्य हें मानवप्राण्याचें वैशिष्ट्य आहे, असें म्हणण्याला त्याच्यामुळे कांही बाध येत नाही.

हसणें हें आनंदाचें द्योतक असल्यामुळे माणसाला स्वतः हसावें आणि दुसऱ्यालाहि हसवावें असें वाटणें स्वाभाविक आहे. दुसऱ्याला हसविण्याच्या या वृत्तींतूनच विनोदाचा जन्म होतो. विनोद वस्तुतः अनेक प्रकारांनी निर्माण होऊं शकतो. हावभाव, वाकुल्या, नकला, कसरत इत्यादि अनेक प्रकारांनी आपण दुसऱ्याला हसवूं शकतों. लहान मुलें एकमेकांना गुदगुल्या करून हसवितात, त्याला आपण सहसा विनोद म्हणत नाही. पण श्रेष्ठ दर्जाचा वाङ्मयात्मक विनोद म्हणजे तरी काय, मनाला केलेल्या गुदगुल्याच त्या. लहानमुलें शरीराला गुदगुल्या

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम 32943 दि: 1-6-91
क्रमांक 9324 नोंः दिः 23-4-72



करतात, तर विनोदी लेखक मनाला गुदगुल्या करतो. दुसऱ्याला हसविण्याचा उद्देश दोन्हीमध्ये समान असतो.

इतरांना हसविण्याचा आपला उद्देश नेहमी शुद्ध स्वरूपाचा असतो असें मात्र म्हणतां येत नाही. एखाद्याची थट्टा कुचेष्टा करण्यानेहि हास्य निर्माण होऊं शकतें. एकाला हसविण्यासाठी दुसऱ्याला हास्यास्पद करून सोडण्याचा मोह पुष्कळांना होत असतो. अशा रीतीने एखाद्याची थट्टा, कुचेष्टा किंवा निंदा करून उत्पन्न केलेल्या विनोदाला उपहास, व्यंगोक्ति इत्यादि नांवें आहेत. 'अ' ला हसविण्यासाठी 'ब' ची थट्टा अगर कुचेष्टा करून त्याला खजिल करून सोडणें अगर दुःख देणें हें वस्तुतः चांगलें नाहीं. पण 'ब' च्या अंगीं जर खरोखरीच कांही दोष असतील तर त्यांची खेळकर पद्धतीने कुचेष्टा किंवा विडंबन करण्याने ते दोष सुधारण्याचाहि संभव असतो. तेव्हा वाङ्मयात्मक उपहास अशा रीतीने उपकारकहि होण्याचा संभव असतो. उपहास हा खेळकर उपहास आहे कीं निर्दय उपहास आहे हें त्याच्या स्वरूपावरून ठरवावयाचें असतें. तसेंच उपहास सुधारणेच्या उद्देशाने खेळकर वृत्तीनें केलेला आहे की शत्रुबुद्धीने प्रतिपक्षाचा पाडाव करण्यासाठीं केला आहे हें त्याच्या स्वरूपावरून व परिणामावरून अंदाजतां येतें.

विनोदाचा जन्म अशा रीतीने हसण्याच्या सहज प्रवृत्तींतून होत असल्यामुळे त्याचें अस्तित्व मानव समाजांत सर्व काळीं व सर्व स्थळीं असलें पाहिजे. विनोदाच्या तऱ्हा स्थळकाळभेदानुसार निरनिराळ्या असतील; पण अमुक एका काळीं किंवा अमुक एका समाजांत विनोदवृत्तीस अवकाश मिळत नसे, असें म्हणणें म्हणजे त्या काळांत किंवा समाजांत माणसांनीं हसायचें सोडलें होतें व सर्व माणसें सदोदित गंभीर व आंबट चेहेरे करून वावरत असत, असें म्हणण्यासारखें आहे. अत्यंत धर्मनिष्ठ व गंभीर प्रकृतीचीं माणसें फार विनोदी व दुसऱ्यांना हसविण्याच्या कलेमध्ये वस्ताद असल्याचें मीं स्वतः पाहिलें आहे.

एवढें मात्र खरें की पूर्वीच्या काळीं समाजामध्ये हास्यविनोदाचा आविष्कार होण्याचीं स्थळें आणि द्वारें सध्याहून निराळीं होतीं. छापण्याची कला नसल्यामुळे लिखित वाङ्मयाचें क्षेत्र फार संकुचित होतें. महत्त्वाचे, चिरस्थायी आणि सर्वोपयोगी असे विचार किंवा अशी माहिती तेवढी पुस्तकरूपाने लिहून ठेवली जात असे; बाकीचें बरेंचसें वाङ्मय मुखपरंपरेने समाजामध्ये प्रचलित होत असे.

विनोदाचा फार मोठा भाग अशा तोंडी वाङ्मयामध्ये सामील झालेला चाणाक्ष शोधकाच्या सहज नजरेस येईल. सध्या विनोदी वाङ्मय हें जसें लिखित–म्हणजे मुद्रित–वाङ्मयाचें एक महत्त्वाचें स्वतंत्र दालनच बनलें आहे आणि श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, राम गणेश गडकरी, चिंतामणराव जोशी, आचार्य अत्रे इत्यादि प्रतिभाशाली कलावंतांनी तें सजविलें आहे, तसा कांही प्रकार जुन्या म्हणजे मुद्रणपूर्वकालीन वाङ्मयांत नव्हता. पण लिखित वाङ्मयाबरोबरच तोंडी वाङ्मय जर जमेस धरलें, तर पूर्वीच्या काळींसुद्धा एकंदर वाङ्मयाच्या प्रासादामध्ये विनोदी वाङ्मयाचें दालन कमी विस्तृत किंवा कमी समृद्ध नव्हतें. आपल्या विस्तीर्ण हिंदुस्थानच्या सर्व भाषांमध्ये अनेक चतुर विनोदी कथा मुखपरंपरेने चालत आलेल्या आहेत व त्यांपैकी कित्येक अलीकडे छापून प्रसिद्ध झालेल्या आहेत. जुन्या काळांतील सम्राट विक्रम व भोजराजा यांच्या गोष्टी, त्यानंतर उत्तर हिंदुस्थानांत बादशहा व बिरबल यांच्या गोष्टी, तेलंगणांतील थट्टेखोर तेनाली रामाच्या गोष्टी आणि महाराष्ट्रांतील चतुर साबाजीच्या गोष्टी या विनोदाचें दालन भूषविण्यास अत्यंत योग्य अशा आहेत. हरदासांचीं कथाकीर्तनें ऐकण्याची ज्यांना आवड असेल त्यांना कित्येक कथाकार मार्मिक अथवा उच्छृंखल विनोदाच्या योगाने हास्याचा कसा खळखळाट माजवितात याचा चांगलाच अनुभव असेल. हरदासांची विनोदी गोष्टी सांगण्याची लकब मराठी समाजाच्या परंपरेंत इतकी मुरली आहे की कोणत्याहि कल्पित विनोदी गोष्टीला ‘ हरदासी नक्कल ’ असें म्हणण्याची चाल पडली आहे.

या हरदासी नकलांचे अनेक प्रकार आहेत. जावयाच्या गोष्टी, खोडमोड्या मद्दलबुडव्या चाकराच्या गोष्टी, नाना फडणीसाच्या चातुर्याच्या गोष्टी—असे कितीतरी वर्ग किंवा गट या हरदासी नकलांचे करतां येतील. समाजाचे निरनिराळे थर आणि भिन्न भिन्न अवस्था यांच्या गरजा पुरवणारे बहुरूप्यांचे संवाद, तमाशांतल्या छकडी इत्यादि आणखीही कित्येक विनोदाचे प्रकार उल्लेखितां येतील.

हे मुखपरंपरेने चालत आलेलें विनोदी वाङ्मय थोडें थोडकें होतें किंवा हीन दर्जाचें होतें असें म्हणतां येत नाही. मात्र तें अपौरुषेय होतें. त्याचा कर्ता कोण, संपादक कोण, प्रकाशक कोण आणि सुधारून वाढविलेली आवृत्ति काढणारा कोण याचा कांही पत्ता नसायचा. अर्थात् त्याला कॉपीराइटचें बंधन नव्हतें. त्याच्या-

वर मालकी जो तें ऐकून त्याचा उपयोग करूं शकेल त्याची! किती सोयीची होती ही गोष्ट, नाही?

सध्या रेकार्डवर लोकप्रिय झालेलें "सखुबाई साळुबाई, बारशाला चला तुम्ही बारशाला चला" हें गाणें बहुरूप्यांच्या गाण्यांपैकीच आहे. त्यांत पुत्रजन्माच्या प्रसंगाचें विनोदमिश्रित वात्सल्याने भरलेलें गोड वर्णन आहे. बहुरूपी लोकांचीं भाषणें, संवाद व गाणीं कोणी संग्रहित करून छापून काढलेलीं आहेत की काय हें मला माहीत नाही. त्याचप्रमाणे हरदासी नकलांच्यापैकी कितीशा छापून प्रसिद्ध झाल्या आहेत याचीही बरोबर कल्पना नाही. पण हरदासाच्या कीर्तनांत किंवा घरांतल्या वडील माणसांच्या तोंडून ऐकलेल्या अनेक गोष्टींपैकी एखाद दुसरी इथे सांगितली तर वावगें होणार नाही असें वाटतें.

रावसाहेब कचेरींत काम करीत बसले होते. घरचा चाकर राम्या धावत धावत कचेरींत आला. रावसाहेबांनी विचारलं, "काय रे, राम्या! काय झालं?" राम्यानं कचेरींतल्या कारकुनांच्या व इतर माणसांच्या देखत ओरडून सांगितलं, "बाई सायबांचा निरोप हाय साब, घरीं पावनं आल्याती, कचेरीसनं घरीं येतांना भाज्या चांगल्या दोन अन् रसासाठी आंबं घेऊन शानी या म्हून." घरीं आल्यावर रावसाहेबांनी चाकराची हजेरी घेतली, "राम्या, गाढवा, एवढें कसं तुला समजत नाही! अरे घरचा कांही निरोप असला तर सावकाश जवळ येऊन हळूच, दुसऱ्या कोणाला ऐकूं जाणार नाही अशा बेतानं सांगावा." आज्ञाधारक रामा लगेच म्हणाला, "हां! असं व्हय? तें माझं काम! या खेपेस जरा चुकलं मालक, पण आता हुकमापरमानं अगदी बराबर करतों बगा, ह्यो राम्या कंदी चुकायचा नाही."

नंतर एके दिवशीं साहेब असेच कचेरींत कामांत असतां घरनं राम्या आला, तो अगदी सावकाश साहेबांच्या जवळ गेला. 'काय रे' म्हणून साहेबांनी विचारतांच रामाने संथपणें साहेबांच्या कानांत सांगितलें, "बाईसायबांचा निरोप हाये की घराला आग लागलीया, तरी ताबडतोब जसे असाल तसे घरीं या." रावसाहेब तडफडत उठले आणि म्हणाले, "अरे गाढवा, ही बातमी काय अशी हळूच येऊन कानांत सांगायची? मोठ्यानं ओरडून माणसं जमा करायचीं कां असं मुंगीच्या पावलानं येऊन कानांत पुटपुटायचं?", "साहेब, आपणच तर मागं एक दिन सांगितलं की, राम्या गाढवा, घरचा निरोप असेल, तर हळूच

कानांत येऊन सांग, म्हून!"

दुसरी अशीच पढतमूर्ख वैद्याची गोष्ट आहे ती आपणापैकी पुष्कळांनी ऐकली असेल.

वैद्यराजांची स्वारी जवळच्या गावाला रोगी पाहण्याकरिता चालली होती. वाटेंत झाडाखाली एक शेतकरी शिदोरी सोडून आपलें दुपारचें जेवण उरकीत होता. शेतकऱ्याने समोरची भाकऱ्यांची चवड खलास केली व जवळच्या लोट्यांतलें पाणी गटागटा पिऊन टाकलें. वैद्यराजांनी हें पाहिलें व घाबऱ्या घाबऱ्या ते म्हणाले "अरे बाबा, काय केलंस तूं हें! आता तूं मरणार खास!" शेतकरी म्हणाला "आं! काय झालं जी?" वैद्यराज उत्तरले, "अरे, केवढा घोर प्रमाद केलास तूं! शास्त्रांत सांगितलं आहे, 'भोजनान्ते विषं वारि' जेवणाच्या अखेरीस पाणी प्याल्यास तें विषाप्रमाणे आहे. तूं तर जेवण संपल्यावर चांगलं तांब्याभर पाणी प्यालास. आता मला तुझी धडगत दिसत नाही." शेतकरी हें ऐकून क्षणभर चमकला. लगेच त्यानं आपली शिदोरी सोडली व त्यांत उरलेल्या दोन-तीन भाकऱ्या होत्या त्या खाऊन फस्त केल्या; अन् मग वैद्याला म्हणाला, "शास्त्रीबुवा, आता तर पाणी जेवणाच्या मध्यांत झालं ना? आखरी भाकरी खाल्ली तेव्हा पाणी जेवायच्या आखरी नाही राहिलं; आता कांही नाही ना धोका?" वैद्यराजांनी त्याला नमस्कार केला; म्हणाले, "बाबा, आमचीं शास्त्रं तुमच्यासारख्यांच्या करतां नाहीत."

सांगायचं तात्पर्य काय, की आमचं तोंडी वाङ्मय अशा चतुर विनोदी कथा, विनोदी गाणीं, 'पुराणांतलीं वांगीं पुराणांत' यासारख्या विनोदी म्हणी व वाक्संप्रदाय यांनी भरलेलं आहे. मुद्रणपूर्वकालीन लिखित वाङ्मयामध्ये विनोदाचा फारसा संचार झालेला नाही याचं कारण काय हें मागें सांगितलंच. तथापि त्यांतहि लेखकाच्या प्रकृति स्वभावानुसार प्रतिपादन शैलीचें एक अंग म्हणून विनोदाची छटा डोकावत असलेली कित्येक ठिकाणीं आपणाला आढळून येते. गद्यलेखकांमध्ये भाऊसाहेबांच्या बखरीच्या लेखकासारखा कलमबहाद्दर जेव्हा 'मुरगी मारी बचडे दाणादाण' असे दृष्टान्त देतो किंवा मराठ्यांच्या पळपुटेपणाचें वर्णन "रांडेने सावळें हुसकटलें तर झाडास बांधले असता झाड घेऊन बारा कोस पळतील" अशा रीतीने करतो तेव्हां त्याच्या तिखट उपहासमिश्र विनोदी वर्णनशैलीचा प्रत्यय आल्याखेरीज राहत नाहीं. अभंग कवींमध्ये

नामदेव तुकाराम, निरूपणकवींमध्ये एकनाथ मुक्तेश्वर, आणि आख्यानकवीं-मध्ये सामराज, नागेश, मोरोपंत यांच्या काव्यामध्ये विनोदाचा संचार मधून मधून झालेला आढळेल. जनसमाजाचे भिन्न भिन्न घटक आणि भिन्न भिन्न अवस्था यांचें मार्मिक विनोदपूर्ण उद्‌घाटन करण्यांत एकनाथाचा हातखंडा आहे. त्यांच्या रचनेंत अध्यात्माचा तंतु सर्वत्र ओतप्रोत असला तरी ती विनोदाच्या मसाल्याने चमचमीत बनविलेली आहे. त्यांचीं अर्जदास्त वगैरे गद्य प्रकरणें आणि जोशी, महार, जागल्या प्रभृति भारुडें हीं प्रसंगोपात्त विनोदाने चटकदार बनलेलीं आहेत. अर्थात हा विनोद केवळ साधनीभूत आहे, सामान्य जनांचें लक्ष त्यांतून परमार्थाकडे वळवावें, हा हेतु कुठेच लपण्याजोगा नाही. त्यांनी रचिलेलें भवानीच्या रोडग्याचें गाणें खुमासदार व्यंगोक्तीसाठी सुप्रसिद्ध आहे.

सत्वर पावगं मला भवानि आइ ।
रोडगा वाहिन तुला ॥ध्रु. ॥
सासरा माझा गावीं गेला ।
तिकडंच खपवी त्याला ।
नणदेचं कारटं किरकिर करतं ।
खरूज येउं दे त्याला ॥ इ० इ०.

मनांतल्या अभिप्रायानुसार योग्य ते भाग आणि यथोचित दृष्टान्त ज्याच्यापुढे तात्काळ हात जोडून उभे राहात असत असा तुकाराम हा एकमेवाद्वितीय कवि होऊन गेला. त्याला विनोद नकोच आहे. पण पांडुरंग भक्तीचा मुख्य विषय खुलविण्याकरिता तो दृष्टान्त देऊं लागला म्हणजे एखादे वेळेस त्यांत विनोद घुसल्याखेरीज राहत नाही.

कानडीने केला मराठा भ्रतार । एकाचें उत्तर एका नये ।
तिने पाचारिलें ' इल बा ' म्हणोन । येरु पळे आण झाली आता ।

मुख्य विषयाला दृष्टान्त देण्याच्या पद्धतीनेच कां होईना, पण बुद्धिपुरस्सर विनोद काव्यांत निर्माण केल्याचें अपूर्व श्रेय जुन्या कवींमध्ये, कांही लावणीकार सोडल्यास, मोरोपंतांना द्यावें लागेल. पंतांचीं सन्मनोरथराजि आणि संशयरत्न-माला म्हणून दोन प्रकरणें आहेत; त्यांत आपले आध्यात्मिक मनोरथ प्रकट करतांना पंतांनी बहारीचे विनोदपूर्ण दृष्टान्त दिले आहेत—

स्त्रीस जसें न त्यजवे केलें उच्छिष्ट मांजरें दुभतें
सद्भजन दूषिलें जरि दुष्टें, मद्बुद्धि न त्यजू शुभतें ॥

अशा सन्मनोरथराजीमधील अनेक आर्या, आणि

किंवा, वरी परीक्षा केल्यावाचूनि न प्रसाद करा ।
तरि वरि तसाचि आंतहि उगाळितां कोळसा, प्रयास करा ॥

अशा संशयरत्नमालेमधील आर्या विनोदाने मन प्रसन्न केल्यावाचून राहत नाहीत. पंतांचीं आणखीहि कित्येक प्रकरणें अशींच विनोदवचनांनी भरलेलीं आहेत.

अशा रीतीने वर्णनशैलींचें एक उपांग म्हणून जुन्या वाङ्मयांत विनोदाचा जरी कोठे कोठे आढळ होत असला तरी विनोदाला त्या काळच्या लिखित वाङ्मयांत स्वतंत्र स्थान नव्हतें, हें उघड आहे. उपांग म्हणून देखील त्याचा उपयोग क्वचितच होत असे. अध्यात्मविषय अधिक रोचक करण्याकरितां आणलेल्या विनोदाची गोष्ट निराळी. पण त्याशिवाय असलेल्या नुसत्या कोरड्या विनोदाविषयी परमार्थपर साधुसंतांची वृत्ति 'टवाळा आवडे विनोद' या रामदासाच्या वचनांत जी प्रतिबिंबीत झाली आहे, तीच साधारणपणें होती.

विनोदाचें महत्त्व ओळखून त्याला बहुमानाचें स्थान दिलें प्रथम विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी. मुद्रणोत्तर काळांत तोंडी वाङ्मयाचा हळू हळू संकोच होत जाऊन वाङ्मयाचे सर्व भाव आणि सर्व प्रकार लिखित वाङ्मयांत समाविष्ट होत जाणार हें ओळखून चिपळूणकरांनी वाङमयाच्या विविध प्रकारांचा संग्रह करण्याचा कसोशीने प्रयत्न केला. त्यांची रसिकता सर्वगामी असल्यामुळे वाङ्मयाची हास्यरसाची शाखा त्यांच्या नजरेंतून निसटणें शक्य नव्हतें. त्यांनी आपल्या निबंधमालेंत विनोदाकरता 'विनोदमहदाख्यायिका' हें स्वतंत्र सदरच उघडलें. तसेंच सोज्वळ विनोदानें परिपूर्ण असें 'भोजनगृह' यासारखे अनेक लेखही त्यांनी निबंधमालेंत व केसरींत लिहिले आहेत.

पण चिपळूणकरांची विशेष ख्याति आहे ती विनोदाला उपहासाची जोड देऊन त्यांनी त्यांच्या मतें असलेल्या दुर्मतांच्या ध्वंसनाकरितां त्याचा दिग्विजयी वीराप्रमाणे जो उपयोग केला त्याकरिता. त्यामुळे त्यांचे नांव गाजलें व गाजतें आहे. त्यांच्या टीकाकारांनी त्यांचा विनोद बोचक व चावरा आहे असें म्हटलें आहे. तुम्ही प्रतिपक्ष्यांविषयी अत्यंत कडक लिहितां असा आरोप त्यांच्या हयातींत

त्यांच्यावर अनेकांनी केला होता. त्यावर त्यांनी आपल्या विनोदमिश्रित शैलीनेच पुढीलप्रमाणे उत्तर दिलें आहे. :— "मोठे वावदूक म्हणून ज्यांची जगभर ख्याति आहे ते विनोदकलेंत पूर्ण असून वाद खेळण्याचीं शस्त्रास्त्रेंही आपल्यापाशीं नेहमी लखलखीत ठेवीत असत. उघडच आहे की समरांगणांत गाठ पडली असतां कोणत्याहि सैन्याकडून दुसऱ्याविषयी असें गाऱ्हाणें केलेलें कधी ऐकण्यांत येतें काय, की हें काय बोवा, तुम्ही आमच्यावर केवढ्याने घाव करतां? असली प्राणघेणी लढाई कोठें बोलली आहे काय? तिची खरी पद्धत म्हटली म्हणजे अशी की तींत दोन्ही पक्षांकडील एकही शिपायी जाया होऊं नये! तसेंच सीध्या रीतीने झुंझायचें टाकून ही कवाईत व हे कपटप्रयोग तुम्ही करतां, हें तरी तुमच्या माणुसकीला शोभतें काय? वरच्यासारखे धर्मव्याख्यान रणांगणावर जसें अप्रयोजकपणाचें होईल, तितकेंच आमच्या प्रतिपक्ष्यांचे वरील उपदेशपर आक्षेपही होत."

तेव्हा विष्णुशास्त्री चिपळूणकर हे मराठींतील विनोद संप्रदायाचे आचार्य आणि त्यांतील उपहासपर्वाचे प्रवर्तक होत. त्यांच्या अमोघ व तीक्ष्ण उपहासास्त्राचे प्रयोग निबंधमालेमध्ये ठायीं ठायीं दिसून येणारे आहेत. अवकाश नसल्यामुळे इथें त्यांचीं उदाहरणें देतां येत नाहीत. वक्तृत्व निबंधाचा उत्तरार्ध, इंग्रेजी भाषा लोकहितवादी आणि आमच्या देशाची स्थिति या निबंधामध्यें त्यांच्या विनोदमिश्र उपहासाचीं बहारीचीं स्थळें अनेक आढळतील.

चिपळूणकरांच्या वेळेपासूनच नाट्यवाङ्मयास भरती येऊ लागली. त्या वेळेच्या नाटकांमधून सुधारक विरूद्ध सनातनी या झगड्याला तोंड फुटलें आणि त्याच्या तीव्रतेची कमान उत्तरोत्तर चढतच गेली. त्या वेळेचा बहुजनसमाज सनातनी होता. सनातनी मताच्या कानिटकर, भागवत इत्यादि नाटककारांनी आपल्या नाटकांमधून सुधारकांचा इतका प्रखर व निर्दय उपहास केला की त्यांत माणुसकीचा देखील मुलाहिजा राहिला नाही. आणि माणुसकीचा अभाव झाला की विनोदाने तेथून पलायन केलें म्हणून समजावें. चिपळूणकरांची सुसंस्कृतता व्यापकदृष्टि व विनोदबुद्धि या सनातनी लेखकांमध्ये नव्हती. त्यांनी लिहिलेलीं नाटकें आणि निंदाप्रचुर वृत्तपत्री लिखाण यांच्यावर काळाने पडदा टाकला आहे हें योग्यच झालें आहे, असें म्हटलें पाहिजे.

चिपळूणकरांनी विनोदपर उपहासाचा जो संप्रदाय प्रवर्तित केला, त्यांत पुढे

शिवरामपंत परांजपे, कृष्णाजीपंत खाडीलकर, अच्युतराव कोल्हटकर, दिनकरराव जवळकर, श्रीपतराव शिंदे इत्यादि अनेक कलमबहाद्दर रथीमहारथी उदयास आले. पण हा इतिहास पुढचा आहे. त्याच्यात शिरण्याचें सध्या प्रयोजन नाही.

● ● ●

आकाशवाणी, नागपूर, ७-७-१९५२.

६

# मराठी साहित्यांतील पहिलें वहिलें

मराठी भाषेंतील आद्य ग्रंथकर्तृत्वाचा मान सुमारें २५ वर्षांपूर्वीपर्यंत मुकुंदराज किंवा ज्ञानदेव या दोघांपैकी एकास जात असे. अलीकडे या मानावर हक्क सांगण्यास महानुभावांचे ग्रंथ उभे ठाकले आहेत. या पहिल्या वहिल्या ग्रंथकारांच्या ग्रंथांमध्ये मराठी भाषेचें जें रूप आढळतें तें इतकें उन्नत व प्रगल्भ आहे की इथूनच मराठींतील ग्रंथरचनेची सुरवात झाली असावी ही कल्पना मनास पटत नाही. याच कारणास्तव जुन्या मराठी साहित्याचा इतिहास लिहिणारे कै. विनायक लक्ष्मण भावे आपल्या "महाराष्ट्र सारस्वतां"त म्हणतात :—
"कोणताहि मोठा व प्रतिभासंपन्न ग्रंथ एकदम निर्माण होऊन तेथून भाषेंतील ग्रंथरचनेला सुरवात झाली, असें केव्हाहि घडूं शकणार नाही...पराक्रमी पुरुषाच्या पराक्रमाचा प्रारंभ ज्याप्रमाणे साम्राज्य स्थापना हा कधीहि असूं शकणार नाही, त्याप्रमाणेच ज्ञानदेवीसारखा अमोलिक व सर्वांगसुंदर ग्रंथ केव्हाहि भाषेंतील ग्रंथरचनेचा प्रारंभ असूं शकणार नाही.

हें सर्व सांगण्याचा उद्देश असा की ज्ञानेश्वरांची ज्ञानदेवी किंवा मुकुंदराजांचा विवेकसिंधु हे आद्य ग्रंथ नसून यांच्यापूर्वी अनेक शतकें मराठींत ग्रंथ होत असले पाहिजेत. नुसते कांही ग्रंथ होत असले पाहिजेत इतकेंच नव्हे, तर हजारोंहजार ग्रंथ त्या काळीं निर्माण करण्याची ताकद मराठी भाषेंत व महाराष्ट्र लेखकांच्या लेखणींत निःसंशय आलेली असली पाहिजे.

भाव्यांच्या म्हणण्यांत कितीहि तथ्य असलें तरी जोपर्यंत मुकुंदराज ज्ञानेश्वर यांच्या काळाच्या पूर्वी कांही शतकें रचले गेलेले ग्रंथ उपलब्ध होत

नाहीत तोंपर्यंत या शून्यस्थितिबद्दल हळहळ व्यक्त करण्यापलीकडे आपणांस कांही करतां येत नाही. कांही प्राकृत ग्रंथांतील आणि ताम्रपट शिलालेखांतील आधारावरून असें दिसतें की मराठी भाषा इसवी सनाच्या सातव्या शतकांत चांगली आकारास येत चालली होती. तेव्हापासून एका झेपेंत सहाशे वर्षांचें उड्डाण करून आपण साधारणपणे ज्ञानेश्वरांच्या काळांत येऊन ठेपलों म्हणजे अंधारांतून एकदम झगझगीत प्रकाशामध्ये आल्यामुळे डोळे दिपून जावे त्याप्रमाणे आपली स्थिति होते. ग्रंथरचनेला भर आलेला दिसतो, निरूपणकारांचा उत्साह ओसंडत आहे असा भास होतो आणि श्रोता वक्ता यांचा संवाद, म्हणजे मन-मिळणी पूर्ण झाली असल्याचें प्रत्ययास येतें.

संशोधनाच्या सध्याच्या अवस्थेंत हाच मराठींतील ग्रंथरचनेचा आरंभकाळ, असें मानावें लागतें. या पहिल्यावहिल्या ग्रंथरचनेच्या काळांत झालेल्या ग्रंथांमध्ये त्यांतल्या त्यांत आद्य ग्रंथाचा मान कोणाकडे जातो याचा थोडासा विचार करूं. मुकुंदराज हा मराठीचा आदिकवि आणि त्याचा विवेकसिंधू हा मराठीचा आद्य ग्रंथ असें नेहमी वर्णिलें जातें. विवेकसिंधूच्या कांही पोथ्यांमध्ये पुढील ओंव्या आढळतात...

शके अकरा दाहोत्तरू । साधारण संवत्सरू ।
राजा शारंगधरू । राज्य करी ।
अैसा समयो सर्वोत्तमू । तेथ मुकुंद द्विजोत्तमू ।
विवेकसिंधु मनोरमू । निर्मिता जाला ॥

यांत ग्रंथाचा रचनाकाल शके १११० साधारण संवत्सर हा सांगितला आहे. पण यांत गोम अशी आहे की शके १११० मध्ये साधारण संवत्सर येत नाहीं. शिवाय ही ओवी सर्व पोथ्यांमध्यें आढळत नाही, फार थोड्या अलीकडच्या पोथ्यांमध्ये आढळते. तेव्हा या कालनिर्देशावर विसंबण्यास मन धजत नाही. राजा शारंगधर हा कोण, कोठला, केव्हा राज्य करीत होता याचाहि नीटसा पत्ता लागत नाही.

या सर्व गुंतागुंतीचा इत्यर्थ इतकाच की विवेकसिंधूच्या रचनाकालासंबंधाने विश्वसनीय असा आधार मिळत नाही. आणि त्याची भाषा ज्ञानेश्वरी किंवा पहिले पहिले महानुभावीय ग्रंथ यांच्या मानाने बरीच अलीकडची वाटते. एक-दोन ओव्यांवरून भाषेचें तपशीलवार निरीक्षण करणें अशक्य, हें खरें. तथापि

नमुन्यादाखल लहानसा उतारा येथे देतों—

अगा सर्वही आपण व्हावें। अथवा कांहीच न व्हावें।
कांहीच न होऊन असावें। नेणू काई जें ॥
कांहीच न व्हावयापासाव। सर्वही होणें हें बरव।
जेथ सुखदुःखासी वेगळीक। आथीचि ना ॥
आदि अंतीं साळी देखिली। मध्ये तृणाकार विस्तारली।
परी साळी येणें शब्दें बोलिली। विबुधजनीं ॥

ही भाषा ज्ञानेश्वरीच्या मानाने एकदम अलीकडची वाटते. आता भाषा हें ग्रंथाचा काळ ठरविण्यास अगदी निर्णायक प्रमाण नाही हें खरें. पण वेदान्ता-सारख्या गहन विषयाचें प्रतिपादन करणारा संघटित स्वरूपाचा ग्रंथ—तो कांही लोकांच्या तोंडीं नेहमी खेळणारा फुटकळ अभंगांचा समुदाय नव्हे – त्याची भाषा जर ढळढळीत वेगळी भासत असेल, तर त्यावरून रचनाकाळ देखील वेगळा असावा असा अंदाज मनाशीं बांधण्यास हरकत नाही.

एक जरासा सूक्ष्म विचार मनांत येतो तो असा. विवेकसिंधु हा ग्रंथ शंकरा-चार्यांच्या अद्वैत मतानुसार वेदान्ताचें विवरण करणारा ग्रंथ आहे. मराठींत हा ग्रंथ रचण्याची बुद्धि ग्रंथकाराला कां झाली असावी ? त्या काळीं कांही विशेष प्रेरणा असेल तरच मराठींत ग्रंथ रचिला जात असे. ज्ञानेश्वरांना गीतेचें व्याख्यान करण्यास केवढ्या प्रचंड प्रेरणेने प्रवृत्त केलें होतें हें सांगावयास नको. ‘ कलिगी-लितेयां जीवां ’ कळिकाळाने त्रस्त झालेल्या जीवांच्या उद्धाराकरिता धावून जाण्याची मला आज्ञा करून श्रीगुरूंनी मला निमित्त करून या प्रबंधाच्या योगाने जगाचें रक्षण केलें आहे, असें ज्ञानेश्वर म्हणतात. अशा लोकोद्धारकार्याचा आणि प्रेम-सुखाची नवी सृष्टि निर्माण करीत असल्याचा जबर विश्वास श्रीज्ञानेशांना वाटत होता. आणि त्या निर्मितीची प्रेरणा अमृताहुनि गोड असे शब्द त्यांच्या तोंडून वदवीत होती.

निराळ्या रीतीची परंतु अशीच उत्कट प्रेरणा महानुभावीय लेखकांच्या मनां-मध्येहि वसत होती. चक्रधरांनी उपदेशिलेल्या नवीन उद्धरणमार्गाचे ते प्रवर्तक होते. हें कांही तरी अद्भुत कल्याणकारक आपणांस गवसलें आहे तें लोकांना दिलें पाहिजे. त्यांच्यांत हें ज्ञान सर्वत्र पसरविलें पाहिजे, अशी प्रेरणा प्रारंभींच्या महानुभावीय लेखकांच्या ग्रंथरचनेच्या बुडाशीं असलेली भासमान होते. तशी

कांही प्रेरणा विवेकसिंधुकार मुकुंदराजांच्या मनांत वसत असल्याचें दिसत नाही. म्हणून असें वाटूं लागतें की ज्या काळीं मराठींत ग्रंथरचना करणें ही ज्ञानेश्वरादिकांच्या उदाहरणाने बरीच रूढ गोष्ट होऊन बसली होती, अशा काळांत या ग्रंथाची रचना झाली असावी. जी एक पहिलेवहिलेपणाची झाक ज्ञानेश्वरीमध्ये आणि महानुभावी आद्य ग्रंथांमध्ये भासमान होते ती विवेकसिंधूंत दिसत नाही.

हे आपले मला सुचलेले विचार आहेत. हें कांही पुरावा जोखून मापून केलेलें काटेकोर संशोधन नव्हे. मराठी वाङ्मयाचा इतिहास लिहिणाऱ्या बहुतेक विद्वानांनी मुकुंदराजांनाच आदि कवि व विवेकसिंधूला आद्यग्रंथ मानिलें आहे. पण तें रूढ समजुतीच्या बळावर. मी मागे जे डळमळीत व संशयास्पद आधार सांगितले, त्यापेक्षा अधिक बळकट आधार त्यांना मिळाले आहेत असें दिसत नाही.

ज्ञानदेवांची ज्ञानेश्वरी उर्फ भावार्थ दीपिका हिची स्थिति अशी नाही. तिचा काळ शके १२१२ हा निश्चित आहे. हा काळ जिच्यांत सांगितला आहे ती—

शके बारा शतें बारोत्तरें । तै टीका केली ज्ञानेश्वरें ।
सच्चिदानंदबाबा आदरें । लेखक जाला ॥

ही ओवी ज्ञानदेवांनीं रचलेली नाही हें खरें. पण ती ज्ञानेश्वरीच्या सर्व पोथ्यांमध्ये, राजवाड्यांनी अगदी ज्ञानेश्वरसमकालीन म्हणून छापलेल्या आवृत्तीमध्ये देखील आढळते. या ओवींत उल्लेखिलेला सच्चिदानंदबाबा ज्ञानेश्वरांचा शिष्य व ज्ञानेश्वरांचा लेखक होता हे प्रत्यंतर पुराव्यावरून सिद्ध आहे. आणि नामदेव प्रभृतींच्या अभंगांवरून ज्ञानेश्वरांच्या जन्माचे व समाधीचे जे काळ आपणांस कळतात त्यांच्याशीं हा ज्ञानेश्वरीलेखनाचा काळ सुंदर रीतीने जुळतो. परंपरागत समजूत अशी की ज्ञानदेवांचा जन्म शके ११९७ मध्ये झाला; सोळाव्या वर्षीं म्हणजे शके १२१२ मध्ये त्यांनी ज्ञानेश्वरी रचून पूर्ण केली आणि त्यानंतर नामदेवप्रभृति संतमंडळाला घेऊन भरतखंडभर तीर्थयात्रा करण्याच्या मिषाने भागवतधर्माचा प्रसार व संघटना केली. पांचसहा वर्षें हें कार्य करून शके १२१८ मध्ये त्यांनी समाधि घेतली.

ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरी कोणत्या परिस्थितींत कोणत्या हेतूने लिहिली याविषयी पुष्कळ लेखकांनी पुष्कळ विवेचन आजवर केलें आहे. महाराष्ट्र सारस्वतकार भावे यांचे पुढील उद्गार बहुधा सर्वांना समर्पक वाटतील. ते म्हणतात, —“सर्व

जगाला आनंदाचे आवारूं घालूं पाहणाऱ्या ज्ञानेश्वराला या सृष्टींत आशेच्या किरणांचा प्रकाश पाडून त्यांत स्त्रीशूद्रादिकांना – म्हणजे चातुर्वर्ण्याचा भेदाभेद आड न येऊं देतां सर्वांनाच – या प्रकाशांत मोक्षमार्ग स्पष्ट व सोपा करून करून दाखवावयाचा होता. व हा मोक्षाचा रस्ता चोखाळतांना चातुर्वर्ण्यविशिष्ट जो आपला समाज, त्याची जुनी घडी मोडून टाकून, त्यांतील चालत आलेली सर्व व्यवस्था मोडून चातुर्वर्ण्य झुगारून तो चोखाळावा, असा त्याचा आशय मुळींच नव्हता. जातीचे भेद आणि त्यांच्यामधील उच्चनीच भाव त्या काळीं फार वाढला होता. क्षुद्र देवतांची उपासना आणि केवळ पुरोहित वर्गाचें स्तोम माजविणारीं व्रतवैकल्यें यांचें बंड फार माजलें होतें. अशा त्या विस्कळीतपणाच्या व समाजविघटनेच्या काळांत निदान परमार्थाच्या बाबतींत तरी ब्राह्मणापासून चांडालपर्यंत सर्वांना एका पातळींत आणून सर्वांना प्रेमसूत्रांत गोवणारा असा मार्ग जिकडे तिकडे फैलावण्याची फार जरूरी होती. परमेश्वरच सर्व विश्वरूपाने नटलेला आहे, त्याच्यापुढें सर्व मानव व्यक्ति समान आहेत, या सर्वात्मका ईश्वराची नामस्मरणादि साधनांनी भक्ति करून सर्वाभूतीं भगवंत पाहण्याचा अभ्यास करणें हीच सर्वांत मोठी साधना आणि या साधनेने वृत्ति तदाकार होणें हाच ब्रह्म-साक्षात्कार – हाच मोक्ष – हें ज्ञानेश्वरांच्या शिकवणीचें एकंदर तात्पर्य आहे. या भूमिकेवर त्यांनी सर्व समाजाला एक केलें, त्याला उत्साहाने प्रेरित केलें आणि प्रेमसूत्राने बांधलें.

मुकुंदराजाच्या विवेकसिंधूचा रचनाकाल ज्यांना संशयास्पद वाटत असे, असे बरेच विद्वान पूर्वी ज्ञानेश्वरीला मराठींतला आद्यग्रन्थ मानीत असत. योग्यतेच्या दृष्टीने तर तो आद्य ग्रन्थ आहेच; पण कालदृष्ट्याहि, शके १२१२ च्या अगोदर लिहिलेला दुसरा कोणताहि ग्रन्थ उपलब्ध नसल्यामुळे, ज्ञानेश्वरीला आद्यस्थान देण्यांत येत असे. पण गेल्या पंधरावीस वर्षांत महानुभावीय वाङ्मय प्रसिद्ध झाल्यामुळे ज्ञानेश्वरीच्या अगोदर महानुभावांच्या कांहीं ग्रंथांची रचना झाली असली पाहिजे हें आता स्पष्ट झालें आहे. कांही लोकांचा असा समज झालेला दृष्टीस पडतो की महानुभावांचे पहिले वहिले ग्रंथ ज्ञानेश्वरीपेक्षां खूपच जुने आहेत. तसें मात्र नाही. महानुभावपंथ संस्थापक चक्रधर यांनी लोकांना आपल्या मार्गाचा उपदेश करीत जो संचार केला त्याचा काल शके ११८६ ते ११९४ असा आठ वर्षांचा सांगितला जातो. चक्रधरांनी स्वतः कांही ग्रंथरचना केली

नाही. त्यांना जीवोद्धरणाचें व्यसन होतें. तें पुरें पाडण्याच्या उद्देशाने ते सारखा एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं संचार करीत आणि निष्ठावंत जीवांना वेध लावून त्यांना आपलेसे करीत. अशा रीतीने अनेक विद्वान विरक्त स्त्रिया व पुरुष त्यांचे शिष्य बनले आणि सर्वभावें त्यांना अनुसरले. पुढे अवतार समाप्त करून त्यांनी 'उत्तरापंथें गमन' केलें तेव्हा त्यांची शिष्य मंडळीं त्यांच्या वियोगाने विव्हल झाली आणि तें दुःख थोडें तरी हलकें व्हावे म्हणून त्यांच्या लीळा आठवून त्यांत मन रमविण्याचा प्रयत्न करूं लागली. 'लीळा' म्हणजे चक्रधरांच्या संचारांतला एखादा प्रसंग की जो त्यांच्या शिष्यांना संस्मरणीय वाटून त्यांनी जतन करून ठेवला. सध्याच्या भाषेंत सांगायचें झाल्यास 'लीळा' म्हणजे चक्रधरांच्या 'आठवणी'! लीळाचरित्र म्हणजे अशा सर्व आठवणींचा संग्रह पुष्कळशा लीळांच्या आरंभी त्यांच्यांतील विषय सांगणारा एक मथळा असतो. आणि त्यानंतर गोसावी–चक्रधर–कोणाकडे गेले व तेथे काय प्रसंग घडला याचें निवेदन केलेलें असतें. लीळाचरित्राच्या पूर्वार्धांतील एक लहानशी लीळा येथे वाचून दाखवितों म्हणजे ह्या लीळांचें स्वरूप कसें असतें हें समजेल.

### धानाइसांसी कवडा खेळु

एकु दीनी गोसावी सारंग पंडिताचेया घरासि बीजें केलें. आसनीं उपविष्ट जाले. धानाअिसी काअिसेयाची नेणों आळि घेतलीः सर्वतें म्हणितलेंः बाई याः हें तुमसीं कवडा खेळेलः कवडे घेउनि आलिः कवडे मांडिलेः गोसावीहीं आपुले मांडिलेः गोसावीयाचे कवडे चालतिः तेयाचे न चलतिः आणि म्हणतिः आपण चालते घेतलेः मज न चलते दीधलेः पालटितिः मागुते मांडितिः गोसावीयांचे चालों लागति : तेयाचे न चलतिः मग म्हणतिः मातें हे जिंकतातिः म्हणौनि पुरे केलेः

या लीळेचा अर्थ सर्वांस सहज समजेल. अशा सामान्य पण गंमतीदार प्रसंगांच्या वर्णनांनी हें लीळाचरित्र भरलें आहे. चक्रधर शिष्यांच्या घरीं गेले असतां त्याच्याकडे चरण प्रक्षारण, मर्दना (अंगाला मालिश) मार्जनी (स्नान.) पूजा जेवण, हात धुणें, जेवणानंतरची वामकुक्षी ह्या सर्व गोष्टी बहुधा व्हावयाच्याच. त्यांचीं वर्णनें कांहीशीं एकाच ठशाचीं वारंवार या लिळाचरित्रांत आलीं आहेत. ही

पुनरुक्ति थोडीशी कंटाळवाणी झाली आहे, तथापि मराठींतील पहिलवहिला गद्यग्रंथ या नात्याने लीळाचरित्राचें महत्त्व फार आहे. सातशें वर्षांपूर्वीच्या मराठी भाषेचें सहजसुंदर रूप इथे आपणाला दिसून येतें. मोकळेपणाने वागडणारी किशोरावस्थेंतील कन्यका जशी असावी तशी, लघुशब्द, लघुवाक्यें यांच्यामुळे खेळकर दिसणारी चुणचुणीत मराठी भाषा आपणास इथे दृष्टीस पडते.

श्री चक्रधरांच्या प्रयाणाचें दुःख हलकें व्हावें म्हणून त्यांची शिष्यमंडळी त्यांच्या 'लीळा' आठवून एकमेकांना सांगू लागली. तेव्हा या रम्य आणि पवित्र आठवणींचा संग्रह करून ग्रंथरूपाने त्यांना चिरस्थायी करावें अशी कल्पना म्हाइंभट उर्फ महिंद्रव्यास या शिष्याला सुचली. चक्रधरांचे शिष्य, आणि आपल्या संचारांत ते ज्यांच्या ज्यांच्या कडे गेले होते त्या व्यक्ति यांना भेटून त्यांच्या कडून चक्रधारांच्या आठवणी जमा करण्याचें मोठें कष्टाचें व जिकिरीचें काम या निष्ठावंत शिष्याने केलें. नंतर या आठवणींची सत्यासत्यता पडताळून पाहणें, त्यांना लिखित वाङमयाचे रूप देणें आणि कालक्रमानुसार त्यांची रचना करणें हें काम त्याने चक्रधरांचे पट्टशिष्य नागदेवाचार्य यांच्या साहाय्याने पार पाडलें. असा हा सुमारें एक हजार आठवणींचा, पांचशे छापील पानें भरतील एवढा संग्रह मराठींतील पहिला गद्य ग्रंथ, पहिलें चरित्र, भाषेचा पहिला वहिला नमुना या नात्यानी केवळ अपूर्व आहे. चक्रधरांच्या प्रयाणानंतरच्या सुमारें ४ वर्षांच्या आंत, म्हणजे शके १२००च्या सुमारास या ग्रंथाची रचना झाली असावी. म्हणजे, त्यांचें आरंभिक स्वरूप ज्ञानेश्वरीच्या किंचित पूर्वीचें आहे, असें म्हणतां येतें.

लीळा चरित्रांत आपल्याला चक्रधरांच्या भव्य परंतु विलोभनीय आणि अनेकरंगी व्यक्तिमत्त्वाचें पूर्ण दर्शन घडतें. महानुभावपंथी लोक तर त्यांना परमेश्वराचे अवतारच मानतात. पण हा एक जनतेच्या कारुण्याने प्रेरित झालेला स्थितप्रज्ञ महापुरुष होता, ही खूण लीळाचरित्राच्या इतर वाचकांना देखील पटेल. चक्रधरांचा ज्यांच्याज्यांच्याशीं संबंध आला अशा इतर अनेक व्यक्तींचीं वर्णनें व शब्दचित्रें यांत आढळतात तीं सुंदर वैशिष्ट्यपूर्ण आहेत. आणखी या आठवणीसंग्रहांत त्या वेळची लोकस्थिति, चालीरीति, धर्माचार, लोकभ्रम इत्यादिकांचें यथातथ्य प्रतिबिंब पडलें आहे तें मोठें हृदयंगम आहे.

असा हा मराठीचा पहिला वहिला ग्रंथ मराठीचें सौंदर्य, तिचा महिमा आणि

तिची प्रतिष्ठा यांना साजेसा आहे. इंग्रजीतील आदिग्रंथकार चॉसर याच्या Canterbury Tales ची मोठी महती गातात. लीळाचरित्र हें त्यापेक्षा सरस ठरेल असें मला वाटतें.

आपल्या लीळांमधून चक्रधरांनीं जें तत्त्वज्ञान व जो आचारमार्ग सांगितला, त्याचें तरी सार काय ? लहानसान क्षुद्र देवतांना भजूं नका, एका परमेश्वराची भक्ति करा, हीन कृत्यांमुळे लागणारे मळ झाडून टाका, सर्व मानवाशीं प्रेमानें वागा – हेंच. महानुभाव पंथाला पुढे कांहीसें एकांगी व जखडबंद स्वरूप आलें, पण खुद्द चक्रधरांनीं उपदेशिलेला परमार्ग आणि ज्ञानेश्वरांनीं उपदेशिलेला प्रेममार्ग यांत विरोध तर नाहीच पण फारसा भेदहि नाही, अशी माझी स्वतःची समजूत आहे. समाजाच्या त्या काळच्या विस्कळीत व जखडबंद अवस्थेंत समता, प्रेम आणि भक्ति यांचा प्रसार करण्याकरिता हे दोघे महापुरुष अवतरले होते. आजच्या वादळी अवस्थेंत देखील या जीवितकार्यांचा दीपस्तंभाप्रमाणे उपयोग होण्याजोगा आहे.

• • •

आकाशवाणी, नागपूर ६-४-१९५३.

७

# सुधारक आणि आगरकर

महाराष्ट्राच्या आधुनिक इतिहासांत ज्या व्यक्ति अजरामर झालेल्या आहेत त्यांपैकी सुधारककर्ते गोपाळ गणेश आगरकर हे एक होत. चिपळूणकर आणि निबंधमाला, टिळक आणि केसरी, परांजपे आणि काळ, हरिभाऊ आपटे आणि करमणूक हीं नांवें जितकीं एकमेकांशीं निगडित झालीं आहेत, तितकींच आगरकर आणि सुधारक हीं नांवें परस्परांशीं कायमचीं जोडलीं गेलीं आहेत.

वास्तविक आगरकरांनी सुधारकांत जितका काळ लेखन केलें त्यापेक्षां जास्त काळ ते पूर्वी केसरीपत्रांत लिहीत होते. तथापि त्या वेळचें केसरीपत्र ही एक प्रकारें बारभाईची खेती होती. त्यावर एकट्या आगरकरांच्या व्यक्तित्वाचा छाप निर्भेळपणे उमटणें शक्य नव्हतें. हें अशक्य झालें म्हणूनच तर आपल्या मतांचा व विचारसरणीचा अनिर्बंध प्रचार करण्यासाठी त्यांनी सुधारक काढला. सुधारक काढल्यापासून आगरकरांच्या संपूर्ण व्यक्तित्वाचें प्रतिबिंब त्या पत्रांत पडूं लागलें. सुधारक म्हणजे आगरकर आणि आगरकर म्हणजे सुधारक हें समीकरण पक्कें ठरून गेलें. आगरकरांचीं इतर कोणतींहि स्मारकें झालीं असोत वा नसोत, त्यांचे सुधारकांतील लेख हें त्यांचें अविनाशी आणि सर्वोत्तम स्मारक आहे. सुधारकांतील लेख ही आगरकरांची वाङ्मयी मूर्ति आहे. ते लेख वाचीत असतां जणू आगरकरच अंतःकरणाच्या उमाळ्यासरशी तळमळीने आपणाशीं बोलत आहेत असा आजहि आपणांस भास होतो. इतकें आपलें व्यक्तित्व आगरकरांनी सुधारकांतील लेखांमध्ये ओतलें होतें.

वाङ्मयविलासाकरिता आपली लेखणी चालविणाऱ्या हौशी लेखकांपैकी आगर-

कर नव्हते. ‘बुडते हे जन देखवे न डोळां’ अशी स्थिति होऊन जनतेच्या उद्धाराचे विचार सांगितल्याशिवाय ज्यांना चैन पडत नव्हतें, अशा उदार आत्म्यांपैकी आगरकर एक होते. त्यांचें लिखाण विविध विषयांवर असलें तरी अथपासून इतिपर्यंत या तळमळीने भरलेलें आहे. म्हणून आज साठ वर्षांनंतर देखील जिवंत आणि चैतन्यमय वाटतें.

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत ज्या व्यक्तिस्वातंत्र्यवादी उतार मतांचा प्रादुर्भाव इंग्लंडांत झाला होता, त्याचा पगडा आगरकरांवर फार मोठ्या प्रमाणांत बसला होता. इंग्लंड, फ्रान्स वगैरे युरोपांतील देशांमध्ये समाजशास्त्र, मानवशास्त्र इत्यादि शास्त्रांचा उदय झाला व ऑगस्ट कोंट, हरबर्ट स्पेन्सर, मिल इत्यादि शास्त्रज्ञांनी मानव समाजाच्या प्रवृत्तीची चिकित्सा करून तत्संबंधी नियम बांधण्यास सुरुवात केली होती. सामाजिक संस्था, चालीरीति, रूढि, धर्म या सर्वांचें तर्काच्या आधारें परीक्षण करून त्यांच्या स्थितिगतीसंबंधांचे सिद्धान्त प्रस्थापित करण्याची या शास्त्रज्ञांची पद्धति आगरकरांनी आत्मसात केली होती. अर्थात श्रद्धा व विश्वास यांना त्यांनी फाटा दिला होता. ग्रंथप्रामाण्य त्यांनी बाजूला सारलें होतें. देवधर्म, परलोक, परमार्थ, मोक्ष या गोष्टींना आपल्या विचारांतून अजिबात काढून टाकून मानवतेचें ऐहिक सुखवर्धन हें त्यांनी आपलें ध्येय मानिलें होतें; इष्ट असेल तें बोलणार आणि साध्य असेल तें करणार हा आपला बाणा त्यांनी जाहीर केला होता.

साठ सत्तर वर्षांपूर्वीचा तो श्रद्धाळू रूढिग्रस्त समाज! परंपरेने चालत आलेले आचार, शिवाशिवीचे निर्बंध आणि सोवळें ओवळें, हाच काय तो धर्म अशी त्या वेळच्या समाजाची दृढ समजूत. पुनर्जन्म, प्रारब्ध आणि मरणोत्तर प्राप्त होणारा स्वर्ग यांवर सर्वांची दृढ निष्ठा असल्यामुळे परलोकांत उत्तम फळ मिळावें म्हणून या मृत्युलोकीं वाटेल तशीं वेडींविद्री कृत्यें धर्माच्या नांवाखाली करण्यास सर्व लोक निमूटपणे तयार. अशी एकंदर त्या काळच्या समाजाची मनःस्थिति असल्यामुळे आगरकरांना आपली बुद्धिवादी विचारसरणी लोकांच्यापुढे मांडतांना केवढें मानसिक धैर्य दाखवावें लागलें असेल व केवढा झगडा करावा लागला असेल, याची कल्पनाच केली पाहिजे. रूढीचा दास बनलेला सनातनी बहुजन समाज हाच केवळ त्यांचा प्रतिस्पर्धी नव्हता. इंग्रजी शिकून विद्वान झालेल्या लोकांपैकीहि कांहीं मंडळी शिंगें मोडून वासरांत शिरत होतीं, याचा त्यांना मोठा

मराठी ग्रंथ संग्रहालय
९२३९५



राग येत असे. इंग्रजी शिक्षणामुळे ज्यांच्या मनाचीं कपाटें खुलीं झालीं आहेत, समाजाच्या प्रगतीसंबंधाचे बुद्धिवादावर आधारलेले शास्त्रीय विचार ज्यांना माहीत आहेत अशा तऱ्हेची आंग्लविद्याविभूषित मंडळी लोकांची मर्जी संपादण्यासाठी, अथवा त्यांजकडून आपली पाठ थोपटून घेण्यासाठी, लोकांच्यामधील दोषांचें मंडन करूं लागत तेव्हा त्यांचें हें करणें अत्यंत लज्जास्पद होय. असें आगरकरांस वाटत असे. प्रस्तुत स्थितींत अशा लोकाग्रणीचें वर्तन आमच्या देशास फारच विघातक होणार आहे असें त्यांनी सुधारक सुरू करितांना लिहिलेल्या लेखांत म्हटलें आहे.

तेव्हां, आगरकरांनी सुधारक काढला तोच मुळी स्वमतप्रसाराच्या तळमळीने आणि झगड्याच्या कल्पनेने काढला, ही आपली मनोवृत्ति प्रकट करतांना सुधारकाच्या पहिल्या अंकांत ते म्हणतात—

" जेवढीं जुनीं शास्त्रें तेवढीं सारीं ईश्वरप्रणीत, त्यांना हात लावणें हें घोर पातक अशी ज्यांची समजूत, जगत्कारणाच्या तोंडांतून, हातांतून, मांडींतून व पायांतून एकेक वर्ण निघाला अशी ज्यांची वर्णोत्पत्तीविषयी कल्पना, पंचामृताने व धूपदीपाने केलेली पूजा मात्र ईश्वरास मान्य, याहून ईषपूजेचा विशेष प्रशस्त मार्ग नाही, असे ज्यांचे धर्मविचार, आहे ही सामाजिक स्थिति अत्युत्तम, हींत फिरवाफिरव करण्यास कोठेहि अवकाश नाही, सध्या येथे स्त्रियांचे पुरुषांशीं, मुलांचे आईबापांशीं जे संबंध चालत आले आहेत तेच उत्तम आहेत व अनंतकाळ तेच चालले पाहिजेत, ज्ञान संपादणें हें पुरुषांचें कर्तव्य, शिशुसंगोपन हें स्त्रियांचें कर्तव्य, पुरुष स्वामी, स्त्री दासी, स्वातंत्र्य पुरुषाकडे, पारतंत्र्य स्त्रियांकडे, विवाहाशिवाय स्त्रीस गति नाही व गृहाशिवाय तिला विश्व नाही. वैधव्य हें तिचें महाव्रत व ज्ञानसंपादन हा तिचा मोठा दुर्गुण, अशा प्रकारच्या ज्यांच्या धर्मविषयक व समाजविषयक कल्पना – असे लोकाग्रणी काय कामाचे ? अशांच्या उपदेशाने व उदाहरणाने आम्हांस चांगलें वळण कसें लागणार व इतर सुधारलेल्या राष्ट्रांस होत असलेल्या सुखाचा लाभ आम्हांस कशाने होणार ? निदान सुधारकास तरी असले लोकाग्रणी व त्यांचें वर्तन मान्य नाही. ज्या तत्त्वांचें अवलंबन केल्यामुळे इतर राष्ट्रें अधिकाधिक सुधारत चाललीं आहेत, त्या तत्त्वांचा स्वीकार करण्यास आम्ही आनंदाने तयार झालें पाहिजे. तीं तत्त्वें हा ' सुधारक ' मराठी लोकांपुढे वारंवार आणील. असें करण्यांत त्यास, आज, ज्याचा जारीने अंमल

चालला आहे त्या लोकमताविरुद्ध बरेंच जावें लागणार असल्यामुळे, फार त्रास पडणार आहे. पण त्याची तो पर्वा करीत नाही."

आगरकरांच्या लेखांतला हा उतारा जरा लांब झाला खरा, पण त्यांत आगरकरांची मनोवृत्ति, विचारसरणी, आपल्याला आपल्या मतांसाठी झगडा करावा लागणार ही त्यांची प्रथमपासून असलेली ठाम अपेक्षा — या सर्व गोष्टी आल्या असल्यामुळे आगरकरांचें संपूर्ण व्यक्तित्व यांत प्रतिबिंबित झालें आहे. यास्तव तो येथे मीं मुद्दाम घेतला आहे. दुसरी गोष्ट अशी कीं, आगरकरांची विचारसरणी जशी यांत ठामपणे मांडलेली दृष्टीस पडते तशी आगरकरांची भाषाशैली याच उताऱ्यांत उत्तम रीतीने निदर्शित झालेली आपणांस आढळते. कोणत्याहि वस्तूचें अथवा अवस्थेचें वर्णन करावयाचें असलें म्हणजे तिच्ीं सर्व अंगें, सर्व बाजू आपल्या वर्णनांत याव्या असा हव्यास आगरकरांचा असे. त्या सर्व बाजूसंबंधीसर्वनामांनी ( जे ते, ज्या त्या इ० ) जोडलेल्या वाक्यखंडामध्ये आगरकर मांडीत असत आणि आपल्या सर्व कल्पना अशा रीतीने मांडून झाल्या म्हणजे मुख्य विधान करून वाक्याचा शेवट करीत असत. अशा वाक्यखंडाच्या मालिका त्यांच्या निबंधामध्ये आपणास ठायीं ठायीं आढळतील. अशा वाक्यखंडांमुळे त्यांच्या शैलीमध्ये एक प्रकारचा जोरकसपणा आला आहे हें खरें, पण कित्येक वेळां अशा वाक्यखंडाची फार लांबण लागली म्हणजे तें वाक्य संपेल केव्हां असें वाचकाला होऊन जातें. त्यामुळें क्वचित् बोजडपणा येऊन वाक्यें कंटाळवाणीं होतात. टिळकांच्या लेखनशैलींत असा प्रकार सहसा आढळायचा नाहीं. त्यांच्या वाक्यांत पुष्कळसे वाक्यखंड, संबंधी सर्वनामें व अवलंबित विधानें यांची गुंतागुंत फार करून आढळायची नाही. एका वाक्यामध्ये एक विधान टणटणीत रीतीने टाशीव पद्धतीने मांडलेलें असायचें. चिपळूणकर हे निबंधलेखकांमधील तिसरे महारथी आणि टिळक-आगरकरांपेक्षा थोडे वडील. मराठी गद्य चांगलें कमावून सर्व तऱ्हेचे विचार करण्यास समर्थ केले मुख्यतया चिपळूणकरांनी. त्यांच्या लिहिण्यांत देखील मधून मधून लांब वाक्यें असतात. पण त्यांत उपमा दृष्टान्त वगैरे अलंकारांची भरती असल्यामुळे त्यांचा कंटाळा येत नाही; उलट त्यांची लेखनशैली वाचकाला मोह पाडून त्याला आपल्या बरोबर वाहवत घेऊन जाते. आगरकरांच्या शैलींत लढवय्याचा आवेश नेहमी भरलेला असतो. त्या आवेशाच्या योगाने ती वाचकाच्या मनावर विलक्षण प्रभाव गाजविते. स्वजनांचें

दोषाविष्करण आगरकरांच्या इतक्या निष्ठुरपणें कोणीं कधी केलें नसेल. स्वजनांच्या उद्धाराविषयी त्यांना अतोनात तळमळ होती, म्हणूनच उद्धार शब्दाच्या दुसऱ्या अर्थाने त्यांनी स्वजनांचा वारंवार उद्धार केलेला आढळतो. उपहास हें त्यांच्या हातचें मोठें शस्त्र. चिपळूणकरांच्याहि लिहिण्यांत उपहास आहे. तो बहुतेक सर्वत्र विनोदाने मिश्रित असल्यामुळे वाचकांना गोड व खमंग वाटतो. आगरकरांच्या उपहासांत विनोद एकंदरीने फार थोडा व क्वचित् प्रसंगीं आढळणारा. बहुतेक ठिकाणीं कठोर व कापीत जाणारा उपहासच आपणास आढळेल. हा एक नमुना पहा :—

"भेकड व प्रतिष्ठाखोर हिंदु लोकांनो, ज्या वेळेस पोर्तुगीज लोकांनी ख्रिस्ती धर्म स्थापण्यासाठी कोकणपट्टींत तुमचे अनन्वित हाल केले त्या वेळेस तुमचा धर्माभिमान कोठे गेला होता ? जर तुम्हांस तुमच्या धर्माची इतकी प्रतिष्ठा वाटत आहे तर पूर्वी ज्यांनी ज्यांनी त्याचें उल्लंघन केलें त्यांचें तुम्ही शासन कां केलें नाही ? पण तुमच्यासारख्या शेंदाड शिपायांवर असले शब्दप्रहार तरी करण्यांत काय अर्थ आहे ? हेंहि असो, ही तुमच्या पौरुषाभावाची कहाणी झाली. पण अलीकडे जे सहजगत्या किंवा जाणूनबुजून धर्माच्या उलट जातां तें काय म्हणून ? पोटांत काटे भरतां येत नाहीत म्हणून ? कलालांचीं दुकानें सरकार काढतें म्हणून त्यांच्या नांवाने खडे फोडतां ! पण, झक मारायला तुम्ही त्या दुकानांकडे जातां का ? धिक्कार असो अशा प्रकारच्या तुमच्या धर्मनिष्ठेला आणि पापभीरुत्वाला. तुम्ही खोटे, तुमचा धर्म खोटा ! तुमचा धर्माभिमान त्याहून शतपट खोटा ! !"

अशा रीतीने आपल्याच लोकांवर निष्ठुरपणें कोरडे ओढणाऱ्या या सुधारकाग्रणीवर त्या वेळेचे लोक चिडून गेले असतील तर त्यांत नवल नाही. पण आपण आज जेव्हा आगरकरांचे हे निबंध वाचतों तेव्हा त्यांतील निर्भयपणा, निर्भीडपणा, तळमळ आणि आवेश या गुणांविषयीच्या आदराने आपलें मन भरून जातें. आणि आजच्या समाजांत जरी इतर कितीहि दोष असले तरी आगरकरांनी इच्छिलेल्या दिशेने आपल्या समाजाने फार मोठी प्रगति केली आहे हें पाहून आगरकरांच्या द्रष्टेपणाची खूण आपल्याला पटते.

मराठी गद्याला आवेश, जोम आणि चढाऊपणा हे गुण आगरकरांनी दिले आणि मराठी निबंध त्यांनी समृद्ध केला. हजामत, आंघोळ, गंध लावणें यासारख्या वैयक्तिक आचाराच्या किरकोळ गोष्टींपासून तों सामाजिक स्थितिगति

यासारख्या गहन विषयांपर्यंत सर्वत्र आगरकरांच्या लेखणीने संचार केला आहे. मानवतेचें ऐहिक सुखवर्धन हें त्यांचें ध्येय. या ध्रुवताऱ्याकडे लक्ष ठेवून त्यांनी आपले निबंध लिहिले. ते त्यांतील विचारांकरिता आणि शैलीकरिता मराठी भाषा जोंपर्यंत अस्तित्वांत आहे तोंपर्यंत मराठी वाचकांस आदरणीय वाटतील यांत शंका नाही.

• • •

आकाशवाणी, नागपूर, १२-१०-१९५३
प्रसिद्धि, मराठी जग, नागपूर, १९-६-१९५४

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रमांक 33963 वि: 15-11-51
क्रमांक 9356 नों: दि: 23/5/52

८

# मराठी वाङ्मयाच्या इतिहासाची अखिल भारतीय पार्श्वभूमि

पुण्याच्या महाराष्ट्र साहित्य परिषदेने मराठी वाङ्मयाचा इतिहास मोठ्या प्रमाणावर लिहून प्रसिद्ध करण्याची योजना जाहीर केल्यापासून गेल्या वर्षा-दोन वर्षांत या विषयासंबंधाने पुष्कळ चर्चा आणि वाद झाला आहे. साहित्याच्या क्षेत्रांत विचार करणारी जेवढी मंडळी आहेत त्यांच्यापैकी बऱ्याच जणांनी या वादांत भाग घेऊन उलटसुलट विचार प्रदर्शित केले आहेत. वादाचा धुरोळा एकदा उठला म्हणजे कित्येक महत्त्वाच्या गोष्टीसुद्धा दिसेनाशा होतात. या इतिहासाचे खंड किती असावेत आणि ते कुठे कुठे पाडण्यांत यावेत या प्रश्नावरच वादाचें रण माजलें. इतर कित्येक महत्त्वाचे मुद्दे या संबंधांत उपस्थित होतात त्यांच्याकडे जावें तसें लक्ष गेलेलें दिसत नाहीं.

इतिहास म्हणजे सनावळी नव्हे किंवा घटनांची जंत्री देखील नव्हे. कल्हणाने आपल्या राजतरंगिणींत म्हटलें आहे त्याप्रमाणे 'इतिहास' ही कविप्रजापतीची एक रम्य कलाकृति असायला पाहिजे; इतिहासांत मागे होऊन गेलेल्या काळाचें जणू काय जिवंत व सचेतन असें दर्शन आपणांस घडलें पाहिजे. मनुष्याच्या आणि समाजाच्या हालचाली व घडामोडी, त्याच्या वृत्ती आणि प्रवृत्ती, त्यांचा परस्पर सहकार आणि संघर्ष यांचें वेधक चित्र इतिहासाने आपल्या डोळ्यासमोर उभें केलें पाहिजे.

मनुष्य हा एकटा एकलकोंडा प्राणी नाही. तो समाज करून राहणारा आहे. एकाच्या वागण्याचा इतर अनेकांवर परिणाम होत असतो आणि अनेकांच्या

वृत्तिप्रवृत्तींचा एका व्यक्तीवर उलट परिणाम होत असतो. ही क्रियाप्रतिक्रिया एकसारखी चालू असते. एका व्यक्तीच्या जीवनावर भोवतालच्या अनेक व्यक्तींचा आणि समाजाचा जो परिणाम होत असतो त्यानेच त्या व्यक्तीचें चरित्र बनत असतें. हें जसें व्यक्तीला लागू आहे तसेंच तें समाजालाहि लागू आहे. कोणताहि समाज एकटा एकाकी कधीहि असत नाही. एका समाजांतील प्रवृत्ति, घडामोडी आणि खळबळी यांचा परिणाम भोवतालच्या इतर समाजांच्यावर झाल्याखेरीज राहणार नाहीं. या परिणामाचें स्वरूप वर्णन करणें, त्यांचे धागेदोरे तपासणें आणि त्याची कारणमीमांसा करणें हें इतिहासकारांचें काम आहे. गेल्या शंभर वर्षांत महाराष्ट्रांत ज्या चळवळी–खळबळी झाल्या त्यांपैकी कित्येकांचे धागेदोरे बंगालशीं निगडीत झालेले आढळतील. कर्नाटकांतील घटनांचा व प्रवृत्तींचा निकट संबंध महाराष्ट्रातील घटनांशीं जुळत असलेला आढळेल. महाराष्ट्राच्या इतिहास-काराचें हें काम आहे की, त्यानें केवळ मराठी जनतेच्या हालचालींची माहिती देऊनच न थांबतां त्या हालचाली अथवा खळबळी कोणत्या प्रेरणांनी उद्भवल्या होत्या, त्या प्रेरणांच्यामध्ये हिंदुस्थानांतील इतर प्रांतांचा कितपत भाग होता याचें साधार विवरण करायला हवें. असें होईल तरच त्या इतिहासाला जिवंतपणा व भरदारपणा येईल.

प्रत्येक व्यक्तीचा ज्याप्रमाणे इतर व्यक्तींशीं संबंध असतो त्याप्रमाणे प्रत्येक व्यक्ति एका मोठ्या समुदायाचा अंश असते हें लक्षांत ठेवणें देखील महत्त्वाचें आहे. कुटुंबातील एकेक व्यक्ति इतर व्यक्तींशीं कांही नात्याने जोडलेली असते. तसेंच प्रत्येक व्यक्ति त्या कुटुंबाचा एक अंश म्हणून देखील वागत असते. त्या कुटुंबाची जात, सांपत्तिक स्थिति, सामाजिक दर्जा वगैरेंचा परिणाम त्या व्यक्तीवर होत असतो. ‘ जें पिंडीं तें ब्रह्मांडीं ! ’ एका व्यक्तीला जें लागू तें समाजालाहि तसेंच लागू पडतें. आपण हिंदुस्थानांतील सर्व समाज एकमेकांचे भाऊ–भाऊ आहोंत, तसेंच त्याबरोबर त्या विशाल भारत देशाचे घटक आहोंत, अंश आहोंत. महाराष्ट्राचा इतिहास एकंदर हिंदुस्थानच्या इतिहासांतून तोडून अलग काढून वर्णिल्यास तो खरा इतिहासच होणार नाही. एकंदर हिंदुस्थानांत मुसल-मानांची सत्ता कशी पसरली, त्यांनी राजकीय व धार्मिक आक्रमण केव्हा केव्हा कुठे कुठे केलें, या सर्व गोष्टींची नीट कल्पना करून दिल्याशिवाय मराठ्यांचें स्वराज्य कोणत्या परिस्थितींत कसें निर्माण झालें याचा नीट खुलासा करणें कधी

तरी शक्य होईल काय ?

तेव्हा संपूर्णाचा अंश आणि समकक्षीयांचा साथीदार या दोन्ही नात्यांनी व्यक्तींचें व समाजाचें विवेचन केल्याशिवाय त्या व्यक्तीचा वा समाजाचा इतिहास लिहिला गेल्यास तो खराखुरा सोपपत्तिक इतिहास होणें शक्य नाही हा सिद्धान्त निर्विवाद होय.

हा सिद्धान्त सर्वसाधारण राजकीय इतिहासाला जितका लागू आहे तितकाच तो वाङ्मयाच्या इतिहासालाहि लागू पडतो. वाङ्मय ही मनुष्याच्या अनेक कृतींच्यापैकीच एक कृति आहे. इतरांच्याशीं असलेल्या संबंधांचा परिणाम मनुष्याच्या सर्वच जीवनावर, त्याच्या सर्वच कृतीवर होतो. अर्थात् तो वाङ्मय-कृतीवर देखील होणारच. महाराष्ट्रांतील व्यक्तींच्या मनावर इतर प्रांतांतील हालचाली, खळबळी, चळवळी यांचा परिणाम झालेला असणारच; मराठी लेखकांच्या मनावर इतर भाषांतील वाङ्मयाचे बरेवाईट ठळक अथवा अंधुक ठसे उमटलेले असणारच. त्यांमुळे मराठी लेखकांच्या वृत्ति, भावना आणि प्रेरणा यांच्यांत कांही तरी पालट झाला असणें अपरिहार्य आहे. तेव्हा मराठी वाङ्मयाचा इतिहास या सर्व परिणामांचा विचार करून तदनुसार वाङ्मयप्रवाहांचें आणि वाङ्मयांतील प्रवृत्तींचें स्वरूप निर्धारण करणारा असा झाला पाहिजे. अमक्या काळांत अमुक अमुक ग्रंथकार झाले, त्यांनी अमुक अमुक ग्रंथ लिहिले आणि त्या ग्रंथांत अमुक अमुक विषय होते असें कालक्रमानुसार सांगितलें की झाला वाङ्मयाचा इतिहास तयार असें मानून मुळीच चालणार नाही. किंबहुना वाङ्मयांतील प्रेरणांची आणि प्रवाहांची नुसती महाराष्ट्रांतील परिस्थितीच्या अनुरोधाने मीमांसा करूनहि भागणार नाही. यापेक्षा आपली दृष्टि अधिक व्यापक, अधिक दूरदर्शी बनविली पाहिजे.

मराठी वाङ्मयाचा विचार करतांना आपण अगदीच बाहेर नजर फेकीत नाही असें नाही. आपण बाहेर पाहतों, पण बहुधा एकाच खिडकींतून एकाच दिशेकडे पाहतों. त्यामुळे आपलें विवेचन एकांगीं होतें. इंग्रजी अंमल आपल्या देशांत सुमारें दीडशें वर्षांपूर्वी सुरू झाला. इंग्रजांचें वाङ्मय, इंग्रजांचा इतिहास इंग्रजांच्या सामाजिक चालीरीति यांचा पगडा ते राज्यकर्ते म्हणून साहजिकच आमच्याकडील सुशिक्षितांच्या मनावर बसला. लेखकांनी वाङ्मय–निर्मितीस सुरुवात केली ती इंग्रजी वाङ्मय, इंग्रजांचा इतिहास व समाजस्थिति यांपासून

प्रेरणा घेऊनच केली. निबंध, कादंबरी, नाटक, कविता इत्यादि वाङ्मयाचे अभिनव प्रकार सुरू झाले ते इंग्रजी वाङ्मयांतील नमुन्यावरूनच सुरू झाले. साहजिकच वाङ्मयाचें ऐतिहासिक दृष्टीने समालोचन करण्याचा जेव्हा जेव्हा प्रसंग येतो तेव्हा तेव्हा मराठी लेखकांनी इंग्रजींतून घेतलेल्या प्रेरणा व संस्कार यांचा शोध घेतला जातो आणि इंग्रजी वाङ्मयांतील नमुन्यांच्या तुलनेने मराठी वाङ्मयाचें मूल्यमापन केलें जातें.

पण हें सर्व स्वाभाविक असलें तरी सर्वांशीं योग्य आहे असें मात्र नाही. झापड घातल्याप्रमाणे आपण केवळ एकाच दिशेकडे म्हणजे पश्चिमेकडे पाहात आलों. त्यामुळे संकुचितपणा व एकांगीपणा यांचे मात्र आपण धनी झालों. इंग्रजी वाङमय, इंग्रजी इतिहास यांचे आपणावर झालेले परिणाम फार खोल व बलवत्तर होते हें खरें; पण सगळें कांही तेवढेंच असें मानून चालणें चुकीचें होतें. हजारों कोसांवरील राज्यकर्त्यांची उपासना करण्याच्या भरांत आपण शेजारच्या भाईबंदांना विसरलों. आपल्या भारतांतील परिस्थितीच्या बैठकीवरून सर्व घटनांचें अवलोकन केलें म्हणजे त्या कांही निराळ्याच प्रकाशाने चमकूं लागतात, हें आपल्या ध्यानांत आलें नाही. अद्यापहि या गोष्टीकडे आपलें जितकें जावयास पाहिजे तितकें लक्ष गेलेलें दिसत नाही.

आधुनिक मराठी गद्याचे निर्माते विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या कामगिरीचें मूल्यमापन करतांना ॲडिसन, जॉन्सन, मेकॉले, या इंग्रज लेखकांचे त्यांच्यावर जे संस्कार झाले त्यांचें परीक्षण आपण करतों. हें तर करायला पाहिजेच. त्याच्या योगाने चिपळूणकरांच्या वाङ्मयकार्याचें यथार्थ ज्ञान आपणांस होईल. पण त्याच काळांत भारतांतील भाषांमध्ये कोणकोण लेखक पुढे आले होते, त्यांच्या द्वारा कसकशी वाङ्मयनिर्मिति होऊं लागलेली होती याचें जर आपण तुलनेसाठी अवलोकन केलें तर महाराष्ट्रांतील त्या वेळच्या वाङ्मयीन हालचालींवर कांहीएक निराळाच प्रकाश पडेल. उदाहरणच द्यायचें झालें तर हिंदी भाषेकडे आपणांस वळतां येईल. लल्लूलाल आणि सादल मिश्र यांनी आधुनिक हिंदी वाङ्मयाचा पाया घातला ती परिस्थिति आणि त्यानंतर साधारणपणें चिपळूणकरांच्याच काळांत भारतेंदु हरिश्चंद्र यांनी आपल्या निबंधांनी हिंदी गद्याची परंपरा सुरू केली तो प्रकार आपण जर तुलनेसाठी न्याहाळला तर चिपळूणकरांच्या वाङ्मयीन कार्यावर फार मोठा प्रकाश पडेल

यांत कांही शंका नाही.

आपले महामान्य कादंबरीकार हरिभाऊ आपटे यांची प्रेरणा व स्फूर्ति जेव्हा आपण तपासून पाहतों तेव्हा थॅकरे, डिकन्स, स्कॉट, झोला इत्यादि पाश्चात्य कादंबरीकारांच्या त्यांच्यावर पडलेल्या प्रभावाची आपणांस जाणीव होते; कोणाकोणाचे संस्कार हरिभाऊंनी कसकसे घेतले त्याची छाननी आपण करतों. हें करूं नये असें माझें म्हणणें नाही. पण या छाननीचें जें महत्त्व आहे त्याला तिळमात्र उणेपणा न आणतांहि मी असें म्हणेन की त्या वेळच्या भारतीय भाषांतील वाङ्मयाची दखल घेणें या बाबतींत उपयुक्त ठरल्याखेरीज राहणार नाही. बंगाली कादंबरीचे जनक बंकिमचंद्र चतर्जी यांचा लेखनसंसार हरिभाऊंनी लेखनाला प्रारंभ करण्याच्यापूर्वी बहुतेक आटपला होता. त्यांनी हरिभाऊंप्रमाणेच सामाजिक व ऐतिहासिक कादंबऱ्या लिहिल्या आहेत. त्यांच्या लिखाणाचा हरिभाऊंच्या लिखाणावर कसा आणि कितपत परिणाम झाला असावा याचें संशोधन करावयास नको काय ? हरिभाऊ आपट्यांच्या स्फूर्तीचा उगम हजारो कोस दूर होऊन गेलेल्या वॉल्टर स्कॉटमध्ये शोधण्यापेक्षा तो बंकिमचंद्राच्या भावनापूर्ण देशभक्तिप्रधान कादंबऱ्यामध्ये शोधल्यास फार महत्त्वाचे धागेदोरे आपल्या हातीं लागण्याचा संभव आहे. बंकिमचंद्राच्या दुर्गेशनंदिनी नामक कादंबरीचा प्रारंभ आणि हरिभाऊंच्या उषःकाल कादंबरीचा प्रारंभ यांत कसें विलक्षण साम्य आहे हें मी स्वतःच पूर्वी एकदा दाखवून दिलें होतें.

भारतांतील निरनिराळ्या भाषा आणि आपली मराठी यांच्यामध्ये ही जी अशी सदोदित देवाणघेवाण चालली आहे तिचें संशोधन करून संस्कार, प्रेरणा आणि अनुकरण यांचे उगम कोठेकोठे कसकसे दिसतात यांचा नीट छडा लावल्याखेरीज मराठी वाङ्मयाचा अभ्यास पूर्ण झाला असें कदापि म्हणतां येणार नाही. हा अभ्यास अशा रीतीने करून अखिल भारताच्या वाङ्मयीन परिस्थितींचें सारग्राही अवलोकन केलें म्हणजेच मराठी वाङ्मयांतील प्रकारांचा, प्रवाहांचा व घटनांचा अन्वयार्थ नीट रीतीने लावण्याची भूमिका सिद्ध होईल. मराठी वाङ्मयाचा इतिहासकार होण्याची महत्त्वाकांक्षा जो बाळगीत असेल त्याने आपली ही सर्व पूर्वतयारी झालेली आहे की नाही याची मनांतल्या मनांत तरी तपासणी करून पहावी. इ. स. १८९० ते १९१० पर्यंत मराठींत जें देशभक्तिप्रचुर भावनाप्रधान वाङ्मय निर्माण झालें त्याचें मूल्यमापन त्याच काळांतील

बंगाली वाङ्मयाचें तपशीलवार अवलोकन केल्याखेरीज करतां येणें शक्य नाही. कारण बंगाल्यांतहि त्या काळांत तसलेंच भावनांनी सळसळणारें लिखाण बाहेर पडत होतें. नंतर रवींद्रनाथांच्या गीतांजलीनें गूढवादाचा गंभीर ध्वनि जो उमटविला त्याचे पडसाद महाराष्ट्रांत घनदाट रीतीने उमटल्याखेरीज राहिले नाहीत. मराठी वाङ्मयांतल्या या गूढवादाच्या लाटेचें समालोचन तत्कालीन वंगीय वाङ्मयाच्या अभ्यासाखेरीज परिपूर्ण होऊं शकेल, असें म्हणण्याचें धाष्टर्य कोण करील ?

आणि हें केवळ आधुनिक वाङ्मयासंबंधानेच खरें आहे असें समजण्याचें कारण नाही. जुनें भक्तिप्रधान संतवाङ्मय पाहिलें तरी भाषेभाषेमधील जिव्हाळ्याचे धागेदोरे ठायींठायीं दिसून आल्याखेरीज राहात नाहीत. श्रीतुकारामांच्या गुरुपरंपरेचा धागा बंगाल्यांतील श्रीकृष्ण चैतन्यापर्यंत जाऊन पोचत असावा असें वाटण्यास आधार आहेत. महाराष्ट्रांतील नामदेव, गुजरातेंतील नरसी मेहता इत्यादि अनेक संतांच्या कवनांचा प्रसार त्या त्या भाषेचीं कुंपणें ओलांडून फार दूरवर झाला होता, हें सत्य आहे. किंबहुना त्या काळांत सर्व भारतभर भागवत धर्माचें एकच पाणी खेळत होतें, या अखिल भारतभर वाहात असलेल्या पावन जीवनप्रवाहाची परिपूर्ण जाणीव करून घेतल्याशिवाय मराठीसारख्या कोणत्याहि एका भाषेचा इतिहास लिहिण्याची भूमिका कशी सिद्ध होऊं शकेल ?

तेव्हा भारतांतील भिन्नभिन्न भाषांचें वाङ्मय आणि एकंदर भारतांतील वाङ्मयीन वातावरण यांचा चांगला व्यासंग करून आणि परस्पर संस्कारांचे धागेदोरे समजून घेऊन मगच मराठी वाङ्मयाचा सांगोपांग आणि सोपपत्तिक इतिहास लिहिण्याचें कार्य हातीं घ्यावें, तरच तें समाधानकारक होईल, हा सिद्धान्त अगदी पक्का. महाराष्ट्र साहित्य परिषदेने इतिहासलेखनाचा जो महान् प्रयत्न करण्याचें योजिलें आहे तो करतांना या संबंधांत योग्य ती खबरदारी तिजकडून घेतली जाईल अशी आपण आशा करूं या.

• • •

आकाशवाणी, नागपूर, १९५४
प्रसिद्धि, महाराष्ट्र साहित्य पत्रिका

९

# ज्ञानेश्वर महाराजांचें चरित्र आणि कार्य

( नभोवाणी प्रवचन )

शके १२१८ कार्तिक वद्य त्रयोदशीच्या दिवशीं म्हणजे आजपासून बरोबर ६५८ वर्षांपूर्वी श्री ज्ञानदेवांनी आळंकापुरीं म्हणजे आळंदीस इंद्रायणी नदीच्या तीरीं जिवंत समाधि घेतली अशी हकीकत परंपरेने चालत आली आहे. या समजुतीस अनुसरून या दिवशीं ज्ञानेश्वर महाराजांची पुण्यतिथि सर्वत्र पाळण्यांत येते व आळंदीस कार्तिक वद्य एकादशीपासून त्रयोदशीपर्यंत मोठी यात्रा भरते. हजारो वारकरी व भाविक मंडळी इंद्रायणीचें स्नान करून महाराजांच्या समाधीचें दर्शन घेतात आणि स्वतःला धन्य मानतात.

मीं नुकतेच असें म्हटलें की ज्ञानेश्वर महाराजांनी या तिथीस समाधि घेतली अशी समजूत परंपरेने चालत आली आहे. यावर आपण विचाराल, ‘ म्हणजे ही सिद्ध झालेली निश्चित गोष्ट नाही काय ?’ प्रमाणशास्त्राला आणि ऐतिहासिक दृष्टीला अनुसरून आपल्या या प्रश्नाला उत्तर द्यायचें झाल्यास तें नाही असें देणें भाग पडेल. ज्ञानेश्वरमहाराजांच्या चरित्राकडे व शिकवणुकीकडे आपण श्रद्धायुक्त मनाने पहातों. तें योग्यच आहे. पण आपली श्रद्धा डोळस असली पाहिजे, ती विवेकाच्या पायावर आधारलेली असावी. ती तशी असली म्हणजे तिचा आपण आपल्या प्रगतीसाठी उपयोग करून घेऊं शकतों. विशेषतः व्यक्तीच्या चरित्रांतल्या घटना व प्रसंग ऐतिहासिक दृष्टीच्या आणि तर्कशुद्धतेच्या कसोटीवर घासून पाहून मगच त्यांचें खरेंखोटेंपण ठरविलें पाहिजे. म्हणजे त्यांतूनच

आपणाला आपल्या जीवनाला उपयोगी असे धडे घेतां येतील. नाहीतर संतांचीं चरित्रें म्हणजे अद्भुत चमत्कारांची गाथा व त्यांचा उपदेश म्हणजे केवळ नामस्मरणाचा गदारोळ असें होऊं लागलें तर आपलें जीवन अधिक शुद्ध व उन्नत करण्याचा मार्ग आपणाला सापडणें कठीण होईल. ज्ञानेश्वरांनी रेड्याच्या मुखाने वेद वदविले व आपली पाठ तापवून त्यावर मांडे भाजून दिले, असले जे चमत्कार सांगितले जातात ते खरे असोत किंवा खोटे असोत. हे चमत्कार खरे मानणारीहि कांही विद्वान मंडळी आहेत. तें कसेंही असलें तरी आपणासारखा सामान्य जनांना त्या चमत्कारांचा कांही उपयोग नाही ही गोष्ट निश्चित आहे. ज्ञानेश्वरांनी रेड्याला वेद म्हणायला लावलें असलें तरी आपल्या समोरून एखादा रेडा धावत आल्यास आपणाला बाजूला सरणें भाग आहे. तसेंच आपणाला मांडे भाजायचे असल्यास काडी ओढून विस्तवच पेटवला पाहिजे. कोणाची पाठ त्यासाठी आपल्या कामीं येणार नाही.

तेव्हा, ‘ पीछेसे आओ और आगे चली ’ या न्यायाने चालत आलेल्या ज्या हकीकती आहेत त्या सोडून जर ज्ञानेश्वरांकडे आपण पाहूं लागलों तर प्रमाणशास्त्राच्या व ऐतिहासिक दृष्टीच्या कसोटीस उतरणाऱ्या अशा गोष्टी त्यांच्या चरित्रांत फारच थोड्या उतरतात. ज्ञानदेवी उर्फ ज्ञानेश्वरी म्हणून जी भगवतद्गीतेची टीका प्रसिद्ध आहे, तिच्यांत लेखकाने आपलें नांव ज्ञानदेव म्हणून दिलें आहे. आपल्या गुरुचें नांव निवृत्तिनाथ असें सांगितलें आहे. आणि हें गीतेचें देशीकार लेणें ‘ महाराष्ट्र मंडळां ’ त गोदावरीच्या दक्षिण तीरीं महालसा देवीचें स्थान असलेल्या प्राचीन पंचक्रोश क्षेत्रांत यादव वंशांतील रामचंद्र उर्फ रामदेवराय हा राजा राज्य करीत असतां रचलें गेलें, अशी ग्रंथाच्या अखेरीस माहिती दिली आहे. खुद्द ज्ञानेश्वरांनी सांगितलेली म्हणून अर्थातच पूर्ण विश्वसनीय अशी जी कांही आपणाला माहिती मिळते ती एवढीच.

ऐसें युगी वरि कली, आणि महाराष्ट्र मंडलीं.
श्री गोदावरिचां कुलीं, दक्षिणिलीं ॥
तेथ भुवनैकपवित्र, अनादि पंचक्रोश क्षेत्र,
जगाचें जीवनसूत्र, जेथे श्रीमहालसा ॥
तेथ अिंदुवंशविलासु, जो सकलकलां निवासु,
न्यायातें पोखीत क्षितीशू, श्रीरामचंद्रु ॥

तैं माहेषान्वय संभूतें, श्रीनिवृत्तिनाथ सुतें
केलें ज्ञानदेवें गीतें, देशीकार लेणें.

—श्रीज्ञानेश्वरी, १८.१७८१–८४

खुद्द ज्ञानेश्वरीमध्ये मिळणाऱ्या वरील माहितीखेरीज नामदेवांचे आदीचे व तीर्थावळीचे अभंग, इतर संतांच्या अभंगांतील उल्लेख व महीपतीसारख्या संत-चरित्रकारांनी वर्णिलेल्या कथा यांवरून आपणाला पुष्कळ अधिक गोष्टी कळतात.

नामदेवांच्या अभंगावरून ज्ञानदेवांचें जें चरित्र आपणांस कळतें तें सर्वांस माहीतच आहे. आपेगावचे कुलकर्णी गोविंदपंत यांचा मुलगा विठ्ठलपंत. शास्त्र-विद्या पढल्यानंतर विठ्ठलपंतांना विरक्ति प्राप्त होऊन ते तरुणपणींच तीर्थयात्रा करीत हिंडूं लागले. हिंडतां हिंडतां ते आळंदीस आले. तेथील कुळकर्णी सिधोपंत यांची मुलगी रुक्मिणीबाई हिच्याशीं श्रीपांडुरंगाच्या दृष्टांतावरून त्यांचा विवाह झाला. विठ्ठलपंत आपल्या सासऱ्याच्या म्हणजे सिधोपंताच्या घरीं पत्नीसहित पण उदासीन वृत्तीने राहूं लागले. बहुत काळ गेला तरी पुत्र होईना, तेव्हा विठ्ठलपंतांनी, "संन्यास घ्यायला मला अनुज्ञा दे", म्हणून पत्नीला आग्रह सुरूं केला. बरेच दिवस रुक्मिणीबाईने विठ्ठलपंतांना दाद दिली नाही. पण विठ्ठलपंत

निरोपाची वाट पाहे भलत्या मिसे, रखुमाई असे सावधान,
असता दुश्चितपणें निरोप पुसिला, जा जा म्हणे दिधला अवसरू,
जाऊनि विठ्ठलें घेतला संन्यास, चिंता रखमाईस पडली भारी;

पुढे रामानंदस्वामींनी काशी येथे त्यांना संन्यास दिला. तेच फिरत फिरत आळंदीस आले असतां नवऱ्याविषयीच्या काळजीने पिंपळाला प्रदक्षिणा घालीत असलेल्या रुक्मिणीबाईने त्यांना नमस्कार केला, त्या वेळीं रीतीप्रमाणे त्यांनी "पुत्रवती भव" म्हणून आशीर्वाद दिला. तिने आपल्या पतीने संन्यास घेतल्याचें स्वामींना सांगितलें. पतीच्या खाणाखुणा विचारल्यानंतर आपण काशीस ज्या गृहस्थास संन्यास दिला तोच ह्या बाईचा पति असावा अशी स्वामींनी मनाशीं खूणगाठ बांधली व सिधोपंत व रुक्मिणीबाई ह्यांस घेऊन ते काशीस गेले. विठ्ठलपंताचें संन्यासांतले नांव चैतन्यस्वामी असें होतें. त्याने पत्नीचा त्याग करून आल्याचें कबूल केलें. तेव्हा पुन्हा गृहस्थाश्रम स्वीकारून पत्नीसह संसार करावा अशी त्यांनी चैतन्यस्वामीला आज्ञा केली, तेव्हा त्याने गृहस्थाश्रम

स्वीकारला व तो आळंदीस परत आला. तेथे विठ्ठलपंत व रुक्मिणी या जोडप्यास निवृत्ति, ज्ञानदेव, सोपान आणि मुक्ताबाई अशीं चार अपत्यें झालीं. मुलगे मुंज करण्याच्या वयाचे झाले तेव्हा आईबापांना काळजी उत्पन्न झाली. कारण हा संन्यासी पुन्हा गृहस्थाश्रमी झाला म्हणून गांवच्या लोकांनी विठ्ठलपंताच्या कुटुंबाला वाळींत टाकलें होतें. तुम्ही सांगाल तें प्रायश्चित्त आम्ही घेतों, पण आम्हांला शुद्ध करून घ्या व मुलांच्या मुंजी करायला परवानगी द्या, अशी विठ्ठलपंताने आळंदीच्या ब्रह्मवृन्दाला विनंती केली, तेव्हा त्यांनी निर्णय दिला की—

देहान्त प्रायश्चित्त असे या बोलिलें
विचारूनि भलें हित करा

ब्राह्मणांनी सांगितलेलें प्रायश्चित्त विठ्ठलपंतांनी मान्य केलें. त्यांनी त्रिवेणी संगमावर जाऊन नदींत जीव दिला. रुक्मिणीबाईने त्यांचाच मार्ग अनुसरला.

तेव्हा पुढे काय करावें हा मोठाच पेच निवृत्तीपुढे उभा राहिला. आळंदीचे ब्राह्मण उपनयनाला परवानगी देईनात. पैठण हें मोठें क्षेत्र व विद्येचें महापीठ. तेथील ब्राह्मणांकडून शुद्धिपत्र आणा असें आळंदीच्या ब्राह्मणांनी सांगितलें. तेव्हा हीं चारी भावंडें पैठणास गेलीं, तेथे

केली ब्रह्मसभा बैसले वरिष्ठ, होतें तैसें स्पष्ट निवेदलें,
नाही प्रायश्चित्त उभयकुळभ्रष्ट, बोलीयले श्रेष्ठ पूर्वापार,

अशा रीतीने ब्राह्मणांनी तुम्हांला प्रायश्चित्त नाही म्हणून सांगितल्यावर ज्ञानेश्वरांनी रेड्याच्या तोंडून वेद म्हणविणें वगैरे चमत्कार करून दाखविले. तेव्हा ब्राह्मणांचा ताठा उतरला व त्यांनी पश्चात्तापाचे उद्‌गार काढून

मिळोनि समस्त सोडियेलीं शास्त्रें, विचारोनि पत्र लिहियेलें,
परलोकीचें तारु देवत्रय यांसी प्रायश्चित्त यांसी, द्यावें णेंको

पैठणच्या ब्राह्मणांनी याप्रमाणे शुद्धिपत्र (!) दिलें, पण प्रायश्चित्त कांही दिलें नाही. तेव्हां मुंजी करून घेण्याच्या खटाटोपांत न पडतां ज्ञानेश्वरांनी तेथून नेवासें इथे येऊन ज्ञानेश्वरी लिहिली. हा ग्रंथ भगवद्‌गीतेवर टीकेच्या स्वरूपाचा असल्यामुळे निवृत्तिनाथांनी परमार्थ विषयावर स्वतंत्र ग्रन्थ लिहावा अशी ज्ञानरायांस आज्ञा केली. त्याप्रमाणे ज्ञानेश्वरांनी अमृतानुभव हा वेदान्त ग्रन्थ रचिला. याप्रमाणे ग्रन्थलेखन झाल्यानंतर ज्ञानदेव आपल्या भावंडांसह पंढरपुरास गेले. तेथे नामदेव, गोरा कुंभार इत्यादि संत मंडळींसह भजनानंदाचा कांही काळ अनुभव घेऊन

मग नामदेवादि संतांना बरोबर घेऊन ज्ञानदेवांनी तीर्थयात्रा केल्या. तीर्थयात्रेहून परत आल्यानंतर संतमंडळींसह ज्ञानदेव आळंदीला आले. तेथे जिवंत समाधि घेण्याचा आपला निश्चय त्यांनी प्रकट केला. भावंडांना व संतमंडळींना अपार शोक झाला. पण ज्ञानेश्वरांचा निश्चय अढळ होता. आपलें अवतारकार्य संपलें असें वाटून त्यांनी स्वेच्छेने समाधि घेतली.

तैसा प्रबंधु हा श्रवणीं, लागत खेवो समाधी आणी.

अशा तऱ्हेचा विश्व मोहरेला लावणारा ग्रन्थ रचणाऱ्या महाविभूतीचें हें अद्‌भुत, लोकविलक्षण चरित्र आहे. हें चरित्र आपणांस असें सांगतें की या महापुरुषाचें आयुष्यमान फक्त २१ वर्षांचें होतें, पंधराव्या वर्षी याने ज्ञानेश्वरी-सारखा अलौकिक ग्रन्थ रचला आणि एकविसाव्या वर्षी, म्हणजे ज्या वयांत मनुष्य जगांतील इंद्रियजन्य सुखें भोगण्यास उत्कंठित झालेला असतो अशा वयांत त्याने स्वेच्छेने आयुष्याचा शेवट केला.

हें चरित्र खरोखरीच असें घडलें, असें सांप्रदायिक वारकरी आणि इतर भाविक मंडळी तर मानतातच. त्याप्रमाणे बरेच संशोधक विद्वान देखील यावर साधारणपणें विश्वास ठेवून चालतात. शिवरामबुवा भारदे यांच्यासारखे कांही थोडे चिकित्सक मात्र ज्ञानेश्वरी रचणारा ज्ञानदेव आणि अभंग रचणारा पंढरीच्या विठ्ठलाचा भक्त आणि वारकरी संप्रदायाचा अध्वर्यू ज्ञानदेव हे दोघे एकमेकांहून भिन्न होते, यांपैकी पहिला ज्ञानेश्वरीकर्ता इसवीसनाच्या तेराव्या शतकांत आणि अभंग रचणारा विठ्ठलभक्त पंधराव्या सोळाव्या शतकांत होऊन गेला असें प्रति-पादन करतात. ह्या वादामध्ये खोल जाण्याचें आपल्याला कांही कारण नाही; एवढें मात्र खरें की ज्ञानेश्वरांचें हें चरित्र जितकें अद्‌भुत तितकेंच काव्यमय आहे आणि जितकें काव्यमय तितकेंच आत्मबोधाने भरलेलें आहे. त्यांतलीं नांवें आणि त्यांतले प्रसंग म्हणजे एक सुंदर आध्यात्मिक रूपक आहे. कसें तें पहा—

विठ्ठल म्हणजे परमात्मा, म्हणजे वेदांत्यांच्या मतीं परब्रह्म किंवा सांख्यांच्या मतीं पुरुष. रुक्मिणी म्हणजे वेदांतांत माया किंवा सांख्य तत्त्वज्ञानांत प्रकृति. माया किंवा प्रकृति हिच्या योगानेच सृष्टि निर्माण होते. एरवी परब्रह्म हें निर्गुण निराकार, उदासीन असतें. आपल्या चरित्रांत पहा, विठ्ठलपंत हा विरक्त व उदासीन होता. तो संन्यासी होऊन केवल चैतन्य बनून गेला. पण रुक्मिणीरूपी

प्रकृतीने त्याला पुन्हा संसारांत म्हणजे सृष्टिनिर्माणकार्यांत ओढलें. तेव्हा त्यांच्यापासून जी प्रजा झाली; त्यांचीं नांवें देखील पहा कशीं आहेत, निवृत्ति ज्ञान, सोपान व मुक्ता ! हीं नांवें म्हणजे अध्यात्म मार्गाच्या वाटचालीवरचे टप्पेच आहेत असें आपल्याला दिसून येईल. आत्मज्ञानाचा अधिकारी होण्याला प्रथम विषयांपासून निवृत्ति म्हणजे वैराग्य उत्पन्न व्हावें लागतें. निवृत्ति झाली म्हणजे ज्ञानाचा उदय होतो. आपल्या आत्म्याच्या ठायीं ज्ञानाचें स्फुरण झालें तरी तें पुढे ठसावें लागतें आणि वासनात्मक देह गळून पडावा लागतो. सोपान म्हणजे मुक्तावस्थेला पोचेपर्यन्तच्या अध्यात्मसाधनेच्या पायऱ्या. या चढून गेल्यानंतर मुक्ता म्हणजे मोक्षावस्था ही प्राप्त होते. अशा रीतीने विठ्ठलरखमाई म्हणजे पुरुष आणि प्रकृति हीं दोन्ही मोक्षमार्गाप्रत जाणाऱ्या जीवात्म्याला जन्म देतात असें हें रूपक सुंदर रीतीने बसतें.

निवृत्ति, ज्ञान, सोपान यांची मुंज व मुक्ताबाईचें लग्न होऊं शकत नाही, यांतला मतलब असा की विशुद्ध जीवात्मा संसाराच्या किंवा वासनात्मक सृष्टीच्या बंधनांत गुरफटला जाऊं शकत नाही. अज्ञ जनांना ज्ञानाचा उपदेश करून तो समाधिस्थ होतो. म्हणजे आत्मसुखांत निमग्न होतो.

ज्यांचें सगळें चरित्र म्हणजेच एक असें आध्यात्मिक रूपक आहे अशा महाविभूतीने आपल्या ग्रंथांत सांगितलेलें ज्ञान हें तसेंच अलौकिक असेल हें काय सांगायला पाहिजे ? या ज्ञानाचा विशेष हा की तें केवळ मोक्षमार्गी विरक्त लोकांनाच उपयोगी आहे असें नाही तर सामान्य संसारी लोकांना देखील सुखी करण्याचा गुण त्यांत आहे. खुद्द ज्ञानेश्वर म्हणतात,

तैसे अध्यात्मशास्त्रीं इयें, एक अंतरंगचि अधिकारिये,
येरि लोक वाक्चातुर्यें, होईल सुखिया.

सर्व लोकांना सुखी करण्याचें सामर्थ्य या ग्रंथांत जें आलें आहे, त्याची कारणें दोन आहेत. एक कारण म्हणजे या ग्रंथाचें अप्रतिम वाङ्मयसौंदर्य. अमृताशीं पैजा जिंकणारीं रसाळ अक्षरें मिळवून हा ग्रंथ लिहिला आहे असें ज्ञानदेवांनी जें म्हटलें आहे त्यांत तिळमात्रहि अतिशयोक्ति नाही. एखाद्या शोभिवंत बगीच्यामध्ये हिंडावें त्याप्रमाणे ज्ञानेश्वरी वाचतांना आपणाला अनुभव येतो.

ना तरी उद्यानीं माधवी घडे, तैं वनशोभेची खाणी उघडे,
आदिलपासौनि अपाडे, जियापरीं.

सर्वोत्कृष्ट सारस्वत हें नेहमी आपल्या समाधानाचें शांतीचें निधान असतें. तीच गोष्ट ज्ञानेश्वरीच्या बाबतींत खरी आहे.

पण याहिपेक्षा सबळ कारण म्हणजे, ज्ञानेश्वरांना या गीताटीकेच्या रूपाने जें सांगायचें आहे तें ज्ञान किंवा ती वस्तूच मुळांत अशी आहे की ती कोणालाहि प्राप्त करून घेतां येण्याजोगी आहे आणि ती प्राप्त होतांच सर्वत्र सुखाचे मळे भरभराटतील आणि मोक्ष हा तळहातावरील आवळ्याप्रमाणे सुलभ होईल. हें मी पदरचें सांगत नाही. स्वतः ज्ञानेश्वर काय म्हणतात तें ऐका,

जरी मैत्रेंचि वैरी मरे, तरि वायां कां बांधावे कटारे,
योगु जाय दूधें ओंगरें*, तरि निंब का पियावा,
तैसा मनाचा मारू न करितां, इंद्रिय दुःख नेदितां
एथ मोक्ष असे आइकतां श्रवणांमाझि.

* ओंगर–वाढलेलें अन्न

हें सर्व कसें होतें ? ज्ञानेश्वरांनी जीवनाचें ध्येय आणि परमेश्वराचें स्वरूप जें वर्णिलें आहे, तें असें आहे की त्यांतून विशुद्ध आनंदाखेरीज दुसऱ्या कशाची प्राप्ति होऊंच नये.

ज्ञानेश्वरींत आत्यंतिक प्रेमळपणाने मनाला भारून टाकणारीं अशीं जीं स्थळें आहेत, त्यांत आपणाला कोणतें तत्त्व दिसून येतें ? संवाद. संवाद म्हणजे प्रेमामुळे व अंतरीच्या ऐक्यभावामुळे जुळलेला परस्पर मेळ. ज्ञानेश्वरीमध्ये सर्वत्र हा संवाद भरलेला आहे. या संवादाचे नानारूपांनी ज्ञानेश्वरांनी वर्णन केलें आहे. अगदी पायाभूत म्हणजे श्रीकृष्ण आणि अर्जुन यांचा संवाद. कृष्णार्जुनांचें अद्वितीय प्रेम ज्ञानेश्वरांनी अनेक ठिकाणीं अत्यंत मनोहर रीतीने वर्णिलें आहे. एक लहानसें उदाहरण पाहूं.

वत्स घाल्याहि वरी, धेनू न बचावी दुरी,
अनन्य प्रीतीची परी, ऐसी आहे.
तेणे काजेवीणही बोलावे, ते देखिले तरी पाहावे.
भोगितां चाड दुणावे, पढियंतया ठायी,

त्याचप्रमाणें दुसरें,

दोहीं ओठीं एक बोलणें, दोहीं चरणीं एक चालणें.
तैसें पुसणें सांगणें, तुझें माझें.

एवं आम्ही तुम्ही येथे, देखावें एका अर्थातें,
सांगतें पुसतें येथे दोन्ही एक.

तसाच श्रोता वक्ता संवाद. सज्जन श्रोत्यांचें प्रेम आणि ज्ञानेश्वरांचा विनय यांची इथे अशी कांही मिळणी होऊन गेली आहे की ज्ञानेश्वरांनीच म्हटल्या प्रमाणें " पंचमालाप आणि सुगंध, की परिमळ आणि सुस्वाद. " असा अनुभव वाचकास निरंतर येतो. नवव्या अध्यायाच्या प्रारंभीं ज्ञानेश्वर म्हणतात,

कां जें ललेयाचे लळे सरति, मनोरथाचे मनौरे पुरति,
जरि माह्येरें श्रीमंतें होति, तुम्हां ऐसीं. ३
आणि बालक बोबडां बोलीं, कां वाकुडां विचुकीं पाउलीं,
चोज करूनि माउली, रिझवी जेवि. ६
तेवि तुम्हां संतांचा पढियावो,
कैसेनि तऱ्हीं आम्हांवरि हो,
इया बहुवा अळुकी जी आहों, सलगि करित. ७
वांचूनि माझिये बोलतिये योग्यते, सर्वज्ञ भवादृश श्रोते,
काइ घडेयावरि सारस्वतें, पढों सिकिजे. ८

यानंतर अखेरचा गुरुशिष्य संवाद, त्याची माधुरी काय वर्णावी ? निवृत्तिनाथांना उद्देशून किती लीनपणाचे उद्गार ज्ञानेश्वरांनी काढावे! त्यांचें गुरुप्रेम केवळ अपार आहे. बऱ्याच अध्यायांच्या प्रारंभीं ज्ञानेश्वरांनी गुरुकृपेवर सुंदर रूपकें केलीं आहेत. चौदाव्या अध्यायाच्या प्रारंभीं सूर्याचें रूपक केलें आहे तें आपण थोडेंसें पाहू.

जय जय आचार्या, समस्तसुरवर्या,
प्रज्ञाप्रभातसूर्या, सुखोदया १
जय जय सर्वविसांवेया, सोहंभावसुहावेया,
नानालोक हेलावेया, समुद्रा तूं, २
आइकैं गा आर्तबंधू, निरंतर करुणासिंधू,
विशद विद्यावधू, वल्लभा जी. ३
कां उदैलेयां भास्वतु, चंद्र जैसा खद्योतु,
आम्हा श्रुती तुजआंतु, तेतुला पाडु. १३

याप्रमाणे सर्व सृष्टि ज्ञानेश्वरांना संवादरूप दिसत होती, याचें कारण निरहंकारता व प्रेम. ज्ञानेश्वरांची विनम्रता इतकी अलौकिक होती की इतका उत्तमोत्तम

ग्रंथ रचूनहि अखेरीस त्यांनी त्याला दूर्वादलाची उपमा दिली आहे.

अरूणु आंगा जवळिके, म्हणौनि सूर्यातें तो देखे,
माभूतलींचि नेदखे, मुंगी काई. १८. १६९८

इथे ज्ञानेश्वरांनी आपल्याला मुंगी म्हणवून घेतलें आहे. स्वतःला किती हीन दृष्टान्त घ्यावे, याची त्यांनी कांही सीमा ठेवली नाही.

या प्रेमभावांतून आणि नम्रतेंतून ज्ञानेश्वरांनी कोणता रस आळविला आहे, म्हणाल तर शांत रस. या माझ्या शांत रसावरून बाकीचे सर्व रस ओवाळून टाकावे असें ते म्हणतात.

जयाच्या बखेपणीं, कीजे आठां रसांची ओवाळणी,
जो सज्जनाचिये आणि, विसावा जगीं.
तो शांतचि अभिनवैल, ते परियसा मन्हाटे बोल.
जे समुद्राहूनि खोल, अर्थभरित.
जे साहित्य आणि शांति, हे रेखा दिसे बोलती,
जैसी लावण्यगुणयुवती, आणि पतिव्रता.

अशा रीतीने हा शांत रस आणि त्याच्यामुळे सर्व सृष्टींत स्फुरणारा परस्पर संवाद हा कशामुळे निर्माण होतो ? ज्ञानेश्वरांनी प्रतिपादिलेल्या तत्त्वज्ञानाचा मूलभूत सिद्धान्तच असा आहे की त्यांत संवादावाचून किंवा शांत भावावाचून दुसरें कांही संभवतच नाही. हें विश्व म्हणजेच परब्रह्म आहे. परब्रह्म किंवा परमात्मा हाच सृष्टिरूपाने आकारलेला आहे. असा ज्ञानेश्वरांनी निरूपिलेल्या भागवतधर्माचा सिद्धान्त आहे. हा सिद्धांत ज्याच्या ठायीं ठसला व जो तद्रूप होऊन गेला, त्याला व्यक्तिव्यक्तींत किंवा वस्तुवस्तूंत विरोध भासेल तरी कसा ? सर्व वस्तुजात किंवा प्राणिमात्र परस्पर संवादी आहेत, त्यांच्यांत पूर्ण मेळ आहे, एकसूत्रता आहे, असाच अनुभव त्याला येतो आणि सर्वांची परिपूर्ति, सर्वांचें समाधान व शांति हीच त्याची ईश्वरोपासना किंवा ब्रम्हप्राप्तीची तपस्या ठरते.

अशा रीतीने आपण विनम्र होऊन या जगद्रूपी ब्रम्हाची सेवाभावाने उपासना करावी आणि सर्वत्र समाधान व शांति अनुभवावी हा ज्ञानराजांचा संदेश आहे. हा त्रिकालाबाधित आहे. याला जाति वय लिंग यांच्या तर काय, पण देशकालादिकांच्या देखील मर्यादा नाहीत. या संदेशाला आपण सामाजिक म्हणा, राजकीय म्हणा किंवा आध्यात्मिक म्हणा, हा सर्वत्र सारखाच उपयोगी पडणारा

आहे, कारण ज्ञानेश्वरांच्या मताने प्रपंच व परमार्थ हे मुळी भिन्न नाहीतच. या संदेशाचें सार ज्ञानेश्वरांनी आपल्या अद्भुत ग्रंथाच्या शेवटीं पसायदानाच्या रूपाने निवेदन केलें आहे. त्याचा उच्चार करून आपण परस्परांचा निरोप घेऊं या,

आता विश्वात्मकें देवें, एणें वाग्यज्ञें तोषावें.
तोखौनि मज देयावें, पसायदान हें.
जे खळांची वांकुडी मोडे, तेयां सत्संगीं रति वाढे,
भूता परस्परें पडे, मैत्र जीवाचें.
दुरितांचें तिमीर जावो, विश्वा स्वधर्मसूर्यो पाहो,
वांछिल तें तें लाहो, प्राणिजात.
चलां कल्पतरूचे आरव चेतना चिंतामणिचे गावं,
बोलते पां अर्णव, पीयूखांचे,
चंद्रमे जे अलांछन, मार्तण्ड जे तापहीन.
ते सर्वांही सदा सज्जन, सोयरे होंतु.
किंबहुना सर्वसुखीं, पूर्णा होउनि तिहीं लोकीं.
भजिजो आदिपुरुषीं, अखंडित.

आकाशवाणी पुणें, कार्तिक वद्य १३, शके १८७६

१०

# आधुनिक बंगाली कविता

साहित्यसम्राट बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी 'सुजलाम् सुफलाम् सस्यश्यामलांम्' असे जे उद्गार काढले ते गंगानदीच्या हजारो फाट्यांनी वेढलेल्या वंगभूमीला विशेषेंकरून लागू पडतात. मोठा चमत्कार असा की ही वंगभूमि पार्थिव दृष्ट्या जशी सुजला सुफला झाली आहे, तशीच आणि तितकीच मानसिक दृष्ट्याहि सुजला सुफला झाली असल्याचें आपल्या अनुभवास येतें. साहित्यामध्ये आणि, ज्ञानाच्या सर्व शाखांमध्ये आपल्या वंगीय बंधूंनीं जी प्रगति केली आहे ती विस्मयजनक आहे. हिंदुस्थानांतल्या सर्व भाषांत बंगाली भाषेचें साहित्य आघाडीवर आहे, असें विधान केलें तर कुणालाहि त्याबद्दल वैषम्य वाटण्याचें कारण नाही. ती गोष्ट सर्वमान्य आहे. भारतांतील ज्या साहित्यकारांनी आपल्या वाङ्मयगुणाच्या जोरावर आंतरराष्ट्रीय कीर्ति संपादन केली आहे, त्यांपैकी सर्वांत अधिक साहित्यकार बंगाली आहेत. रवीन्द्रनाथ टागोरांचेंच एक नांव घेतलें तरी त्यावरून वंगीय साहित्याची व्यापकता, उन्नतता आणि सुंदरता यांचा प्रत्यय आल्याखेरीज राहणार नाही.

इतर सर्व शाखांप्रमाणे बंगाली वाङ्मयाची काव्यशाखाहि अत्यंत समृद्ध आहे. मराठीशीं तुलना केली तर आधुनिक बंगाली वाङमयाची काव्याच्या बाबतींतील समृद्धता ठळकपणें नजरेंत भरेल. बंगाली माणसाचें मन स्वभावतःच अधिक भावनाप्रधान व सौंदर्यलोलुप; मराठी माणसाचें मन त्या मानाने अधिक तर्कप्रधान व रोखठोक. हा त्या त्या जनतेचा स्वभाव वाङमयाच्या प्रांतांत प्रतिबिंबित झाला नसला तरच नवल. आधुनिक मराठी वाङ्मयामध्ये गद्याची निपज

फार थोडी आणि त्यांतहि काव्यगुणांनी उच्च दर्जाचें ठरणारें काव्य एकंदरीने कमीच, बंगाली वाङमयांत काव्याचा पसारा पुष्कळच मोठा आणि त्यांत उच्च दर्जाचें काव्यहि प्रमाणानें पुष्कळ आढळेल. एकट्या रवींद्रनाथांनी इतकी कविता लिहिली आहे की मराठींतल्या एका पिढीच्या सर्व कवींनी लिहिलेल्या कवितेपेक्षा कदाचित ती अधिक भरेल.

मराठींतल्याप्रमाणेच बंगालींतहि आधुनिक काव्याचा जन्म कथाकाव्याच्या रूपाने झाला. मराठींत कुंटे लेले वगैरेंनी शिवाजीच्या चरित्रावर महाकाव्यरचना केली. बंगालींतहि महाकाव्य म्हणजे इंग्रजींत ज्याला Epic म्हटलें जातें, त्याच्या धर्तीवर काव्यरचना प्रथम प्रादुर्भूत झाली. मायकेल मधुसूदन दत्त यांचें 'मेघनादवध' हें महाकाव्य १८५७ च्या क्रांतियुद्धानंतर थोड्याच वर्षांनी प्रसिद्ध झालें. मेघनाद म्हणजे इंद्रजित हा रावणाचा मुलगा; त्याच्या वधावर हें काव्य रचलें आहे हें स्पष्ट आहे. पण देव दैत्य, राक्षस इत्यादि पौराणिक कल्पनांचें आवरण काढून टाकून मेघनादाला मायकेलने मानवी धीरोदत्त वीरपुरुष बनविलें आहे. त्यामुळे ही एक आधुनिक तऱ्हेची वीरकथा बनली आहे. मायकेलपुढे इंग्रजी महाकवि मिल्टनचें उदाहरण होतें. मिल्टनप्रमाणे मायकेलने या महाकाव्यांत निर्यमक छंद ऊर्फ Blank Verseचा प्रयोग केला. मिल्टनचें जसें 'पॅराडाइज लॉस्ट' त्याप्रमाणेच मायकेलचें 'मेघनादवध' हें बंगालींतलें श्रेष्ठ महाकाव्य समजलें जातें. मायकेल वीरतेचा भोक्ता होता. पुराणकालीन वीरपुरुष आणि वीररमणी यांचीं चित्रें वठविण्यांत त्याने आपली प्रतिभा ओतली. 'वीरांगना' महाकाव्य ही त्याची दुसरी रचना आहे. तिच्यांत त्याने रुक्मिणी प्रभृति पुराणकाळच्या वीर रमणींनी आपल्या प्रियकरांना लिहिलेलीं पत्रें वर्णिलीं आहेत. याशिवाय पेट्रार्क, मिल्टन, यांचें अनुकरण करून त्याने बंगालींत सॉनेट ऊर्फ सुनीतें लिहिण्याचाहि पायंडा पाडला.

मायकेलनंतर त्याच्या धर्तीवर महाकाव्यें लिहिणारे पुष्कळच कवि पुढे आले. हेमचंद्र बनर्जी यांचें वृत्रसंहार, नवीनचंद्र सेनचें पलाशीर युद्ध म्हणजे प्लासीची लढाई या दोहोंचा येथे उल्लेख करणें पुरेसें होईल.

एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या पंचविशींत पदार्पण करून आपण वाटचाल करूं लागलों म्हणजे काव्याच्या क्षेत्रांत वैणिकी प्रतिभेचा हळू हळू आढळ होऊं लागतो. कवींची वृत्ति आत्मलक्षी बनते, त्यांचें विश्व भावमय होऊन जातें, बाह्य

वस्तु या आत्मभावनेचा आविष्कार करण्याचीं साधनें या नात्यानें उपयोगिल्या जातात. आपणाला माहीत आहे की मराठीचे सर्वश्रेष्ठ भावकवि केशवसुत याच काळांत आपलें काव्य लिहूं लागले होते. बंगालींतहि भावगीतांच्या प्रादुर्भावाचा हाच काळ होता, हें साम्य लक्षांत ठेवण्याजोगें आहे. या काळांत होऊन गेलेल्या वैणिक प्रतिभेच्या बंगाली कवींमध्ये बिहारीलाल चक्रवर्ती यांचा उल्लेख केला पाहिजे. भावमयतेपेक्षा सौंदर्यनिदर्शनावर यांचा भर जास्त होता. यांची सौंदर्यदृष्टि इतकी तरल व प्रसंगविशेषीं उदात्त होती की खुद्द रवीन्द्रनाथांच्यावर यांच्या कवितेचा बराच प्रभाव पडला होता. काव्यक्षेत्रांत बिहारीलाल हे आपले मार्गदर्शक झाले असें रवीन्द्रांनी म्हटलें आहे. यांच्या हिमालय नामक कवितेंतील हा उतारा ऐकल्यास त्यांच्या काव्यसौंदर्याची कांहीशी कल्पना येईलः--

असीम नीरद नय ।
ओइ गिरि हिमालय
उथुले उठेले जेनो
अनन्त जलधि
व्यापे दिक दिगन्तर
तरंगिया घोरतर
प्लाविया गगनांगने जागे
निरवधि ॥
पदे पृथ्वी, शिरे व्योम
तुच्छ तारा सूर्य सोम
नक्षत्र नखाग्रे जेनो गनिबारे पारे
समुखे सागराम्बरा
छडिये रयेछे धरा,
कटाक्ष करन जेनो हेरिछे ताहारे ॥

यानंतर आपण रवीन्द्रयुगामध्ये प्रवेश करतों. ऐंशी वर्षांच्या दीर्घ आयुष्यांत तब्बल साठ वर्षें रवीन्द्रनाथ एकसारखे लेखन करीत होते. एक मोठें कपाट भरेल एवढें विस्तीर्ण साहित्य त्यांनी निर्माण करून ठेवलें आहे आणि त्यांतलें बहुतेक उच्च दर्जाचें, चिरकाल टिकण्याजोगें आहे हें विशेष. रवीन्द्र हे काय नव्हते ? ते

कादंबरीकार होते, लघुकथाकार होते, नाटककार होते, निबंधकार होते, होते, शास्त्रज्ञ होते, वक्ते होते, प्रवचनकार होते, चित्रकार होते. हें सर्व कांही असलें तरी ते सर्वतोपरि कवि होते. त्यांचा आत्मा कवीचा होता. त्यांची सौंदर्यदृष्टि निरुपम होती आणि सौंदर्याचा आविष्कार करण्याची शक्ति असाधारण होती. समाजांत हरघडी घडणारे साधे प्रसंग असोत किंवा देवेन्द्रादिकांच्या गोष्टी असोत. त्या सर्वांना आपल्या प्रतिभाबलाने दिव्य तरल कल्पनामय वातावरणांत नेऊन जणू कांही रंगभूमीवरील देखाव्याप्रमाणे वाचकांच्या नजरेसमोर उभ्या करण्याचें त्यांचें सामर्थ्य विलक्षण होतें. अतीन्द्रियपरी भोगवीन। इंद्रियांकरवीं। ही ज्ञानेश्वरांची उक्ति त्यांना बरोबर लागू पडते.

पुष्कळांची समजूत अशी की रवीन्द्रनाथांचें काव्य सगळें गूढगुंजनात्मक आहे. ही समजूत व्हायला कारण त्यांचा गीतांजलि हा स्फुट कवितांचा संग्रह होय. आपल्या निवडक अध्यात्मपर कवितांचें इंग्रजी भाषांतर रवीन्द्रांनी इंग्लंडांत प्रसिद्ध केलें आणि त्यावर १९१३ सालीं त्यांना जगद्विख्यात नोबेल पारितोषिक देण्यांत आलें, त्याबरोबर रवीन्द्र आणि गीतांजलि या दोघांचाहि आपल्याकडे सर्वत्र बोलबाला झाला. गीतांजलीची सर्वत्र भाषांतरें व रूपांतरें झालीं आणि त्यांच्या अनुकरणानें हिंदुस्थानांतल्या प्रत्येक भाषेंत गूढगुंजनाचें अथवा ज्याला इंग्रजींत Mysticism किंवा हिंदींत रहस्यवाद म्हणतात त्याचें युग अवतरलें. पण याचा अर्थ असा नव्हे की रवीन्द्रांनी केवळ गूढवादी काव्यच लिहिलें. त्यांनी अद्भूतरम्य, देशभक्तिपर, ऐतिहासिक, सामाजिक, सर्व प्रकारच्या विषयांवर कविता लिहिली आणि हरएक प्रकारचा विषय त्यांनीं आपल्या सौंदर्यदृष्टीने उजळून सोडला. जन्मभर कुटुंबाचे कष्ट उपासण्याखेरीज जिने कांही केले नाही, अशा एका मध्यमवर्गीय गृहिणीचें हें रवीन्द्रांनी केलेलें करुणरम्य वर्णन पाहा —

डाक्तोर जा बले बलुक नाको
राखो राखो खुले राखो
शिओरेर ओई जानला दुटो, गाय लागुक हावा
ओशुध ? आमार फुरिये गेछे ओषुध खावा
तितो कडा कतो ओशुध खेलाम ए जीवने
दिने दिने खणे खणे

बेंचे थाका, सेंई जेनो एक रोग.

रवीन्द्रांचे समकालीन पुष्कळच कवि होऊन गेले. पण कांही अंशीं कालिदासाच्या शब्दांत असें म्हणणें शोभेल की—

नक्षत्रताराग्रहसंकुलापि ज्योतिष्मती चंद्रमसैव रात्रि ।

रवीन्द्रनाथांच्या सर्वातिशायी प्रभावाखाली त्यांचें कर्तृत्व कांहीसें झांकोळून गेलें होतें. रवीन्द्रनाथांच्या प्रभावामुळे कल्पनासौंदर्यवादी आणि गूढवादी कवींचा संप्रदाय बंगाल्यांत निर्माण झाला. यतीन्द्रमोहन बागची, इन्दिरादेवी, प्रियवंदादेवी, निरुपमादेवी, यतीन्द्रनाथ सेनगुप्त इत्यादि अनेक कवि कवयित्री या संप्रदायांत मोडतात. रवीन्द्रनाथांचे समवयस्क देवेन्द्रनाथ सेन, अक्षयकुमार बडाल, तसेंच त्यांच्या थोडे नंतरचे मोहितलाल मुजुमदार, रजनीकांत सेन इत्यादि नामवंत कवींनी उच्चदर्जाचें काव्यलेखन केलें. यांचा समावेश रवीन्द्रसंप्रदायांत होत नसला, तरी भावनापूर्ण काव्यरचनेंत या कवींनी उच्च यश संपादन केलें असें स्थूलमानानें म्हणतां येईल. प्रसिद्ध नाटककार द्विजेन्द्रलाल राय यांची वीररसपूर्ण व देशभक्तिपर कवनाबद्दल ख्याति आहे.

पहिल्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर रवीन्द्रयुगाचा प्रभाव हळू हळू ओसरूं लागला. रवीन्द्रसंप्रदायांतले कवि जरी पुढें काव्यरचना करीत होते तरी सुस्थितींत असल्यामुळे आत्मलक्षी व सौंदर्यवादी बनलेल्या मध्यमवर्गाला चांगलाच हादरा बसूं लागला होता आणि नव्या युगाचे साम्यवादी विचार झपाट्याने आक्रमण करूं लागले होते. अशा वेळीं नभोमंडलांत एकाएकीं एक नवीन तेज उदयास आलें. काजी नजरुल इस्लाम हें तें नवें तेज होय. नजरुल इस्लामची 'विद्रोही' ही कविता १९२१ सालीं प्रसिद्ध झाली. या कवितेने आतापर्यंतच्या सौंदर्यवादी स्वप्नाळू कवितेच्या परंपरेला जोराचा धक्का दिला. चिरकाल दडपल्या गेलेल्या मानवाने जागृत होऊन केलेली ही रणगंभीर गर्जना आहे.

आमि होमशिखा, आमि साग्निक जमदग्नि
आमि यज्ञ, आमि पुरोहित, आमि अग्नि
आमि सृष्टि, आमि ध्वंस, आमि लोकालय, आमि श्मशान
आमि अवसान, निशावसान ।
आमि कृष्णकंठ, मन्थनविष पिया व्यथावारिधिर
आमि व्योमकेश, धरि बन्धनहारा धारा गंगोवीर.

अशा तऱ्हेने उफाळून उठलेला विद्रोही मानव गर्जना करीत आहे.

नजरुल इस्लामांच्या कवितेंत प्रथम साम्यवादी आशय नव्हता. पण पुढे १९२५ च्या सुमारास ते साम्यवादी बनले व त्या व्यासपीठावरून त्यांनी बरीच कविता लिहिली आणि इतरहि लेखन केलें. 'क्रांतीची घोषणा' या कवितेंत ते म्हणतात– ( त्याचें मराठी भाषांतर करून इथे सांगतों. )

"ती शुभघडी आता येऊन ठेपली आहे. तुमच्या सेवेसाठी ज्याने हमालाचा धंदा स्वीकारला आहे, तुमचें ओझें वाहण्यासाठी जो नेहमी धुळींत रहातो, तो मजूर होय. तोच एकटा संपूर्ण मानव आहे. त्याचींच गाणीं मी गातों. त्याचें दुखावलेलें हृदय आता एक नवजीवन निर्माण करील."

नजरुल इस्लामांच्या काव्यापासूनच साधारणपणें 'अति आधुनिक युगा'चा प्रारंभ होतो असें मानल्यास चालेल. 'कल्लोल' नांवाचें कवितांचें मासिक नवा-कवितेच्या प्रकाशनार्थ सुरू करण्यांत आलें आणि त्या झेंड्याभोंवती नवीन विचारांचे तरुण कवि गोळा झाले. 'कल्लोलयुग' म्हणजेच अत्याधुनिक कवितेची उद्दाम सृष्टि होय. अत्याधुनिक युगाचे जे विशेष आपल्या इकडे मराठी कवितेंत दृष्टीस पडतात, तेच बहुतांशीं बंगाली कवितेंत दिसून येतात. तरी देखील बंगाली स्वभावानुसार भावसौंदर्य बंगाली कवितेंत अधिक आढळतें असें मला स्वतःला वाटतें. सामाजिक संबंधाचें, प्रसंगाचें दृश्याचे, उघडें नागडें रोखठोक वर्णन, वास्तवतेची विदारक चिकित्सा आणि साम्यवादी मूर्तिभंजक तत्त्वज्ञान, हे साधारण-पणे अति आधुनिक कवितेचे विशेष म्हणतां येतील. यांत अर्थात ज्याच्या त्याच्या मनोरचनेनुसार पायऱ्या किंवा प्रमाण हें आहेच. जसीमुद्दिनसारखा ग्रामीण कवि खेड्यांतल्या जीवनाचीं चित्रें रम्य कुंचल्याने चितारतो, तर हुमायून कबीर-सारखे कवि भावमधुर वीणाकाव्य लिहितात. याच्या उलट टोकाला बुद्धदेव बसु, सुधीरनाथ दत्त इत्यादि मॉडर्निझमचे प्रणेते मानवी वासनांचें रोखठोक वर्णन करण्यांत काव्यशक्तीची सार्थकता मानतात. रवींद्रनाथ मैत्र, विष्णु दे, प्रेमेंद्र मित्र, अचिंत्य-कुमार सेनगुप्त हे याच संप्रदायांतील उल्लेखनीय कवि होत. रवींद्रनाथ मैत्र म्हणतोः-

दंभभरे खरदृष्टि हाने जांहारा दाडाये दूरे,
नाहि चाहि तांहादेर पाने ।

"दांभिक आणि कठोर दृष्टीचे जे लोक दूर उभे राहिले आहेत त्यांच्याकडे मी पाहात नाहीं."

तर मग कुणाकडे पाहतों व कशाचें गान करतो ?

धरणीर जन्मतिथि हते
मानुष भासिया चले दुःखज्वाला वेदनार स्रोते ।
जतो वेदनार हा हा डुबे जाय केह नाही सोने ।
आमि कान पाति सुर खूंजि तारि माझे, तादु दिये गान मोर गाँथि।

" पृथ्वीच्या जन्मदिवसापासून मनुष्य दुःखज्वाला आणि वेदना यांच्या प्रवाहांत वाहत चालला आहे ! त्या वेदनांचे जितके हाहाकार, ते सर्व लुप्त होऊन जातात, कोणी ते ऐकत नाही. मी त्यांच्याकडे कान देतों आणि त्यांच्या अंतरंगांतला सूर ओळखून त्याने माझें गाणें मी गुंफतों."

आजकालचें बंगाली काव्य कसें आहे आणि कोणत्या दिशेने प्रगति करीत चाललें आहे, याची कल्पना स्थूल मानाने या उताऱ्यावरून होऊं शकेल.

● ● ●

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थूलमत.
अनुक्रम 33903 दि: 17-8-61
क्रमांक 23ele नों दि: 23-5-72

आकाशवाणी, मुंबई; प्रसिद्धि 'मराठी जग', नागपूर १५-८-१९५४

११

# पंडितराय जगन्नाथ आणि त्यांची प्रिया

तैलंगदेशोद्भव जगन्नाथ पंडिताचें नांव उच्चारतांच त्याच्या संबंधीची एक आख्यायिका चटकन मनांत येतें.

लोकांना चटकदार व खमंग वाटणारी या पंडितराजा-विषयीची ही जी आख्यायिका आहे ती एका यवनीवरील त्यांच्या प्रेमाची. ही यवनी बादशहाची कन्यका असून तिचें नांव लवंगी होतें. तिचें जगन्नाथांवर प्रेम बसलें, नंतर तिचा व यांचा विवाह झाला; किंवा ही लवंगी एका सामान्य मुसलमानाची मुलगी असून पंडितांवर तिचं प्रेम बसल्यामुळे ती त्यांच्यापाशीं राहिली होती. पुढे वृद्धापकाळीं पश्चात्ताप पावून पंडितराज आपल्या यावनी प्रियेसह गंगातटाकीं जाऊन झोपलें असतां तिकडून महापंडित अप्पय्य दीक्षित स्नान करून सोवळ्याने येत होते. त्यांच्या दृष्टीस हें निजलेलें वृद्ध जोडपें दिसलें, तेव्हा ते उद्गारले—

किं निःशंकं शेषे, शेषे वयसि त्वमागते मृत्यौ

'वृद्धापकाळीं मृत्यु जवळ आला असतां असा बेफिकीरपणाने काय निजला आहेस ?' पण जवळ येऊन पाहिल्यावर हा जगन्नाथ पंडितराय आहे असें दिसून येतांच त्याच्या वाटेला जाणें नको अशा बुद्धीने

अथवा सुखं शयीथा, निकटे जागर्ति जान्हवी भवतः॥

'काही हरकत नाही, तुझ्या शेजारीं गंगामाई जागती आहे, तेव्हां तूं खुशाल झोपून रहा' असं म्हणून दीक्षित पुढे चालते झाले.

अशा अनेकानेक नवलकथांचें जाळें जगन्नाथ पंडितांच्या व्यक्तीभोवती लोकांच्या कल्पनेने विणलें आहे. या नवलकथांना आधारभूत म्हणून

यवनी नवनीत कोमलांगी शयनीचे यदिनीयते कथंचित्।
अवनीतलमेव साधु मन्ये न वनी माघवनी विनोद हेतुः ॥
इयं सुस्तनी मस्तकन्यस्त कुम्भा कुसुम्भारुणं चारुचेलं वसाना।
अरं भासमानापि रम्भासमाना लवंगी कुरंगीदृगंगी करोतु ॥

असे कित्येक श्लोकहि प्रचलित झाले आहेत. पण एकंदरीने विचार केला असतां असें दिसतें की या दंतकथा केवळ काल्पनिक असाव्या. त्या एकतर कुणी तरी उठविलेल्या खोडसाळ कंड्यांप्रमाणे खोट्या असाव्या किंवा त्यांचा संबंध दुसऱ्या एखाद्या जगन्नाथाशीं असावा. रसगंगाधर या अलंकारशास्त्रावरील विख्यात ग्रंथाचा आणि भामिनीविलास या काव्यग्रंथाचा कर्ता जो जगन्नाथ पण्डितराय, त्याचा आणि या रंगेल नवलकथांचा कांही संबंध असावा असें वाटत नाही. पंडितराज जगन्नाथाला शहाजहान बादशहा व दारा शुकोह यांचा आश्रय होता आणि त्याने स्वतःविषयी गर्वाचे उद्गार काढले आहेत, हें खरें. या गोष्टी त्याने रचिलेल्या ग्रंथांवरून सिद्ध आहेत. पण त्याचें स्त्रीविषयक चारित्र्य ढिलें होतें असें म्हणण्यास वरील दंतकथांच्या वावड्यांखेरीज कांही आधार नाही. त्याच्या कोणत्याहि ग्रंथांत लवंगीचा किंवा दुसऱ्या कोणत्याहि यवनीचा उल्लेख नाही, किंबहुना तशी शंका उत्पन्न होईल असा ध्वनीदेखील नाही. प्रणयाच्या नाना परींचें व भिन्न भिन्न छटांचें वर्णन करणारें जगन्नाथाचें भामिनीविलास हें जें काव्य, त्यांत त्याच्या पांडित्याचा व कवित्वाचा गर्व उच्छृंखलपणें व्यक्त झाला आहे. पण प्रणयाचा उत्तानपणा किंवा अनिर्बंधपणा कुठेच दिसून येत नाही. उलट एक प्रकारची विशुद्ध सात्त्विकता, गाढ प्रेमाचा निष्ठावंतपणा त्यांत दिसून येतो. त्याची प्रेयसी भामिनी ही देवाब्राम्हणांसमक्ष लग्नाने त्याची झालेली कुलवधू आहे; वडीलमाणसांच्या दडपणांत ओझरत्या कटाक्षाने आपला अनुराग व्यक्त करणारी ती विनयवती पुरन्ध्री आहे. तिला दुरूनसुद्धा यवनीचा किंवा लवंगीचा वास येत नाही.

म्हणूनच इथे असें आवर्जून सांगावेंसें वाटतें की दंतकथावरून जगन्नाथ पंडितांविषयी जी कल्पना होते तिचा त्यांच्या काव्यांशीं मेळ बसत नाही. त्यांनी भामिनीविलासांत स्त्रीच्या रूपाचें वर्णन पुष्कळ केलें आहे, पण संस्कृत काव्यांतला एकंदर रिवाज पाहतां तें पुष्कळच मर्यादशील, विशुद्ध व सात्विक आहे असें म्हटलें पाहिजे. कदाचित् सध्याच्या प्रतिष्ठित अभिरुचीच्या मानाने तें वाजवी-

पेक्षा जास्त स्पष्ट व उघड असें वाटेल. परंतु तें करतांना त्याने मर्यादा पाळली आहे. हें एक आणि त्याच्या वर्णनांत भावपूर्णता आहे, निवळ कामुकता व शरीरभोगलालसा नाही हें दुसरें. या विशेषामुळे त्याचीं वर्णनें हृदयंगम झालीं आहेत.

संस्कृत साहित्यामध्ये स्त्रियांच्या रूपाचीं जीं वर्णने करण्यांत आलीं आहेत, त्यांच्यासंबंधाने कांही ठळक आक्षेप घेण्यांत येतात. तीं ठरीव ठशांचीं व ठरीव संकेतांनी बांधलेलीं असतात, हा पहिला आक्षेप. मुख हें कमलाप्रमाणे, डोळे नीलकमलाप्रमाणे, किंवा हरणाप्रमाणे किंवा मदिरेप्रमाणे, केशभार मोराच्या पिसाऱ्याप्रमाणे, भुवया धनुष्याप्रमाणे, श्वासाचा सुगंध कस्तुरीप्रमाणे, तळहात आणि तळपाय रक्तकमलाप्रमाणे. हें सर्व कांही ठरून गेलें आहे. हे जे कांही ठरलेले साचे आहेत, त्यांच्या बाहेर हीं वर्णनं बहुतकरून जायचीं नाहीत. यालाच जोडून येणारा दुसरा आक्षेप असा की संस्कृत कवींचीं वर्णनें काल्पनिक ध्येयरूप (idealtstic) असतात. त्यांत वास्तविकता असत नाही. हिन्दुस्थानांत सर्व साधारण बहुसंख्य माणसं काळींसांवळीं असतां साहित्यांतल्या इथूनतिथून सगळ्या नायिका अगदी केतकीप्रमाणे किंवा कमलाप्रमाणे गोऱ्या कशा? या सगळ्या नायिकांच्या रंगरूपांमध्ये प्रत्येकीचं वैशिष्ट्य किंवा व्यक्तिमत्त्व म्हणून कांही नाहीच. कालिदासाची शकुंतला, भवभूतीची मालती किंवा जगन्नाथाची भामिनी यांच्या रूपवर्णनांची जर अदलाबदल किंवा सरमिसळ केली तर काय बिघडेल? मला तरी वाटतं कांही बिघडणार नाहीं. तीच सौंदर्याची कल्पना, तसलींच विशेषणं आणि तसल्याच उपमा व उत्प्रेक्षा!

तिसरा आक्षेप या वर्णनांवर घेण्यांत येतो तो शारीरिकतेचा. स्त्रीस्वरूपाचीं सर्व वर्णनं शरीरसंभोगाच्या उद्दिष्टांतून स्फुरलेलीं दिसतात. याला अपवाद आढळतील, पण ते केवळ अपवादच. स्त्रीच्या अंगप्रत्यंगांचीं कामोद्दीपक वर्णनें करण्यांत कालिदासासुद्धा सर्व कवींनी इतिकर्तव्यता मानलेली दिसते. इतकेंच नव्हे तर याच्यापुढे जाऊन बऱ्याचशा संस्कृत कवींनीं अमर्याद वर्णनांनी उत्तानतेचा व अश्लीलतेचा आरोप आपल्यावर ओढवून घेतला आहे. कोणत्या अवयवाचें किंवा कोणत्या अवस्थांचें काव्यांत वर्णन करावें, याला कांही धरबंध संस्कृत कवींनी मानिलेला दिसत नाही.

या बाबतींत अर्थात हें लक्षांत ठेवलें पाहिजे की त्या काळच्या सौंदर्याच्या व

औचित्याच्या कल्पना आणि अभिरुचीच्या मर्यादा सध्याच्याहून फार निराळ्या होत्या. तरी देखील त्या काळांत बराच संयम राखून वर्णन करणारे भवभूतीच्या सारखे कांही कवि झाले व जगन्नाथाची गणना साधारणपणें अशा अपवादभूत कवींमध्ये करावी लागेल हें मी मघाशी सांगितलें आहेच. स्त्रीरूपाचीं वर्णनें जगन्नाथाच्या काव्यांपैकी भामिनीविलासामध्येच मुख्यत्वेंकरून आलीं आहेत. हें काव्य म्हणजे स्फुट कवितांचा संग्रह असून त्याचे अन्योक्तिविलास, शृंगारविलास, करुणविलास व शांतविलास असे चार भाग आहेत. शृंगारविलासामध्ये प्रेयसीच्या रूपाचें व प्रणयाचें वर्णन असून करुणविलासामध्ये प्रियतमेच्या मृत्यूने झालेल्या शोकाचा विस्तार आहे. या दोन विलासांतील वर्णनांकडे पाहिलें म्हणजे असें दिसून येतें की जगन्नाथाचीं वर्णनें ठरीव साचे व रूढ संकेत यांच्या बाहेर फारशीं गेलीं नसलीं तरी तीं भावपूर्ण आणि कल्पना-चमत्कृतीने युक्त असल्यामुळे हृदयंगम झालीं आहेत. शृंगारविलासाच्या आरंभींच आलेलें नायिकेचें वर्णन पहाः—

स्वेदांबुसांद्रकणशालिकपोलपाली-
दोलायितश्रवणकुंडलवंदनीया ।
आनंदमंकुरयति स्मरणेन कापि
रम्या दशा मनसि मे मदिरेक्षणायाः ॥

प्रेमी तरुण म्हणतो—" घामाच्या बिंदूंचं दाट जाळं ज्यांच्यावर टचटचलं आहे अशा गालांवर हेलकावणाऱ्या कुंडलांमुळे जी सुशोभित दिसत आहे, अशा या मदिराक्षीची ही रम्य अवस्था आठवली की माझें मन हर्षाने भरून येतें."

या श्लोकांतील वर्णनावरून हें उघड दिसतें की ही प्रिया संसारांत कष्ट करून घाम गाळणारी आहे व तिच्या या अवस्थेचें तिच्या प्रियकराला मोठें कौतुक वाटत आहे. पण माणसाने सारखे कष्टच करावेत असें नाही. विशेषतः कोणत्या तरुणाला आपल्या प्रिय पत्नीने सुखविलास भोगावेत असें वाटत नाही? दिवसभर कष्टलेल्या प्रियेला तिचा प्रियकर विश्रांतीसाठी म्हणतो—

कस्तूरिकातिलकमालि विधाय सायं
स्मेरानना सपदि शीलय सौधमौलिम् ।

प्रौढिं भजन्तु कुमुदानि मुदामुदारा-
मुल्लासयन्तु परितो हरितो मुखानि ।

" हे सखि, संध्याकाळ झाली आहे. कस्तुरीचा तिलक लावून हसऱ्या मुखानें लौकर तूं वाड्याच्या गच्चीवर चल कशी ! चंद्रकमळें आनंदित होऊन विकसूं देत आणि सर्व बाजूंनी दिशा उजळूं देत. " अर्थात चंद्रोदयामुळे जो परिणाम व्हायचा तो तुझें मुख गच्चीवर गेल्याने होईल असें वर्णन करून कवीने प्रियतमेच्या मुखाचें चंद्राशीं साम्य सुचविलें आहे. या वर्णनाचे घटक आहेत सगळे ठरीव साचाचेच. पण त्यांतील चमत्कृतीमुळे अथवा वक्रोक्तीमुळे आणि भावपूर्णतेमुळे हें वर्णन अत्यंत मनोरम झालें आहे.

पूर्वीच्या म्हणजे जगन्नाथाच्या काळीं विवाह लहानपणीं होत असत. तेव्हां लहानपणापासून आपल्या प्रियेच्या रूपाची शोभा कसकशी वाढत गेली, हें प्रियकर वर्णन करतो:—

बदरामलकाम्रदाडिमानामपहृत्य श्रियमुन्नतां क्रमेण ।
अधुना हरणे कुचौ यतेते दयिते ते हरिशावकुम्भलक्ष्म्याः ॥

रूपवर्णन हाच आजच्या भाषणाचा विषय असल्यामुळे ही कविता सांगितली. हिचा अर्थ इथे न सांगितला तरी चालेल, नाही का ?

अशा या लहानपणीं विवाहबद्ध झालेल्या पतिपत्नींचा संसार प्रारंभीं वडील माणसांच्या छायेखाली म्हणा, अथवा दडपणाखाली म्हणा, चालत असे. त्या वेळेला या प्रणयी युग्माचे प्रणयव्यापार कसे लपून छपून चालत असत याचीं वर्णनेंहि जगन्नाथाने हृदयंगम केलीं आहेत.

गुरुभिः परिवेष्टितापि गंडस्थलकंडूयनचारुकैतवेन ।
दरदर्शितहेमबाहुनाला मयि बाला नयनांचलं चकार ॥

" आवती भोवती वडील माणसें होतींच, तथापि मी तिकडून जात आहें असें पाहून कानाजवळची जागा खाजवण्याचें सोंग करून तिने आपला सुवर्ण वर्णाचा बाहु मला थोडासा दिसेल असें केलें आणि चोरून माझ्याकडे कटाक्ष फेकला. "

त्याचप्रमाणे—

प्रातःस्मरांप्रणमने विहिते गुरूणा–
माकर्ण्यवाचममलां भव पुत्रिणीति ।
नेदीयसि प्रियतमे परमप्रमोद–
पर्णादरं दयितया दधिरे दृगन्ताः ॥

" प्रातःस्मरणीय सासूबाईंना व मामंजींना वंदन केल्यावर त्यांनी ' पुत्रवती हो ' असा गोड आशीर्वाद दिलेला ऐकून जवळच असलेल्या प्रियतमाकडे प्रियतमे आनंदाने व आदराने भरलेल्या नजरेने पाहिलं. " यांत या प्रियतमेला दिवस गेले आहेत असें नाजूक रीतीने सुचविलें आहे.

अशा रीतीने हा दुःखमिश्रित पण परस्पर प्रेमामुळे सुखकर झालेला संसार पुढे लोटला जातो. त्यांत मधून मधून वियोगाचे प्रसंग येतात. विरहावस्था घर-धनिणीला फार जाचक होते.

यदवधि दयितो विलोचनाभ्यां
सहचरि दैववशेन दूरतोऽभूत् ।
तदवधि शिथिलीकृतो मदीयै–
रथ करणैः प्रणयो निजक्रियासु ॥

" हे गावाला गेले आहेत ना, तेव्हापासून कशांत माझं मन म्हणून लागत नाही, बघ. कामाचा राडा तस्सा पडलेला राहतो. हातपाय चालत नाहीत. कांही करूं नये, स्वस्थ बसून राहावं असं वाटतं. " एखाद्या आधुनिक प्रणयकथेंतलें नायिकेचें हें भाषण आहे असा आपणाला भास होत नाही का ?

याप्रमाणें कालक्रमणा करतां करतां केव्हा तरी एकदा चिरवियोगाचा प्रसंग येतो. आपण पतिपत्नी कितीहि एकतान झालों, आणाशपथा घेतल्या, तरी दोघां-पैकी कोणीतरी एक अगोदर जायचें, व दुसऱ्याने त्याची आठवण काढीत काल कंठायचा हें विधिलिखित ठरलेलेंच असतें. जगन्नाथाच्या बाबतींत त्याच्या पत्नीने, दयितेने अगोदर जावें अशी विधात्याची योजना होती. तिच्या उचं-बळून येणाऱ्या आठवणींचे करुणोद्गार त्याच्या कविहृदयांतून निघाले, त्यांनी करुणाविलास भरला आहे.

मंदस्मितेन सुधया परिषिच्य या मां
नेत्रोत्पलैर्विकसितैरनिशं समीजे ।

सा नित्यमंगलमयी गृहदेवता मे
कामेश्वरी हृदयतो दयिता न याति ।।

भूमौ स्थिता रमण नाथ मनोहरेति
संबोधनैर्यमधिरोपितवत्यसि द्याम् ।
स्वर्ग गता कथमिव क्षिपसि त्वमेण
शावाक्षि तं धरणिधूलिषु मामिदानीम ।।

हे श्लोक अत्यंत हृदयंगम, करुणोदात्त असे आहेत. दुसऱ्या श्लोकांतील शोकपूर्ण चतुरोक्ति अंतःकरण पिळवटून टाकणारी आहे. यांत जगन्नाथाचें गाढ व निर्मळ प्रेम व्यक्त झालेलें दिसतें. आणि हेंहि उघड दिसतें की त्याची प्रिया ही गृहदेवता आहे, बाहेरचा शौक पुरविणारी कोणी विलासिनी यवनी नव्हे.

जगन्नाथाने आपल्या प्रियमतेच्या रूपाने स्त्रीचें वर्णन पुष्कळ केलें आहे. पण पुरुषाचें किंवा लहान मुलांचें किंवा भिन्न भिन्न अवस्थांतील माणसांचें वर्णन फारसें कुठे केलें आहे असें दिसत नाही. कालिदास बाण यांच्याप्रमाणे जगन्नाथाचा आटोप व आवाका मोठा नाही. त्याने सुधालहरी, अमृतलहरी, करुणालहरी, लक्ष्मीलहरी आणि पीयूष उर्फ गंगालहरी अशीं भक्तिभावपूर्ण पांच स्तोत्रें रचलीं आहेत, त्यांपैकी करुणालहरींत श्री विष्णूचें पादादिकेशान्त, म्हणजे पायांपासून केसांपर्यंत रूपवर्णन आहे. तसेंच लक्ष्मीलहरी हें सबंध काव्यच लक्ष्मीच्या रूपाचें वर्णन करणारें आहे. हीं वर्णनें अर्थात् ध्यानाच्या व उपासनेच्या हेतूने केलेलीं, आपल्या मराठी वेंकटेशस्तोत्रांत श्रीवेंकटेशाच्या मूर्तीचें जसें वर्णन आहे तशा तऱ्हेचीं पण अधिक काव्यमय आहेत. याच प्रकारांत बसणारें श्रीगंगेचें ध्यान गंगालहरीमध्ये जगन्नाथाने एका श्लोकांत वर्णिलें आहे, तें वामनाने केलेल्या समश्लोकीसह इथे म्हणून दाखवून या भाषणाची समाप्ति करूं.

शरच्चंद्रश्वेतां शशिशकलशुभ्रालमुकुटां
करैः कुंभांभोजे वरभयनिरासौ च दधतीम् ।

सुधाधाराकाराभरणवसनां शुभ्र मकर-
स्थितां त्वां ये ध्यायन्त्युदयति न तेषां परिभवः ॥

याची वामनाने केलेली समश्लोकी—

शरीरीं चंद्राभा विशदशशिशोभा सुमुकुटीं
धरी कुंभा पद्मा वर अभय चारी करपुटीं।
पटीं पीयूषाची रुचि रुचिर संस्थान मकरीं
अशा तूंतें ध्याती नरवर न त्यां दुर्गति करी॥

●●●

आकाशवाणी, नागपूर, १६-९-१९५४.

१२

# नाटकाचें तंत्र

## ( परंपरा आणि प्रयोग )

साखळीचे दुवे जसे एकमेकांमध्ये अडकलेले असतात त्याप्रमाणे परंपरा आणि प्रयोग यांचें आहे. परस्परानुबंधी असें हें सनातन द्वन्द्व आहे. प्रयोग सिद्ध झाला की तो परंपरेंत जमा होऊं लागतो, पण त्याच परंपरेच्या आधारावर नव्या प्रयोगाला दुसरीकडे सुरवात झालेली असते. चालणारा माणूस पुढे टाकलेलें एक पाऊल जमिनीवर स्थिर होतांच दुसरें उचलतो. तें एक क्षण अधांतरीं अवकाशांतून पुढे नेऊन स्थिर करतो आणि त्याच्या आधारावर मागचें स्थिर असलेलें पाऊल उचलतो. परंपरा आणि प्रयोग या जोडीचेंहि असेंच आहे. मानवी समाज कधीहि स्थिर असत नाही. त्याचें एक पाऊल परंपरेंत रोवलेलं, तर दुसरें पाऊल प्रयोगासाठी उचललेलें, असा क्रम सारखा चालू असतो. बाह्य परिस्थिति नेहमी बदलत असते. तिच्याशीं जुळतें घेण्याची धडपड समाजाला करावीच लागते. पण जुनें जें चालत आलें असेल तें सवयीने सुखकर वाटत असल्यामुळे परंपरेला चिकटून राहण्याची वृत्तीहि दुसऱ्या बाजूने जोर करीत असते. कित्येक वेळां समाजामधलें चैतन्य किंवा परिस्थितीनुसार बदल करण्याची ईर्ष्या मंद होते, नवे प्रयोग करण्याचें धाडस दिसून येत नाही; अशा काळांत समाजाचें जीवन किंवा समाजांतल्या विद्या कला कुचंबलेल्या दिसून येतात.

मराठी नाट्य आणि रंगभूमि यांचा इतिहास अवलोकन केल्यास परंपरा आणि प्रयोग यांचा पाठशिवणीचा खेळ त्यांत चालल्याची मौज आपल्या अनु-

मवास येते. ही खेळाची रंगत कशी काय रंगली आणि विशेषतः त्यांतून नाट्याचें तंत्र हें कसें बदलत गेलें हें आपण थोडेंसें पाहूं.

मराठी रंगभूमीचे आद्य आचार्य जे विष्णुदास भावे त्यांनी सन १८४३ पासून जें पौराणिक नाटक अस्तित्वांत आणलें त्याचें तंत्र अर्धवट हरदासी पद्धतीचें आणि अर्धवट तत्कालीन कानडी नाटकावरून घेतलेलें असें होतें. या पौराणिक अल्लडुर्र नाटकांतला सूत्रधार म्हणजे जणू कांही कीर्तनकार हरदासच. हरदासाप्रमाणेच त्याचा पोशाख, हातीं टाळ, मागे पखवाजवाला वगैरे सरंजाम. नाटकाच्या प्रारंभापासून अखेरपर्यंत तो रंगपीठावर हजर असायचा. त्याच्यामध्ये आणि हरदासामध्ये फरक हा की हरदास गाण्याबरोबर निरूपणहि करीत असे, तर नाटकाचा सूत्रधार फक्त नाटकाच्या कथानकावर लिहिलेलीं गाणींच म्हणत असे. गद्यांतले संवाद व त्यांना अनुसरून सर्व अभिनय बाकीचीं नाटकपात्रें रंगपीठावर येऊन करीत. प्रारंभीं मंगलाचरण, शेवटीं आरती वगैरे प्रकारहि कीर्तनाप्रमाणे या नाटकांत होत असत.

लवकरच या नाटकांना फार्सांची जोड देण्यांत येऊं लागली. तें मात्र केवळ गद्यात्मक असत. नारायणराव पेशव्यांच्या वधाचा फार्स, वगैरे कांही फार्स त्या वेळीं प्रख्यात होते व ते करून दाखविणाऱ्या कंपन्या लोकप्रिय होत असत. या फार्सांमध्ये अभिनयकलेची कसोटी लागत असल्यामुळे चांगला अभिनय करणारे नट निर्माण होऊं लागले. या फार्सांच्या पद्धतीचाच विकास होऊन पुढे गद्य अथवा बुकिश नाटकें निर्माण झालीं. या बुकिश नाटकांपैकी कांही शेक्सपियरच्या नाटकांचीं भाषांतरें अथवा रूपांतरें होतीं, तर कांही स्वतंत्र पण त्या धर्तीवर लिहिलेलीं अशीं होतीं. या नाटकांच्या तंत्राविषयी अधिक कांही सांगायला नको. त्यांत नांदी, मंगलाचरण, सूत्रधार वगैरे उपाधि नव्हत्या. कथानकाचें सुसंगत निरूपण करणारे प्रवेशामागून प्रवेश घालणें हेंच त्या नाटकांचें एकंदर स्वरूप.

विष्णुदासी पद्धतीच्या पौराणिक नाटकांचा व इंग्रजी पद्धतीच्या बुकिश नाटकांचा लोकांना कंटाळा आला तेव्हा अण्णा किर्लोस्करांचें संगीत नाटक मराठी रंगभूमीवर अवतरलें. मराठी रंगभूमीच्या इतिहासांतला हा एक महान यशस्वी प्रयोग होय. परंपरा जेव्हा जीर्ण जरठ होते, तेव्हा नवीन प्रयोग करून तिच्यांत चैतन्य कसें ओतलें जातें याचें किर्लोस्करी संगीत नाटक हें उत्तम उदाहरण होय.

किर्लोस्करांनी साचा घेतला संस्कृत नाटकांचा. प्रारंभीं नांदी, नंतर सूत्रधार नटीचा प्रवेश, त्यांतूनच एखाद्या चतुर युक्तीने मुख्य नाटकास सुरवात, मुख्य पात्रांच्या प्रवेशांच्यामध्ये दरम्यानच्या काळांतली हकीकत सांगण्याकरिता घातलेले विष्कंभक, वगैरे सर्व तरतुदी संस्कृत नाटकांवरून घेतलेल्या दिसतात. संस्कृत नाटकांत मधून मधून श्लोक असतात, त्यांच्या जागीं अण्णांनी गाणीं घातलीं. हीं गाणीं ताना, मींडा, खटके, मुरके, वगैरे गायकी ढंगांसह घोळून घोळून म्हणायचीं नसून साध्या आलापांसह थोडक्यांत संपवावीं असा मूळ हेतु होता. म्हणूनच एकेका नाटकांत शंभर शंभर गाणीं घातलेलीं दिसतात.

सारांश, अण्णांचें संगीत नाटक हा त्या वेळीं एक नवीन प्रयोग असला, तरी तो आपल्या प्राचीन परंपरेंतूनच उद्‌भवलेला होता. मूळ साचा संस्कृत नाटकाचा अण्णांनी घेतला. कथानक पौराणिक, एकंदर वातावरण जुन्या पद्धतीच्या खानदानी कुटुंबांतल्यासारखें. आपण सौभद्र नाटक वाचून पहा, किंवा त्यांतले संवाद नजरे-समोर आणा, म्हणजे मी काय म्हणतों त्यांतलें तथ्य आपल्या लक्षांत येईल. आणि सौभद्रानंतर वीस बावीस वर्षांनी झालेलें देवलांचें शारदा नाटक जर आपण पाहिलेंत, तर किर्लोस्करांच्या संगीत नाटकांचीच परंपरा इतकीं वर्षें तजेल-दारपणानें कशी टिकून राहिली हेंहि आपल्या लक्षांत येईल. शारदा नाटकाचें कथानक पौराणिक नसून सामाजिक आहे, परंतु नाटकाचा सांगाडा आणि रचना-पद्धति साधारणपणे सौभद्राप्रमाणेच आहे.

यानंतर तंत्राच्या दृष्टीने मराठी नाट्यामध्यें झालेला महान प्रयोग खाडिल-करांचा होय. तंत्राच्या बाबतींत खाडिलकर हे कांही अंशीं शेक्सपियरचे अनुयायी होते. तंत्रापेक्षाहि आशयाच्या बाबतींत शेक्सपियरची छाप त्यांच्यावर आरंभी विशेष पडली होती. शेक्सपियरप्रमाणे वैशिष्ट्यपूर्ण प्रभावी व्यक्ति निर्माण करण्याचा त्यांनी यत्न केला. ‘सवाई माधवरावाचा मृत्यू’मधील माधवराव व केशवशास्त्री, कांचनगडच्या मोहनेमधील पिलाजीराव व प्रतापराव हीं अशा प्रवृत्तीचीं उदाहरणें म्हणून देतां येतील. पुढे पुढे व्यक्तीपेक्षा तत्त्वज्ञानाकडे खाडिलकरांच्या मनाचें पारडें अधिक झुकलें. नाटकाचें कथानक, त्यांतल्या भूमिका, त्यांचें पर्यवसान या सर्वांना त्यांनी आपल्या तत्त्वज्ञानाचे वाहक बनविलें. सामाजिक आणि राजकीय तत्त्वें आणि ध्येयें यांच्या प्रखरपणामुळे त्यांच्या नाट्य-कलेमधलें लालित्य उत्तरोत्तर कमी होत गेलें असा भास होतो.

खाडिलकरांनी साधारणपणें शेक्सपियरचें नाट्यतंत्र उचललें होतें असें मीं आताच सांगितलें. केवळ उचललें असें नव्हे, तर तें तंत्र त्यांनी अधिक तर्कशुद्ध केलें व अधिक पूर्णत्वास नेलें. नाटकाच्या पर्यवसानापर्यंत पोचण्यास कोणकोणत्या पायऱ्या अवश्य आहेत हें पाहून नाटकाला आरंभ कोणत्या बिंदूपाशीं करायला पाहिजे हें हेरून अत्यंत बांधेसूदपणे प्रवेशामागून प्रवेश कसे रचावे व क्रमाक्रमाने कथानक उत्कर्षबिन्दूप्रत कसें न्यावें हें खाडिलकरांच्यापासून शिकावें. कीचकवध, सत्त्वपरीक्षा हीं नाटकें या दृष्टीने नमुनेदार आहेत.

तंत्रदृष्ट्या खाडिलकरांनी केलेल्या कांही कांही गोष्टी लक्षांत घेण्याजोग्या आहेत. बहुतेक नाटकांत खाडिलकरांनी गौण पात्रें व मुख्य पात्रें असा विभाग केलेला आहे. या दोन्ही विभागांचा परस्पर संबंध येत असला तरी त्यांतील अलगपणा स्पष्ट आहे. गौण पात्रांचा उपयोग त्यांनी दुहेरी रीतीने करून घेतला आहे. समाजांतल्या मुख्य व्यक्तींच्या आचरणाचे परिणाम सामान्य अथवा क्षुद्र व्यक्तींवरहि कसे होतात हें या गौण पात्रांच्या द्वारें त्यांनी दाखविलें, आणि विनोदनिर्मितीचें कामहि त्यांनी त्यांच्या द्वारें साधून घेतलें.

खाडिलकरांचे समकालीन श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांनी शेक्सपियरचें नाट्यतंत्रच, परंतु बऱ्याच क्लिष्ट रीतीने अमलांत आणलें. पार्शी नाटकांतील चालींवरच्या सुंदर काव्यमय पद्यांनी त्यांनी आपल्या नाट्यरचनेला भूषविलें हें त्यांचें वैशिष्ट्य लक्षांत घेण्याजोगें आहे.

गडकऱ्यांनी खाडिलकर आणि कोल्हटकर या दोघांचे रचनागुण आत्मसात केले आणि आपल्या उत्कट प्रतिभेच्या बळावर त्यांचा परमोत्कर्ष करून दाखविला. कथानकाची बांधेसूद मांडणी, संघर्षांची तीव्रता पायरीपायरीने चढवीत नेण्याचें कौशल्य, विनोदी पात्रांचा स्वतंत्र प्रपंच इत्यादि गोष्टी त्यांनी खाडिलकरांपासून उचललेल्या दिसतात. भाषेची सजावट, कल्पनांचें वैभव, विनोदाचा व कोट्यांचा अतिरेक इ. गोष्टी त्यांच्या अनिर्बंध प्रतिभेच्या विलासामुळे नाटकांत घुसल्या. या सर्व गोष्टींचें मूळ कोल्हटकरांमध्ये आढळतें, त्यांचा अफाट पसारा गडकऱ्यांच्या नाटकांत आपल्याला स्तिमित करतो. बाकी तंत्रदृष्ट्या गडकऱ्यांनी एखादा अभिनव प्रयोग केला असें म्हणतां येत नाही.

श्री. भार्गवराम विठ्ठल उर्फ मामासाहेब वरेरकर हे खरे प्रयोगशूर नाटककार होत. त्यांनी केलेल्या प्रयोगांना सबंध रंगभूमीवर ठसा उमटून पूर्वीच्या परंपरेला

कलाटणी देण्याइतकें सामर्थ्य जरी लाभलें नाही, तरी नानाप्रकारचे प्रयोग जाणतेपणाने करण्यांत त्यांचा हात कोणी धरूं शकणार नाही. सिनेमाचें आक्रमण नाटकावर होणार असें दिसतांच त्यांनी एकांकप्रवेशी अडीच तासांत संपणारीं नाटकें लिहून रंगभूमीवर नवा पायंडा पाडण्याचा यत्न केला. त्यांनी एकांकिका लिहिल्या, 'सारस्वता 'सारखीं परस्पर विरोधी दोनच प्रभावशाली भूमिकांवर आधारलेलीं छायाप्रकाशस्वरूपी नाटकें लिहिलीं. संगीत नाटकांमधल्या पदांची संख्या जाणीवपूर्वक कमी करण्याचा यत्न केला. त्यांच्या प्रयोगांचा खोल व चिरस्थायी ठसा जरी मराठी रंगभूमीवर पडला नाही, तरी त्या प्रयोगांचें रंगभूमीच्या इतिहासांतलें स्थान कोणी नाकारूं शकणार नाही.

यानंतर नाटकाच्या तंत्रासंबंधीचा महान प्रयोग १९३२–३३ च्या सुमारास झाला. इब्सेन या महानाटककाराच्या तंत्राचा अवलंब करण्याचा प्रयत्न मराठींत या काळांत झाला. एखाद्या कथानकाचा सर्वोच्च संघर्षात्मक प्रसंग तेवढा नाट्यरूपाने दाखवून त्या संघर्षाच्या उद्घाटनांत त्याला कारणीभूत होणाऱ्या मागच्या कारणमालिकेची उचित प्रसंगाने उकल करणें आणि त्या योगाने संघर्षाचा स्फोट घडलेला दाखवून नाटकाचा शेवट करणें, असें हें स्थूल मानाने इब्सेनच्या नाट्यतंत्राचें स्वरूप वर्णितां येईल. या तंत्रानुसार नाटकें लिहिण्याचे बरेच यशस्वी प्रयत्न म्हणजे श्री. वासुदेवराव भोळे यांचें सरलादेवी आणि कै. श्रीधर विनायक वर्तक यांचें आंधळ्यांची शाळा हे होत. आंधळ्यांची शाळा हें अधिक गाजलें. मनोहरचें पूर्वचरित्र आणि त्याचें कलंकित चारित्र्य यांचें उद्घाटन बिंबाच्या समोर होतें आणि त्यामुळे कुमार व बिम्बा यांच्यामधला कळसाला पोचलेला संघर्ष शांत होतो, असें या नाटकांत दाखविलें आहे.

इब्सेनी तंत्र याप्रमाणे मराठी रंगभूमीवर आणण्यांत आलें खरें. पण तें रुजलें किंवा रुळलें असें म्हणतां येत नाही. या तंत्राचा अवलंब करणारीं फारच थोडीं नाटकें मराठींत झालीं असतील. बाकी तंत्रांतले बाह्य बदल पुष्कळच झालेले सांगतां येतील. आता नवीन नाटकें बहुतेक एकांकप्रवेशी म्हणजे एका अंकांत एकच प्रवेश असणारीं लिहिण्यांत येतात. रंगभूमीवरील सजावट पडद्यांची नसून चोखटांची असते व अंक संपल्याशिवाय सीन बदलण्यांत येत नाही. गाणीं असलींच तर अगदी थोडीं, चार पांचच असतात. हें सगळें खरें. प्रेक्षकांमध्ये नाटकें पाहण्याची आवड वाढत आहे हेंहि खरें. पण तंत्राच्या बाबतींत नवा

महान प्रयोग अद्याप अवतरलेला दिसत नाही. वास्तविक इब्सेनचें तंत्र सुद्धा आता जुनें झालें आहे. युरोपांतले नाटककार नवीन नवीन कल्पनांच्या व तदनुसार बसविलेल्या तंत्रांच्या मागे धावत आहेत. मनोमय सृष्टि, पूर्वकाळच्या भयानक स्मृति किंवा अतींद्रिय जगांत वावरणारे आत्मे यांचें नाट्यांत कसें दिग्दर्शन करतां येईल हें पाहण्याकडे आधुनिक नाटककारांची प्रतिभा वळूं लागली आहे. श्री. व्यंकटेश वकील यांनी भाषांतरिलेल्या 'सारेच सज्जन' या नाटकांत असा प्रयत्न दिसून येतो. पण हें सर्व परक्यांचें धन. आपल्या समाजांतल्या परिस्थितीस अनुसरून जिवंत स्वतंत्र प्रयोग नाट्यसृष्टींत होऊं लागलेला दिसत नाही.

आपली नाट्यसृष्टि कुचंबल्यासारखी होऊन नव्या द्रष्ट्या प्रयोगकाराची वाट पाहात आहे.

• • •

आकाशवाणी, नागपूर, १९५५

१३

# र स वि चा र

रसो वै सः । रसं ह्येवायं लब्ध्वाऽनंदी भवति ।

जीवनांतील व्यापसंतापापासून निवृत्त होऊन शाश्वत आणि निरामय आनंदाचा शोध करणाऱ्या मुनीने आपल्या तत्त्वचिंतनाचा निष्कर्ष म्हणून उद्गार काढले, 'रसो वै सः । रसं ह्येवायं लब्ध्वा आनंदी भवति ।'. आत्मतत्त्व हें या सृष्टींतील सारभूत सुखदायक तत्त्व असून त्याचा अनुभव ज्याला घडतो त्याला खऱ्या शाश्वत आनंदाची प्राप्ति होते, हा महासिद्धान्त या तैत्तिरीय उपनिषदांतल्या अप्रतिम सुंदर वाक्यामध्ये आत्मज्ञानी मुनींनी सांगितलेला आढळतो. कोणत्याहि वस्तूमधला सारभूत, सुखदायक गोड असा जो अंश तो त्यांतला रस होय. म्हणूनच ह्या जीवनांतलें सारभूत, निरतिशय आनंददायक असें जें तत्त्व त्याचा उल्लेख करतांना वैदिक मुनींनी त्याला 'रस' म्हटलें.

रस सगळीकडे भरलेला आहे. आपल्या शरीरामध्ये रस आहेत; सृष्टीमध्ये रस आहेत; अन्नामध्ये असलेले सहा रस तर सर्वांना माहीतच आहेत. ब्रह्मदेवाच्या सृष्टीमध्ये शरीराचें पोषण करणारें जें साहित्य आहे त्यांत गोड, आंबट, तिखट इत्यादि सहाच रस आहेत. ब्रह्मदेवाच्या सृष्टीवर ताण करणारी जी कविनिर्मित सृष्टि तिच्यामध्ये मनाचें पोषण करणारें जें साहित्य आहे त्यांत रसांची संख्या ब्रह्मदेवाच्या सृष्टीच्या मानाने दिढीने अधिक असावी, हें योग्यच आहे. ब्रह्मदेवाच्या सृष्टींत ६ तर कवींच्या सृष्टींत ९ रस आहेत, ही

कविनिर्मित सृष्टीची प्रौढी मम्मटाचार्यांनी आपल्या काव्यप्रकाशांत प्रारंभींचें नमन करितांनाच सूचित केली आहे.

साहित्यशास्त्राच्या विवेचनास आपल्या देशांत फार प्राचीन काळीं प्रारंभ झाला. सहृदयाच्या मनाला आल्हाद देणारें जें काव्यांतलें प्रमुख तत्त्व त्याला रस म्हणावें, ही गोष्टहि फार प्राचीनकाळीं ठरली गेली असली पाहिजे. रसाचें विवरण ज्यांत केलें आहे असा सर्वांत प्राचीन ग्रंथ भरत नाट्यशास्त्र हा होय. त्यांत रसाचा उल्लेख पूर्वीपासून सर्वांना मान्य असलेलें तत्त्व, अशा रीतीनेच केला आहे. या तत्त्वाला 'रस' असें कां नांव पडलें हें सहज लक्षांत येण्याजोगें आहे. रस ह्या शब्दांतली कल्पना आता प्रारंभीं मीं सांगितली तीच. कोणत्याहि वस्तूमधला सारभूत आणि आल्हाददायक अंश म्हणजे रस. ह्याच अर्थानें काव्यशास्त्रांत व नाट्यशास्त्रांत हा शब्द वापरण्यास सुरवात झाली असली पाहिजे यांत शंका नाही.

काव्यांतला किंवा ललित वाङ्मयांतला हा रस कशा रीतीनें अभिव्यक्त होतो? सहृदय वाचकाच्या मनाला रसानुभव कसा घडतो? या प्रश्नाचें उत्तर अगदी सरळ व सोपें आहे. खाण्याच्या पदार्थाचा रस आपल्याला कसा कळतो? अर्थात् तो पदार्थ चावून तोंडांत घोळविल्यानें, म्हणजेच त्याची गोडी चाखल्यानें. अगदी हीच क्रिया काव्य किंवा नाटक यांच्यापासून मिळणाऱ्या रसाच्या बाबतींत घडते. आणि या क्रियेचें वर्णन करितांना साहित्यशास्त्रकारांनीं चर्वण, रसन, आस्वादन हेच अन्नाच्या बाबतींत लागू पडणारे शब्द वापरले आहेत. नाटकामध्ये दुष्यन्तशकुन्तला यांचा किंवा कृष्णरुक्मिणीचा शृंगार पाहिला म्हणजे आपलें मन त्या भावना घोळवूं लागतें, त्यांचा आस्वाद घेण्यांत तें तल्लीन होऊन जातें. मनाला तल्लीन करून सोडणारा हा जो आस्वादाचा अथवा गोडी चाखण्याचा अनुभव तोच रस होय. कवि जर तितका प्रतिभाशाली असला तर तो या आस्वादांत आपल्याला देहभान विसरावयास लावतो. येथे कवि या शब्दांत नाटककार, कादंबरीकार वगैरे ललित वाङ्मय लिहिणारे सर्व लेखक आले असें समजावयाचें. हरिभाऊ आपट्यांच्या 'पण लक्षांत कोण घेतो?' या कादंबरींतील मधुर शृंगार आणि उत्कट करुण, त्याचप्रमाणे त्यांच्या उषःकाल कादंबरींतील स्फूर्तिदायक वीररस आणि मनाला थक्क करून सोडणारा अद्भुत, हे ज्याचें मन तल्लीन करून सोडीत नाहीत, असा अरसिक वाचक कोणी तरी असेल काय?

येथें विचार करण्याजोगा एक प्रश्न उद्‌भवतो. काव्यनाटकांतून अनुभवास येणारा रस खरोखरी वाचक प्रेक्षकांच्या अंतःकरणांत असतो की त्या काव्य नाटकांतच असतो ? वास्तविक 'सृष्टीचें' उदाहरण पाहिलें तर रस पदार्थामध्ये असतो व आपण त्याचा आस्वाद घेतों असें दिसतें. गोडी आंब्यांत असते, द्राक्षांत असते, जिलेबींत असते. ह्या साम्यानुसार कवीच्या काल्पनिक सृष्टींतल्या विषयावर विचार केल्यास तेथेहि रस हा काव्यांत अथवा नाटकांत असतो आणि रसिक वाचक, प्रेक्षक त्याचा आस्वाद घेतो असें म्हणावेंसें वाटेल. सर्वसाधारण समजूत अशीच आहे आणि भाषेंत प्रयोगहि तशाच तऱ्हेचे होतात. शाकुंतल नाटकांत शृंगाररस आहे, रघुनाथ पंडिताचें नलोपाख्यान रसाळ आहे, एकच प्याला नाटक करुणरसाचें भांडार आहे, अशा प्रकारचे भाषाप्रयोग नेहमी करण्यांत येतात.

पण रसाचा सिद्धान्त प्रस्थापित करणाऱ्या शास्त्रकारांच्या मतीं वरील समजूत बरोबर नाही; अर्थात् वरच्यासारखीं विधानें लाक्षणिक अर्थानें घेतलीं पाहिजेत. म्हणजे, शाकुंतल नाटक शृंगाररसाचें उद्‌भावन करणारें आहे, रघुनाथपंडिताचें नलोपाख्यान हें रसनिष्पत्ति करण्यास समर्थ आहे, अशा तऱ्हेने वरच्यासारख्या विधानांचे अर्थ समजून घेतले पाहिजेत. कवीने केलेल्या वर्णनाच्या योगानें सहृदय मनुष्याच्या मनामध्ये विशिष्ट भावनांचें उद्दीपन होऊन त्यांचें जें अलौकिक आनंददायी असें आस्वादन घडतें त्याचें नांव रस.

सामान्य समजुतीच्या आणि भाषाप्रयोगांच्या विरुद्ध जाऊन रस हा काव्य-नाटकांत नसून सहृदय वाचक-प्रेक्षकांच्या ठायीं असतो असा सिद्धान्त साहित्य-शास्त्रकारांनी कां केला असा प्रश्न आपल्या मनांत उद्‌भवतो. यासंबंधांत दोन कारणें सुचतात. रस हा वाचक-प्रेक्षकांच्या मनांत नसून काव्यनाटकादि वस्तूंत आहे असें मानूं लागलें म्हणजे इतर वस्तूंप्रमाणे त्याची प्रचीती सर्व माणसांना सारखी आली पाहिजे असें साहजिकच निष्पन्न होतें. पण प्रत्यक्षांत तसें दिसत नाही. ज्याचीं इंद्रियें रोगट किंवा निकामी झालीं आहेत असा लक्षावधि माणसां-तून एखादा माणूस सोडल्यास बाकीच्या सगळ्यांना साखर गोडच लागणार, झाडाचीं पानें हिरवींच व जास्वंदीचें फूल लालभडकच दिसणार, जाईचा वास मोहक वाटणार. पण काव्यनाटकाच्या रसाविषयी असें म्हणतां येत नाही. रसाची प्रचीती होण्यास अंतःकरण संस्कारयुक्त आणि संवेदनाशील असावें लागतें.

संस्कारशून्य बोथट अंतःकरणाच्या मनुष्यास बाष्कळ हास्य व उत्तान लैंगिक वर्णनें आवडतील. पण तो खरा हास्य व शृंगाररस नव्हे. रस हा सूक्ष्म तरल मनाच्या खऱ्या रसिकासच प्रतीत होतो. म्हणजेच तो आत्मनिष्ठ आहे, वस्तुनिष्ठ नाही. कांही रसिकांना कांही विशिष्ट रसच गोड वाटतात, इतरांची मातब्बरी त्यांना वाटत नाही; किंबहुना त्यांना ते रस मानायला देखील तयार नसतात, हें रसाच्या आत्मनिष्ठतेचेंच द्योतक होय. ज्ञानेश्वरांना शांतरस हाच सर्वश्रेष्ठ वाटत होता, तर संस्कृतांतील प्राचीन साहित्यशास्त्रकार शांताला रस मानायला देखील तयार नव्हते. 'एको रसः करुण एव' करुण हाच एक खरोखरीचा रस, असें कविवर भवभूति म्हणतो तर शृंगार हा रसराज, इतर रस त्यापुढे तुच्छ, असें मानणारे कांही कवि व शास्त्रकार आहेत. या सर्व विचारवैचित्र्याचें तात्पर्य हेंच की रस हें आत्मनिष्ठ तत्त्व आहे आणि त्यामुळेच भिन्न भिन्न सहृदयांचे त्यासंबंधांत फार निरनिराळे अभिप्राय दिसून येतात.

रस हा मुळांत काव्यनाटकांत असतो आणि तोच वाचक-प्रेक्षकांच्या मनांत उतरतो असें मानण्यांत आणखी एक अडचण येते ती अशी की काव्यनाटकां-मधील पात्रांच्या ज्या भावना तेथे व्यक्त होतात त्या तशाच वाचक-प्रेक्षकांच्या मनांत उतरत नाहीत. आंब्यांत जो रस आहे, चिंचेंत जें आंबटपण आहे तें खाणाऱ्याच्या जिभेवर ज्याप्रमाणे तसेंच उतरतें, तसें काव्यनाटकांच्या बाबतींत होत नाही. शाकुंतल नाटकांत दुष्यन्त प्रेमविव्हल होऊन शकुन्तलेशीं प्रेमचेष्टा करूं लागतो, म्हणून आपण प्रेक्षकगण प्रेमविव्हल होऊन प्रेमचेष्टा करूं लागतों असें कधी होत नाही. 'पण लक्षांत कोण घेतो' मधील यमुनेवर पतिमरण, केशवपन इत्यादि घोर दुःखें कोसळतात.आपण कादंबरी वाचूं लागलों म्हणजे आपण पति-निधनाचें दुःख अनुभवूं लागतों असें तर होत नाही. मग होतें काय ? नाटक-कादंबऱ्यांतील पात्रांच्या कविवर्णित भावना आपल्या म्हणजे वाचक प्रेक्षकांच्या मनांतील संवादी भावनांच्या तारा छेडतात. तिथे त्या भावनांचें साधारणीकरण होऊन त्यांना अनुकूलसंवेदनात्मक असें रूप प्राप्त होतें. वाचक-प्रेक्षकांच्या मनांत उद्दीपित झालेल्या या संवादी भावनांचें जें चर्वण किंवा आस्वादन तोच रस. भावना कोणतीहि असो, सुखरूप असो दुःखरूप असो, रस नेहमी आनंदस्वरूप असतो.

रसाचा उद्भव, आताच सांगितल्याप्रमाणे, कांही एक संक्रमण किंवा परंपरा यांच्या द्वारा होतो. साहित्यशास्त्रकारांनी याविषयी फार सूक्ष्म विचार करून

ह्या संक्रमणक्रियेचें आखीव आणि रेखीव विवरण केलें आहे. हें सर्व त्यांनी नाट्यशास्त्रकार भरतमुनि याच्या एका सूत्राच्या आधाराने केलें आहे. त्याने आपल्या ग्रंथांत रसाचा उद्‌भव कसा होतो याविषयी 'विभावानुभावव्यभिचारिसंयोगाद्रसनिष्पत्तिः' असें एक छोटेंसें सूत्र घालून दिलें आहे. नंतरच्या साहित्यशास्त्रकारांनी या सूत्राभोवती रिंगण धरलें असून त्याच्या आधाराने रसनिष्पत्तीची शास्त्रीय प्रक्रिया प्रतिष्ठापित केली आहे. या विषयांत मतभेद, विचारभेद पुष्कळच व्यक्त झाले आहेत. भरतमुनीचें सूत्र तेंच, पण त्याचा अर्थ प्रत्येक ग्रंथकार भिन्न भिन्न तऱ्हेने लावतो. या सर्व विचारमंथनांत ध्वन्यालोक नामक ग्रंथाचा कर्ता आनंदवर्धन, त्याचा टीकाकार अभिनवगुप्त आणि त्याचा शिष्य काव्यप्रकाशकर्ता मम्मट यांनी प्रतिपादिलेली मतप्रणालि विशेष मान्यता पावली आहे.

मनुष्याच्या मनांत कांही विकार किंवा भावना मूलभूत स्थिर स्वरूपाच्या असतात. म्हणजे त्या त्या वासना सुप्त स्वरूपांत माणसाच्या मनांत कायम असतात आणि अनुकूल कारण घडलें की त्या उद्दीपित होऊन मनुष्याचें मन व्यापून टाकतात. प्रेमयोग्य स्त्री पाहिली की कामविकार जागृत होतो किंवा शत्रूला चालून येतांना पाहिलें की क्रोध जागृत होतो. अर्थात काम आणि क्रोध हे वासनारूपाने मनुष्याच्या मनांत असतात, त्यांना चेतविणारें कारण घडलें की ते पृष्ठभागावर येऊन मनाचा कबजा घेतात. असे जे मूलभूत स्थिर भाव किंवा विकार त्यांना साहित्याच्या संबंधांत स्थायी भाव असें शास्त्रीय नांव आहे. प्रत्यक्ष शत्रु चालून आला असतां आपल्याला जो क्रोध येतो त्याचा साहित्याशीं संबंध नाही. हा खरोखरीचा मनोविकार परिणामीं त्रासदायक होतो, पण भीम दुःशासनावर चालून गेला आहे, किंवा दत्ताजी हाणामारी करीत गिलच्यांच्या कोंडींत घुसला आहे, अथवा मारीन किंवा मरेन या दृढ निर्धाराने भाऊसाहेब पेशवे त्वेषाने गिलच्यांवर तुटून पडले आहेत, अशा प्रसंगांचें कवीने किंवा बखरकाराने केलेलें वर्णन आपल्या मनांतील क्रोध जागृत करतें, त्यावेळीं तो क्रोध वैयक्तिक ममत्वाने लपेटलेला मनोविकार असत नाही, तर साधारणीभूत आस्वादनीय असा भाव असतो. तो आनंदरूप असतो. असा हा भाव वासनारूप सुप्त अवस्थेंत असेल तेव्हा त्याला स्थायीभाव म्हणतात. काव्यनाटकांतील वर्णनांनी उद्दीपित झाला म्हणजे तो रसत्वाप्रत प्राप्त होतो. क्रोध हा स्थायीभाव उद्दीपित झाला की तो रौद्र रस होतो.

रस हा सहृदय वाचक प्रेक्षकांच्या मनांत असतो असें जें मागे सांगितलें त्याचा अर्थ काय, हें आता आपल्या लक्षांत येईल. काव्यनाटकादिकांतील वर्णनें हीं रसनिष्पत्तीची सामग्री होय. त्यांत पात्रांच्या अंगचे मनोविकार, म्हणजे त्यांचीं कारणें व तज्जनित क्रिया, वर्णिलेल्या असतात. प्रतिभावान कवीच्या हातीं हें सर्व वर्णन इतकें उज्ज्वलत्व धारण करतें की वाचक प्रेक्षकांचें मन त्यांत समरस होऊन जातें, त्याच्या वृत्ति तदाकार होतात आणि त्याच्या अंतःकरणांत संवादी स्थायी भाव उद्दीपित होऊन त्याचें मन आनंदसंप्लवांत लीन होऊन जातें. हाच तो साहित्यशास्त्रकारांनी 'ब्रह्मानंद सहोदर', 'अलौकिक चमत्कारकारी' या विशेषणांनी स्तविलेला रस !

प्रथम नाट्यशास्त्रांत शृंगार वीर करुण रौद्र हास्य भयानक बीभत्स अद्भुत असे आठ रस मानण्यांत आले. यांचे स्थायीभाव अनुक्रमें रति उत्साह शोक क्रोध हास भय जुगुप्सा ( किळस ) विस्मय हे निश्चित करण्यांत आले. नाटकांसाठी साधारणपणे हें ठीक होतें. पण रसतत्त्व हें संपूर्ण साहित्याला लागू करण्यांत आलें तेव्हा ही व्यवस्था अपुरी असल्याची जाणीव होऊं लागली. काव्यांत प्रसंगानुसार नानापरींच्या भावनांचा उल्लास दिसून येतो. वैराग्यपर कविता निर्माण होऊं लागली तेव्हा शांत हा नववा रस मानावा असें ठरलें. त्याचा स्थायीभाव कांही जणांनी निर्वेद ( विरक्ति ) हा सांगितला तर कांहीजणांनी शम हा सांगितला. पुढे स्थायी भाव इतकेच कां असावेत, संपूर्ण चित्ताला व्यापून टाकणाऱ्या ज्या इतर अनेक भावना काव्यांत प्रभावी होतात, त्यांना स्थायी भावांचा—अर्थात रसांचा—दर्जा कां मिळूं नये असे प्रश्न निघूं लागले. कांहीनी मित्रप्रेमावर आधारलेला प्रेयान् हा रस मानिला, तर कांहीनी अपत्यप्रेमावर आधारलेला वत्सल रस मानावा असें सुचविलें. भागवतादि भक्तिपर काव्याचें माहात्म्य लक्षांत घेऊन कित्येकांनी भक्तिरसाचा पुरस्कार केला. चैतन्यसंप्रदायी पंडितांनी रसाची अगदी निराळी व्यवस्था सुचविली.

या सर्व मतमतांतरांमध्ये अलीकडे मराठी साहित्यशास्त्रकारांनी महत्त्वाची भर घातली आहे. मुख्य रस शृंगार वीर करुण हे तीनच, बाकीचे रस हे यांचे गौण प्रकार, असें कांहींनी प्रतिपादिलें आहे. बीभत्स भयानक हे रसच नव्हेत असें कांहींचें मत आहे, तर प्रक्षोभ नांवाचा नवा रस मानावा असें कांहींनी सुचविलें आहे. देशभक्तीची भावना अलीकडे महत्त्व पावली असल्यामुळे तो

एक रस मानावा असें कांही जणांचें म्हणणें आहे.

पण मराठीच्या साहित्यक्षेत्रांतील विचारवंतांचा एकंदर रोख पाहिला तर तर्कशुद्ध विचारसरणीचा अवलंब करून भावनेचें व्यापक क्षेत्र रसतत्त्वाला मोकळें करून देण्याकडे दिसतो. काव्याचें क्षेत्र जर जीवनाइतकें व्यापक आहे, तर ज्या अनंत भाव भावनांनी जीवन संकुल झालेलें आहे त्यांच्यापैकीं कांही भावनांना 'आजाव' आणि बाकीच्यांना 'मज्जाव' असा पंक्तिप्रपंच कां? प्रेम, उत्साह दुःख या भावनांचें जीवनामध्ये आणि साहित्यामध्ये प्राबल्य आहे, म्हणून शृंगार, वीर, करुण हे प्रधान रस मानले तर तें सयुक्तिक आहे. पण बीभत्स, अद्भुत, भयानक असल्या कधीं काळीं साहित्यांत अवतरणाऱ्या, संस्कृत साहित्यांत तर मुद्दाम ओढून ताणून कित्येक स्थलीं आणले गेलेल्या गौण भावांना रसाचें स्थान बहाल करण्यांत काय मतलब आहे? प्राचीन मुनींच्या वचनांनी आपले विचार जखडबंद करून ठेवण्याची आता जरूरी नाही. काव्यनाटकांत, कथा-कादंबऱ्यांत ज्या ठिकाणीं जी भावना प्रभावी, सहृदय वाचकाचें मन तल्लीन करून सोडणारी असेल, तोच तेथील रस, मग ती भावना कोणतीहि कसलीहि असो, अशी विचारसरणी आता प्रचलित होऊं पाहत आहे.

ह्या व्यापक दृष्टिकोनांतून पाहिल्यास रस म्हणजे भावोल्लास हेंच सत्य आपल्याला गवसतें. भावोल्लास कोणत्याहि भावनेमुळे झालेला असो त्याची अखेरची जी निर्भर अवस्था असते ती सगळ्या भावनांमध्ये साधारणपणे एकरूपच असते आणि बाह्य विषयांची, इन्द्रियवासनांची जाणीव तेथे लुप्त होते. रसनिर्भरतेचा हा अनुभव लक्षांत घेऊन काव्यप्रकाशकार मम्मटाने 'हृदयमिव प्रविशन् सर्वांगीण-मिवालिंगन् ब्रह्मास्वादमिवानुभावयन्' असें रसतत्त्वाचें उज्ज्वल वर्णन केलें आहे. भवभूतिने करुण रसाचें निमित्त करून हीच अवस्था सूचित केली आहे, तर ज्ञानेश्वरांनी शांत रसाला रसराज कल्पून आपल्या निरूपणांत प्रत्यक्ष ब्रह्मरस पिकविला अहे. शृंगारादि लौकिक रसांचा आस्वाद देखील जर ब्रह्मानंदासारखा अंतःकरण प्रकाशित करून सर्वांगाला व्यापून टाकणारा अनुभव घडवितो, तर ज्यांनी आपल्या काव्यांत प्रत्यक्ष अध्यात्माची मांदूस खोलली त्यांच्या काव्यांतील रस हा प्रत्यक्ष आत्मानुभवाच्या पायरीला जाऊन पोचत असेल हें काय सांगायला पाहिजे! ज्ञानेश्वरांचा शांतरस म्हणजे प्रत्यक्ष आत्मानुभवाचा, ब्रह्मतादात्म्याचा आनंद होय. म्हणूनच हा अनुभव घेण्यास 'अंतरंगचि अधिकारिये' असें

ज्ञानदेवांनी म्हटलें आहे, शांतरस हा आत्मानंदरुप असतो ही माझीच कांही तरी बिनबुडाची कल्पना आहे असें नव्हे. रसतत्त्वाचें पूर्ण अधिकाराने विवरण करणारा महान तत्त्वज्ञ अभिनवगुप्त याने आत्मा किंवा परमात्मा हा शांतरसाचा स्थायीभाव म्हणून सांगितला आहे. रसतत्त्वाचें उन्नयन कोणत्या अखेरच्या शिखरापर्यंत होऊं शकतें हें यावरुन दिसून येतें. सामान्य विषयांच्या भोवती घोटाळणाऱ्या भावनापासून तों सर्वत्र भरलेल्या परमात्मतत्त्वापर्यंतचे सर्व भाव या तत्त्वाच्या कक्षेंत येऊं शकतात. म्हणूनच उपनिषत्कारांनी 'यस्य सर्वमात्मैवाभूत्' अशा पराकोटीच्या अनुभवाला 'रस' असें म्हटलें आहे. आणि तुकोबांनी याला ब्रह्मरस म्हटलें आहे. ज्यांनी आपल्या प्रतिभा सामर्थ्याने हा ब्रह्मरस शब्दांत अवतरविला त्यांच्या वाग्वैभवाच्या रूपाने साहित्याची परमश्रेष्ठ शक्ति प्रकट झाली असें म्हटलें पाहिजे.

• • •

... ग्रंथ संग्रहालय, ठाणें. ...
अनुक्रम 33963 वि: निवांत
क्रमांक 33.66 नों दि 23/9/62

१४

# पुरुषाच्या दृष्टिकोनांतून पत्नी

एकसारखीं तीस वर्षे ज्याने एका स्त्रीबरोबर एकनिष्ठपणें संसार केला आहे अशा मनुष्यावर आपला पत्नीविषयक दृष्टिकोन मांडण्याची पाळी येणें हें दिसायला जितकें सोपें तितकेंच खरोखरी अवघड आहे. एका दृष्टीने माझा अनुभव अगदी मर्यादित, तर दुसऱ्या दृष्टीने तितकाच गाढ आहे. या दोन्ही गोष्टी खूपसें बोलायला आणि अघळपघळ गप्पा मारायला थोड्याशा अडचणीच्याच आहेत.

मानवी जीवनांत पति–पत्नीचें हें एकच नातें असें आहे की ज्यांत पुरुष स्त्रीला आणि स्त्री पुरुषाला संपूर्णपणे पाहूं शकते. इतकें निकटचें नातें या जगांत फक्त एकच असूं शकेल. तें म्हणजे देव आणि भक्त यांचें. भक्त देवासमोर स्वतःचें कांहीच लपवून ठेवूं इच्छीत नाही, तसाच देव देखील भक्तापासून कांही लपवून ठेवूं शकत नाही. देवांचीं सर्व वर्में भक्त पुरेपूर जाणून असतो. म्हणूनच की काय, नामदेवापासून तों मोरोपंतापर्यंत सर्व भक्तांनी, एखादी बायको नवऱ्याशीं काय करील, इतकी सलगी देवाशीं केली आहे.

देव–भक्त संबंधामधला हा गाढपणा व निकटपणा लक्षांत घेऊनच पति–पत्नीसंबंधाला देव–भक्तांची उपमा देण्याची चाल पडली असावी. आणि पुरुष-प्रधान समाजांत ही केवळ उपमा न राहतां, पति हा स्त्रीचा प्रत्यक्ष देव आहे, त्याची सेवा परिचर्या करणें हाच पत्नीचा धर्म, असें प्रतिपादन करण्यांत येऊं लागलें. पुराणांतरीं सगळीकडे स्त्रियांना उद्देशून हाच उपदेश भरलेला आहे आणि वटसावित्रीसारख्या व्रतवैकल्याचें तात्पर्य तरी हेंच आहे. पूर्वीच्या काळच्या स्त्रियांची वागणूकहि म्हणे अशीच असे. कुठें तरी असें वाचल्याचें मला आठवतें

की पूर्वीच्या काळीं बायका नवऱ्याच्या पायांचें तीर्थ घेत आणि त्याच्या पायांना वंदन केल्याखेरीज निजत नसत.

फार नवलाचें आणि आश्चर्यकारक वाटेल हें सर्व आजच्या तरुण पिढीला, नाही ? आजची तरुण पिढी तर आमच्यापेक्षा पुष्कळच पुढे गेली आहे. माझ्या एका मित्राने लिहिल्याप्रमाणे "कॉलेजांत शिकावयाचें, विवाहमंडळांत विवाहबद्ध व्हावयाचें, 'ति'ने मास्तरीण व्हायचें व 'त्या'ने साहेबाच्या आफिसांत क्लार्क व्हावयाचें, दोघांनी खाणावळींत जेवायचें व शेवटीं हॉस्पिटलमध्ये मरावयाचें." असें आजच्या शहरी संस्कृतीचें स्वरूप बनूं लागलें आहे. या मानाने आम्ही बऱ्याच जुन्या चालीरीतींत वाढलों व जुन्या रूढीनुसार संसार केला; तरी देखील पत्नी म्हणजे पतिसेवापरायण दासी, पतिभक्ति हाच केवळ तिचा धर्म, असें आम्हाला कधीच वाटलें नाही. पत्नी ही सहचारिणी आहे, तिला स्वतंत्र व्यक्तित्व आहे; संसारांत तिचें स्थान पुरुषाच्या बरोबरीचें असून पुरुषाइतकेंच स्वातंत्र्य तिलाही आहे, असें आम्ही मानीत आलों. असें मानणें आणि त्याप्रमाणे परस्परांनी परस्परांचा आदर व मान राखून वर्तन करणें हेंच उभयतांना कल्याणकारक आहे.

आणि पुराणादिकांमधले एकांगी उपदेश सोडले तर आमच्या संस्कृतीच्या उदारतेची जोपासना करणाऱ्या धर्मशास्त्रकारांनी व कविजनांनी पत्नीपदाचा दर्जा अशाच रीतीने वर्णिला आहे. कविकुलगुरु कालिदासानें—

गृहिणी सचिवः सखी मिथः
प्रिय शिष्या ललिते कलाविधौ ।

या आपल्या सुप्रसिद्ध वचनांत पुरुषाचा पत्नीविषयक दृष्टिकोण केवढा उदात्त व हृदयंगम असूं शकतो हें दर्शविलें आहे. कुटुंबाची स्वामिनी, अंगीकृत कार्यांतील सल्लागार आणि बरोबरीची मैत्रीण, या वर्णनापेक्षा पत्नीपदाचें उच्चतर भावनेनें केलेलें वर्णन दुसरें कोणतें कोठेहि असूं शकेल असें वाटत नाही. आमचे महाराष्ट्रकविवर्य मोरोपंत यांनीहि धर्मराजाच्या तोंडी द्रौपदीसंबंधीचे उद्गार घातले आहेत, त्यांत पत्नीपदाचें असेंच गौरवयुक्त वर्णन केलें आहे. द्रौपदीस पणाला लावण्याच्या समयीं धर्मराज म्हणतो—

शरदुत्पलपत्राक्षी शरदुत्पलपुण्यगंधसमगंधा
....अस्खलित चालवी गृहधर्मी मज, यष्टि जसि पथीं अंधा ।

"संसारकृत्यांमध्ये माझी पत्नी द्रौपदीच मला वाट दाखवून सर्व कांही बरोबर करवून घेते." म्हणजे कुटुंबव्यवस्थेचें नेतृत्व पत्नीकडे आहे, आणि तसें असलें म्हणजेच संसार निरामय होतो, हें अनुभवसिद्ध सत्य येथे व्यक्त केलें आहे.

आद्य धर्मशास्त्रकार मनु याचें पुढील वचन सुप्रसिद्धच आहे—

यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः ।
यत्रैतास्तु न पूज्यन्ते सर्वास्तत्राफलाः क्रियाः ॥

"जेथे स्त्रियांचा मानसन्मान केला जातो तेथे देवता आनंदाने वास करितात; जेथे बायकांचा मान ठेवला जात नाही तेथील सर्व कर्में निष्फळ होतात." यापेक्षा स्त्रीजातीचें अधिक गोरव तें काय करायचें राहिलें ?

पण स्त्रीजातीची एवढी स्तुति जरी केली असली, आणि गृहराज्यांतला पत्नीचा श्रेष्ठ अधिकार जरी सर्वांनी मान्य केला असला, तरी एकंदरीने संसारामध्ये स्त्रीने पुरुषाच्या अनुकूलतेने व आधीनतेने वागावें, पतीचा संतोष हेंच आपलें प्रधान उद्दिष्ट मानावें, असाच निष्कर्ष सर्वांच्या प्रतिपादनांतून निघतो. मोरोपंतांची जी आर्या वर दिली आहे तिच्यापुढे ते म्हणतात—

आधी जिणें उठावें पाहुनि निजलों असें मग निजावें ।

पतीच्या आधी उठावे आणि मागून निजावें, असें म्हणण्यांतला तात्पर्यार्थ काय, तर पतीच्या मानाने पत्नीकडे गौणपणा आहे, हाच. मनूने तर चक्कच सांगून टाकलें आहे, की, "स्त्रीने लहानपणीं पित्याच्या, यौवनांत पतीच्या आणि वृद्धपणीं पुत्राच्या आधीन राहावें; स्वतंत्रपणें राहण्यास स्त्री पात्र नाही."

माझ्या स्त्री-स्वातंत्र्यवादी भगिनी म्हणतील की, "तुमचा कालिदास काय, मोरोपंत काय किंवा मनु झाला तरी काय, हे पुरुषच. ते आपल्या जातीवर जाणारच." माझें यावर उत्तर एवढेंच की, तुम्ही म्हणतां तें अगदी खरें. हा सगळा पुरुषी दृष्टिकोन आहे आणि पुरुषांचा दृष्टिकोनच मला आज सांगावयाचा आहे. स्त्रीला स्वातंत्र्य असावें की नाही आणि स्त्रीचे हक्क पुरुषाच्या बरोबरीचे आहेत की नाही, या तात्त्विक वादाचें तात्त्विक उत्तर कांहीही असो, सर्व पुरुषांना सामान्यत्वेंकरून आजच्या पुरोगामित्वाच्या काळांत देखील, असें वाटतें की संसारांत पत्नीने पतीच्या अधीनतेने वागावें. पुरुष जर समंजस व सौम्य स्वभावाचा असेल आणि पत्नी आग्रही व तिखट स्वभावाची असेल, तर पुरुष होतां होईल

तो पत्नीपुढे नमतें घेतो व अशा रीतीने संसाराचा गाडा समाधानीपणाने चालविला जातो. याच्या उलट पति आग्रही व तापट असून स्त्री सौम्य व मनमिळाऊ असेल तर ती नवऱ्यापुढे नमतें घेऊन गोष्टी विकोपास जाऊं न देतां संसाररथ सुरळीतपणे चालविते. दोघेही जोडीदार कोपिष्ट व हेकेखोर असतील तर पदोपदीं वितुष्ट व खडाजंगी, हें नशीब ठरलेलें. जगामध्ये व्यक्तिगणिक मानवी स्वभावाचे अनंत नमुने आहेत. या अनंत प्रकारांपैकी कोणते तरी दोन-प्रकार पति व पत्नी या नात्याने एकत्र येतात. आपण परस्परांशीं जमवून घेऊन संसार सुखाचा करून दाखवूं अशा निर्धाराने दोघांनी वागलें पाहिजे. मीच तेवढा चांगला व दुसरा वाईट, त्याने माझ्या म्हणण्याप्रमाणे वागलें पाहिजे, असा हेका धरण्याने गोष्टी बिनसतात व असंतोष माजत जातो.

स्वभावाचे नानाप्रकार दोन्ही बाजूंकडे आढळत असले, तरी एकंदरीने पुरुषी मनाची ठेवण व इच्छा अशी की पत्नीने आपल्यापुढे नमतें घ्यावें, कांही मर्यादेपलीकडे विरोध ताणूं नये. याचा अर्थ असा नाही की, आपल्या बायकोने दासानुदासाप्रमाणें आपण म्हणूं त्यास केवळ मान तुकवीत जावी, असें पुरुषाला वाटतें. थोडासा हट्ट, मर्यादित विरोध, क्वचित् एखादे वेळीं कडक लक्ष्मीचा अवतार, हा नवऱ्याला मनांतून आवडतो. तेवढी समंजस रसिकता बहुधा प्रत्येक पुरुषाच्या ठायीं असते. मात्र गोष्टी विकोपाला नेण्याची प्रवृत्ति नसावी. तसेंच पुरुषी अहंकार म्हणा की कांही म्हणा, चार चौघांदेखत आपल्या बायकोने आपले दोष काढलेले पुरुषाला कधी आवडत नाहीत. पुष्कळ बायकांना हें तारतम्य राहत नाही. आपल्या हुशारीचें व कर्तबगारीचें प्रदर्शन करण्याच्या भरांत त्या आपल्या पतिराजांवर चारचौघांमध्ये ताशेरे ओढीत असतात.

पुरुषाचा स्वभाव बहुधा नादी असतो. स्त्री बहुधा आपल्या संसारकृत्यांनी इतकी वेढलेली असते की तिला कांही नाद मुळांत असला तरी त्याला भरपूर वेळ देऊन तो वाढविणें बहुधा परवडत नाही. पुरुषाला तशी कांही अडचण नसल्यामुळे तो आपला नाद निर्वेधपणे चालवूं शकतो. कोणी राजकारण करतो, तर कोणी देशभक्ति करतो, कोणी वाङ्मयसेवा करतो तर, तर कोणी थिऑसफीच्या मागे लागतो. कित्येकांचे नाद व्यसनांच्या स्वरूपाचे कडेलोटाला गेलेले असतात. पण निदानपक्षीं ऑफिसांतून आल्यावर ब्रिज खेळण्यासाठी किंवा चकाट्या पिटण्यासाठी क्लबांत जाण्याचा नाद तरी पतिराजांना असतोच. असल्या नादांच्या पायीं संसारांत

कितीहि टंचाई भासली, कितीहि गैरसोय झाली, तरी ती सर्व चालवून घेऊन पत्नीने हसतमुखाने पतीच्या इच्छेला सादर होण्याची तयारी ठेवली की पतिराज बेहद्द खूष!

(Intellectual Championship) ऊर्फ बौद्धिक साहचर्य ह्याची महती कांही काळापूर्वी फार गाइली जात असे. एका पिढीपूर्वीचा जमाना असा होता की पांढरपेशा वर्गातील पुरुष खूप शिकत असत, पण स्त्रियांमध्ये शिक्षणाचा प्रसार कमी होता. तेव्हा पुरुष उच्च शिक्षित, तर बायको अशिक्षित अशीं जोडपी फार असत. अर्थात्च आपले विचार, भावना, आकांक्षा व ध्येयें यांच्यामध्ये सहभागी होण्याची पात्रता आपल्या पत्नीमध्ये नसावी, हें वैषम्य त्या काळच्या पुरुषांना फार बोचत असे आणि त्यामुळे कित्येकांचे संसार असमाधानी होत असत.

आतां पांढरपेशा वर्गातली बौद्धिक साहचर्याची ही भूक शमन पावलेली आहे, कारण या वर्गात स्त्रिया पुरुषांइतके शिकूं लागल्या आहेत. कित्येक जोडपीं मला अशीं माहीत आहेत की ज्यांत स्त्रिया पुरुषांपेक्षा अधिक शिकलेल्या व अधिक कर्तबगार आहेत. नवऱ्यांकडून बौद्धिक साहचर्य लाभत नसल्याबद्दल आतां त्यांची तक्रार सुरू झाली आहे की काय हें मला माहीत नाही! परंतु बौद्धिक साहचर्याची ही भूक पांढरपेशाखेरीज जो इतर समाज आतां शिक्षण घेऊं लागला आहे त्यांच्यांत वाढीला लागल्याचें मात्र दृष्टोत्पत्तीस येत आहे. पांढरपेशा समाजाची एकदोन पिढ्यांपूर्वी जी स्थिति होती ती सध्या त्यांची आहे; पुरुष झपाट्यानें उच्च शिक्षण घेत आहेत, पण स्त्रिया अद्याप अशिक्षित वा अल्पशिक्षित आहेत. त्यामुळे पुरुषांची बौद्धिक साहचर्याची भूक अतृप्त राहत आहे.

शिक्षित वर्गात बौद्धिक साहचर्याची लालसा निर्माण होते, तर शरीरकष्ट करून पोट भरणाऱ्या अशिक्षित समाजांत आर्थिक सहकार्याची गरज भासत असते. मोलमजुरी करणाऱ्या अशिक्षित तरुणांचा दृष्टिकोन बहुधा हा असतो की, बायको करायची ती शेजेची सांगातीण होण्यासाठी तर खरीच, पण ती कामधंदा करून चार पैसे कमावून आणण्याजोगीहि असावी. शेतकऱ्याची पत्नीविषयक आकांक्षा हीच असणार की आपल्या बायकोनें शेतांत राबण्यास, आपल्या बरोबरीनें लावणी, कापणी निंदण डवरण करण्यास सिद्ध असलें पाहिजे. ज्याच्या घरीं कुणबावा मोठा, असे कित्येक शेतकरी घरचा व्याप सांभाळण्यास काळजीचें आणखी एक माणूस असावें म्हणून दुसरें लग्न करून नवी बायको घरीं आणतांना मीं पाहिलें आहे.

बाह्य रंगरूपाविषयी तुम्ही कांहीच बोलत नाही, हें कसें ? असा कित्येकांना प्रश्न पडला असेल. आपली बायको सुस्वरूप असावी असें काय पुरुषांना वाटत नाही ? वाटत नाही कसें ? वाटतेंच. पण या वाटण्याचें प्रमाण काव्यामध्ये व कथाकादंबऱ्यांमध्ये जितकें आढळतें त्या मानाने वास्तव सृष्टींत फार कमी आढळतें असें माझें ठाम मत बनलें आहे. प्रोफेसर फडके प्रभृति सौंदर्यवादी कलाकारांच्या कादंबऱ्या प्रसिद्ध होत होत्या, तो एक जमाना असा होता की, स्त्रीसौंदर्याविषयीचा विवाहेच्छु तरुणांचा दृष्टिकोण अतिचिकित्सक बनला होता. धनुष्याकृति भुवया मुलीच्या नसल्यामुळे त्या काळांत लग्न मोडलेलें मला माहीत आहे. पण असला आचरटपणा त्या वेळींहि अल्पप्रमाणांत होता, आणि आता तो त्याहूनहि पुष्कळ कमी झाला आहे. रूपाची देणगी ज्यांना मिळालेली नाही, अशा कित्येक बुद्धिमान मुलींनी चांगल्या सुस्थितींतल्या सुयोग्य अशा तरुणांशीं विवाह केले असून त्यांचे संसार सुखाने चालले आहेत हें आनंददायक दृश्य मी आज पाहतों, आणि मला मोठी धन्यता वाटते. ज्यांच्या पायाशीं रंभा-उर्वशीसारख्या मुली लोळण घेत होत्या असे उच्च योग्यतेचे विवाहेच्छु तरुण 'इतकी सुस्वरूप मुलगी नको बुवा आपल्याला' असें म्हणत असलेले मला कांही माहीत आहेत.

या सगळ्याचा निष्कर्ष हाच की, संसाररूपी जी पति-पत्नीची भागीदारी, त्यांत बुद्धिमत्तेला आणि शिक्षणाला अव्वल महत्त्वाचें स्थान नाही. शरीरसौंदर्याचें स्थान त्याहूनहि गौण आहे. या भागीदारींत खरें भांडवल, प्रेमाचें आणि समंजसपणाचें असतें. गृहकृत्यांमध्ये दक्ष असणारी, आणि प्राप्त परिस्थितींत संसाराचा गाडा कर्तबगारीनें हाकून त्यांत आनंद मानणारी अशी पत्नी पुरुषांना आदर्शभूत वाटत आली आहे. आणि पुरुषवर्गाचा तो दृष्टिकोण आज बदलला आहे असें मानण्यास कांही आधार नाही. हाच पुरुषांचा दृष्टिकोन मनूने पुढील श्लोकांत व्यक्त केला आहे---

सदा प्रहृष्टया भाव्यं गृहकार्येषु दक्षया।
सुसंस्कृतोपस्करया व्यये चामुक्तहस्तया॥

• • •

आकाशवाणी, नागपूर, १२-१२-१९५२

प्रसिद्धि, 'संगम' मासिक जानेवारी १९५३

१५

# तात्यासाहेबांचें स्मृतिचित्र

"तर मग असें करा, तुम्हांला जें काय वाटतें, आता तुम्ही मला जें स्पष्ट करून सांगितलेंत, तें लिहून आणा; म्हणजे वाटल्यास त्यांत क्वचित थोडे कमीजास्ती करून आपण तोच अभिप्राय म्हणून पाठवून देऊं. मी आपल्याकडून हें जें लिहून काढलें आहे तें वर्णनात्मक भाग म्हणून त्याला प्रारंभीं जोडून देऊं म्हणजे झालें." समोरची व्यक्ति म्हणाली. "कांही हरकत नाही" मीं म्हटलें. "मला जें कांही म्हणायचें आहे, त्यांतले मुख्य मुद्दे हे मी लिहून आणलेच आहेत. पण तात्यासाहेब, तुम्ही जें लिहिलें आहे त्याचा रोख निराळा आहे आणि माझे जे मुद्दे आहेत त्यांचा रोख निराळा, कांहीसा तुमच्याविरुद्धच आहे. तेव्हा दोन्ही गोष्टींचा समन्वय करण्याचें हें काम कसें जमेल ?"

"अहो, न जमायला काय झालं ? मी लिहिलेल्या मजकुराला थोडेंसें वळण द्या आणि तुम्ही काढलेल्या मुद्यांनाही थोडेंसें सौम्य स्वरूप देऊन माझ्या लिहिण्याशीं जुळतें करा म्हणजे झालें. नाही तरी आपल्याला निर्णय बदलायचा नाहीच. अखेरची कलाटणी तुमच्या मतानुसारच द्यायची आहे." तात्यासाहेबांनी उत्तर केलें.

"ठीक आहे, आपल्या म्हणण्याप्रमाणे दोन्ही लिखाणांचा समन्वय करण्याचा प्रयत्न करतों आणि दोन्ही एकत्रित करून तयार झालेला अभिप्राय आपल्याला दाखवायला उद्या घेऊन येतों." याप्रमाणे मीं कबुली दिली आणि सुमारें तास दीड तास चाललेली आमची ही मुलाखत आटोपली.

वर वर्णिलेल्या संवादांतली एक व्यक्ति म्हणजे मी स्वतः व दुसरी व्यक्ति

म्हणजे नरसिंह चिंतामण ऊर्फ तात्यासाहेब केळकर. ही मुलाखत ऊर्फ भेट तात्या साहेबांच्या आयुष्याच्या शेवटी शेवटी झाली आणि जरा महत्त्वाच्या विषयासंबंधाने होती, म्हणून माझ्या चांगली लक्षांत राहिली आहे. पी.एच डी. पदवीकरिता विद्यापीठाकडे पाठविलेल्या एका प्रबंधाचे तात्यासाहेब आणि मी दोघे परीक्षक होतों. पत्रद्वारें हें परीक्षणाचें काम करणें अशक्य नव्हतें, पण पुण्यास जाण्याचा योग लवकरच येण्याचा संभव असल्यामुळे समक्ष भेटीकरिता मीं तें राखून ठेवलें होतें. पुण्यास गेल्यानंतर प्रभात रोडवरील त्यांच्या बंगल्यांत मी त्यांना जाऊन भेटलों आणि प्रबंधासंबंधाने योग्य ती चर्चा केली. आताच मी जो आम्हा दोघांमधील संभाषणाचा गोषवारा सांगितला तो आमच्यामधील चर्चेच्या अखेरीचा भाग होय.

चर्चा संपवून मी आपल्या बिऱ्हाडीं परत जात असतां साहजिकच माझ्या मनांत झालेल्या चर्चेविषयी आणि त्यांत दिसून आलेल्या तात्यासाहेबांच्या स्वभाववैशिष्ट्याविषयी विचार घोळूं लागले. मुळांत तात्यासाहेबांचा कल माझ्या अभिप्रायाला तितकासा अनुकूल नव्हता. पण माझें व त्यांचें बरेच बोलणें झाल्यानंतर त्यांनी माझा अभिप्राय मान्य केला, फक्त आपण स्वतः लिहिलेला वर्णनात्मक मजकूर अभिप्रायाला प्रारंभीं जोडावा एवढाच आग्रह धरला. त्याला मीं अर्थातच मान तुकवली.

हा प्रसंग म्हणजे तात्यासाहेबांच्या प्रांजळपणाचे आणि समन्वय बुद्धीचें एक मोठें उदाहरण मी समजतों. कोणताहि विषय विचारासाठी पुढे आला तरी तात्यासाहेबांना त्याची चांगली–वाईट, उलट-सुलट, अनुकूल-प्रतिकूल दोन्ही बाजू अशा रीतीने दिसत असत की ठामपणें चांगलें किंवा वाईट असें एकान्तिक मत त्यासंबंधांत ठोकून देणें हें त्यांजकडून होत नसे. अर्थात आग्रहीपणा बहुधा नसेच. कोणचेंहि उदात्त तत्त्व किंवा उच्च ध्येय पुढे आलें की व्यवहारांत त्या तत्त्वाला करावे लागणारे अपवाद, घालावी लागणारी मुरड त्यांना आधी दिसत असे. त्यामुळे तात्कालिक परिस्थितींत व्यवहार्य ठरेल व सर्व पक्षांना झेपेल असा तडजोडीचा मार्ग सुचविण्याचा ते प्रयत्न करीत, त्यामुळे निर्भेळ ध्येयवाद्यांना व एकान्तिक तत्त्वनिष्ठांना केळकर हे तेजोभंग करणारे, पुढे जाणाऱ्यांचा पाय मागे खेचणारे आहेत असें पुष्कळदां वाटत असे. मला मात्र कधी तसें वाटलें नाही व अजूनहि वाटत नाही. ध्येयाच्या उच्च पातळीवरून कोणास मुद्दाम खाली

१५

# तात्यासाहेबांचें स्मृतिचित्र

"तर मग असें करा, तुम्हांला जें काय वाटतें, आता तुम्ही मला जें स्पष्ट करून सांगितलेंत, तें लिहून आणा; म्हणजे वाटल्यास त्यांत क्वचित थोडे कमीजास्ती करून आपण तोच अभिप्राय म्हणून पाठवून देऊं. मी आपल्याकडून हें जें लिहून काढलें आहे तें वर्णनात्मक भाग म्हणून त्याला प्रारंभीं जोडून देऊं म्हणजे झालें." समोरची व्यक्ति म्हणाली. "कांही हरकत नाही" मीं म्हटलें. "मला जें कांही म्हणायचें आहे, त्यांतले मुख्य मुद्दे हे मी लिहून आणलेच आहेत. पण तात्यासाहेब, तुम्ही जें लिहिलें आहे त्याचा रोख निराळा आहे आणि माझे जे मुद्दे आहेत त्यांचा रोख निराळा, कांहीसा तुमच्याविरुद्धच आहे. तेव्हा दोन्ही गोष्टींचा समन्वय करण्याचें हें काम कसें जमेल ?"

"अहो, न जमायला काय झालं ? मी लिहिलेल्या मजकुराला थोडेंसें वळण द्या आणि तुम्ही काढलेल्या मुद्यांनाही थोडेसें सौम्य स्वरूप देऊन माझ्या लिहिण्याशीं जुळतें करा म्हणजे झालें. नाही तरी आपल्याला निर्णय बदलायचा नाहीच. अखेरची कलाटणी तुमच्या मतानुसारच द्यायची आहे." तात्यासाहेबांनी उत्तर केलें.

"ठीक आहे, आपल्या म्हणण्याप्रमाणे दोन्ही लिखाणांचा समन्वय करण्याचा प्रयत्न करतों आणि दोन्ही एकत्रित करून तयार झालेला अभिप्राय आपल्याला दाखवायला उद्या घेऊन येतों." याप्रमाणे मीं कबुली दिली आणि सुमारें तास दीड तास चाललेली आमची ही मुलाखत आटोपली.

वर वर्णिलेल्या संवादांतली एक व्यक्ति म्हणजे मी स्वतः व दुसरी व्यक्ति

म्हणजे नरसिंह चिंतामण ऊर्फ तात्यासाहेब केळकर. ही मुलाखत ऊर्फ भेट तात्यासाहेबांच्या आयुष्याच्या शेवटी शेवटी झाली आणि जरा महत्त्वाच्या विषयासंबंधाने होती, म्हणून माझ्या चांगली लक्षांत राहिली आहे. पी.एच डी. पदवीकरिता विद्यापीठाकडे पाठविलेल्या एका प्रबंधाचे तात्यासाहेब आणि मी दोघे परीक्षक होतों. पत्रद्वारें हें परीक्षणाचें काम करणें अशक्य नव्हतें, पण पुण्यास जाण्याचा योग लवकरच येण्याचा संभव असल्यामुळे समक्ष भेटीकरिता मीं तें राखून ठेवलें होतें. पुण्यास गेल्यानंतर प्रभात रोडवरील त्यांच्या बंगल्यांत मी त्यांना जाऊन भेटलों आणि प्रबंधासंबंधाने योग्य ती चर्चा केली. आताच मी जो आम्हा दोघांमधील संभाषणाचा गोषवारा सांगितला तो आमच्यामधील चर्चेच्या अखेरीचा भाग होय.

चर्चा संपवून मी आपल्या बिऱ्हाडीं परत जात असतां साहजिकच माझ्या मनांत झालेल्या चर्चेविषयी आणि त्यांत दिसून आलेल्या तात्यासाहेबांच्या स्वभाववैशिष्ट्याविषयी विचार घोळूं लागले. मुळांत तात्यासाहेबांचा कल माझ्या अभिप्रायाला तितकासा अनुकूल नव्हता. पण माझें व त्यांचें बरेच बोलणें झाल्यानंतर त्यांनी माझा अभिप्राय मान्य केला, फक्त आपण स्वतः लिहिलेला वर्णनात्मक मजकूर अभिप्रायाला प्रारंभीं जोडावा एवढाच आग्रह धरला. त्याला मीं अर्थातच मान तुकवली.

हा प्रसंग म्हणजे तात्यासाहेबांच्या प्रांजळपणाचे आणि समन्वय बुद्धीचें एक मोठें उदाहरण मी समजतों. कोणताहि विषय विचारासाठी पुढे आला तरी तात्यासाहेबांना त्याची चांगली–वाईट, उलट-सुलट, अनुकूल-प्रतिकूल दोन्ही बाजू अशा रीतीने दिसत असत की ठामपणें चांगलें किंवा वाईट असें एकान्तिक मत त्यासंबंधांत ठोकून देणें हें त्यांजकडून होत नसे. अर्थात आग्रहीपणा बहुधा नसेच. कोणचेंहि उदात्त तत्त्व किंवा उच्च ध्येय पुढे आलें की व्यवहारांत त्या तत्त्वाला करावे लागणारे अपवाद, घालावी लागणारी मुरड त्यांना आधी दिसत असे. त्यामुळे तात्कालिक परिस्थितींत व्यवहार्य ठरेल व सर्व पक्षांना झेपेल असा तडजोडीचा मार्ग सुचविण्याचा ते प्रयत्न करीत, त्यामुळे निर्भेळ ध्येयवाद्यांना व एकान्तिक तत्त्वनिष्ठांना केळकर हे तेजोभंग करणारे, पुढे जाणाऱ्यांचा पाय मागे खेचणारे आहेत असें पुष्कळदां वाटत असे. मला मात्र कधी तसें वाटलें नाही व अजूनहि वाटत नाही. ध्येयाच्या उच्च पातळीवरून कोणास मुद्दाम खाली

खेचावें असा त्यांचा हेतु नसे. श्रेष्ठ तत्त्व किंवा उच्च ध्येय संपूर्णपणे जो आचरणांत आणील तो परम वंद्य, हें केळकर प्रथमच कबूल करीत. पण ज्यांना एवढें उच्च उड्डाण झेपण्याजोगें नसेल त्यांनी भावनेच्या भरांत आंधळेपणाने उडी न घालतां आपणास झेपेल तेवढें ध्येय पालन करावें असें त्यांचें सांगणें असे. सर्वांचें भलें व्हावें, कोणीहि भलत्या भरीस पडून आपलें नुकसान करून घेऊं नये असें वाटावयास लावणारी जी सर्वांविषयीची कल्याण बुद्धि तीच त्यांच्या या व्यावहारिक उपदेशाच्या बुडाशीं असे, असें त्यांचीं पुष्कळ विषयांवरचीं मतें आणि त्यांनी प्रतिपादिलेलें व्यावहारिकतेचें तत्त्वज्ञान मला स्वतःला पटलेलें नसूनहि मी निखालस म्हणूं शकतों. " सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चिद्दुःखभाग्भवेत् " हें जें आपल्या आर्य संस्कृतीचें उदार तत्त्व आहे, त्याच्यासारखीच वृत्ति केळकरांची होती.

त्यांच्या समन्वयबुद्धीविषयीसुद्धा असेंच म्हणतां येईल. एकाच वस्तूचे चांगले व वाईट गुण आणि तिचे भिन्न भिन्न पैलू त्यांच्या विवेचक दृष्टीसमोर एकदम उभे राहत असत; त्यामुळे त्या वस्तूला निखालसपणे चांगलें किंवा वाईट म्हणणें त्यांच्याच्याने होत नसे. " असेंही असूं शकेल, किंवा तसेंही असूं शकेल " अशा प्रकारची शब्दयोजना त्यांच्या तोंडून पुष्कळ वेळां बाहेर पडे आणि ती क्वचित कांहीजणांच्या चेष्टेचा विषय होत असे. मुंबईच्या एका वर्तमानपत्राने पुष्कळ वर्षांपूर्वी केळकरांचें एक व्यंगचित्र काढून त्यांत दूर तळ्याच्या काठीं बसलेल्या एका प्राण्याला केळकर न्याहाळीत आहेत असें दाखविलें होतें. आणि खाली केळकरांच्या तोंडचें म्हणून वाक्य दिलें होतें—" उडाला तर कावळा आणि बुडाला तर बेडूक ". तराजूच्या पारड्याप्रमाणे दोन्ही बाजूंना आलटून पालटून झुकणाऱ्या त्यांच्या मनोवृत्तीची ही कुचेष्टा होती.

पण त्यांची ही दोलायित चित्तवृत्ति त्यांच्या डळमळीतपणाची किंवा विवेकहीनतेची दर्शक नसून त्यांच्या तारतम्यप्रधान वस्तुनिष्ठ अलिप्ततेची दर्शक होय असें मला वाटतें. अलिप्तवृत्तीच्या तत्त्वजिज्ञासु मनुष्याला " दृष्टं किमपि लोकेऽस्मिन्न निर्दोष न निर्गुणम् " ( या जगतामध्ये निर्दोष असें कांहीही नाही, त्याचप्रमाणे गुणरहित अशी कोणचीही गोष्ट नाही ). या सुभाषिताचा सर्वत्र प्रत्यय यावा हें स्वाभाविक नाही काय ?

आणि उच्च पातळीवरून व्यापक आणि निर्लेप दृष्टीने जीवनाच्या या विशाल

आणि सनातन प्रवाहाकडे पाहूं लागलें म्हणजे

‘ सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चिद्‌दुःखभाग्भवेत् ’

( सर्वांचें कल्याण होवो; कोणालाही दुःख न होवो )

आणि ‘ दृष्टं किमपि लोकेऽस्मिन्न निर्दोषं न निर्गुणम् ’ हीं दोनच तत्त्वें त्रिकालाबाधित आणि सर्वव्यापक होत अशी आपल्याला प्रतीति होत नाही काय ? पहिलें तत्त्व जीवनाचें ध्येय दर्शवितें आणि दुसरें तत्त्व वस्तुस्थिति दर्शवितें. अभय, अहिंसा, प्रेम, समता, सत्य इत्यादि तत्त्वें तरी काय अखिल जगताच्या कल्याणाकरिताच आहेत. तेव्हा व्यक्तीचें, समाजाचें व राष्ट्राचें दुःखविमोचन व सुखसंवर्धन हें ध्येय नजरेसमोर ठेवून जो प्रसंगविशेषीं सत्य, अहिंसा, न्याय, समता इ० तत्त्वांना मुरड घालावी असें म्हणतो तो खरा अलिप्त दृष्टीचा तत्त्वज्ञ होय असें आपणास म्हणावेसें वाटेल.

तात्यासाहेब केळकर हे असे अलिप्त दृष्टीचे तत्त्वज्ञ होते की नाही, याची चिकित्सा आपल्याला येथे करावयाची नाही. सर्वांविषयीची हितबुद्धि त्यांच्या मनांत जागृत असे आणि इतरांचें भलें व्हावें यासाठी आपल्या हातून होईल तेवढी मदत ते करीत असत एवढें मी निभ्रांत सांगूं शकतों.

यो न हृष्यति न द्वेष्टि न शोचति न कांक्षति ।

अशा कोटीच्या जवळपास पोचलेले ते स्थितप्रज्ञ पुरुष होते की नाही, असा प्रश्न उपस्थित करणें निरर्थक आहे. त्यांची थोरवी आजमावण्यासाठी असल्या खोल आध्यात्मिक चिकित्सेंत शिरण्याची कांही जरूरी नाही.

परस्पर भिन्न किंवा परस्पर विरोधी गोष्टींचा समन्वय साधण्याची वृत्ति आणि एकान्तिक तत्त्वनिष्ठेला व्यावहारिकतेची मुरड घालण्याची वृत्ति या तात्यासाहेबांच्या उपजत वृत्तींचें आताच वर्णन केलें. यावरून स्वतःच्या मतांचा आग्रह त्यांच्या अंगीं मुळींच नव्हता, असें अनुमान काढल्यास तें बरोबर होणार नाही. मामुली प्रश्न किंवा सर्वसाधारण सार्वजनिक कार्य ते समन्वयाच्या व तडजोडीच्या मार्गाने निकालांत काढीत हें खरें. पण महत्त्वाच्या केंद्रभूत प्रश्नासंबंधी त्यांना ठाम मतें नव्हतीं असें कधीच म्हणतां येणार नाही. महत्त्वाचे राजकीय प्रश्न व धोरणें या संबंधाने त्यांचे ग्रह व अभिप्राय निश्चित असत व त्याबाबत त्यांच्या ठायीं आग्रहीपणाही भरपूर असे. एक प्रसंग मला अद्याप चांगला आठवतो. तो काळ १९३०-३१ च्या सुमाराचा असावा. कांही वाङ्मयात्मक योजना घेऊन मी

त्यांच्याकडे सल्ला घेण्यासाठी व साहाय्य मागण्यासाठी गेलों होतों. वेळ संध्याकाळची होती व बोलणें लवकर पुरें होईल असें दिसत नव्हतें. तेव्हा ते मला म्हणाले, "असं करा, तुम्ही जेवायला इथंच थांबा. तुमच्या योजनेविषयी आता शक्य तितकें बोलूंच. पण जेवण झाल्यावरहि पाहिजे तितका वेळ बोलत बसूं. म्हणजे तुमच्या मागे जेवणासाठी घरीं जाण्याचा वेध राहणार नाही व आपणाला निर्वेधपणे वाटाघाट करतां येईल." त्यांच्या सूचनेचें पडतें फळ मीं मोठ्या खुशीने झेललें. योग्य वेळीं आम्ही जेवायला गेलों. त्यांचे चिरंजीव व इतर एक दोघे पंक्तीला असल्यामुळे माझ्या कामासंबंधाचा विषय मी जेवतांना काढला नाही. गप्पागोष्टी सर्व काळीं, सर्व स्थळीं, सर्वांना पुरण्याजोगा विषय जो राजकारण त्यावर चालू झाल्या. जें बोलणें झालें त्याचा तपशील मला आता आठवत नाही. पण कांग्रेसच्या त्या वेळच्या राजकारणाविषयी स्वतः तात्यासाहेब किती चिडीने व त्वेषाने बोलत होते तें मला अद्याप चांगलें आठवतें आहे. लाहोर कांग्रेसमध्ये झालेला स्वातंत्र्याचा पुकारा, त्यानंतर गांधीजींना प्रदान केलेलें सर्वाधिकारित्व, कौन्सिलांतल्या स्वराज्य पक्षाच्या सभासदांस राजीनामे देण्याबद्दल झालेली आज्ञा इत्यादि गोष्टींवर तात्यासाहेब कडाडून बोलले असें मला त्या वेळचें स्मरण आहे. "तुम्ही आपलें म्हणणें A.I.C.C. समोर खुलासेवार कां मांडलें नाहीं?" असें कुणीतरी विचारलें. "जिथे यच्चयावत् सर्व जणांनी बुद्धि, तर्क, प्रामाणिकपणा यांना रजा देऊन एका माणसाच्या बोलण्याला माना डोलवायच्या अशी परिस्थिति आहे तिथे कितीही कंठशोष केला तरी काय उपयोग? तर्काला, सारासार विवेकाला कांही अवकाश असेल तर मग साऱ्या गोष्टी." हें बोलत असतांना रागाने आरक्त झालेला तात्यासाहेबांचा चेहरा माझ्या नजरेसमोर अद्याप दिसतो आहे.

तात्यासाहेबांनी दिलेल्या या जोरकस अभिप्रायाविषयी किंवा एकंदरीने त्यांच्या राजकीय मतप्रणालीविषयी आपल्याला येथे चर्चा करावयाची नाही. मुद्दा इतकाच की सर्वसाधारणपणे तडजोड, समन्वय आणि विरुद्ध बाजूचेंहि गुणग्रहण यांकडे त्यांची प्रवृत्ति असली तरी कित्येक महत्त्वाच्या बाबतींत त्यांचे अभिप्राय व ग्रह अगदी ठाम आणि तीव्र असत. यासाठी आधार खाजगी संभाषणाचाच घ्यायला नको. विशिष्ट व्यक्ति व मतें याविषयीचे त्यांचे तीव्र अभिप्राय व त्यांना वाटणारी चीड त्यांच्या लेखांमधूनही भरपूर दाखवून देतां येईल.

...लय, ठाणें.
अनुक्रम ......... विः ...................
क्रमांक ... ......


तात्यासाहेबांच्या चिडखोरपणाविषयीही बराच प्रवाद आहे. मेनका नाटकामुळे तें किती चिडले याचा पुरावा वाङ्मयांत चिरस्थायी झालेला आहे. माझ्या आणि त्यांच्या संबंधांत ते मजवर एकदा खूप चिडले होते. त्याची मला चांगली आठवण आहे. मी सुरू करणार असलेल्या नवभारत ग्रंथमालेसंबंधी त्यांची सल्ला व मदत घ्यावी या हेतूने मी त्यांना भेटत होतों. प्रारंभी सर्व कांही सुरळीत झालें व सर्वप्रकारें मदत करण्याचें त्यांनी आश्वासनहि दिलें. नंतर कोणत्या तरी कारणाने त्यांचा असा ग्रह झाला की मी त्यांच्याशीं प्रतारणा केली, ही मी काढलेली योजना आहे असें त्यांना खोटेंच भासविलें. अर्थात् ते माझ्यावर खूप चिडले. मी त्यांना वस्तुस्थिति नीटपणे समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. तो बऱ्याच अंशीं सिद्धीस गेला. अखेरीस ते मला म्हणाले, "तें प्रकरण आता संपलें. आता त्या संबंधांत पुन्हा बोलणें काढूं नका."

त्यांचा तथाकथित चिडखोरपणा हा त्यांच्या प्रांजळपणाचाच एक आविष्कार होय असें मी समजतों. सार्वजनिक कार्यांत वावरणारे आणि विशेषतः पुढारी मानले गेलेले लोक कोणी सामान्य मनुष्य त्यांच्या मर्जीविरुद्ध वागला म्हणजे रागावत नसतील असें थोडेंच आहे? पण बरेचजण आपला राग मनांत ठेवतात; आणि बोलण्यांतला गोडपणा कायम ठेवून कृति करण्याचा प्रसंग आला म्हणजे मात्र मर्जीविरुद्ध जाणाऱ्या त्या बिचाऱ्या माणसाचें नुकसान करतात. तात्यासाहेब केळकरांचा प्रकार असा नव्हता हें खास. त्यांना कोणाच्या वागण्याचा राग आला तर ते लगेच त्याला झाडून टाकीत; मनांतलें किल्मिष मनांत ठेवून बाह्यात्कारीं गोडवेपणा करणें हें त्यांच्या स्वभावांत नव्हतें.

सुळके, कडे, दऱ्या, खोरीं कपारी यांनी भरलेला अखिल महाराष्ट्राचा कणा असलेला सह्याद्रिपर्वत जसा आम्हांला आवडतो त्याप्रमाणेच एवंगुणविशिष्ट तात्यासाहेब आम्हांला आवडत. पुण्यास गेलों म्हणजे एकवार त्यांना भेटून घटकाभर त्यांच्याशीं गप्पा करून आलों म्हणजे मनाला बरें वाटे. निरनिराळ्या विषयांवरचे त्यांचे प्रांजळ व साफ दृष्टीचे अभिप्राय ऐकून विचाराला चालना मिळे. तात्यासाहेबांचा आणि माझा 'सहवास' म्हणजे एकत्र राहणें असें कधीच झालें नाही. त्यांच्या व माझ्या वयामध्येही अंतर पुष्कळच म्हणजे तीस वर्षांचें. तथापि १९२३ सालापासून निरनिराळ्या निमित्तांनी त्यांचा व माझा संबंध पुष्कळच आला. 'मयूरकाव्यविवेचन' हा माझा पहिला प्रबंध त्यांनी मुद्दाम

मला निरोप पाठवून वाचण्याकरितां मागून घेतला व त्याचें त्यांनी फार मोठें कौतुक केलें. त्यांतील कांही भाग 'केसरी' मध्ये प्रसिद्ध करून त्याचा प्रभावी पुरस्कार केला. त्यांना माझ्या लिखाणाविषयी वाटणारें कौतुक मयूरकाव्यविवेचनाला त्यांनी लिहिलेल्या प्रस्तावनेंत व्यक्त झालें आहे. त्यानंतर १९३१ सालीं मी नवभारत ग्रंथमाला सुरू केली, त्यावेळीं त्यांचा माझा पुष्कळच घनिष्ठ संबंध आला. कांही गैरसमज निर्माण झाले, तरी हें एक उपयुक्त वाङ्मयकार्य आहे, याला आपण शक्य ती मदत केली पाहिजे ही जाणीव त्यांनी ढळूं दिली नाही. त्यामुळे नवभारत ग्रंथमालेला फार उपयोग झाला. हें त्यांचें मजवर मोठें ऋण आहे. एकंदरीने लेखक म्हणून आणि भाषेच्या व समाजाच्या सेवेचें एक कार्य करणारा म्हणून पुढें येण्याच्या बाबतींत तात्यासाहेबांची जेवढी मला मदत झाली तेवढी नात्याच्या व्यक्तींखेरीज इतर कोणाचीही झाली नाही हें सत्य हा स्मरण-मणिहार त्यांना वाहत असतां त्यांत शेवटचा मणि म्हणून गुंफून देणें मला अवश्य वाटतें.

● ● ●

आकाशवाणी, नागपूर, २६-६-५२

प्रसिद्धि, 'तरूण भारत' नागपूर, ३०-६-१९५२.

१६

# मराठ्यांच्या सैन्याची उभारणी व रचना

आजच्या अणुबॉंब, हैड्रोजन बॉंब, रॉकेटस इत्यादि शस्त्रास्त्रांच्या काळांत मराठेशाहीच्या काळांतील युद्धपद्धतीचा विचार करणें फार मनोरंजक ठरेल. सहा वर्षांपूर्वी काश्मिरावरील आक्रमणाच्या प्रसंगीं केवळ कांही तासांच्या अवधीमध्ये आपल्या राष्ट्रीय सेना चारशे मैलांचें अंतर तोडून श्रीनगरमध्ये जाऊन उतरल्या व त्यांनी काश्मीरचा बचाव केला हें आपणास माहीत आहे.एकशे साठ वर्षांपूर्वी मराठ्यांचे सेनापति परशुरामभाऊ पटवर्धन यांनी टिपूवरील स्वारीच्या प्रसंगीं धारवाडपासून श्रीरंगपट्टणापर्यंत अडीचशे मैलांचा पल्ला पावणेदोन महिन्यामध्ये गाठला, या जलद गतीबद्दल इतिहासकोविद दत्तोपंत आपटे यांनीं परशुरामभाऊंची पाठ थोपटली आहे. एकंदर युद्धपद्धतीमध्ये केवढी क्रांति झाली आहे हें यावरून दिसून येईल. ही क्रांति शस्त्रास्त्रें व युद्धसाहित्य यांमध्ये जशी झाली आहे, तशीच सैन्याची उभारणी, रचना व पूर्वतयारी यांमध्येहि झाली आहे.

मराठ्यांचें सैन्य असें म्हटलें म्हणजे शिवाजीमहाराजांनी ज्या राज्याची स्थापना केली आणि दुसऱ्या बाजीरावाने ज्या राज्याचें उदक इंग्रजांच्या हातावर सोडलें, त्या राज्याचें सैन्य, असा अर्थ आपल्या मनांत येतो. आपल्या या महाराष्ट्र देशांत फार पूर्वीं राष्ट्रकूट, चालुक्य शिलाहार, यादव इत्यादि घराण्यांचीं राज्यें झालीं व त्यानंतर अहमदनगरची निजामशाही व विजापूरची आदिलशाही ह्या मुसलमानी बादशाह्या झाल्या. ह्या राज्यांचीं व बादशाह्यांचीं

सैन्यें ही वास्तविक एका अर्थानें मराठ्यांचींच सैन्यें होतीं. पण त्यांना कोणी मराठ्यांचीं सैन्यें म्हणत नाहीं. मराठा हें नांव त्या वेळीं तितकें प्रचारांत नव्हतें. अर्थात् आपल्याला जो विचार करावयाचा आहे तो पुण्यश्लोक शिवछत्रपतींने स्थापिलेल्या राज्यांतल्या सैन्याचाच, यांत कांही शंका नाही. स्वराज्यसंस्थापक शिवाजीमहाराजांनी ज्या सैन्याची उभारणी केली, प्रौढप्रताप पेशव्यांच्या अमदानींत ज्याने अटकेपर्यंत झेंडे नाचविले आणि सरदारांच्या धुमश्चक्रीच्या पायीं जे मोडकळीस आले, त्या मराठी सैन्याची अंतर्गत रचना व संघटना कशी होती, त्यांत वेळोवेळीं कसकसे बदल होत गेले यांचेंच आपणांस अवलोकन करायचें आहे. हें सैन्य कांही काळ विजयी झालें तें कां आणि तें अपेशी ठरलें तें कां, याचेंहि ज्ञान आपणाला या अवलोकनावरून होईल.

अर्थात हें तर खरेंच कीं शिविजीमहाराजांनी जें सैन्य उभारलें तें कांही एकदम भुईतून वर आलें नव्हतें, किंवा आकाशांतून पडलेलें नव्हतें.

महाराष्ट्राची पूर्वीची लढाऊ परंपरा, मराठी जनतेमध्ये मुरलेली वीरवृत्ति यांतूनच तें निर्माण झालेलें होतें, ही गोष्ट लक्षांत राहावी, एवढ्यासाठींच महाराष्ट्राच्या पूर्वेतिहासाचा मी कांही क्षणांपूर्वीं उल्लेख केला.

मराठ्यांच्या लढाऊ सामर्थ्याची संघटना करतांना महाराजांनी जनतेमधील वीर वृत्तीचा व लढाऊ परंपरेचा ज्याप्रमाणें उपयोग करून घेतला त्याप्रमाणें या संघटनेस मारक ठरणारे असे जे अवगुण मराठी जनतेमध्ये होते त्यांचें उच्चाटन करण्याचाहि त्यांनी यत्न केला. मराठी जनतेमधला मोठ्यांत मोठा स्वभावदोष म्हणजे ' वतनाचा लोभ' पेशवाईच्या उत्तरार्धांत होऊन गेलेल्या मोरोपंत कवीने या वतनाच्या आसक्तीला उद्देशून 'करिति जतन वतन, पतन मत न भल्याला तथापि ते वरिती' असा मोठा मार्मिक उद्गार काढला आहे. शिवाजीच्या उदयापूर्वी मराठी प्रदेशांत देशमुख देशपांडे पाटील इत्यादि वतनदार सर्वत्र सत्ताधीश होऊन बसले होते. हे वतनदार जवळ फौजफाटा बाळगीत आणि परस्परांमध्ये कलह करीत. देशावर राज्य कोणाचेंहि होवो त्याला मानाचा मुजरा करण्यास यांची तयारी असे; यांचें वतन तेवढें कायम राहिलें म्हणजे झालें. शिवाजी महाराजांच्या राजनीतीचें मार्मिक वर्णन करणारा आज्ञापत्रकार या वतनदारांची कडक शब्दात हजेरी घेतो. "राज्यांतील वतनदार, देशमुख, देशकुलकर्णी, पाटील आदिकरुन यांस वतनदार म्हणून म्हणावें, ही प्राकृत परिभाषा मात्र आहे. ते

स्वल्पच परंतु स्वतंत्र देशनायकच आहेत··· हे लोक म्हणजे राज्याचे दायादच आहेत ... जंव जंव नूतन संपादावें व बळकट व्हावें, बळकट झालें म्हणजे एकाचें घ्यावें, दावेदरवडे करावे, हा यांचा सहज हव्यास ... परचक्र आलें म्हणजे वतनाच्या आशेनें अगोदरच सलूख करितात...इकडचा भेद तिकडे करून राज्यांत शत्रूचा प्रवेश करितात." शिवाजीचा सर्वांत जुना बखरकार कृष्णाजी अनंत सभासद यानेहि वतनदारांविषयी अशाच धर्तीचे उद्गार काढले आहेत. जात-कुळीच्या अभिमानाचें ओझें वाहणाऱ्या मोरे, घोरपडे, निंबाळकर इ. जुन्या वतनदार घराण्यांशीं शिवाजीला किती निकराचा झगडा करावा लागला हें आपणास माहीतच आहे. तानाजी मालुसरे, येसाजी कंक यांच्यासारखे सामान्य लोक शिवाजीने आपल्याभोवती गोळा केले. त्याचें धर्मरक्षणाचें ब्रीद ओळखून सर्व सामान्य जनता आपण होऊन त्याच्याकडे आकर्षित झाली. या सर्वसामान्य जनतेंतूनच त्याने लढवय्ये, वीर, सेनापति, सेनासंघटक निर्माण केले. मोरोपंत पिंगळे, अण्णाजी दत्तो, तानाजी मालुसरे, येसाजी कंक, नेताजी पालकर, कडतोजी गुजर असे कितीतरी वीरमणि त्याच्या तालमींत घर्षणसंस्कार होऊन तेजाने तळपूं लागले.

तेव्हा वतनदार आणि वतनदारी यांना बाजूला सारून आपल्या साक्षात हुकमतीखाली नेहमी राहणारें खडें सैन्य शिवाजीने निर्माण केलें, हा त्याच्या लष्करी कर्तबगारीचा सर्वांत मोठा विशेष होय. सतराव्या आणि अठराव्या शतकांत युरोपमध्ये सरंजामशाहीचा अस्त होऊन एकतंत्री राज्यसत्ता असलेलीं इंग्लंड, फ्रान्स, स्पेन इ. राष्ट्रें निर्माण झालीं. व त्यांनी केव्हाहि युद्धास तयार असलेलीं खडीं सैन्यें उभीं केलीं. शिवाजीचा प्रयत्न हा तशाच प्रकारचा होता. त्याने मराठ्यांचें राष्ट्र निर्माण केलें व त्याच्या रक्षणासाठी सदोदित सज्ज असलेलें लष्कर उभारलें.

शिवाजीने उभारलेल्या लष्कराचे सभासदाने सांगितल्याप्रमाणे तीन विभाग होते. चौथा विभाग आरमाराचा तो आपण सध्या बाजूला ठेवूं. बाकीचे तीन विभाग म्हणजे गड, लष्कर व हशम हे होते. गड म्हणजे किल्ला, लष्कर म्हणजे घोडदळ किंवा घोडेस्वारांचें सैन्य आणि हशम म्हणजे पायदळ. गड किल्ले यांना शिवाजीच्या संरक्षण योजनेंत फार महत्त्वाचें स्थान होतें. 'संपूर्ण राज्याचें सार तें दुर्ग' असें आज्ञापत्रकार म्हणतो. सभासदानेहि गडावरील संरक्षण

योजनेला आपल्या वर्णनांत पहिलें स्थान दिलें आहे. तो म्हणतो—" जे जे गड घेतले त्या गडांवर राजियाने कारभारी बंदोबस्ती ऐसी पद्धत घातली की गडावरि हवालदार एक व सरनोबत एक असे तिघेजण एका प्रतीचे, त्यांस कारखाननीस म्हणून कारभारी केला. त्याचे विद्यमाने सर्व कारखाने यांस जमाखर्च लिहावा. गड तोलदार आहे तेथे त्या गडाचा घेरा थोर, त्या जागां सात पांच तट सरनोबत ठेवावे. त्यास तट वाटून द्यावे—हवालदार व सरनोबत मराठे जातिवंत ठेवावे. सबनीस ब्राह्मण ठेवावे व कारखानीस प्रभु ठेवावे. असे एकास एक प्रतिमेळ ठेवावे. याप्रमाणे नवी पद्धत घातली. "

सभासद बखरींतील या उताऱ्यावरून गडाचा बंदोबस्त किती काळजीपूर्वक केला जात असे, हें तर दिसून येईलच—खेरीज शिवरायाच्या धोरणी मुत्सद्दे-गिरीचा आणखी एक साक्षात्कार होईल. निरनिराळ्या जातींचा समन्वय करण्याचें सर्वसंग्राहक धोरण या योजनेंत उत्कृष्ट रीतीने व्यक्त झालें आहे.

यानंतर लष्करांतील अत्यंत महत्त्वाचा भाग जें घोडदळ त्याचा विचार येतो. मराठ्यांच्या सैन्यांत घोडदळास फार महत्त्व होतें. प्रारंभापासून गनिमी काव्याची जी लढण्याची पद्धत मराठ्यांनी अवलंबिली होती तिचे घोडें हें आवश्यक व अपरिहार्य अंग होतें. हलकें व सुटसुटीत सामान चपळ घोड्यावर लादून मराठा घोडेस्वार लांबच्या मजला मारून शत्रूला चकित करीत असे. चपळ आणि सदा तत्पर अशा घोडदळामध्येंच मराठी सैन्याचें शक्तिसर्वस्व साठविलेलें होतें. या घोडदळाच्या संबंधांत दोन तीन शब्द नेहमी वापरण्यांत येतात त्यांचें स्पष्टीकरण येथे करणें जरूर आहे.

घोडदळाचा मूळ आधार म्हणजे घोड्यांची पागा. पागांचा उल्लेख मराठी इतिहासांत वारंवार येतो. "शिवाजीने पागेचें बळ तोलदार केलें," असें सभासद म्हणतो. तसेंच "पागांच्या तोलदारीखाली शिलेदार ठेवले. स्वतंत्र बंड कोणाचें चालेना. पागेमध्ये दर घोड्यासि बारगीर एक. पंचवीस बारगिरास मराठा धारकरी हवालदार एक केला. पांच हवाल्यांचा एक जुमला, दहा जुमल्यांचा एक हजारी अशा पाचां हजारियामिळोन एक पंचहजारी," याप्रमाणें घोडदळाच्या संघटनेचें कोष्टक सभासद देतो. असे जितकें पंचहजारी असतील तितक्या सर्वांवर सरनोबत म्हणजे सेनापति हा मुख्य अधिकारी. "ये जातीचा मामला पागेचा. तसे शिलेदाराकडे सुभे वेगळाले. तेहि सरनोबताचे आज्ञेंत" अशी शिलेदारांचीहि

व्यवस्था सभासदाने वर्णिली आहे. त्याचप्रमाणें कारकून, जासूद, हरकारे, यांचीहि संघटना सरनोबताच्या हाताखाली असे.

• घोडदळाचा अगदी प्राथमिक घटक बारगीर. बारगीर आणि शिलेदार या मराठी लष्करी इतिहासांत सर्वत्र दिसणाऱ्या दोन मूलभूत घटकांचें स्वरूप आपण समजावून घेतलें पाहिजे.

सरकारने किंवा कोणा फौजी सरदाराने राखलेली जी घोड्यांची पागा, तिच्यांतील घोड्यावर स्वार होऊन सैन्यांत चाकरी करणारा तो बारगीर. नेमलेला तनखा फक्त घेऊन सैन्यांत नोकरी करणारा हा नोकर. स्वतःचें घोडें व हत्यारपात्यार बाळगून सरकारने सांगितल्यावेळीं लष्करी कामगिरीसाठी हजर होणारा तो शिलेदार. ह्यालाहि पगार किंवा लढाईच्या लुटींतला वाटा मिळत असे; पण घोडें व हत्यार सामान याचें स्वतःचें असल्यामुळे याची वृत्ति स्वतंत्र व बेलगामी बनत असे. हा वेळेवर हजर होईल की नाही व झाला तरी मालकाच्या हुकमाप्रमाणे वागेल की नाही याची शाश्वती नसे. त्यामुळेच "हुजरातींत शिलेदार एकंदर न ठेवतां लिहिलेप्रमाणे हुजरात सजवावी" असे स्पष्ट नापसंतीचे उद्गार आज्ञापत्रकाराने काढले आहेत.

घोडदळाप्रमाणेच शिवाजीने मावळे हेरकरी वगैरे लोकांचें पायदळहि ठेवलें होतें. या पायदळाचा सरनोबत म्हणजे सेनापति येसाजी कंक हा होता. सभासद म्हणतो की शिवाजीचें पायदळ फक्त सात हजार व घोडदळ ४५००० होतें. पण तत्कालीन इंग्रज व डच निरिक्षकांनी लिहून ठेवलें आहे, त्यावरून शिवाजीचें पायदळ सैन्य यापेक्षा पुष्कळच जास्त होतें असें दिसतें.

शिवाजीने ही सैन्याची संघटना निर्माण केली तिचें मुख्य कळसूत्र राजाची एकतंत्री हुकमत हें होतें. 'राजा बोले आणि दळ हाले' ही म्हण शिवकालीन परिस्थितीस अक्षरशः लागू पडत होती. पण शिवाजीच्या अंतानंतर जी त्रिकट परिस्थिति उद्भवली तिच्या तडाख्याने हें मुख्य कळसूत्रच तुटून पडलें. त्या काळच्या सामाजिक विकसनाला अनुरूप अशी एकतंत्र राज्यव्यवस्था लोपून सरंजामी पद्धति त्याऐवजी अवतरली. ही पद्धति म्हणजे वतनदारीचीच सुधारून वाढवलेली आवृत्ति. प्रत्येक सरंजामदार हा आपापलें स्वतंत्र सैन्य ठेवूं लागला अर्थातच त्या सैन्याचा बेलगामी उपयोग करण्याची प्रवृत्ति निर्माण झाली.

याचे केवढे मोठे वाईट परिणाम मराठेशाहीच्या भवितव्यावर झाले, हें सांगण्याचा प्रस्तुत प्रसंग नाही, तो सर्व राजकीय इतिहासाचा विषय आहे. तरी सैन्य रचनेच्या दृष्टीने देखील या सरंजामी पद्धतीमध्ये घातुक प्रवृत्तींचा शिरकाव झाला व त्या उत्तरोत्तर वाढत गेल्या, असें आपणास दिसून येतें.

शिवाजीच्या नंतर, किंबहुना राजारामानंतर मराठेशाहीचें जें स्वरूप परिणत झालें त्यांत प्रथमच लक्षांत घेण्याजोगी गोष्ट अशी की गडकोटांचें महत्त्व फार कमी झालें. मराठ्यांच्या राज्याचा दूरवर विस्तार झाल्यामुळे एका अर्थी ही गोष्ट अपरिहार्य होती. घोडदळाची संघटना व रचना एकंदरींत पूर्वीसारखीच राहिली पण घोडदळामध्ये बारगिरांचें महत्त्व कमी लेखण्यांत येऊन शिलेदारांचें स्तोम बरेंच माजलें. त्यामुळें सैन्यांत बेलगामीपणा व बेभरंवशीपणा वाढीस लागला. पेशवाईच्या अखेरीस लावण्या रचणारे जे शाहीर झाले, त्यांनी या मिजासी व अक्कडबाज शिलेदारांनाच आपल्या लावण्यांचें नायक बनविलें आहे हें आपल्या लक्षांत येईल.

शिवाजीचा संचार डोंगराळ मुलखांत, दऱ्याखोऱ्यांमधून विशेष असल्यामुळे त्याच्या अमदानींत पायदळास बरेंच महत्व होतें. पण पुढे कवायती कंपूचा अवतार होईपर्यंत पेशव्यांच्या काळांत पायदळ अगदीं रोडावलें. सैन्याबरोबर बाजारबुणगे असत, तेंच काय तें पायदळ! स्वपक्षाचा जय झाल्यास मागाहून शत्रूची कापाकापी व लूट करण्याचें काम तें करीत असे. आपल्या पक्षाची हार होण्याचें किंचित चिन्ह दिसूं लागतांच पाठीला पाय लावून पळ काढण्याची कामगिरी तें सर्वांच्या अगोदर बजावीत असे.

पेशवे कालांत मराठी सैन्याची वाढ एकसारखी होऊं लागल्यामुळे आपल्या घरीं पागा तयार करण्याचा एक प्रतिष्ठित धंदाच बनला. कोणी सधन मनुष्याने पदरचा पैसा खर्चून अथवा ज्याच्या अंगांत कर्तृत्व असेल त्याने कर्ज काढून घोडे खरेदी करावे व बारगीर नोकरीस ठेवावे. त्याकाळीं मुलखगिऱ्या नेहमी चालू असल्यामुळे पागेच्या मालकास सरकारकडून किंवा कोणा सरदाराकडून बोलावणें येईच. तेव्हा पागेचा मालक आपली पागा घेऊन मोहिमेवर जाई. अंगांत कर्तृत्व व पराक्रम असेल तर तो प्रथम पथक्या, नंतर सरंजामदार व अखेर सरदार अशा पायऱ्यांनी चढत जाई.

घोडदळाच्या या अवाढव्य वाढीला पेशवाईच्या उत्तर काळांत एका निराळ्या गोष्टीने पायबंद बसला. ती गोष्ट म्हणजे गारदी व कवायती कंपूची योजना. या गारद्यांचा व कंपूचा समावेश पेशवे व त्यांचे सरदार यांनी आपल्या फौजेंत इंग्रज फ्रेंच इत्यादि युरोपीय आक्रमकांच्या अनुकरणाने केला. हे कवायती कंपू अस्सल मराठी सेनेच्या उभारणीच्या मुळावर आले व अखेर मराठेशाहीस ते घातकच ठरले असें इतिहास सांगतो.

आकाशवाणी, नागपूर २६-७-१९५४.

प्रसिद्धि लोकशक्ति पुणें, १२।१३-८-१९५४.

१७

# सरमा आणि पणि

## ( ऋग्वेदांतील एक कुतूहल )

ऋग्वेदाचीं संहिता म्हणजे बहुतांशीं यज्ञामध्ये देवतांचें आवाहन करण्यासाठीं करावयाच्या प्रार्थनांचा संग्रह. हें वर्णन सामान्यतः बरोबर आहे, पण या वर्णनाशीं न जुळणारीं अशीं थोडीशीं सूक्तें या संहितेंत आहेत. अशा कांही सूक्तांतून सामाजिक अथवा राष्ट्रीय घटनांचा, प्रसंगांचा उल्लेख झालेला आढळतो. हा उल्लेख इतका ओझरता व त्रोटक असतो की, त्यावरून निश्चित इतिहास तर कांही कळत नाही, पण कल्पना जागृत होऊन नाना तऱ्हेचे तर्क करण्यास अवसर मात्र सापडतो. ' सरमा–पणि सूक्त ' हें अशाचपैकी एक सूक्त आहे. ऋग्वेदाच्या दहाव्या मंडलामधलें हें १०८ वें सूक्त आहे. त्यांत ११ ऋचा अथवा श्लोक असून त्यांचें वृत्त त्रिष्टुभ् हें आहे.

रचनेच्या दृष्टीने हें सूक्त फार मजेदार व अर्थाच्या दृष्टीने अतिशय कुतूहल-जनक आहे. यांत सरमा आणि पणि यांचा संवाद आहे. एक ऋचा पणीची व एक ऋचा सरमेची याप्रमाणे आलटून पालटून शेवटपर्यंत आहे. १० वी व ११ वी या लागोपाठ दोन शेवटच्या ऋचा मात्र सरमेच्या आहेत. इतकीं पद्धत-शीर संवादात्मक रचना असलेलीं सूक्तें सबंध ऋग्वेद संहितेंत फारच थोडीं असतील. या रचनेवरून असें वाटतें की, हा संवाद त्या काळीं नाट्यरूपाने प्रत्यक्ष करून दाखवीत असावेत. तसें नाट्य या संवादांत भरपूर आहे. भारतीय

नाट्याचा हा वैदिक आर्यांच्या काळांत झालेला प्रारंभच होय असें मानलें तरी चालेल.

या संवादांतली ही सरमा कोण, आणि हे पणि म्हणजे तरी कोण? कल्पनेचें घोडें दामटायला चांगलाच विषय आहे हा. ज्या वेळीं हा संवाद रचला गेला त्या वेळीं सरमापणींचा वृत्तांत सर्वांना माहीत असेल; किंवा हा संवाद नाट्यरूपाने करून दाखवितांना एखादा सूत्रधार किंवा निवेदक आपल्या भाषेंत मागचा पुढचा कथाभाग आणि मधले दुवे सांगत असेल. तें सर्व जाऊन आता हा संवादाचा सांगाडा तेवढा उरला आहे. या संवादावरून जें काय दिसून येतें तें हें की, पणि नांवाचे कोणी लोक होते—एक जमात होती किंवा राष्ट्र होतें म्हणा पाहिजे तर—त्यांच्याजवळ खूप गायी, घोडे व इतर संपत्ति होती. ती त्यांनी इंद्राजवळची लुटून नेलेली असो अथवा त्यांनी स्वतः संपादन केलेली असो. ती संपत्ति मिळविण्याच्या इच्छेने इंद्राने सरमेला आपली दूती म्हणून पाठविलें. सरमा ही रसा नांवाची मोठी बिकट नदी पार करून पणींच्याकडे गेली. तिने चांगलींच जरबेचीं व दमदाटीचीं भाषणें करून आपला सर्व खजिना इन्द्राला देण्याबद्दल पणींना सांगितलें. पणींनी मोठीं गोडीगुलाबीचीं व लाघवीपणाचीं भाषणें करून सरमेला आपल्या बाजूला वळवून घेण्याचा प्रयत्न केला. पण सरमा मोठी वस्ताद व जहांबाज. इंद्र स्वतः येऊन तुम्हांला लोळवील; अयास्य, आंगिरस, नवग्व इत्यादि ऋषि येऊन तुमचें कांडात काढतील, तेव्हा बऱ्या बोलाने न्यायनीतीला अनुसरून गायी वगैरे संपत्ति आमच्या स्वाधीन करा आणि आपलें चंबूगबाळें आवरून दूरदेशीं निघून जा असें ती पणींना अखेरचें बजावते. परराष्ट्राशीं बोलणीं करण्यास पाठविलेल्या निष्ठावंत व खंबीर राजदूताचा आदर्श नमुना सरमेमध्ये आपल्याला दिसतो.

ऋग्वेदाचे भाष्यकार सायणाचार्य यांचें या सरमापणि-कथेसंबंधाने काय म्हणणें आहे तें आपण पाहूं. "इंद्राचा पुरोहित बृहस्पति याच्या गायी, वल नांवाच्या असुराच्या पदरीं असलेल्या पणि नामक लढवय्या असुरांनी पळवून नेल्या व त्या गुहेमध्ये दडवून ठेवल्या तेव्हा बृहस्पतीने इंद्राला प्रेरणा केल्यावरून इन्द्राने गायींचा शोध लावण्याकरिता सरमा नांवाच्या देवांच्या कुत्रीला पाठविलें. ती मोठी नदी तरून जाऊन वलाच्या नगराप्रत प्राप्त झाली आणि गुप्त ठिकाणीं ठेवलेल्या त्या गायी तिने पाहिल्या. दरम्यान पणींना ही हकीकत कळली व

त्यांनी सरमेला आपल्या बाजूला वळवून घेण्याच्या उद्देशानें तिच्याशीं संभाषण सुरू केलें. ''

सायणाचार्यांनी सांगितलेली ही हकीकत ब्राह्मण ग्रंथांतील त्रोटक उल्लेखांवर आधारलेली दिसते. पण आधुनिक वैदिक संशोधकांच्या लक्षांत ही गोष्ट आलेली आहे की ब्राह्मणें रचलीं गेलीं त्याच वेळीं संहितेंतील मंत्र फार जुने झाले असून त्यांतील कित्येकांचा अर्थ कळेनासा झाला होता. बिचाऱ्या सरमेला या लोकांनी कुत्री कां बनविलें हें समजण्यास मार्ग उरला नाही. तसेंच पणि हे वल नामक असुराच्या पदरचे योद्धे होते असें म्हणण्यास या सूक्तांत कांही आधार दिसत नाही. पणि आणि सरमा या दोहोंचा उल्लेख ऋग्वेद संहितेंत अन्यत्र आलेला आहे. त्यावरून असें दिसतें कीं हे मोठे धनवान् परंतु निर्दय व कृपण असे लोक होते, निदान वैदिक आर्यांना तरी ते तसे वाटत असत. एखादादुसऱ्या पणीला चांगला म्हटलेलें क्वचित् आढळेल. पण एकंदरीनें पणि या जमातीबद्दल किंवा राष्ट्राबद्दल संहिता रचणाऱ्या वैदिक आर्यांना तिरस्कार वाटत होता हें उघड दिसतें. 'धनवान परंतु सोमरस न देणाऱ्या पणीबरोबर इंद्र सख्य जोडीत नाही, त्याला नग्न करून मारतो,' असा ऋग्वेदाच्या चवथ्या मंडलांत एके ठिकाणीं उल्लेख आहे. दुसऱ्यां एका ठिकाणीं, 'जिथे कशाचेंहि ज्ञान होणार नाही अशा घनदाट अंधकारांत पणींना खितपत पडूं दे,' अशी वामदेव ऋषीनें उषेची प्रार्थना केली आहे. भरद्वाज ऋषी तर याहिपेक्षा पलीकडे जाऊन पूषा नामक देवतेची प्रार्थना करितो की, 'हे पूषन्, पणीचें हृदय करवतीनें कापून आमच्या स्वाधीन कर.'

ऋग्वेदांतल्या अशा तऱ्हेच्या उल्लेखांवरून पणि हे व्यापारी वृत्तीचे, गाई घोडे, धनदौलत यालाच आपलें सारसर्वस्व समजणारे चिक्कू लोक असावेत असा एक अंधुक प्रकाश मनावर पडूं लागतो. लढाऊ वृत्तीच्या वैदिक आर्यांना त्यांच्याविषयी तिरस्कार वाटत असावा आणि जमलें तर सामोपचारानें, नाहीतर त्यांच्यावर स्वारी करून त्यांचा खजिना लुटून आणावा, असा त्यांनी बेत केला असावा. हा बेत पार पाडण्याच्या कामीं सरमा नामक मुत्सद्दी महिलेनें मोठी कामगिरी बजावली असली पाहिजे. पांचव्या मंडलाच्या ४५ व्या सूक्तांत सरमेनें जी कामगिरी केली तिचा उल्लेख आहे. त्यावरून असें दिसतें की सरमेनें मोठें

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. ...
अनुक्रमांक 33263 वि: ...
क्रमांक 93 ... नोंद दि. 23/5/02


धाडस करून पणींच्या गाई वगैरेंचा पत्ता लावला आणि अंगिरा कुलांतील नवग्व वगैरे ऋषींनी १० महिनेपर्यंत युद्ध करून पणींच्या गाई वगैरे दौलत लुटून घेतली.

लढाऊ राष्ट्र आणि व्यापारी राष्ट्र यांच्यांत वैर उत्पन्न होऊन लढाऊ राष्ट्राने व्यापारी राष्ट्राला नेस्तनाबूद केल्याचीं कांही उदाहरणें प्राचीन इतिहासांत आढळतात. रोम आणि कार्थेज यांच्यामधील अहिनकुलवत् विरोध सुप्रसिद्ध आहे. कार्थेज हें व्यापारी राष्ट्र होतें, रोमचे लोक लढवय्ये होते. त्यांना कार्थेजचा उत्कर्ष सहन न होऊन त्यांनी ते राष्ट्र साफ बुडवून टाकलें. त्याच्याहिपूर्वी कित्येक शतकें फिनीशियन हे कुशल वणिक आणि महान् दर्यावर्दी लोक होते पण ग्रीक लोकांनी त्यांना नामशेष केलें. तसाच प्रकार पणि आणि वैदिक आर्य यांच्यामध्ये कशावरून झाला नसेल ?

किंबहुना कांही संशोधकांनी असें म्हटलेंसुद्धा आहे कीं, पणि म्हणजे फिनीशियन लोक. आपल्याकडे प्रसिद्ध संशोधक राजारामशास्त्री भागवत यांनी ही कल्पना प्रथम मांडली. वैदिक आर्य हिंदुस्थानांत येण्याच्या पूर्वी त्यांचा व पणींचा कुठे तरी संघर्ष आला असावा. रसा ही बहुधा मध्य आशियांतील आरल समुद्रास मिळणारी ऑक्सस या नावाने सध्या प्रसिद्ध असलेली नदी असावी. तेथून वैदिक आर्यांनी पणींना पिटाळून लावलें. पुढे आर्यांची एक शाखा इराणांत गेलीं तेव्हा तेथूनहि हे पणि उर्फ फिनीशियन पश्चिमेकडे ढकलले गेले. अखेर भूमध्य समुद्राच्या काठीं त्यांनी आपलें बस्तान बसवलें. अशी कल्पना करणें शक्य आहे.

ऋग्वेदांतील उल्लेखांवरून सुचणाऱ्या कांही कल्पनांचा इथे फक्त निर्देश केला. या किंवा अशाच कांही कल्पनांच्या आधाराने पणीसंबंधीच्या वैदिक उल्लेखांची छाननी करून संशोधन करणें शक्य आहे. परंतु त्यांत न शिरतां आपण सरमा आणि पणि यांच्या संवादाचें जरा तपशीलवार अवलोकन करूं. पणींचा लाघवीपणा आणि सरमेचा सणसणीतपणा याच्या सामन्याची मौज अनुभवूं.

सरमेला पाहून पणि विचारतात---

किमिच्छन्ती सरमा प्रेदमानड् दूरे ह्यध्वा जगुरिः पराचैः ।
कास्मेहितिः का परितक्म्यासीत् कथं रसाया अतरः पयांसि ॥ १

"कशाची इच्छा धरून सरमा इथे आली आहे? वाट मोठी लांब आणि घोटाळ्याची. आमच्यापाशी तुझें काय ठेवलें आहे? एवढी यातायात कशासाठी? रसा नदीचें पाणी कसें ओलांडलें?"

पणींच्या प्रत्येक मुद्याला सरमा रोखठोक उत्तर देते :—

इन्द्रस्य दूतीरिषिता चरामि मह इच्छन्ती पणयो निधीन्वः ।

अतिष्कदो भियसा तन्न आवत् तथा रसाया अतरं पयांसि ॥ २

"इंद्राची दूती, त्यानें पाठविलेली, म्हणून मी हिंडतें आहे, तुमचीं मोठीं मांडारें हस्तगत करण्याची माझी इच्छा आहे. नदी ओलांडू लागलों, त्या भयामुळे नदीच्या पाण्याने आमचें रक्षण केलें. अशा रीतीने मीं नदी ओलांडली."

यावर पणि गोडबोलेपणाने आपलें जाळें पसरूं पाहतात :—

कीदृङ् इन्द्रः सरमे का दृशीका यस्येदं दूतीरसरः पराकात् ।

आ च गच्छान्मित्रमेनादधाम अथा गवां गोपतिर्नो भवाति ॥ ३

"सरमाबाई, ज्या इन्द्राची दूती म्हणून इतक्या लांबून तुम्ही आलांत तो आहे तरी कसा हो? त्याची आकृती दिसण्यात कशी काय आहे? त्याने स्वतःच इथे यावें, आम्ही त्याच्याशी मैत्री जोडूं, आमच्या गायीचा मालक तोच होइल."

पणींच्या या गळेपडूपणावर सरमाबाईचें तडाखेबाज उत्तर पहा :—

नाहं तं वेद दभ्यं दभत् स यस्येदं दूतीरसरं पराकात् ।

न तं गूहन्ति स्रवतो गभीरा हता इंद्रेण पणयः शयध्वे ॥ ४

"ज्याची दूती म्हणून मी लांबून इथे आलें तो इंद्र कधी दडपला गेलेला मला माहीत नाही. उलट तोच इतरांना दडपील. अथांग नद्या देखील त्याला अडवूं शकणार नाहीत. तेव्हा हे पणींनो, त्याच्याकडून मारलें जाऊन तुम्ही रणांत शयन कराल."

असेंच आणखी उत्तर प्रत्युत्तर झाल्यानंतर पणि जरा स्पष्टपणाने आपलें म्हणणें मांडतात :

अयं निधिः सरमे अद्रिबुध्नो गोभिरश्वेभिर्वसुभिन्यृष्टः ।

रक्षन्ति तं पणयो ये सुगोपा रेकु पदमलकमाजगन्थ ॥ ७

"सरमाबाई गाई घोडे आणि इतर धनदौलत यांनी भरलेला आमचा हा खजिना डोंगराच्या आंत दडवून ठेवलेला असून खबरदार पणींचा त्यावर कडक पहारा आहे. तेव्हा आपण या ठिकाणीं येण्याचा वृथा शीण घेतलात."

याप्रमाणे स्पष्ट सांगूनहि सरमा ऐकत नाही असें पाहिलें तेव्हा मोठी लालूच दाखवून तिला जाळ्यांत पकडण्याचा पणींनी यत्न केला —

एवा च त्वं सरम आजगन्थ प्रबाधिता सहसा दैव्येन ।
स्वसारं त्वा कृणवै मा पुनर्गा अप ते गवां सुभगे भजाम ।।९

"सरमाबाई, एवीतेवी देवांच्या आज्ञेनुसार भाग पडल्यामुळे, तुम्हीहि आलांच आहांत, तर तुम्हाला आपली बहीण मानतों आणि आमच्या दौलतीचा वाटा तुम्हांला देतों."

यावर सरमा जें अखेरचं सणसणीत उत्तर देते तें पाहण्याजोगें आहे—

नाहं वेद भ्रातृत्वं नो स्वसृत्वमिन्द्रो विदुरङ्गिरसश्च घोराः ।
दूरमित पणयो वरीय उद्गावो यन्तुमिनती ऋतेन ।

"मी भाऊपण जाणत नाही आणि बहिणीचें नातें समजत नाही. तें कसें असतें तें इंद्र आणि भयंकर आंगिरस हेच तुम्हाला दाखवितील. तेव्हा हे पणींनो शहाणपणाची गोष्ट म्हणजे तुम्ही इथून अगदी दूर चालते व्हा. न्यायनीतीला अनुसरून गायींना एकत्र करून आमच्या स्वाधीन करा."

आहे की नाही मोठा सुंदर आणि चटकदार हा संवाद! व्यापारी राष्ट्र आपल्या व्यवहारांचें धूर्त जाळें पसरून दूरच्या देशांची संपत्ति हरण करतें आणि अखेरीस त्यांना गुलाम करून सोडतें, याचा अनुभव ब्रिटीश राजनीतीच्या रूपाने आपल्याला अलीकडच्या काळांत येऊन चुकलेला आहे. 'गावः' म्हणजे केवळ गाई नव्हेत. संपत्ति, धनदौलत असाहि त्या शब्दाचा अर्थ होऊं शकतो. गेल्या तीनशें वर्षांत इंग्रजांच्या राष्ट्राने जें केलें तशाच प्रवृत्तीचें प्राचीन काळीं हें पणींचें राष्ट्र असेल. इन्द्र, आंगिरस इत्यादि त्यावेळच्या आर्य राष्ट्राच्या नेत्यांनी सरमेसारख्या मुत्सद्दी महिलेच्या साहाय्याने पणींचा यशस्वी प्रतिकार केला. ही कल्पना म्हणजे केवळ बुद्धिचापल्य असेल किंवा ऐतिहासिक सत्य असेल. संशोधकांच्या अभ्यासांतून काय काय निष्पन्न होईल तें होवो, त्याचें महत्त्व नाही असें मी म्हणत नाही; पण हजारो वर्षांपूर्वी एका राष्ट्राकडून दुसऱ्या राष्ट्राकडे शिष्टाई

करण्याकरिता गेलेल्या महिलेची त्या राष्ट्राच्या पुढाऱ्यांशीं झालेली बोलाचाली या नात्यानें या संवादाची चमक कांही न्यारीच आहे. रसिकाच्या हृदयाची पकड घेण्याचें सामर्थ्य त्याच्यांत आहे, असें आपणाला वाटल्याखेरीज खास राहणार नाही.

• • •

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम 33953 वि: ...
क्रमांक 93८८ नों दि 23/5/62

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 92394

REFBK-0012315

आकाशवाणी नागपूर, १९-५-१९५५;
प्रसिद्धि, ‘ केसरी ’ ११-९-५५ पुणें